मा. अध्यक्ष नगरपरिषद सातारा

सातारा नगरपरिषद
दिनांक: 19 OCT 2020
आवक: 5920200000010488
विभाग प्रमुख उपमुख्याधिकारी मुख्याधिकारी

# नगरपरिषद सातारा

# सातारा

# लेखा परीक्षण अहवाल

# 2018-2019

मा. मुख्याधिकारी पुढील कार्यवाही करण्यात यावी

सातारा नगर परिषद

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, सातारा

जिल्हा परिषद विस्तारित इमारत, दुसरा मजला

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नगरपरिषद सातारा यांनी 2018-2019 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा

लेखापरिक्षण अहवाल सन 2018-19

जा.क्र.स्था. 2 /जि.लेप.आ/न.प. सातारा/2018-19/४०७

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
न.प.सातारा यांचे कार्यालय,
दिनांक २५/०९/२०२०

प्रेषक,

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे.

प्रति,

मा. अध्यक्ष,
नगरपरिषद सातारा

नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा सन 2018-19 या वर्षाचे लेखापरिक्षण श्री. शार्दुल पाटील, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा, श्री. नितिन यादव, लेखापरीक्षा अधिकारी, श्री. एस. एस. चाकणे, श्री. द. आ. वाघमारे, सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, श्री. बा. प्र. ससाणे, श्रीमती क्रांती गायकवाड, श्री. मिलींद जगताप, वरीष्ठ लेखापरीक्षक, श्री. प्र. शं. घस, श्री. अ. ना. नाझीरकर, श्री. वि. गो. चांगण, श्री. विशाल सावंत, संदीप उंडे, इरफान मुलाणी, स्नेहल सावंत, निलम चौधर, तेजल पवार, कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा, यांनी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे नियम 4 अन्वये दिनांक २०/१/२०२० ते ७/३/२०२० या कालावधीत पूर्ण केले. पुनर्विलोकन श्री. शार्दुल पाटील, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा यांनी व अंतिमीकरण श्री. दि. रा. सूर्यवंशी, सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक २०/९/२०२० रोजी चर्चा करून अंतिमीकरण केले आहे.

लेखापरिक्षण कालावधीत खालील प्रमाणे अधिकारी व पदाधिकारी पंचायत समितीचा कारभार पहात होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती माधवी कदम | नगराध्यक्ष | 01/04/2018 ते 31/03/2019 |
| 2 | शंकर बबन गोरे | मुख्याधिकारी | 01/04/2018 ते 31/03/2019 |

(२५/९)
सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे

मुख्याधिकारी
सातारा नगर परिषद,सातारा.

M.M.Kadam
नगराध्यक्ष
सातारा नगर परिषद

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

I PART I :मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 2

नगरपरिषद सातारा ........ 2

PART II ........ 13

नगरपरिषद सातारा ........ 13

कलम ९ अ खालील आक्षेप ........ 14

1 अंदाजपत्रकातील कमी/जादा खर्चाबाबत. ........ 15

2 वार्षिक लेख्याबाबत. ........ 18

3 अंशदायी निवृत्ती वेतन योजना वर्गणीच्या रकमा वेळचेवेळी गुंतवणूक न केल्याबाबत. ........ 19

4 भविष्य निर्वाह निधी डे बुक शिल्लक व बृहतपत्रक शिल्लक यामधील तफावतींबाबत. ........ 19

5 भविष्य निर्वाह निधी शिल्लक कमी/जादा घेतलेबाबत. ........ 20

6 भविष्य निर्वाह निधी अग्रिम नियमबाहय अदा केलेबाबत. ........ 21

7 सन 2018-19 अनुदान निर्धारण न झालेबाबत. (शिक्षण मंडळ) ........ 22

8 नोव्हेंबर 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणेबाबत. (शिक्षण मंडळ) ........ 23

9 अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकाबाबत. (शिक्षण मंडळ) ........ 25

10 दिव्यांग व्यक्तीसाठी राखीव 5 टक्के निधीमधून केलेल्या खर्चाबाबत. ........ 25

11 कार्यवृत्तांत नोंदवहीतील अनियमिततांबाबत. ........ 27

12 रोजगार हमी कर व शिक्षण कर रक्कम शासनाकडे भरणा करणे व रिबेटबाबत. ........ 29

13 मागासवर्गीय दुर्बल घटक कल्याण सदरी केलेल्या खर्चाबाबत. ........ 30

14 अनुदान नोंदवही/बँक पासबुक/स्क्रोल/अनुदान आदेश व सन 2018-19 चे प्राप्त अनुदान विवरणपत्रे इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करणेबाबत. ........ 31

15 घसारा निधीबाबत ........ 32

16 अखर्चित निधी शासनास जमा करणेबाबत. ........ 33

17 भांडार विभाग कर्मचारी गणवेश व कापड खरेदी खर्चाबाबत. ........ 34

18 स्वच्छ महाराष्ट्र अभियानातून वैयक्तिक शौचालय बांधणेकरीता केलेल्या अनुदान वाटपाबाबत. ........ 35

19 विविध विभागांसाठी संगणक ऑपरेटर ठेका पध्दतीने नेमणेबाबत. ........ 40

20 प्रभाग क्रमांक 16 मधील महिला व मुलींना संगणक (MSCIT) चे प्रशिक्षण देणेबाबत. ........ 42

21 महिला बालकल्याणावर केलेल्या अत्यल्प खर्चाबाबत. ........ 44

22 आरोग्य विभागाकडील महिंद्रा ट्रॅक्टर 575 DLX (सरपंच) खरेदी करणेबाबत. ....45
23 नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या सफाई करणेबाबत ....46
24 चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना स्वच्छतेसाठी हत्यारे पुरविण्याबाबत. ....49
25 नवि (६) योजनेंतर्गत पेठ यादोगोपाळ आरक्षण क्रमांक 42 सिसन १३४अ, १३४ब येथे बगीचा विकसित करणे 50
26 अमृत योजने अंतर्गत सन २०१७-२०१८ चे मंजूर प्रस्तावानुसार बागबगीचा विकसित करणे. ....52
27 घनकचरा संकलन, कचरा वाहतूक, साफसफाई कामामधील अनियमितता ....54

**कलम ९ ब खालील आक्षेप** ....58

28 संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न झालेबाबत ....59
29 संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न झालेबाबत. (शिक्षण मंडळ) ....60
30 जादा वेतन अदा झालेबाबत. ....61
31 माजी सैनिकांसाठीच्या निधी अतर्गत केलेल्या CELL COUNTER मशिन खरेदीबाबत. ....66
32 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत. ....67
33 वेतन, सेवानिवृत्ती वेतन, सेवा उपदान व अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा केलेबाबत. ....71
34 वेतनामधून विशेष भत्ता अदा केलेबाबत. ....75
35 सेवा उपदान जादा अदा केलेबाबत. ....76
36 कास पंपींग स्टेशन चालविणे कामातील अनियमिततेबाबत. ....77
37 वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांबाबत. ....78
38 वेतन बँडमधील वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर रिमीत करण्याबाबतची कार्यवाही न केलेबाबत. ....79
39 पेठ 440 सदर बझार ते 442 सदर बझार रस्ते डांबरीकरण व गटर पाईपड्रेन करणे. ....80
40 प्रभाग क्रमांक 16 पेठ शनिवार सोमवार यादोगोपाळ अंतर्गत ठिकाणी पाईप ड्रेन करणे ....81
41 नगरपरिषद मालकीचे मंगल कार्यालय मक्ता पध्दतीने चालविणेस दिल्याबाबत. ....83
42 अतिक्रमण विभाग आणि मंडई विभाग मधील कमी जमा आणि डे बुक व जमा खतावणीत जमा नसलेबाबत. 84
43 रस्ता खुदाई परवानगी व फी वसुलीबाबत. ....86
44 आर्किटेक्ट नेमणेबाबत. ....88
45 कोटेश्वर मंदिर येथे पूल व अर्कशाळा येथील पुलाचे रुंदीकरण करणे ....89
46 पेठ शुक्रवार लोखंडे कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे ....91
47 सोनगाव कचरा डेपो येथे संरक्षक भिंत, केबिन वे ब्रिज कार्यालयीन इमारत स्टोअर्स रूम बांधणे. ....92
48 बुधवार नाका कब्रस्थान येथे विविध विकास कामे करणे ....94
49 सोनगाव कंपोस्ट डेपो SANITERY LANDFIELD साठी बांधकाम करणे. ....96
50 पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते कनिष्क मंगल कार्यालय अखेर रस्ता डांबरीकरण करणे ओव्हाळ हॉस्पिटल पिछाडी ते कुपर पूल अखेर गटर व पाईपलाईन करणे. ....99

51 सि.स.नं 492/493 पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते प्लॉट नं 36 ते ADV गोवेकर ते सावकार ते प्लॉट नं 2 अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण गटर पाईप लाईन करणे. ....101
52 प्रभाग क्रमांक 2 अंतर्गत ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे ....103
53 केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत हरित क्षेत्र विकसित करणे (सन 2016-2017 चे प्रस्तावानुसार) 105
54 पेठ सोमवार सिसन २२२/१ येथे दुसरा मजला बांधणे ....107
55 १८२२ रविवार पेठ येथे शॉपिंग सेंटर ईमारत बांधणे....109
56 76 मल्हार पेठ डॉक्टर यादव घर ते श्री पन्हाळे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे....111
57 सिसन ५१९ पेठ सदर बझार आयुर्वेदिक गार्डन येथे म्यूझिकल कारंजे बसविणे....112
58 स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीतून सार्वजनिक शौचालय विद्युतीकरणासाठी केलेल्या खर्चाबाबत....114
59 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विद्युतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत....116
60 सन 2017-18 तसेच सन 2018-19 मध्ये शहरातील महिला व मुलींना मबाक समितीतर्फे एमएससीआयटी व मोबाईल अॅपचे प्रशिक्षण देणेबाबत. ....120
61 वेलणकर बोळ ते पालकर घर (पॅट्रीट बोळ कॉर्नर) अखेर पाईपलाईन घालणे. ....123
62 आरोग्य विभागाकडील जेसीबी 2DX- 49 HP खरेदीतील अनियमिततेबाबत. ....124
63 स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीमधून स्वच्छ सर्वेक्षण 2018 अंतर्गत राजवाडा, गुरुवार परज-1 व 2 व सदरबझार या भागामध्ये ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे सफाई करणे. ....126
64 तुरटी ब्लिचींग पावडर खरेदीबाबत....128
65 प्रभागनिहाय रस्ते गटारे,मंडई ,गाळ काढणे साफसफाई इ.विविध कामांसाठी सेवापुरतणेबाबत अनियमितता 130
66 प्रभागनिहाय रस्ते गटारे,मंडई ,गाळ काढणे साफसफाई इ.विविध कामांसाठी सेवापुरवणेबाबत अनियमितता 132
67 भांडार विभागाकडील स्टेशनरी साठा नोंदवहीमधील रकमेच्या तफावतीबाबत. ....135
68 अतिक्रमण काढणेकामी केलेल्या खर्चाबाबत. ....137
69 अनधिकृत बांधकामांबाबत....137

**कलम ९ क खालील आक्षेप**....139

---------------- **निरंक** ---------------- ....140

**कलम ९ ड खालील आक्षेप**....142

70 राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना निमशासकीय आस्थापनेतरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागु करणेबाबत. ....143
71 चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रेनीसुट पुरविणेबाबत. ....144

72 आयकर कपाती शासन खात्यात वेळेत भरणा न केलेबाबत..........145
73 वाहन चालकाच्या सेवा पुस्तकातील उणिवांबाबत..........146
74 14 व्या वित्त आयोगाचा अनुदानातून केलेल्या मुदत ठेवींबाबत..........148
75 सर्वसाधारण रोकडवही नमुना क्रमांक 11 मधील नमुद बँकांच्या ताळमेळाबाबत..........150
76 अनामत नोंदवहीतील अनियमिततांबाबत..........150
77 लेखापरीक्षणास प्रमाणके उपलब्ध न केलेबाबत..........154
78 अपंग वाहन भत्ता फरक बिल अदा करणेबाबत..........155
79 रोकडवही व प्रमाणके ताळमेळाबाबत..........156
80 पावती पुस्तक साठा नोंदवही नमुना नंबर 116 बाबत..........157
81 शिल्लक कोरी पावती पुस्तके साठ्याबाबत..........158
82 वर्धापन दिनानिमित्त कर्मचारी/पदाधिकारी कौटुंबिक स्नेह भोजन पुरविणे..........159
83 स्थावर जिंदगी विभाग येथे मागणी केलेल्या अभिलेख्यांबाबत..........160
84 स्थावर जिंदगी विषयी आढळून आलेल्या त्रुटींबाबत..........161
85 दावे खटले नोंदवहीबाबत..........162
86 अतिक्रमण विभागाकडील पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत..........163
87 मोबाईल ठराव नोंदवही न ठेवलेबाबत..........165
88 आयकर रक्कम कपातीबाबत..........165
89 अग्निशमन विभागाकडील साहित्य खरेदीबाबत..........166
90 अग्निशमन विभागाकडील वाहनाचा पाणी वाटपासाठी केलेल्या वापराबाबत..........167
91 तसलमात नोंदवही व तसलमात रकमांबाबत..........168
92 वाहन क्रमांक एम.एच.11 8004 मध्ये वापरलेल्या इंधनाबाबत..........168
93 वाहन निर्लेखनाबाबत..........169
94 आरोग्य विभागाकडील 70 HP BACK HOE OADER खरेदीतील अनियमिततेबाबत..........170
95 आरोग्य विभागाकडील EICHER PRO 1080 TIPPER TRUCK खरेदीतील अनियमिततेबाबत..........172
96 स्वच्छ सर्वेक्षणासाठी आरोग्य विभागाने केलेल्या कामातील अनियमिततेबाबत..........173
97 नगरपरिषद शॉपींग सेंटर व अन्य गाळे मुदतबाहय भाडेपट्टयाबाबत..........173
98 करांची मागणी नोंदवही तसेच करांची पावती पुस्तके विहीत नमुन्यात न ठेवलेबाबत..........176
99 थकबाकीबाबत सन 2018-19..........178
100 कर वाढ व घट नोंदवहीबाबत..........180
101 संकलित कराच्या थकबाकीबाबत..........180
102 पाणी तपासणी फी रकमेबाबत..........182
103 पथदिवे देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत..........183

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र..........187

विवरणपत्रे व जोडपत्रे ........ १८४

I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

*नगरपरिषद सातारा*

भाग एक

नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा, जिल्हा सातारा

मागील लेखापरीक्षण अहवाल

प्रलंबित परिच्छेदांचे विवरणपत्र

मागील अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा.आयुक्त, पुणे विभाग यांचे कडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित परिच्छेद | पीआरसी परिच्छेद | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | 1951-52 | 21 | | 1 |
| 2 | 1954-55 | 8(अ) परिशिष्ट व, परिशिष्ट ड (6) | | 1 |
| 3 | 1955-56 | 7 परिशिष्ट (ब-14) | | 1 |
| 4 | 1956-57 | 1 | | 1 |
| 5 | 1959-60 | 16 परिशिष्ट (ब) (14 व 16) | | 2 |
| 6 | 1960-61 | परिशिष्ट क्रमांक 4, परिशिष्ट क्रमांक क, ब, 17 | | 1 |
| 7 | 1961-62 | 8 परिशिष्ट ब (5 व 28) 34 व 37(4) | | 2 |
| 8 | 1962-63 | 8 परिशिष्ट 10,11 | | 1 |
| 9 | 1963-64 | 6 परिशिष्ट (ब) (28,12)<br>4 परिशिष्ट (ब)(2,3,4,9) | | 2 |
| 10 | 1965-66 | 8,9,13,14 | | 4 |

## विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 18 | 41, 42 | | 86, 87, 88, 89, 90, 91, 92, 93 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 25 | 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57 | | |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | 58, 59 | | 103 |
| पाणी पुरवठा व मल निसारण | | 61 | | 102 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16 | 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40 | | 70, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84 |
| कर निर्धारण व संकलन | | | | 97, 98, 99, 100, 101 |
| आरोग्य | 22, 23, 24 | 62, 63, 64, 65, 66 | | 94, 95, 96 |
| माहिती आणि जनसंपर्क | 19 | | | |
| विधी विभाग | | | | 85 |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 27 | | | |
| भांडार | 17 | 67 | | |
| महिला व बालकल्याण विभाग | 20, 21 | 60 | | |
| अतिक्रमण विभाग | | 68, 69 | | |
| उद्यान विभाग | 26 | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | 1966-67 | 3,5,7,8, | | 3 |
| 12 | 1967-68 | 1 | | 1 |
| 13 | 1968-69 | 8,12,19,22 | | 4 |
| 14 | 1969-70 | 7,10,11,25 | | 4 |
| 15 | 1970-71 | 7,9,15,16,18,21,25,30अ | | 8 |
| 16 | 1971-72 | 7,9,12,13,14,15,16,17,18,19,20,27,29,31 | | 14 |
| 17 | 1972-73 | 9,10,12,13,14 | | 5 |
| 18 | 1973-74 | 7,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21(ब)(3) | | 14 |
| 19 | 1974-75 | 4,5,6,8,9(अ),10,11,12,13,14,15,16,17,20 | | 14 |
| 20 | 1975-76 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27 | | 25 |
| 21 | 1976-77 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17 | | 15 |
| 22 | 1977-78 | 3,4,5,6,7,8,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>21(अ) | | 28 |
| 23 | 1978-79 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26 | | 24 |
| 24 | 1979-80 | 3,4,5,6,,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33 | | 31 |
| 25 | 1980-81 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35 | | 33 |
| 26 | 1981-82 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, | | 30 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33 | | |
| 27 | 1982-83 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25(अ,ब,क),26,27,28,29,30,31,32,33,34,35, 36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51 | | 49 |
| 28 | 1983-84 ते 1984-85 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37, 38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71 | | 69 |
| 29 | 1985-86 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37, 38,39,40 | | 42 |
| 30 | 1986-87 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,25,26,27,28,29,30,31,32,33,34 | | 31 |
| 31 | 1987-88 ते 1989-90 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69 | | 67 |
| 32 | 1990-91 ते 1992-93 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,7 | | 73 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 2,73,74,75 | | |
| 33 | 1993-94 ते 1994-95 | 3,4,5,6,6अ,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42 | | 41 |
| 34 | 1995-96 ते 1998-99 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65 | | 63 |
| 35 | 1999-00 ते 2001-02 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81 | | 79 |
| 36 | 2002-03 ते 2003-04 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58 | | 56 |
| 37 | 2004-05 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25 | | 23 |
| 38 | 2005-06 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36 | | 34 |
| 39 | 2006-07 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38 | | 36 |
| 40 | 2007-08 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26 | | 26 |
| 41 | 2008-09 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21,22,23,24 | | 24 |
| 42 | 2009-10 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21,22,23,24,25 | | 25 |
| 43 | 2010-11 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21,22,23,24 | | 24 |
| 44 | 2011-12 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19 | | 19 |
| 45 | 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 19 |
| 46 | 2013-14 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21 | | 13 |
| 47 | 2014-15 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 21 |
| 48 | 2015-16 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 13 |
| 49 | 2016-17 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 13 |
| एकुण | | | | 1129 |

भाग पहिला (मागील लेखापरीक्षण)

नगरपरिषद सातारा सन 2018-19

मागील लेखापरीक्षण अहवालातील थकीत परिच्छेद मागील अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून

त्याबाबत मा. आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.

| लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | | एकुण परिच्छेद | पंचायत/नागरी स्वराज्य संस्थाच्या लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद व सांकेतांक क्रमांक | पंचायत/नागरी स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालनातील अंतर्भूत परिच्छेदांचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| | स्वनिधी | शासन निधी(केंद्र व राज्य) | | | |
| 1972-73 | 8 | - | 1 | - | - |
| 1976-77-78 | 62 | 7 | 2 | | |
| 1978-79-80 | 3,83 | 33 | 3 | | |
| 1980-81-82 | 5,26,34,35,37,81,82 | - | 7 | | |
| 1982-83-84 | 8,32,39,44,53,94,<br>106 | 37 | 8 | | |
| 1984-85-86 | 8,17,18 | - | 3 | | |
| 1986-87 | 15,66,82,102 | 13,14 | 6 | | |
| 1987-88-89-90 | 7,10,17,25,26,27,38,<br>51,66,102,145,188,<br>197,215, | - | 14 | | |
| 1992-93 | 26,27,32,45,70,71,<br>87,94,106(2) | 22 | 10 | | |
| 1996-97-98-99 | 5,10,17,23,25,30,31,<br>32,33,47,48,58,60,<br>93,104,109,121,145,<br>147,151,168,187,<br>198,200 | 9 | 25 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1999-00-01 | 16,44,55,64,69,71,<br>175,176,180,193,<br>206,221 | - | 12 | | |
| 2001-02-03 | 5,22,42,44,46,47,48,<br>54,92,97,103,105,<br>106,111,115,117,<br>128 | - | 17 | | |
| 2003-04 | 6,16(ब),18,22,44,46,<br>47,48,49,55,58,61,<br>70,77,82,84 | - | 16 | | |
| 2004-05 | 14,17,18,24,30,32,<br>34,36,50,56,57,65,<br>94,95,96,97 | - | 16 | | |
| 2005-06 | 5,6,19,20,23,25,38,<br>39,40,43,45,46,62,<br>76,81,89 | - | 16 | | |
| 2006-07 | 4,6,8,9,11,14,18,24,2<br>5,33,34,38,39,44,<br>45,46,47,49,51,55,<br>60,61,63,64,66,67,<br>69,71,73,74,75,77,<br>78,79,81,82,83,84,<br>86,87,92,93,94,95, | | 46 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| - | 99,100 | | | | |
| 2008-09 | 4,5,6,7,8,10,11,12,<br>13,15,16,17,21,22,<br>24,26,34,35,41,43,<br>44,45,46,47,52,53,<br>55,57,63,64,65,66,<br>71 | - | 33 | | |
| 2009-10 | 7,8,9,11,14,16,17,<br>20,22,23,25,26,27,<br>28,29,30,31,32,33,<br>34,36,39,40,42,43,<br>46,47,48,51.52,54,<br>55,56,58,59,60,61,<br>62,63,64,72,73,74,<br>75 | - | 44 | | |
| 2010-11 | 4,5,7,8,12,14,16,18,1<br>9,20,21,23,24,28,<br>33,34,35,36,37,40,<br>45,47,54,58,61,62,<br>66,67,69,71,72,73,<br>74,79 | 6 | 35 | | |
| 2011-12 | 3,4,5,6,8,9,10,11,13,<br>14,16,19,20,22,23, | 7 | 59 | 13 -<br>16 - | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 24,27,30,36,40,41, 44,45,46,47,48,49, 50,51,52,53,54,55, 57,58,60,61,62,63, 64,65,66,67,68,69, 71,74,75,77,79,80, 81,82,83,85,86,87, 88 | | | 46 - 79 - | |
| 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,1 1,12,13,14,15,16, 17,18,19,20,21,22, 23,24,25,26,27,28, 29,30,31,32,33,34, 35,37,38,39,40,41, 42,43,44,45,46,47, 48,49,50,51,52,53, 54,55,56,57,58,59, 60,61,62,63,64,65 | 36 | 65 | 12 - 13 - 24 - | |
| 2013-14 | 1,3,4,5,6,8,9,10,11, 12,13,14,15,16,18, 20,21,22,27,29,33, 34,35,36,38,39,40, 41,42,44,45,46,47, | 2,7,17,19,23,24, 25,26,28,30,31,32, 37,43,55,57,58,59, 61,69,70,76 | 82 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 48,49,50,51,52,53, 54,56,60,62,63,64, 65,66,67,68,71,72, 73,74,75,77,78,79, 80,81,82 | | | | |
| 2014-15 | 1,5,6,7,13,14,16,18,19,20,21,22,23,24, 25,26,28,30,35,36, 38,39,40,41,42,44, 45,46,48,49,50,51, 52,53,54,55,56,57, 58,59,60,61,62,63, 64 | 2,3,4,8,9,10,11,12, 15,17,27,29,31,32, 33,34,37,43,47 | 64 | | |
| 2015-16 | 1,2,3,4,5,8,9,10,11, 12,13,14,15,17,19, 20,21,22,24,25,28, 29,30,38,46,47,48, 49,50,52,54,56,57, 58,59,60,61,62,63, 64,65,66,67,69,70, 71,72,73 | 6,7,16,18,23,26, 27,31,32,33,34,35, 36,37,39,40,41,42, 43,44,45,51,53,55, 68 | 73 | | |
| 2016-17 | 2,4,5,6,7,8,9,10,11, 12,13,14,15,18,19, | 1,3,16,17,22,24, 25,26,27,28,29,30, | 90 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 20,21,23,31,32,33, 34,35,36,37,38,39, 40,41,42,43,44,45, 46,47,48,49,50,51, 52,57,58,59,60,61, 62,63,64,65,66,68, 69,70,71,72,73,75, 77,78,79,80,81,85, 87,88,89,90 | 53,54,55,56,67,74, 76,82,83,84,86 | | | |
| 2017-18 | 2,4,5,6,7,8,9,10,12, 13,14,16,17,18,19, 21,22,23,24,25,26, 27,29,30,32,33,35, 36,37,38,39,40,41, 44,45,46,47,48,50, 51,52,53,55,61,63, 64,66,67,68,69,70, 71,72,74,75,76,77, 78,80,83,84,85,86, 87,88,89,90,91,92, 94,95,96,97,99,100 | 1,3,11,15,20,28, 31,34,42,43,49,54, 56,57,58,59,60,62, 65,73,79,81,82,93, 98,101 | 101 | | |
| एकुण | | | 847 | | |

# Part II

## नगरपरिषद सातारा

## भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

# कलम ९-अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

लेखा

## 1 अंदाजपत्रकातील कमी/जादा खर्चाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| नगरपरिषदेने सन 2018-19 मधील अंदाजपत्रकात तरतुद केल्याप्रमाणे काही बाबींवर कमी जादा रकमा जमा व खर्च झालेल्या आहेत. तसेच मागासवर्ग व अपंगांसाठी योजनांवर अत्यंत कमी तरतुद करुन कमी खर्च केला आहे. अंदाजपत्रक तयार करतांना ते वास्तववादी होईल याची दक्षता घेतलेचे दिसून येत नाही. |
|---|

नगरपरिषद सातारचे सन 2018-19 चे अंदाजपत्रकाचे व नस्तीचे अवलोकन करता सन 2018-19 चे अर्थसंकल्पातील तरतुद व वार्षिक लेख्यांचा सारांश पाहता खालीलप्रमाणे आकडेवारी दिसून येते.

जमा बाजू उदाहरणादाखल –

| अ.क्र. | जमाबाब | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष प्राप्त | कमी प्राप्त | जादा प्राप्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एकत्रित कर | 120000000 | 82239292 | 37760708 | 00 |
| 2 | मत्तांपासून भाड्याचे उत्पन्न ( खुली जागा भाडे/इमारत भाडे इ.) | 12000000 | 8328397 | 3671603 | 00 |
| एकुण | | | | 41432311 | |

खर्च बाजू उदाहरणादाखल

| अ.क्र. | जमाबाब | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय प्रतिपूर्ती | 1000000 | 1180662 | 180662 | - |
| 3 | कार्यालयीन उपभोग्य वस्तूंची खरेदी स्टेशनरी फर्निचर | 475000 | 515825 | 40825 | - |
| 4 | दुरध्वनी | 450000 | 937611 | 487611 | - |
| 5 | वाहन भत्ता | 500000 | 515622 | 15622 | - |
| 6 | मोजणीफी | 100000 | 209000 | 109000 | - |
| 7 | अभियांत्रिकी सेवा/आर्किटेक्चर | 2000000 | 12722126 | 10722126 | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | योजनेची प्रसिध्दी | 700000 | 1632942 | 932942 | - |
| 9 | कर्मचारी निवासस्थाने | 500000 | 1660461 | 1160461 | - |
| 10 | वितरण नलिका देखभाल | 4500000 | 10955148 | 6455148 | - |
| 11 | रसायने खरेदी | 1000000 | 1392750 | 392750 | - |
| 12 | विद्युत साहित्य खरेदी | 50000 | 157084 | 107084 | - |
| 13 | स्वच्छ सर्वेक्षण | 00 | 1588328 | 1588328 | - |
| एकुण | | | | 22192559 | |

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 12 दिनांक 20/01/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न आल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त तपशिलाचे अवलोकन करता मालमत्तेपासून मिळालेले उत्पन्न/कर व संकिर्ण यापासून मिळणारे उत्पन्न अंदाजित रकमेपेक्षा कमी जमा झालेचे दिसून येते. तरी नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील तरतुदींचा जास्तीत जास्त काटेकोर वापर करुन उत्पन्न वाढविणेबाबत उपाययोजना करणे बाबत कार्यवाही करणे गरजेचे होते. एकत्रित करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे उद्दीष्ट केवळ 60 ते 70 टक्केपर्यंत साध्य झालेले असून जमेकडील जादा तरतुदीमुळे खर्चासाठी वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. यावरुन वास्तववादी अंदाजपत्रक तयार केलेले नाही असे दिसून येते.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ कलम ४१६ मधील निर्देशानुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील ३ वर्षाच्या जमा रकमेच्या तुलनेवर निश्चित मागणी असेलअशा करामधील/इतर स्त्रोतामधील अंदाजपत्रके मागील ३ वर्षाच्या प्राप्त रकमांची सरासरी किंवा वर्षाच्या मागणी अधिक वसुली योग्य थकबाकीची टक्केवारी यापैकी जे कमी असेल ते उत्पन्नाचे अंदाज असणे आवश्यक असताना नगरपरिषद सातारा ने मागील ३ आर्थिक वर्षातील म्हणजेच सन २०१५-१६ ,२०१६-१७ आणि २०१७-१८ मधील महसुली जमेची सरासरी ५२९७४०७३०/- इतकी असतानादेखील सन २०१८-१९ ची अंदाजपत्रकीय तरतुद ७६०१८०७०/- इतक्या रकमेने वाढवून ६०६७५८५००/- इतके जमेचे अंदाज दर्शविले असल्याचे दिसून आले जमा खर्च अहवालानुसार २०१८-१९ या वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमा हि ५०८५७३३८६/-इतकीआढळून आली.

3. नगरपरिषद संचालनालयाचा स्थायी निर्देश क्र ३२ दि १३ ऑक्टोबर २००० अन्वये अंदाजपत्रकातील विविध खर्चावरील व्याज परतफेडीसाठी मोठी तरतुद करून प्रत्यक्षात मात्र त्या वर्षी व्याजाची कोणतीही रक्कम भरली जात नाही हि बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे असे नमूद असतानादेखील नगरपरिषद सतारा ने महाराष्ट्र शासनाकडून घेतलेल्या कर्जावारती व्याज भरण्यासाठी अंदाजपत्रकात रु ४५०००००/- ची तरतूद केली असताना प्रत्यक्षात मात्र त्यावर कोणताही खर्च केल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले नाही.

4. नगरपरिषदेने आरोग्य विभागाकडील वाहन खरेदीसाठी आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये रक्कम रुपये ४६९६७३८.००/- इतकी खर्च केली आहे वास्तविक पाहता नगरपरिषदेने आरोग्य विभागाकडील वाहन खरेदीसाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केली नसताना उपरोक्त रक्कम खर्च केली असल्याने सदरची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च झाल्याचे दिसून आले.

5. सातारा नगरपरिषदेला आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेसाठी आलेल्या शासकीय अनुदानामधून नगरपरिषदेने २०,००,०००/- इतकी रक्कम वैशिष्ट्यपूर्ण योजना शिर्षाखाली वर्ग केली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेसाठी आलेल्या शासकीय अनुदान हे दलित वस्ती सुधार योजनेसाठीच वापरले जाणे आवश्यक असताना नगरपरिषदेनेतरतुदींशी सुसंगत कार्य केल्याचे आढळून आले नाही.

6. महाराष्ट्र शासन नगर विकास व आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी 1063/1630/प्र.क्र.22/93/नाविल दिनांक 20/12/1993 नुसार नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी नगरपालिकेच्या निव्वळ उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम ही कल्याणकारी योजनेवर खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेने सन 2018-19रक्कम रुपये 5046440/- इतका कमी खर्च केला आहे. उपरोक्त कमी खर्चाबाबत साधार कारणे स्पष्ट करुन आता पुढील वर्षी अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करुन कमी खर्चाचा तपशिल भरुन काढणेत येऊन पुर्तता दाखवावी.

| सन | बांधील खर्च वजा होणारे उत्पन्न | 5% होणारी रक्कम | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|
| 2018-19 | 116992544.00/- | 5849627.00/- | 803187 | 5046440 |

7. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक जि.इ.एन. १०९३/११९८/नवी/14 दिनांक 30/06/1993 नुसार नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी नगरपालिकेच्या निव्वळ उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम ही कल्याणकारी योजने वर खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेने सन 2018-19 रक्कम रुपये 5508005/- इतका कमी खर्च केला आहे. उपरोक्त कमी खर्चाबाबत साधार कारणे स्पष्ट करुन आता पुढील वर्षी अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करुन कमी खर्चाचा तपशिल भरुन काढणेत येऊन पुर्तता दाखवावी.

| सन | बांधील खर्च वजा होणारे उत्पन्न | 5% होणारी रक्कम | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|
| 2018-19 | 116992544.00/- | 5849627.00/- | 341622 | 5508005 |

8. महाराष्ट्र शासन नगर विकास शासन निर्णय दिनांक10/05/2018 नुसार निव्वळ उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम अपंगांसाठीचा खर्च करावयाचा आहे. तथापि नगरपरिषदेने सन 2018-19 मध्ये रक्कम रुपये 2428227/- इतका कमी खर्च केला आहे. याबाबत कागदोपत्री खुलासा करुन पुढील वर्षी योग्य तरतुद करुन अनुशेष भरुन काढणेत येऊन पुर्तता दाखवावी.

| सन | बांधील खर्च वजा होणारे उत्पन्न | 5% होणारी रक्कम | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|
| 2018-19 | 116992544.00/- | 5849627.00/- | 3421400 | 2428227 |

9. सन 2018-19 मधील मंजुर अर्थसंकल्पाचे अवलोकन करता जनेबाबत एकत्रित कर, शिक्षणकर, वृक्षकर, जागाभाडे इत्यादी बाबींवर अंदाजीत रकमेपेक्षा रक्कम कमी जमा झाली आहे. तरी रकमा कमी जमा अथवा वसुल का झाल्या नाहीत तसेच वसुलीबाबत कोणत्या उपाययोजना केल्याचा कागदपत्रांसह खुलासा करावा तसेच अप्राप्त अनुदानाबाबत पाठपुरावा करावा. नगरपरिषद साताराचे सन 2018-19 मधील मंजुर अंदाजपत्रकाचे अवलोकन करता वाहतुक भत्ता, वैद्यकीय प्रति पूर्ती, कार्यालयीन उपभोग्य वस्तुंची खरेदी स्टेशनरी, दुरध्वनी, वर्तमानपत्रे वाहनभत्ता, अभियांत्रिकी सेवा/आर्किटेक्चर फी, योजनेची प्रसिध्दी इत्यादी बाबींवर तरतुदीपेक्षा जादा खर्च केला असल्याचे दिसुन येते. अर्थसंकल्पातील तरतुद अपुरी पडत असल्यास सन 2013 सुधारीत लेखासंहिता अनुसार पुर्व विनियोजन केल्याशिवाय खर्च करता येत नाही. असे असताना नगरपरिषदेने उपरोक्त बाबींवर जादा खर्च केल्याने खर्चासाठी तरतुद करताना खर्चाच्या बाबींबाबत माहितीच्या आधारे नियोजन केल्याचे दिसुन येत नाही. याबाबत

साधार खुलासा करुन यापुढे जमा व खर्चाच्या शक्य तितक्या अचूक माहितीच्या आधारे वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.

लेखा

## 2 वार्षिक लेख्याबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : 00 नगर परिषद स्व- निधी :*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| 1. वार्षिक लेखे मुदतीत मंजूरीस्तव सादर केलेले नाहीत. |
| 2. तिमाही सुचना प्रसिध्द केल्याचे आढळले नाही. |
| 3. 31 जुलै पुर्वी गोषवारा संबंधितांना प्राप्त झाल्याची कागदपत्रे आढळून आली नाही. |

नगरपरिषद सातारा लेखापरीक्षण सन 2018-19 नगरपरिषदेने लेखे प्रसिध्द केले नाहीत. याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 12 दिनांक 20/01/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102(2) अन्वये वार्षिक लेखे पुढील वर्षाच्या 30 जुनच्या आंत नगरपरिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे असे असतांना नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.

2. अधिनियमाचे कलम 103 अन्वये तिमाही व वार्षिक लेखे निरीक्षणासाठी ठेवण्यात आल्याची सुचना स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत नमूद केले आहे. नगरपरिषदेने वार्षिक लेख्यांबाबत वार्षिक सुचना प्रसिध्द केली आहे. तथापि तिमाही सुचना प्रसिध्द केल्याचे आढळले नाही.

3. अधिनियमाच्या कलम 102(3) नुसार वार्षिक लेख्यांचा गोषवारा मा. संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई, मा. जिल्हाधिकारी, सातारा व मा. संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दिनांक 31 जुलै पुर्वी सादर करणे आवश्यक आहे तथापि सदर नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत कागदपत्रे प्राप्त झाली नसल्याने दिनांक 31 जुलै पुर्वी गोषवारा संबंधितांना प्राप्त झाल्याचे प्रमाणित होत नाही.

लेखा

### 3 अंशदायी निवृत्ती वेतन योजना वर्गणीच्या रकमा वेळचेवेळी गुंतवणूक न केल्याबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| नोव्हेंबर 2005 नंतर नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आली असून सदर योजनेकरीता नगरपालिकेने युको बँक सातारा येथे स्वतंत्र खाते सुरु केले आहे. कर्मचारी वर्गणीची पगारातून कपात केलेली 10 टक्के रक्कम व तेवढाच 10 टक्के नगरपालिकेचा हिस्सा प्रथम मुख्य निधीतून या खात्यावर विलंबाने जमा करण्यात येतो व या खात्यातील जमा रकमा उशिराने मुदत ठेवीत गुंतविल्या जातात. |

नगरपालिका सातारामध्ये नोव्हेंबर 2005 नंतर नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आली असून सदर योजनेकरीता युको बँक सातारा येथे स्वतंत्र खाते सुरु केलेले आहे. कर्मचारी वर्गणीची पगारातून कपात केलेली 10 टक्के रक्कम व तेवढाच 10 टक्के नगरपालिकेचा हिस्सा प्रथम मुख्य निधीतून या खात्यावर उशिराने जमा करण्यात येतो व या खात्यातील जमा रकमा उशिराने मुदत ठेवीत गुंतविल्या जातात. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 63 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीस वेतन अदा आल्यानंतर लगेचच अशा कपातीच्या रकमा व नगरपालिका हिस्सा त्वरीत या खात्यावर वर्ग करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरीक्षणात असे आढळून आले की, अशा रकमा वेळेत अदाईनंतर उशिराने या खात्यावर वर्ग केल्या जातात. पर्यायाने या रकमा मुदत ठेवीत गुंतविण्यास विलंब होतो तरी वर्गणी कपातीच्या व नगरपालिका हिश्याच्या रकमा वेळेवर वर्ग न करण्याची कारणमिमांसा स्पष्ट करुन अशा रकमा यापुढे वेळोवेळी वर्ग करण्याची दक्षता घेण्यात यावी.

या योजनेच्या बँक खात्यावर वर्ग केल्यानंतरही रकमा त्वरीत मुदत ठेवीत अथवा इतर आकर्षक व्याज मिळेल अशा योजनेत गुंतविल्या जात नाहीत. सन 2018-19 जमा केलेल्या वर्गणीच्या रकमा एकदाही गुंतवणुक केलेल्या नाहीत. दिनांक 31/3/ 2019 अखेर सदर बँक खाती रक्कम रुपये 18316981/- शिल्लक आहे. पर्यायाने नगरपालिकेच्या व्याजाचे नुकसान होत आहे तरी अशा रकमा त्वरीत मुदत ठेवीत गुंतविण्यात याव्यात व या योजनेसाठी बँक खात्याचे फ्लेक्सी (FLEXI) डिपॉझिट खात्यात परिवर्तन करण्यात यावे. म्हणजे अशा कर्मचाऱ्यांना जितके व्याज द्यावे लागेल तेवढेच नगरपालिकेस मिळणेची शक्यता अधिक आहे. अन्यथा नगरपालिकेस स्वतःच्या निधीतून असे व्याज द्यावे लागेल तरी याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

लेखा

### 4 भविष्य निर्वाह निधी कॅश बुक शिल्लक व वृहतपत्रक शिल्लक यामधील तफावतीबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| भविष्य निर्वाह निधी डे बुक शिल्लक व वृहतपत्रक शिल्लक यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. |
|---|

सातारा नगरपरिषद सातारा सन 2018-19 लेखापरीक्षणात भविष्य निर्वाह निधी डे बुक व वृहतपत्रक यांची तपासणी केली असता दिनांक 31/3/2019 अखेर शिल्लक रकमेमध्ये मोठया प्रमाणात तफावत आहे. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 29 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 64 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. वृहतपत्रक शिल्लक – रक्कम रुपये 36009055/-
2. डे बुक शिल्लक - रक्कम रुपये 11290318.45

---

तफावत रक्कम रुपये 24718737.45

वृहतपत्रक शिल्लक रकमेपेक्षा डे बुकला कमी शिल्लक असणे ही गंभीर स्वरुपाची बाब असून याबाबत भविष्यात कर्मचाऱ्यांची देणी देणेची वेळ आल्यास त्याबाबतचे प्रयोजन नगरपालिका प्रशासनाने केलेली नसल्याचे दिसून येते. सबब गुंतवणुका डे बुक शिल्लक व वृहतपत्रक शिल्लक समान येईल याची यापुढे दक्षता घेणेत यावी.

लेखा

### 5 भविष्य निर्वाह निधी शिल्लक कमी/जादा घेतलेबाबत.

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| भविष्य निर्वाह निधीची शिल्लक कमी/जादा घेतलेने वृहतपत्रक व खाते नोंदवही अद्ययाबत नोंदीसह परिपुर्ण करणे आवश्यक आहे. |
|---|

1. सातारा नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही व बृहतपत्रकांची तपासणी केली असता सन 2017-18 ची अखेरची शिल्लक सन 2018-19 मध्ये सुरुवातीची शिल्लक घेतांना खाली नमूद केल्याप्रमाणे कर्मचारी खाती कमी/जादा घेतल्याचे दिसून येत आहे. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 65 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सन 2017-18 ची अखेरची शिल्लक | सन 2018-19 ची सुरुवातीची शिल्लक | तफावत कमी |
|---|---|---|---|---|
| 1 | सविता रामचंद्र दुर्वे | 282840 | 228840 | 54000 |
| 2 | शहाजी मारुती वायदंडे | 31351 | 30151 | 1200 |
| 3 | बाळकृष्ण सोपान माने | 77402 | 55802 | 21600 |
| एकुण | | 391593 | 314793 | 76800 |

वर नमूद केलेप्रमाणे कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही बृहतपत्रक सुरुवातीची शिल्लक कमी/जादा घेतलेची तफावत दिसून येते. उपरोक्त तफावत कोणत्या कारणास्तव दिसून येते. याबाबत साधार खुलासा करुन योग्य ती व्याज परिगणना होणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे वार्षिक तेरजेत तफावत येत असून ज्या कर्मचाऱ्यांच्या खाती शिल्लक कमी/जादा होते त्यांच्या खातेमधील शिल्लक दुरुस्त करुन बृहतपत्रकामधील वार्षिक एकुण एकंदर शिल्लक अचुक असलेबाबत लेखे अद्यावत करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

लेखा

## 6 *भविष्य निर्वाह निधी अग्रिम नियमबाह्य अदा केलेबाबत.*

80

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार नियम 13 पोटनियम (3) नुसार कार्यवाही केलेली नाही. |

1. सातारा नगर परिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या भविष्य निर्वाह निधी अग्रिम प्रमाणकांची तपासणी केली असता याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 66 दिनांक 17/02/2020 अन्वये

खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार नियम 13 पोटनियम (3) नुसार पुर्वी घेतलेल्या अग्रिमाच्या किमान 12 हप्ते किंवा त्या अग्रिमाचा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल या शर्ती शिथील करुन टीप क्रमांक 2 नुसार वर्गणीदाराला वर्षातून एकदा अग्रिम होण्यात मुभा देण्यात येईल असे असतांना खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना वर्षातुन दोन ते तीन वेळेस नियमबाह्य अग्रिम देणेत आलेले आहे.

| क्रमांक | नांव | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | देविदास बा. चव्हाण | 10/4/2018 | 20000 |
| | | 4/7/2018 | 20000 |
| | | 31/10/2018 | 25000 |
| 2 | उत्तम दि. कांबळे | 16/5/2018 | 10000 |
| | | 9/1/2019 | 9000 |
| | | 31/3/2019 | 20000 |
| 3 | अरुण म. जाधव | 25/7/2018 | 200000 |
| | | 21/9/2018 | 10000 |
| | | 25/1/2019 | 25000 |
| 4 | बाबु वि. शेलार | 10/4/2018 | 40000 |
| | | 26/6/2018 | 15000 |
| | | 27/12/2018 | 15000 |
| 5 | राजेंद्र दे. मोहिते | 11/5/2018 | 10000 |
| | | 29/8/2018 | 3000 |
| | | 9/1/2019 | 10000 |
| 6 | बाळु द. भिसे | 25/4/2018 | 25000 |
| | | 29/8/2018 | 10000 |
| | | 9/1/2019 | 10000 |
| एकुण | | | 477000 |

वर आक्षेपात नमूद केलेल्या नियमानुसार कार्यवाही होणे अपेक्षित असतांना तसे झाल्याचे दिसून येत नाही. यापुढे नियमानुसार अग्रिम देणेची दक्षता घ्यावी.

शिक्षण मंडळ

***7 सन 2018-19 अनुदान निर्धारण न झालेबाबत. (शिक्षण मंडळ)***

00

**लेखापरीक्षण वर्ष** : **2018-2019**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

अनियमितता कलम : 93

नगरपरिषद शिक्षण मंडळ साताराचे सन 2018-19 चे अनुदान निर्धारण मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचेकडून करुन घेतले नाही.

सन 2018-19 चे अनुदान निर्धारण शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडून झालेले नाही. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 73 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा, जिल्हा सातारा चे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात असे दिसून आले की, शिक्षण मंडळाचे सन 2018-19 या वर्षाचे अनुदान निर्धारण मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडून करुन घेणे आवश्यक असतां नगरपरिषद शिक्षण मंडळाने तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. याबाबत समर्पक खुलासा व्हावा.

तरी सन 2018-19 चे अनुदान निर्धारण करुन घेऊन मान्य अमान्य रकमांचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

शिक्षण मंडळ

8 नोव्हेंबर 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणेबाबत. (शिक्षण मंडळ)

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 93*

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31/10/2005 अन्वये दिनांक 01 नोव्हेंबर 2005 किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजनेऐवजी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31/10/20185 अन्वये दिनांक 01 नोव्हेंबर 2005 किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजनेऐवजी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेऐवजी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना

लागु करण्यात आली आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना महाराष्ट्र नागरी सेवा योजना निवृत्ती वेतन नियम 1982 व महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी योजना यांच्या तरतुदी दिनांक 1/11/2005 किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या खाली नमुद कर्मचाऱ्यांबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 71 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शिक्षक/कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री/श्रीमती) | नोकरीत नियुक्त दिनांक |
|---|---|---|
| 1 | चैताली दिलीपराव देशमुख | 1/7/2009 |
| 2 | सुरेश रामचंद्र चिखले | 4/7/2009 |
| 3 | मसाळ विरेंद्र दादा | 27/8/2009 |
| 4 | निराबाई कोंडीबा कदम | 1/9/2009 |
| 5 | डफळ शीतल विठ्ठल | 21/7/2010 |
| 6 | सुर्यवंशी अश्विनी बबन | 26/7/2010 |
| 7 | घोडके राजेंद्र आसाराम | 26/7/2010 |
| 8 | आरुढे कमल देवराम | 26/7/2010 |
| 9 | जगताप पोर्णिमा किसन | 26/7/2010 |
| 10 | खेडकर संतोष आश्रुबा | 27/7/2010 |
| 11 | कापसे अविनाश विजयकुमार | 27/7/2010 |
| 12 | ढेरे शंकर महावीर | 1/8/2010 |
| 13 | पवार भरत तानाजी | 2/8/2010 |
| 14 | उभे अर्चना सुभाष | 15/1/2007 |
| 15 | खेडकर अश्विनी बाजीराव | 1/10/2010 |
| 16 | वंदना शिवाजी तावरे | 1/3/2014 |
| 17 | दिपाली मस्कु मोरे (रावडे) | 28/7/2010 |
| 18 | प्रज्ञा नामदेव जरग | 15/7/2010 |
| 19 | विद्या साहेबराव महाडिक | 13/2/2009 |
| 20 | सफिना शब्बीर नालबंद | 1/7/2009 |
| 21 | सुमैय्या उस्मान महाफुले | 1/7/2009 |
| 22 | सय्यद जावेद अर्शद | 13/8/2010 |
| 23 | फिरोदास प्रवीण जफर मोहियोद्दीन शेख | 9/4/2014 |
| 24 | सुमैया बेगम अब्दुल रशीद पठाण | 9/5/2014 |
| 25 | उजमानाजनिन मोहम्मद नलीम | 9/9/2014 |
| 26 | मोहीम प्रकाश नलावडे | 1/2/2016 |

शिक्षण मंडळ

## 9 अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकाबाबत. (शिक्षण मंडळ)

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 02

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| शिक्षक व शिक्षकेतर वेतन सेवानिवृत्ती वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा कमी/जादा खर्च केला आहे. |
|---|

नगरपरिषद शिक्षण मंडळ साताराचे लेखापरीक्षात अंदाजपत्रकाची तपासणी केली असता खाली नमुद केलेप्रमाणे मंजुरर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा कमी/जादा खर्च केला आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | आर्थिक तरतुद | खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक व शिक्षकेतर वेतन | 43602000 | 43285826 | 316174 |
| 2 | सेवानिवृत्ती वेतन | 39687000 | 35755415 | 393185 |
| एकुण | | | | 709359 |

उपरोक्तबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 70 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सेवानिवृत्ती वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 393185/- एवढा कमी खर्च केला आहे. कमी खर्चाबाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.
2. शिक्षक व शिक्षकेतर वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 316174/- कमी खर्च झाला आहे. कमी केलेल्या खर्चाबाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.

भांडार/आस्थापना

## 10 दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव 5 टक्के निधीमधून केलेल्या खर्चाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3421400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3421400.00/-

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.43/16/नवि-28 दिनांक 14/11/2017 मधील निर्देशानुसार रक्कम अखर्चित रहाणार नाही याची दक्षता घेतलेली नाही.
2. शासन परिपत्रकातील निर्देश क्रमांक 6 नुसार निधीचा आढावा माहे मे, ऑगस्ट, नोव्हेंबर व फेब्रुवारी महिन्याच्या 15 तारखेपर्यंत घ्यावा व त्याचा अहवाल नगरविकास विभागास सादर केलेला नाही.
3. दिव्यांगांसाठीच्या विविध 18 योजनांसाठी सदर निधी खर्च करतांना अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार प्राधान्य द्यावे असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
4. नगरपरिषद ठरावानुसार रोख रक्कम दिलेल्या लाभार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र नस्तीसोबत आढळून आले नाही.
5. वित्त विभाग शासनाने निर्णय क्रमांक विअप्र1068/प्र.क्र.70/2008 विनीयमन दिनांक 15 मे 2009 मधील तरतुदींच्या अधिन खरेदी करुन द्यावेत. असे असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.
6. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 28/10/2015 नुसार अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय/साहित्य खरेदी करण्यासाठी निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात NEFT/RTGS द्वारे जमा करण्याची तरतुद असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात दिव्यांग व्यक्तींसाठी एकुण राखीव निधी रक्कम रुपये 3600000/- पैकी रक्कम रुपये 3421400/- खर्च केल्याचे दिसून येते. सदर खर्चातील उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 57 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.43/16/नवि-28 दिनांक 14/11/2017 मधील निर्देश क्रमांक 3 नुसार सदर निधी इतरत्र वळवता किंवा अखर्चित ठेवता येणार नाही असे असतांना रक्कम रुपये 3600000-3367500 = 232500/- इतकी निधी अखर्चित राहिला आहे,

2. तसेच उपरोक्त शासन परिपत्रकातील निर्देश क्रमांक 6 नुसार सदर निधीचा आढावा माहे मे, ऑगस्ट, नोव्हेंबर व फेब्रुवारी महिन्याच्या 15 तारखेपर्यंत घ्यावा व त्याचा अहवाल नगरविकास विभागास सादर करावे असे असतांना तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही व संपुर्ण रक्कम 30 मार्च रोजी खर्ची पडल्याचे प्रमाणकावरुन दिसून येते. सदर कार्यवाही नियमानुसार झालेली नाही.

3. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20 दिनांक 28 ऑक्टोबर 2015 मध्ये नमुद केलेल्या दिव्यांगांसाठीच्या विविध 18 योजनांसाठी सदर निधी खर्च करण्याचे निर्देश असतांना व तसेच त्यांचे दारिद्रय निर्मुलनासाठी त्याच्या कौटुंबिक उत्पन्नानुसार व अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार प्राधान्य द्यावे असे असतांना नगरपरिषदेने त्याची शहानिशा केल्याचे दिसून येत नाही. व सरसकट प्रत्येकी रुपये 20000/- चे वाटप केले आहे.

4. नगरपरिषद सभेच्या दिनांक 26/2/2019 रोजीच्या ठरावानुसार रोख रक्कम दिलेल्या लाभार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घ्यावे असे असतांना सदर लाभार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र नस्तीसोबत आढळून आले नाही. तसेच लाभार्थ्यांनी त्या उदरनिर्वाहाच्या साधानांसाठी निधीची मागणी केली होती ती त्यांनी प्रत्यक्षात खरेदी केली आहे. किंवा कसे याची शहानिशा किंवा मोका तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

5. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक अपंग 2011/प्र.क्र.91/सुधार-3

दिनांक 20/7/2011 नुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील मुकबधिर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान/उपकरणे प्रति कर्मचारी दोनपेक्षा जास्त नाही असे वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र1068/प्र.क्र.70/2008 विनीयमन दिनांक 15 मे 2009 मधील तरतुदींच्या अधिन खरेदी करुन द्यावेत. असे असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

6. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20 दिनांक 28/10/2015 नुसार अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय/साहित्य खरेदी करण्यासाठी निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात NEFT/RTGS द्वारे जमा करण्याची तरतुद असतांना नगरपरिषदेने एकुण 166 लाभार्थ्यांपैकी 85 लाभार्थ्यांना प्रमाणक क्रमांक 2085 दिनांक 30/3/2019 अन्वये रोखीने/चेकने अदा केल्याचे ते. ते नियमबाह्य आहे. तसेच प्रत्यक्ष अदा केलेल्यांची यादीची तपासणी केली असता अ.क्र. 15 (मयत), अ.क्र. 23, 32 (दुबार), 34,35,45 (हद्दीबाहेर),46,47,50,55 (दुबार);56,59,62,63,76 (हद्दीबाहेर);83,84,85 अशा एकुण 18 लाभार्थ्यांच्या पाल्यांच्या सह्या किंवा अंगठ्याचा ठसा नाही. असे असतांनाही व 85 X 20000 = 1700000/- होत असतांना प्रमाणकानुसार एकुण रक्कम रुपये 1720000/- खर्ची पडल्याचे दिसते. त्यामुळे अधिकचे रक्कम रुपये 20000/- तसेच 18 X 20000 = 360000/- रुपये अंतिम लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याची खात्री होत नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 3421400/- आक्षेपाधिन ठेवण्येत येत आहेत.

सभा कामकाज

## 11 *कार्यवृत्तांत नोंदवहीतील अनियमिततांबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 07

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

1. मे. स्थायी समिती सभा इतिवृत्तामध्ये बऱ्याच विषयामध्ये खाडाखोड व्हाईटनर लावून उपरीलेखन केल्याचे दिसून येते.

2. मे. स्थायी समिती इतिवृत्तामध्ये बऱ्याच विषयामध्ये सुचक व अनुमोदक ही नावे नमुद नाहीत.

3. कार्यवृत्त नोंदवही कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेली नाही.

4. खर्चास व कामाबाबत निर्णय घेणे अस असून प्रस्तावाचा मजकुर यामध्ये मंजुरी देतांना 300500/- ऐवजी 470000/- रकमेस मंजुरी दिलेली आहे. सदर मंजुरी देतांना रकमेमध्ये खाडाखोड दिसून येते.

6. स्थायी समिती सभा इतिवृत्तांवर सभापती स्थायी समिती तथा नगराध्यक्ष यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

7. विशेष सभेच्या कामकाज इतिवृत्तावर मा. पिठासन अधिकारी तथा तहसिलदार सातारा यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ते बंद व कायम केलेले नाही. त्याऐवजी नगराध्यक्ष, सातारा यांनी स्वाक्षऱ्या केल्याचे दिसून येते.

नगरपरिषद सातारा, 2018-2019

नगरपालिका सातारा सन 2018-19 च्या लेखापरीक्षणात स्थायी समिती व सर्वसाधारण सभा कार्यवृत्तांत पुस्तकाचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालील अनियमितता आढळून आल्या.

1. मे. स्थायी समिती सभा इतिवृत्तामध्ये बऱ्याच विषयामध्ये खाडाखोड व्हाईटनर लावून उपरोलेखन केल्याचे दिसून येते ही अतिशय गंभीर बाब आहे.

| सभा दिनांक | विषय क्रमांक |
|---|---|
| 12/4/2018 | 4,130,131,132 |
| 19/6/2018 | 37,43,44 |

2. मे. स्थायी समिती इतिवृत्तामध्ये बऱ्याच विषयामध्ये सूचक व अनुमोदक ही नावे नमुद नाहीत.

| सभा दिनांक | विषय क्रमांक |
|---|---|
| 12/4/2018 | 1,4,8,10,214,215,216 |
| 19/6/2018 | 35,36,38,46 |

3. मे. स्थायी समिती इतिवृत्तामध्ये सभा दिनांक 12/4/2018 विषय क्रमांक 200 मध्ये पेठ मंगळवार सि.स.नं. 124 कात्रेवाडा येथील पुर्वेकडील नगरपरिषद शाळा इमारतीचे दुरुस्तीबाबत श्री. तुकाराम सुतार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा (+18.50 टक्के) जास्त हे दर सर्वात कमी आहेत. चालू दरसुचीशी तुलना करता 5.60 टक्के ने कमी आहेत. परंतू सदर विषय क्रमांक 200 मध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.50 टक्के ऐवजी 19.50 टक्के जास्त या सर्वात कमी असलेल्या दरास मंजुरी देण्यात आलेली आहे. तरी 1 टक्के जादा दराने म्हणजेच 18.50 टक्के ऐवजी 129.50 टक्के दराने मंजुरी देण्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4. स्थायी समिती कार्यवृत्त वहया 1 ते 4 व सर्वसाधारण सभा कार्यवृत्त वहया 1 व 2 कार्यालयप्रमुखाने सदर वहीमध्ये पान क्रमांक 1 ते पान क्रमांक ----इतकी पाने असल्याबाबत प्रमाणित केलेले नाही.

उदा . सर्वसाधारण कार्यवृत्त नोंदवही

दिनांक 27/12/2016 ते 28/5/2018

दिनांक 28/5/2018 ते आजपावेतो

5. मे. स्थायी समिती सभा दिनांक 3/8/2018 मधील विषय क्रमांक 31 मधील प्रस्तावाच्या विषयामध्ये गेंडामाळ नाका येथील हुतात्मा उद्यानाचे विद्युतीकरण/नुतनीकरणासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये 300500/- चे खर्चास व कामाबाबत निर्णय घेणे असा असून प्रस्तावाचा मजकूर यामध्ये मंजुरी देतांना 300500/- ऐवजी 470000/- रकमेस मंजुरी दिलेली आहे. सदर मंजुरी देतांना रकमेमध्ये खाडाखोड दिसून येते. उपरोक्तबाबत खुलासा व्हावा.

6. स्थायी समिती सभा इतिवृत्तांवर सभापती स्थायी समिती तथा नगराध्यक्ष यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ते बंद व कायम केल्याचे दिसून येत नाही.

उदा. दिनांक 4/4/2018 व दिनांक 28/1/2019

7. विशेष सभा दिनांक 21/6/2018 बाबत उपविभागीय अधिकारी सातारा यांचे पत्र क्रमांक नपा/कवि-24/1018 दिनांक 1/1/2019 याद्वारे मा. तहसिलदार सातारा यांना पिठासन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले होते. सदर विशेस् सभेच्या कामकाज इतिवृत्तावर मा. पिठासन अधिकारी तथा तहसिलदार सातारा यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ते बंद व कायम केलेले नाही. त्याऐवजी नगराध्यक्ष, सातारा यांनी स्वाक्षऱ्या केल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

लेखा

## 12 रोजगार हमी कर व शिक्षण कर रक्कम शासनाकडे भरणा करणे व रिबेटबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

1. रोजगार हमी कर व शिक्षण कर वसुली संदर्भात 3 टक्के वटाव (रिबेट) वजा करुन उर्वरीत रक्कम शासनाकडे भरणा करावी असे आदेश असतांना जमा झालेल्या करांच्या रकमेपेक्षा रोजगारहमी कर व शिक्षण कराचा कमी भरणा केला आहे.
2. 3 टक्के रिबेटची रक्कम वजा करुन करांच्या रकमा शासनास भरणा केलेल्या नाहीत.
3. रोजगार हमी कर व शिक्षण कर शासनास कमी भरणा करणेत आलेला आहे.

1. सातारा नगरपरिषद, सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात रोजगार हमी कर व शिक्षण कर शासनाकडे भरणा केलेल्या खर्च प्रमाणकांची तपासणी केली असता मा. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक नपाप्रक/8/05/507 दिनांक 2/7/2014 नुसार संकलित कराद्वारे जमा होणाऱ्या रोजगार हमी कर व शिक्षण कर वसुली संदर्भात 3 टक्के वटाव (रिबेट) वजा करुन उर्वरीत रक्कम शासनाकडे भरणा करावी असे आदेश असतांना जमा झालेल्या करांच्या रकमेपेक्षा खालीलप्रमाणे रोजगारहमी कर व शिक्षण कराचा कमी भरणा केला आहे. सबब कमी भरणा रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

2. प्रमाणक क्रमांक 2469 दिनांक 26/3/2018 रक्कम रुपये 10000000/- (1 कोटी) नुसार रोजगार हमी कर व शिक्षण कर भरणा करणेत आलेला आहे. परंतू त्यामधून 3 टक्के रिबेटची रक्कम रुपये 300000/- वजा करुन रक्कम शासनास भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न केलेने 3 टक्के रिबेटची रक्कम शासनाकडून प्राप्त होणे अथवा पुढील कर भरणा करतांना समायोजन करण्यात येऊन पुर्तता होणे आवश्यक आहे.

3. खालीलप्रमाणे रोजगार हमी कर व शिक्षण कर शासनास कमी भरणा करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | सन | तपशिल | जमा रक्कम | भरणा रक्कम | कमी भरणा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2018-19 | शिक्षण कर | 24342923 | 13019509 | 15118280 |
| 2 | 2018-19 | रोजगार हमी कर | 3794866 | | |
| एकुण | | | 28137789 | 13019509 | 15118280 |

उपरोक्तबाबत पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

लेखा/बांधकाम

## 13 मागासवर्गीय दुर्बल घटक कल्याण सदरी केलेल्या खर्चाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :60 नगर परिषद स्व निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 803187.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 803187.00/-

1. वर्षात न झालेला संपूर्ण खर्च अगर खर्चाचा भाग याची तरतुद पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात वाढवून केली जावी असे नमुद असतांना या बाबींचा विचार केल्याचे आढळले नाही. सन 2017-18 व त्यापूर्वीच्या कमी केलेल्या खर्चाएवढया रकमेचा अंतर्भाव सन 2018-19 मधील तरतुदीमध्ये केला नाही.
2. सदरचा खर्च तरतुदीपेक्षा कमी केला आहे.
3. नगरपरिषदेने बांधील खर्च वजा जाता महसुली उत्पन्नाच्या 5 टक्के खर्च करणे बंधनकारक असतांना कमी खर्च केला आहे.
4. उपरोक्त खर्चाबाबत खर्च प्रमाणकाशिवाय व अन्य अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे खर्च योग्यतेबाबत अभिप्राय नोंदविता आले नाहीत.
5. नगरपरिषदांनी वरील निधीची तरतुद विहीत कार्यक्रमांसाठी केली असल्याचे प्रतिज्ञापत्र जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक असतांना मात्र याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात मागासवर्गीय दुर्बल घटक कल्याण सदरी केलेल्या खर्चाची नस्ती तपासली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 80 दिनांक 18/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी/1985/93/सीआर/885/नवि-10 दिनांक 2/2/1988 नुसार नगरपालिकेने त्यांचे अर्थसंकल्पात तरतुद केलेल्या वार्षिक महसुल उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरीत महसुलाचा 5 टक्के भाग राखीव निधी म्हणून काढून दुर्बल घटकांच्या म्हणजेच अनुसुचित जाती, जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती यांच्या कल्याणकारी योजनेसाठी खर्च करणे आवश्यक आहे. तसेच परिपत्रक क्रमांक बीसीसी-1078/2666/युडी-10 दिनांक 8/9/1978 अन्वये नगरपरिषदेने दरवर्षी संपुर्णपणे खर्च केला नाहीत तर त्या वर्षात न झालेला संपूर्ण खर्च अगर खर्चाचा भाग याची तरतुद पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात वाढवून केली जावी असे नमुद आहे, तथापि नगरपरिषदेने सन 2018-19 मध्ये तरतुद करतांना या बाबींचा विचार केल्याचे आढळले नाही. सन 2017-18 व त्यापूर्वीच्या कमी केलेल्या खर्चाएवढया रकमेचा अंतर्भाव सन 2018-19 मधील तरतुदीमध्ये केला नाही.

2. नगरपरिषदेने सन 2018-19 करीता रक्कम रुपये 3600000/- इतकी तरतुद केली आहे. तथापि खर्च रक्कम रुपये 803187/- एवढा केला आहे. सदरचा खर्च तरतुदीपेक्षा कमी केला आहे.

3. नगरपरिषदेने बांधील खर्च वजा जाता महसुली उत्पन्नाच्या 5 टक्के खर्च करणे बंधनकारक असतांना खालीलप्रमाणे

कमी खर्च केला आहे. याबाबत खर्चाचे योग्य नियोजन केले नसल्याचे दिसते. सबब तरतुद मोकळ केली असल्याचे आढळले.

| महसुली उत्पन्न | 5 टक्के रक्कम | केलेला खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|
| 116992544 | 5849627 | 803187 | 5046440 |
| एकुण | | | 5046440 |

केलेल्या खर्चाबाबत तसेच खर्च कमी केलेबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 80 दिनांक 18/02/2020 अन्वये मागणी केली असता तपशिलासह खुलासा सादर केला नाही. सबब शासन निर्णयाप्रमाणे विहीत मर्यादेपेक्षा कमी खर्च केल्याबाबत खुलासासह साधार पुर्तता आवश्यक आहे.

4. उपरोक्त केलेल्या खर्चाचा तपशिल पाहता रोखवहीतील नोंदीनुसार खालीलप्रमाणे केल्याचे नोंदले आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 11202(4) | 2/11/2018 | 341834 | मिलींद हौसिंग सोसायटी कंपौंड वॉल |
| 1061 | 12/10/2018 | 182309 | दुर्गा तोफखाना गटर व पाईप ड्रेन |
| 653 | 26/7/2018 | 279044 | अण्णाभाऊ साठे पुर्तता परिसर सुशोभिकरण |
| एकुण | | 803187 | |

उपरोक्त परिपत्रक दिनांक 2/2/1988 मधील मुद्दा क्रमांक 3 च्या बाब क्रमांक 1 ते 17 अन्वये नमुद असलेल्या बाबींवर करणे आवश्यक आहे. उपरोक्त नोंद तपशिल पाहता बांधकाम विभागाद्वारे देखभाल व दुरुस्ती या तांत्रिक स्वरुपाच्या कामावर खर्च केल्याचे आढळते. सदर 1 ते 17 बाबींमधील अन्य प्राधान्यक्रमाच्या बाबींची मागणी, प्रस्ताव नसल्याबाबत तपशिल उपलब्ध झाला नाही. सबब या खर्चाशिवाय अन्य पर्याय उपलब्ध नसल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे. तसेच उपरोक्त खर्चाबाबत खर्च प्रमाणकाशिवाय अन्य अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे खर्च योग्यतेबाबत अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

5. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक बीसीसी-1081/1961/सीआर-92-85/युटी-10 दिनांक 3 जुन 1981 अन्वये मागासवर्गीय सदरी प्रतिवर्षी संपुर्णपणे खर्च ज्या नगरपरिषदा करणार नाहीत, त्यांच्या महागाई भत्ता अनुदानाचा शेवटचा हप्ता घेतांना अशा नगरपरिषदांनी वरील निधीची तरतुद विहीत कार्यक्रमांसाठी केली असल्याचे प्रतिज्ञापत्र जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावयाचे आहे. मात्र याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

सन 2018-19 या आर्थिक वर्षात नगरपरिषदेने कमी केलेला खर्च रुपये 5046440/- मागील अनुशेषासह भरुन काढल्याची पुर्तता आवश्यक आहे. पुर्तता होईपर्यंत खर्च रक्कम 803187/- आक्षेपाधिन ठेवण्येत येत आहेत.

*14 अनुदान नोंदवही/बँक पासबुक/स्क्रोल/अनुदान आदेश व सन 2018-19 चे प्राप्त अनुदान विवरणपत्रे इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करणेबाबत.*

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

नगरपरिषद साताराचे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने सन 2018-19 चे योजनानिहाय प्राप्त अनुदान विवरणपत्र, बँक पासबुक/स्क्रोल, अनुदान नोंदवही, अनुदान आदेश इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

नगरपालिका साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात अनुदान नोंदवही/बँक पासबुक/स्क्रोल/अनुदान आदेश व सन 2018-19 चे प्राप्त अनुदान विवरणपत्रे इत्यादी अभिलेख्यांची मागणी केली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 78 दिनांक 18/02/220 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद साताराचे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने सन 2018-19 चे योजनानिहाय प्राप्त अनुदान विवरणपत्र, बँक पासबुक/स्क्रोल, अनुदान नोंदवही, अनुदान आदेश इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणास त्वरीत उपलब्ध करून द्यावेत. लेखापरीक्षणाचा कार्यक्रम हा मंजुर श्रमदिनातच पुर्ण करावयाचा असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करणेस संबंधितांना आदेश व्हावेत.

स्थावर / लेखा

*15 घसारा निधीबाबत*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3001963.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3001963.00/-

1. घसारा रक्कम वैयक्तीक मत्तांना लागु न करता एका वर्गातील मत्तांच्या गटाला लागु करणे आवश्यक आहे.
2. प्रत्येक मत्तांची देखील रुपये 1/- इतक्या घसारा मुल्याने स्थिर मत्ता नोंदवहीमध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.
3. नियम 198 परिशिष्ट दोन नुसार ठरविण्यात आलेल्या दरानुसार स्थिर मत्तांवर नगरपरिषद मलकापूर ने घसारा आकारला नाही..

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 3001963/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक

148 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 198 नुसार स्थीर मत्तां व घसारा आकारणे आवश्यक आहे. ही घसारा रक्कम वैयक्तीक मत्तांना लागु न करता एका वर्गातील मत्तांच्या गटाला लागु करणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 200 नुसार 5000 पेक्षा कमी किंमतीच्या सर्व मत्तांच्या खरेदीच्या वर्षामध्ये 100 टक्के घसारा आकारणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रत्येक मत्तांची देखील रुपये 1/- इतक्या घसारा मुल्याने स्थिर मत्ता नोंदवहीमध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम 2011 नियम 198 परिशिष्ट दोन नुसार ठरविण्यात आलेल्या दरानुसार स्थिर मत्तांवर नगरपरिषद मलकापूर ने घसारा आकारला नाही..

उपरोक्त पुर्ततेम्तव रक्कम रुपये 3001963/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

लेखा

*16 अखर्चित निधी शासनास जमा करणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 181244.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 181244.00/-

अखर्चित रक्कम शासनास भरणा केलेली नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षण करीत असतांना निधीतील अखर्चित रकमांची पडताळणी केली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 83 दिनांक 24/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अखर्चित निधीचा कालावधी | योजनेचे नांव | अखर्चित रकमा |
|---|---|---|---|
| 1 | दिनांक 6/3/2017 ते आजअखेर | 13 वा वित्त आयोग | 80664 |
| 2 | दिनांक 14/10/2017 ते आजअखेर | आमदार निधी | 39516 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | दिनांक 19/4/2017 ते आजअखेर | राजीव गांधी आवास योजना | 61064 |
| एकुण | | | 181244 |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीजीटी-2015/प्र.क्र.71अर्थसंकल्प-2 तारीख 04 मार्च 2015 व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकर्ण-1198/प्र.क्र.30/नवि 4 दिनांक 4 जुन 2018 नुसार उपरोक्त निधीतील अखर्चित निधीतील रकमेबाबत कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

सदरबाबत अखर्चित निधी शासन खाती जमा केलेची पुर्तता करुन लेखापरीक्षणास दाखवावी, अन्यथा लेखापरीक्षण अहवालात आक्षेप कायम करण्यात येईल.

भांडार

**17 भांडार विभाग कर्मचारी गणवेश व कापड खरेदी खर्चाबाबत.**

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 601380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 601380.00/-

1. सदर खरेदी ही GeM पोर्टलवरून केलेली नाही.
2. वेगवेगळ्या निविदाधारकांनी भरलेले दर हे एकसारख्या गुणवत्तेचे आहेत काय याची खात्री करता येत नाही व स्पर्धात्मक दराचा लाभ भेटल्याची खात्री करता येत नाही.
3. साडयांची संख्या किती तसेच गुणवत्तेचा उल्लेख निविदेमध्ये नाही.
4. संबंधित वस्तुंची साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही अद्यावत नाही.
5. गणवेश/साडया कारागृहातर्फे तयार केल्या जाणाऱ्या वस्तुंमध्ये उपलब्ध आहे कि नाही याची शहानिशा खरेदीपुर्वी केल्याचे दिसून येत नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात भांडार विभागाकडील कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी) गणवेश खरेदीच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 60 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

सातारा नगरपरिषदेने सन 2018-19 मध्ये पुरुष चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी सफेद कापड 302 मीटर व खाकी कापड 1162 मीटर दर रुपये 210/- प्रमाणे असे एकुण रक्कम रुपये 307524/- चे कापड खरेदी केले आहे. प्रमाणक क्रमांक 2081 दिनांक 30/3/2019 तसेच महिलांसाठी 174 रंगित सुती साडया व ब्लाऊज पिस, प्रत्येकी दर अनुक्रमे 515 व 65 प्रमाणे एकुण रक्कम रुपये 93856/- ची खरेदी केली आहे. त्यासाठी दैनिक तरुण भारतमध्ये जा.क्र.सानप/भांडार-127/सातारा नगरपरिषद दिनांक 10/10/2018 नुसार निविदांसाठी जाहिरात देण्यात आली होती.

1. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24/8/2017 अनुसार सदर खरेदी ही GeM पोर्टलवरून खरेदी करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2. सदर खरेदी करण्यापूर्वी एकुण किती कर्मचाऱ्यांसाठी प्रति कर्मचाऱ्यास साधारण किती कापड लागेल, त्याचा दर्जा व ब्रँड काय असावा हे नमुद न करता ते किती प्रमाणात खरेदी करावयाचे आहे याचे अंदाजपत्रक संबंधित समितीकडून केले नाही व निविदेमध्ये तशी माहिती प्रसिध्द करण्यात आली नाही त्यामुळे वेगवेगळया निविदाधारकांनी भरलेले दर हे एकसारख्या गुणवत्तेचे आहेत काय याची खात्री करता येत नाही व स्पर्धात्मक दराचा लाभ घेतल्याची खात्री करता येत नाही. तसेच निविदा धारकांनी दिलेल्या दरपत्रकामध्ये सदर दर हे जीएसटी समवेत आहेत कि निव्वळ दर हे नमुद नाही.

3. तसेच साड्याच्या खरेदीमध्येही फक्त रंगित सुती साडया एवढेच नमुद आहे. त्यांची संख्या किती तसेच गुणवत्तेचा उल्लेख निविदेमध्ये नाही.

4. तसेच संबंधित वस्तुंची साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही अद्यावत नाही. एकुण प्रति कर्मचारी किती मिटर कापड वाटप केले व त्यानंतर किती शिल्लक राहिले याचा ताळमेळ साठा नोंदवहीवरुन लागत नाही.

5. नगरपरिषदेने सदर कापड महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4 दिनांक 1/12/2016 मधील परिच्छेद क्रमांक 5.11 नुसार व परिशिष्ट 14 मध्ये नमुद कारागृहातर्फे तयार केल्या जाणाऱ्या वस्तुंमध्ये उपलब्ध आहे कि नाही याची शहानिशा खरेदीपुर्वी केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 601380/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

आरोग्य

***18 स्वच्छ महाराष्ट्र अभियानातून वैयक्तिक शौचालय बांधणेकरीता केलेल्या अनुदान वाटपाबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1271000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1184000.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 87000.00/-

1. पुर्ण झालेल्या शौचालयांचे फोटो फेब्रुवारी 2016 पर्यंत संबंधित वेबसाईटवर अपलोड करणेची दक्षता घेणेबाबत सुचित केले आहे. तथापि असे फोटो अपलोड केले नसलेचे आढळले आहे.

2. संबंधित लाभार्थ्यांच्या a) Geographical Particular या प्रपत्रावरील नोंदींनुसार शौचालय पुर्ण होऊन वापरात असलेचे प्रमाणित होत नाही.

3. विहीत मर्यादेपेक्षा रुपये 5000/- अतिरिक्त लाभ दिला आहे याबाबतीत राज्य संचालक, नागरी स्व अभियान यांची मान्यता असलेचे आढळले नाही.

4. शासन परिपत्रक दिनांक 28/7/2015 चे मुद्दा क्रमांक 9 नुसार जोडपत्र 3 मध्ये वैयक्तिक शौचालयांसाठी लाभार्थ्यांचा अर्ज घेणे व जोडपत्र 4 नुसार जागा इत्यादी बाबी नोंद साक्षांकित करणे आवश्यक असता सन 2015-16 मधील लाभार्थ्यांबाबत अशी कार्यवाही केली नाही.

5. लाभार्थ्यांनी पहिला हप्ता अनुदानाचा विनीयोग केला नसल्यास प्रति लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे रुपये 12000/- वसुल करणे आवश्यक आहे.

6. सन 2017-18 मध्ये मंजुर लाभार्थ्यांच्या प्रस्तावात उणिवा आढळल्या आहेत.

7. लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम पुर्ण केले असलेबाबत तसेच अस्तित्वातील जुन्या शौचालयांपोटी अनुदान घेतले नसलेबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

8. सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याने विहीत नोंदी करुन साक्षांकित केलेल्या नाहीत.

9. लाभार्थ्यांना पुर्ण केलेल्या शौचालयांपोटी निकषानुसार उर्वरीत प्रदान करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 अहवाल वर्षात वैयक्तिक शौचालय अनुदान वाटपापोटी खालीलप्रमाणे खर्च नोंद करण्यात आला आहे.

| नपा निधी प्रमाणक | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 221 | 1 | 25/5/2018 | 75000 | 15 लाभार्थी रुपये 5000/- प्रमाणे तिसरा हप्ता |
| 222 | 2 | 25/5/2018 | 420000 | 70 लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे पहिला हप्ता |
| 914 | 8 | 21/9/2018 | 408000 | 68 लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे दुसरा हप्ता |
| 1267 | 9 | 2/11/2018 | 84000 | 14 लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे पहिला हप्ता |
| 1394 | 10 | 11/12/2018 | 84000 | 14 लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे दुसरा हप्ता |
| 1972 | 13 | 25/3/2019 | 200000 | 50 लाभार्थी रुपये 4000/- प्रमाणे पहिला हप्ता |
| एकुण | | | 1271000 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 151 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, संचालनालय , नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक राज्यस/कार्यान्वयन सुचना/42/2015 दिनांक 27 जुलै 2015 अन्वये सदर योजना राबविणेबाबतची कार्यपध्दती

विषद केली आहे. उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1 अन्वये 15 लाभार्थी यांना रुपये 5000/- प्रमाणे तिसरा हप्ता प्रदान केला आहे. सदर 15लाभार्थीचे प्रस्ताव सन 2015-16 या वर्षात मंजुर झालेचे आढळले. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग वैयक्तिक शौचालय उद्दीष्ट निश्चितीबाबतचे जा.क्र. स्वमअ/प्र.क्र.20/नवि-34 दिनांक 3/12/2015 अन्वये सन 2015-16 मध्ये मंजुर लाभार्थ्यांनी जानेवारी 2016 मध्ये शौचालय बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. तसेच पुर्ण झालेल्या शौचालयांचे फोटो फेब्रुवारी 2016 पर्यंत संबंधित वेबसाईटवर अपलोड करणेची दक्षता घेणेबाबत सुचित केले आहे. तथापि असे फोटो अपलोड केले नसलेचे आढळले आहे.

2. संबंधित लाभार्थ्यांच्या a) Geographical Particular या प्रपत्रावरील नोंदीनुसार commenced व constructed toilet photo याचे status NOT UPLOADED असे आहे. सबब शौचालय पुर्ण होऊन वापरात असलेचे प्रमाणित होत नाही. तसेच शासन निर्देशाचे पालन न करता अंतिम हप्ता प्रदान केलेने नियमबाह्यता झाली आहे.

3. उपरोक्त 15 लाभार्थ्यांना शासन निर्णय क्रमांक स्वमअ/2015/प्र.क्र.23/नवि34 दिनांक 15/5/2015 अन्वये केंद्र शासन 4000, राज्य शासन 8000 असे एकुण 12000 प्रति लाभार्थी अनुदान देय आहे. तथापि नगरपरिषद सातारा ठराव क्रमांक 241 दिनांक 23/12/2015 अन्वये 14 वा वित्त आयोग निधीमधून अतिरिक्त रुपये 5000/- अनुदान प्रतिलाभार्थी देण्याचे निश्चित केले आहे. तथापि याबाबीस राज्य संचालक, नागरी स्वच्छता अभियान यांची मान्यता असलेचे आढळले नाही.

तसेच सदरचे रुपये 5000/- हे अनुदान देखील 14 वा वित्त आयोग निधी ऐवजी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अनुदानातून वरीलप्रमाणे प्रदान केले आहे. शासन अनुदानाचा विनीयोग शासनाने विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त केल्याने उपरोक्त प्रदान रुपये 75000/- प्रति लाभार्थी रुपये 5000/- प्रमाणे 15 लाभार्थ्यांपोटी नियमबाह्य झाल्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधी सदरी अंतिम अमान्य करण्यात येत आहे. सदर रकमेची प्रतिपुर्ती नगरपरिषद निधीतून अथवा शासन मान्यता देईल त्या निधीतून स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीत करणे आवश्यक आहे.

4. उपरोक्त परिपत्रक दिनांक 28/7/2015 चे मुद्दा क्रमांक 9 नुसार जोडपत्र 3 मध्ये वैयक्तिक शौचालयांसाठी लाभार्थ्यांचा अर्ज घेणे बंधनकारक आहे. मात्र सन 2015-16 मधील मंजुर असलेल्या खालील लाभार्थ्यांचे असे अर्ज प्राप्त करुन परिपुर्ण नोंदीसह स्वाक्षरीत केल्याचे आढळले नाही.

तसेच परिपत्रकातील मुद्दा क्रमांक 10.1 नुसार अर्जासोबतच्या जोडपत्र 4 नुसार प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या घरी जाऊन स्थळ निरीक्षण करुन लाभार्थ्यांकडे शौचालय बांधणेकरीता पुरेशी जागा उपलब्ध आहे का इत्यादी बाबी तपासून तशी नोंद करणे आवश्यक असता जोडपत्र 4 नोंदवून साक्षांकित केलेले नाही.

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नांव | वॉर्ड, ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | शहवाज इलाही मोमीन | 39-रामाचा गोट | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 2 | श्रणवंती अतुल बापट | 33-शनिवारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 3 | अशोक शंकर कदम | 26-मल्हारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 4 | महादेव रामचंद्र ढोणे | 22-रामाचागोट | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 5 | शिवाजीराव मा. माने | 20-चिमणपुरापेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 6 | लक्ष्मण रघुनाथ लेवे | 20-चिमणपुरापेठ | जोडपत्र 4 नाही. |
| 7 | रेखा प्रमोद घंटे | 17-बुधवारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 8 | सागर मा. वडेकर | 12-रविवारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | शोभा शिवाजी रणदिवे | 12-रविवारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नोंद नाही. |
| 10 | संजय भिकोबा शिंदे | 10-गोडोली | जोडपत्र 4 नाही. |
| 11 | छत्रपती बाबुराव डांगरे | 10-गोडोली | जोडपत्र 4 नाही. |
| 12 | सागर गणपत कासले | 10-गोडोली | जोडपत्र 4 नाही. |
| 13 | गितांजली संजय पवार | 6-गोडोली | जोडपत्र 4 नाही. |
| 14 | सुरेश शंकर खंदारे | 25 मल्हारपेठ | जोडपत्र 3 व 4 दोन्ही नाही. |

उपरोक्त उणिवा पाहता लाभार्थ्यांचे अर्ज, स्थळ निरीक्षण अहवाल नाहीत. तसेच शौचालय पुर्णत्व व वापराबाबत अंतिम मुल्यांकन दाखला नाही. असे असतां उपरोक्त लाभार्थ्यांना अंतिम हप्ता दिला असल्याने नियमबाह्यता झाली आहे.

5. उपरोक्त प्रमाणक क्रमांक 2 अन्वये सन 2017-18 मध्ये मंजुर 70 लाभार्थ्यांना पहिला हप्ता रुपये 6000/- व त्यापैकी 68 लाभार्थ्यांना प्रमाणक क्रमांक 8 अन्वये दुसरा व अंतिम हप्ता रुपये 6000/- असे प्रदान केले आहे. 2 लाभार्थ्यांनी पहिला हप्ता अनुदानाचा विनीयोग केला नसल्यास प्रति लाभार्थी रुपये 6000/- प्रमाणे रुपये 12000/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच अनुदानाची विगतवारी रुपये 4000 व 8000 अशी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अशी असतांना प्रति हप्ता रुपये 6000/- याप्रमाणे प्रदान केले आहे. याचे प्रयोजनाबाबत तसेच केंद्र व राज्य यांचेद्वारे प्राप्त अनुदानाचा विनीयोग शासनास कशा प्रकारे दर्शविला याबाबींचा तपशिल आवश्यक आहे.

6. उपरोक्त 70 लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांच्या प्रस्तावात खालीलप्रमाणे उणिवा आढळल्या आहेत.

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नांव | वॉर्ड-ठिकाण | उणिवा |
|---|---|---|---|
| 1 | जयश्री राजाराम बनसोडे | 2-करंजे | जोडपत्र 4 नाही. |
| 2 | हसीना खु. मुलाणी | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 3 | निर्मला नं. मोरे | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 4 | सुरज ह. जाधव | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 5 | संतोष ग. बोराटे | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 6 | प्रकाश अ. कुंभार | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 7 | दिलीप बा. वाडकर | 1-रघुनाथपुरा | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 8 | शब्बीर ग. शेख | 1-करंजे | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 9 | मनोहर का. खंदारे | 26-मल्हारपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 10 | सिराज अ. काझी | 14-मल्हारपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पेपरवर करारनामा नाही. |
| 11 | अनुसया मु. तपासे | 23-मल्हारपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 12 | बाळासाहेब म. राजमाने | 7-मल्हारपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 13 | कांता प्र. खुडे | 5-गोडोली | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 14 | सुनिल भा. मोरे | 5-गोडोली | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 15 | हेमंत द. भोसले | 5-गोडोली | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 16 | मनोज रा. भोसले | 23-केसकरपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 17 | संदीप अ. वायदंडे | 6-सदरबझार | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 18 | सुनिल सो. कुंभार | 26-केसकरपेठ | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 19 | राजेश ग. तुपे | 6-सदरबझार | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |
| 20 | अन्वार अ.म. बागवान | 6-सदरबझार | जोडपत्र 4 नाही तसेच रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा नाही. |

7. तसेच 70 लाभार्थ्यांपैकी 6 लाभार्थी वगळता 64 लाभार्थ्यांचे मुद्रांक पत्रावर हमीपत्र घेण्यात आलेले नाही. सबब जागा मालकी तसेच कागदपत्रांची सत्यता व अनुदानाचा योग्य विनीयोग याकरीता सदर लाभार्थी बांधीलकीपासून मुक्त राहिले आहेत.

8. उपरोक्त 70 लाभार्थ्यांना पहिला हप्ता रुपये 6000/- दिनांक 25/8/2018 रोजी 68 लाभार्थ्यांना दुसरा हप्ता रुपये 6000/- दिनांक 29/8/2018 रोजी प्रदान केला आहे. तथापि लाभार्थ्यांना यापुर्वी स्वत:चे शौचालय नसल्याबाबत तसेच शौचालय नवीन बांधले असलेबाबत जोडपत्र 3 व 4 अन्वये सक्षम तांत्रिक दाखल्यासह प्रमाणित केलेले नाही. सबब सदर लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम पुर्ण केले असलेबाबत तसेच अस्तित्वातील जुन्या शौचालयापोटी अनुदान घेतले नसलेबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

9. उपरोक्त प्रमाणक क्रमांक 9 व 10 अन्वये 14 लाभार्थ्यांना प्रथम व द्वीतीय तथा अंतिम हप्ता प्रदान केला आहे तथापि सर्वच लाभार्थ्यांचे जोडपत्र 3 व 4 यावर नोंदी नाहीत. तसेच सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याने विहीत नोंदी करुन साक्षांकित केलेल्या नाहीत. सबब उपरोक्त उपपरिच्छेद क्रमांक 4 व 5 याची पुनरावृत्ती सदर 14 लाभार्थ्यांबाबत झाली आहे.

10. उपरोक्त प्रमाणक क्रमांक 13 अन्वये 50 लाभार्थ्यांना रुपये 4000 प्रमाणे प्रथम हप्ता प्रदान केला आहे. सन 2018-19 अखेर उर्वरीत हप्त्यांचे लाभार्थ्यांना प्रदान केले नाही. सदर लाभार्थ्यांना पुर्ण केलेल्या शौचालयापोटी

निकषानुसार उर्वरीत प्रदान करणे आवश्यक आहे.

सदर योजना 2015-16 पासून सुरु आहे. नगरपरिषद ठराव क्रमांक 241 दिनांक 23/12/2015 नुसार त्यावर्षी मंजुर 475 लाभार्थ्यांपैकी 209 लाभार्थ्यांनी प्रथम हप्ता प्राप्त होऊन देखील शौचालयांचे काम सुरु केले नाही. त्यांना दिनांक 31 जानेवारी 2016 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यापैकी किती लाभार्थ्यांना पुर्ण शौचालयापोटी अंतिम प्रदान केले हे समजू शकले नाही. सबब उपरोक्त सन 2017-18 व 2018-19 मध्ये मंजुर नवीन 70, 14, व 50 एकुण 134 लाभार्थी हे त्यापैकी नसल्याबाबत खात्री करणे आवश्यक होते. मात्र तशी खात्री केली नसलेने दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आस्थापना।

### *19 विविध विभागांसाठी संगणक ऑपरेटर ठेका पध्दतीने नेमणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 298000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 298000.00/-

1. सदरी कामाची मे 2018 मध्ये मुदत संपली असतांना मक्तेदाराकडून कामकाज सुरु असल्याचे आढळले.
2. मक्तेदारास नियमबाह्यपणे मुदतवाढ दिलेली आहे.
3. कामाच्या ठरावाची प्रत पाहता त्यात कामाच्या कार्योत्तर मंजुरीचा उल्लेख नाही.
4. निविदा प्रक्रिया सन 2018-19 मध्ये राबविलेचे आढळले नाही.
5. संगणक ऑपरेटरकरीता शिफारशी प्रमाणे नियुक्ती दिलेली असतांना एका जादा ऑपरेटर करीता दिलेले प्रदान वसुलपात्र आहे.
6. सध्या कार्यरत असलेले संगणक ऑपरेटर हे उपरोक्त मक्तेदार मजुर सहकारी संस्थेचे सभासद असलेबाबत नोंद आढळली नाही.
7. करारनाम्यातील अट क्रमांक 15 नुसार मक्तेदार भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक असतांना असे प्रमाणपत्र आढळले नाही.
8. नगरपरिषदेच्या ठराव नुसार संगणक ऑपरेटर इंग्रजी व मराठी टायपिंग असलेले आवश्यक असलेचे नमुद असतांना सदरचे संगणक ऑपरेटर संगणक तसेच टायपिंग प्रमाणपत्रधारक असलेबाबत नोंद आढळली नाही.

स्थायी समिती ठराव क्रमांक – 174 दिनांक 3/8/2017

मक्तेदार शिफारस – जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जा.क्र. 5259/कक्ष7/मसस/कावाष/शिफारस/2017-18 दिनांक 11/12/2017

मक्तेदार – शिवशक्ती मजुर सहकारी संस्था, सातारा

कामाचे आदेश – क्रमांक सानप/आरधा/03/264अ दिनांक 12/12/2017

मक्ता रक्कम रुपये – 298000/- (7 संगणक ऑपरेटरकरीता)

कामाची मुदत – 5 महिने

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात विविध विभागांसाठी संगणक ऑपरेटर ठेका पध्दतीने नेमणेबाबतच्या नस्तीची पडताळणी केली असता आढळून आलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 114 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त ठराव क्रमांक 174 अन्वये सदर कामाचा मक्ता मजुर सहकारी संस्थेस देण्याचे ठरले त्यानुसार सदर मक्तेदार संस्थेची जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा यांचे दिनांक 11/12/2017 चे पत्रानुसार काम वाटप समितीच्या शिफारशीअन्वये नियुक्ती झाली आहे. शिफारशीनुसार कामाची मुदत 5 महिने एवढी आहे. कामाचे आदेश व करारनामा यामध्ये ही बाब नमुद केली आहे. सबब मे 2018 मध्ये मुदत संपली असतांना अद्याप उपरोक्त मक्तेदाराकडून कामकाज सुरु आहे.

2. संगणक ऑपरेटर काम करीत असलेल्या विविध विभागांच्या मागणीनुसार दिनांक 30/5/2018 रोजीच्या मा. अध्यक्ष यांच्याकडे सादर टिपणीनुसार पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत उपरोक्त मक्तेदारास मुदतवाढ देणेबाबत स्थायी समितीच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता मिळणेस नमुद केले आहे. वास्तविक, सदरचा मक्ता 5 महिन्यांच्या मर्यादित कालावधीसाठी आहे हे विहित असल्याने सदरचा कालावधी संपण्यापूर्वी जिल्हा उपनिबंधक, सातारा यांचेकडे पाठपुरावा करणे अथवा निविदा प्रक्रिया राबविणे या बाबी करणे आवश्यक होते. तसे न करता उपरोक्त मक्तेदारास मुदतवाढ देणेची कार्यवाही करणे नियमबाह्य आहे.

3. स्थायी समिती ठराव क्रमांक 775 दिनांक 3/8/2018 या ठरावाचे सुचक व अनुमोदक यांचेद्वारा स्वाक्षरीत ठरावाची प्रत पाहता नवीन निविदा प्रक्रिया होईपर्यंत सदर मक्तेदार संस्थेस मुदतवाढ देणेस व येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. असे नमुद आहे. यात कार्योत्तर मंजुरीचा उल्लेख नाही. सबब माहे जुन 2018 व जुलै 2018 या महिन्यातील प्रदानास मंजुरी दिलेचे आढळले नाही, याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

4. उपरोक्त ठराव क्रमांक 775 अन्वये भांडार विभागाने नविन निविदा प्रक्रिया राबविण्यास मंजुरी दिली आहे. तथापि त्यानुसार निविदा प्रक्रिया सन 2018-19 मध्ये राबविलेचे आढळले नाही. अद्याप उपरोक्त मक्तेदार संस्थेमार्फत नियुक्त संगणक ऑपरेटर काम करीत आहेत.

5. निवड महिने माहे मार्च 2019 मधील प्रदान पाहता प्रमाणक क्रमांक 1931 दिनांक 19/3/2019 अन्वये सदर संस्थेस फेब्रुवारी 2019 या महिन्याकरीता रुपये 68000/- म्हणजे 8 कर्मचाऱ्यांकरीता खालीलप्रमाणे प्रदान केले आहे.

| अ.क्र. | विभाग | संगणक ऑपरेटर संख्या | एकुण रककम |
|---|---|---|---|
| 1 | जन्म मृत्यु | 3 | 25500 |
| 2 | सभा कामकाज | 1 | 8500 |
| 3 | शहर विकास | 1 | 8500 |
| 4 | आरोग्य | 3 | 25500 |
| एकुण | | 8 | 68000 |

सदर 7 संगणक ऑपरेटरकरीता मागणीनुसार व शिफारशी प्रमाणे नियुक्ती दिलेली असतांना एका जादा ऑपरेटर

करीता दिलेले प्रदान रुपये 500/- वसुलपात्र करण्यात येत आहे. अन्य महिन्यात नियमित व एकत्रित प्रदान झाले नसल्याने कोणत्या विभागात अतिरिक्त संगणक ऑपरेटर कार्यरत आहे व त्यापोटी किती प्रदान अतिरिक्त झाले हे समजू शकले नाही. याबाबत प्रमाणकनिहाय विभागनिहाय तसेच केलेल्या कामकाजाचा महिना व त्याचे प्रत्यक्ष प्रदान केलेला महिना याप्रमाणे तपशिल उपलब्ध करुन मंजुरीपेक्षा जादा ऑपरेटर नियुक्त केले असल्यास त्याला झालेल्या ऑपरेटरपोटी रक्कम परिगणित करुन संबंधित विभागावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

6. सध्या कार्यरत असलेले संगणक ऑपरेटर हे उपरोक्त मक्तेदार मजुर सहकारी संस्थेचे सभासद असलेबाबत नोंद आढळली नाही. तसेच जिल्हा उपनिबंधक यांचे उपरोक्त शिफारस पत्रात नमुद केल्याप्रमाणे मजुरीची रक्कम (संगणक ऑपरेटर) मजुर सभासदांच्या बँक खात्यात धनादेश/EC द्वारे जमा करावी असे निर्देश आहेत. नगरपरिषदेने उपरोक्त बाबींचा पाठपुरावा केल्याचे आढळले नाही.

7. करारनाम्यातील अट क्रमांक 15 नुसार मक्तेदार भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे असे नमुद आहे. मात्र नस्तीसोबत असे प्रमाणपत्र आढळले नाही. तसेच मक्तेदाराने संबंधित संगणक ऑपरेटर यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेचे आढळले नाही. EPF & MP ACT 1952 नुसार कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

8. नगरपरिषदेच्या ठराव तसेच मक्तेदार संस्था शिफारस पत्रानुसार संगणक ऑपरेटर इंग्रजी व मराठी टायपिंग असलेले आवश्यक असलेचे नमुद केले आहे. मात्र सदरचे संगणक ऑपरेटर संगणक तसेच टायपिंग प्रमाणपत्रधारक असलेबाबत नोंद आढळली नाही. सबब त्यांचेद्वारे कामकाज योग्य गतीने अचुक व विहीत कालमर्यादित होत असल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 298000/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

भांडार

***20 प्रभाग क्रमांक 16 मधील महिला व मुलींना संगणक (MSCIT) चे प्रशिक्षण देणेबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 64600.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 64600.00/-

1. सदरची योजना प्रभाग क्रमांक 16 करीता पुन्हा राबविली असल्याने एकाच योजनेकरीता नगरपालिकेच्या यंत्रणेस दुबार कार्यवाही करावी लागली आहे.

2. लाभार्थी प्रशिक्षणासाठी हद्दीबाहेर जाण्याची शक्यता नसल्याने हद्दीबाहेर चालणाऱ्या संस्थेची निविदा स्विकारणे तसेच तुलनेसाठी ग्राह्य धरणे ही नियमबाह्य बाब आहे.

3. लाभार्थ्यांचे प्रस्ताव पाहता सर्वच प्रस्तावांसोबत उत्पन्नाचे दाखले जोडलेले नाहीत. तसेच रेशन कार्ड प्रती

जोडल्या नाहीत.
4. मंजुर निविदाकार श्री. साईप्रसाद कॉम्प्युटर्स, सातारा यांची कागदपत्रे यामधील दाखल्याबाबत तफावत आढळली आहे.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात प्रभाग क्रमांक 16 मधील महिला व मुलींना संगणक (MSCIT) चे प्रशिक्षण देणेबाबतच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर योजनेवर नगरपरिषदेने खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 1516 | 5/1/2019 | 64600 | श्री. साईप्रसाद कॉम्प्युटर्स 17 लाभार्थींना रुपये 3800- प्रमाणे अदा |
| एकुण | | 64600 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमारापत्र क्रमांक 113 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदरची योजना महिला बालकल्याण समिती ठराव क्रमांक 47 दिनांक 30/11/2017 अन्वये राबविणेचे ठरविले व रुपये 1 लक्ष खर्चास मंजुरी दिली आहे. तथापि मबाक समिती ठराव क्रमांक 37 दिनांक 30/10/2017 अन्वये संपुर्ण शहरासाठी योजना राबविणेचे प्रस्तावित असताना प्रभाग क्रमांक 16 करीता पुन्हा राबविली असल्याने एकाच योजनेकरीता नगरपालिकेच्या यंत्रणेस दुबार कार्यवाही करावी लागली आहे. तसेच उर्वरीत संपुर्ण शहराकरीता 26 लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून फक्त प्रभाग क्रमांक 16 करीता 17 लाभार्थींनी लाभ घेतला आहे हे प्रमाण व्यस्त आहे.

2. प्राप्त 3 निविदाकारांपैकी अथर्व कॉम्प्युटर्स यांचा संगणक प्रशिक्षण व्यवसाय केंद्र, ता. सातारा येथे कार्यरत असून तसा ग्रामपंचायत केंद्र यांचा दाखला आहे. लाभार्थी प्रशिक्षणासाठी हद्दीबाहेर जाण्याची शक्यता नसल्याने हद्दीबाहेर चालणाऱ्या संस्थेची निविदा स्विकारणे तसेच तुलनेकरीता ग्राहय धरणे ही नियमबाहय बाब झाली आहे.

3. लाभार्थ्यांचे प्रस्ताव पाहता सर्वच प्रस्तावांसोबत उत्पन्नाचे दाखले जोडलेले नाहीत. तसेच रेशन कार्ड प्रती जोडल्या नाहीत. शहरातील अन्य प्रभागातील लाभार्थ्यांकरीता हा निकष असता राबविलेल्या योजनेत प्रभाग क्रमांक 16 करीता अपवाद केला आहे. त्यामुळे पात्र तसेच गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळाल्याचे प्रमाणित होत नाही याबाबत तपशिलासह पुर्तता आवश्यक आहे.

4. मंजुर निविदाकार श्री. साईप्रसाद कॉम्प्युटर्स, सातारा यांची कागदपत्रे पाहता मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये विहीत नोंदणी दाखला पाहता नुतनीकरण गत वर्ष सन 2015 ते 2017 याचा पावती क्रमांक चव1453/2511/2014 रुपये 360/- हाच पावती क्रमांक दिनांक नामंजुर निविदाकार रविराज कॉम्प्युटर्स, सातारा यांच्या दाखल्यावर आहे. सदर कागदपत्रे झेरॉक्स असून साक्षांकित केलेल्या नाहीत. दुकाने निरीक्षक, सातारा यांच्या निदर्शनास सदर बाब आणल्याबाबत तसेच त्यांच्याकडील मुळ दाखल्यावरील नोंदींसह साधार पुर्तता आवश्यक आहे.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 64600/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

लेखा

## 21 महिला बालकल्याणावर केलेल्या अत्यल्प खर्चाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 03

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 341622.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 341622.00/-

1. महिला व बालकल्याण सदरी 5 टक्के रक्कम रुपये 5849637/- इतक्या रकमेची तरतुद करणे अपेक्षित असतांना रक्कम रुपये 3600000/- ची कमी तरतुद केली आहे.
2. तरतुद कमी असतांना तरतुदीच्या 10 टक्के हून कमी खर्च महिला बालकल्याणावर केला आहे.
3. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीईएन-1093/1198/नवि-14 दिनांक 1/7/1994 अन्वये सदर रक्कम महिला बालकल्याण समितीस मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे त्यामुळे महिला बालकल्याण सदरी निधीची मागणी केली होती किंवा कसे याबाबत समजून येत नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात महिला व बालकल्याणानाठी एकुण रक्कम रुपये 3800000/- इतकी तरतुद केल्याचे दिसते. त्याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 96 दिनांक 24/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-1093/1198/नवि-14 दिनांक 30 जुन 1993 अन्वये नगरपरिषदेने महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा उर्वरीत रकमेच्या 5 टक्के रकमेची तरतुद महिला व बालकल्याणासाठी करणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेचे वार्षिक लेखे तपासले असता एकुण महसुली जमा रक्कम रुपये 508573386/- मधून वेतन व भत्ते व तत्सम कार्यालयीन खर्चासाठी रक्कम रुपये 257361802/-, कार्यालयीन खर्च रक्कम रुपये 52631206/-, कर्ज व व्याज परतफेड इतर परतावे रक्कम रुपये 5896452/-, शिक्षण मंडळासाठी तरतुद रक्कम रुपये 19070652/-, मत्तांची दुरुस्तीसाठी रक्कम रुपे 44743454/- तसेच अनुदान हिस्सा शिक्षण कर रक्कम रुपये 4233552/-, हुतात्मे स्मारक देखभाल दुरुस्तीसाठी रक्कम रुपये 725700/-, लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 450000/- व प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये 19766/- असा एकुण बांधील खर्च रक्कम रुपये 391580842/-, कर्जाकरीता उर्वरीत रक्कम रुपये 116992544/- चे 5 टक्के रक्कम रुपये 5849637/- इतक्या रकमेची तरतुद करणे अपेक्षित असतांना रक्कम रुपये 3600000/- ची तरतुद केली आहे. सदर कमी तरतुदीबाबत नगरपरिषदेने खुलासा करावा.

2. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2005/प्र.क्र.156/05/नवि-20 दिनांक 30/12/2006 मध्ये नमुद विविध 29 योजनांवर मुख्याधिकारी यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीलाच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी, असे असतांना संपुर्ण अर्थिक वर्षात फक्त रक्कम रुपये 341622/- खर्च केल्याचे दिसते. सुरुवातीसच एकुण तरतुद कमी असतांना तरतुदीच्या 10 टक्के हून कमी खर्च महिला

बालकल्याणावर केला आहे. ही बाब गंभीर आहे.

3. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीडीएन-1093/1198/नवि-14 दिनांक 1/7/1994 अन्वये सदर रक्कम महिला बालकल्याण समितीस मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे. तरी महिला बालकल्याण मधुनी निधीची मागणी केली होती किंवा कसे याचा खुलासा करुन अनुपालन सादर करावे.

आरोग्य

## 22 आरोग्य विभागाकडील महिंद्रा ट्रॅक्टर 575 DLX (सरपंच) खरेदी करणेबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

1. आरोग्य विभागाने खरेदीची प्रक्रिया विशिष्ट ब्रँडच्या नावासहीत राबविली आहे.
2. प्रशासकीय मान्यता आदेशात खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तुंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे अशी कोणतीही तरतुद आढळून येत नाही.
3. आस्थापना खर्च विहीत मर्यादेपेक्षा जास्त असल्यास वाहन खरेदीकरीता संचालनालयांची पुर्व परवानगीची आवश्यकता आहे असे असतांना आस्थापना खर्च परिगणित केलेला नाही.
4. वाहन खरेदीपूर्वी अर्थसंकल्पात वाहन खरेदीची व इंधन व देखभाल दुरुस्तीची तरतुद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
5. पुरवठयाच्या ठिकाणी वस्तु पोहोचताच त्याचे त्वरीत निरीक्षण केले जाणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
6. देयकातून आयकर कपात केलेला नाही.
7. सुरक्षा अनामत जमा करुन घेतलेली नाही.
8. वाहन वापर अनुज्ञेय असल्याने लेखापरीक्षणाचे व नगरपरिषद तपासणीचेवेळी आस्थापना खर्चाची मिळकतची काटेकोरपणे तपासणी करावी असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

सातारा नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षण 20 जानेवारी 2020 पासून चालू झाले असून आरोग्य विभागाकडील MAHINDRA TRACTOR 575 DLX (SARPANCH) खरेदीच्या नस्तीची तपासणी केली असता त्यातील उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 49 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला असता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये खरेदींच्या आवश्यकता व्यापक असाव्यात आणि त्यांची व्याख्या स्पर्धा निर्माण करण्याच्या उद्देशाने असावी त्यामुळे कोणताही विशिष्ट ब्रँड किंवा अन्य अनावश्यक मर्यादा घालण्यात येऊ नयेत अशी तरतुद असतांना आरोग्य विभागाने खरेदीची प्रक्रिया विशिष्ट ब्रँडच्या नावासहीत राबविली आहे.

2. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 1/12/2016 नुसार प्रशासकिय मान्यता आदेशात खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे असे प्रमाणित करण्यात यावे असे नमुद असतांना सदर प्रशासकीय मान्यता आदेशात अशी कोणतीही तरतुद आढळून येत नाही.

3. नगरपरिषद संचालनालयाकडील स्थायी निदेश क्रमांक 32 नुसार नगरपरिषदेकडील वाहने खरेदी व वापरासंबंधीचे धोरणाबाबत एकत्रित निर्देश दिलेले असून त्यानुसार आस्थापनी खर्च विहीन मर्यादेचे आत असल्यास (अ वर्ग नगरपरिषदेसाठी 40 टक्के) एक बहुउद्देशीय वाहन असतांना जास्तीचे वाहन खरेदी करावयाचे असल्यास संचालनालयाची पुर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही. परंतू नगरपरिषद साताराने सन 2018-19 साठीचा आस्थापना खर्च परिगणित केला नसल्याने आस्थापना खर्च विहीन मर्यादेपेक्षा जास्त असल्यास वाहन खरेदीकरीता संचालनालयांची पुर्व परवानगीची आवश्यकता आहे.

4. वाहन खरेदीपूर्वी सदर वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात वाहन खरेदीची तरतुद तसेच त्यावरील इंधन व देखभालीकरीता तरतुद करणे आवश्यक असतांना तशी तरतुद अर्थसंकल्पात दिसून आली नाही.

5. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 1 डिसेंबर 2016 च्या बाब क्रमांक 47 नुसार पुरवठ्याच्या ठिकाणी वस्तु पोहोचताच त्याचे त्वरीत निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे. व या निरीक्षणात आढळलेल्या उणिवा/दोष ताबडतोब पुरवठादाराच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही 15 दिवसांचे आंत करणे आवश्यक असतांना अशा प्रकारच्या निरीक्षणाचे कोणतेही प्रमाणपत्र नस्तीसोबत आढळून आले नाही.

6. उपरोक्त खरेदींच्या देयकातुन 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात केलेला नाही.

7. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 1 डिसेंबर 2016 च्या बाब क्रमांक 4.6 नुसार यशस्वी निविदाकाराला खरेदी प्राधिकाऱ्याकडे आदेशाच्या मुल्याच्या (रुपये 535229/-) कमीत कमी कोणतीही रक्कम जमा करुन घेणे आवश्यक असतांना अशी कोणतीही रक्कम नगरपरिषदेने जमा करुन न घेता खरेदी केल्याचे दिसून येत.

8. विहीत आस्थापना खर्चाचे मर्यादेमध्ये वाहन वापर अनुज्ञेय असल्याने लेखापरीक्षणाचे व नगरपरिषद तपासणीचेवेळी आस्थापना खर्चाची निकषाची काटेकोरपणे तपासणी करावी. आस्थापना खर्च चुकीच्या पध्दतीने काढून वाहन खरेदीचे प्रकरण आढळल्यास अशी वाहने खरेदी महाराष्ट्र नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 96 अन्वये नियमबाह्य खर्च समजण्यात येईल व झालेल्या खर्चाची पुर्ण रक्कम मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 प्रमाणे वसुलीस पात्र असेल.

आक्षेप

## *23 नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या सफाई करणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 12

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 93*

गुंतलेली रक्कम रु. 952010.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 952010.00/-

| |
|---|
| 1. सदर कामासाठी सर्व वॉर्ड मिळून एकच निविदा काढणे आवश्यक असतांना सदर वॉर्डची संख्या दोन मध्ये विभागून निविदा काढण्यात आली आहे.<br>2. टेंडर फी, अनामत रकमा, जमा केल्याबाबत पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाही.<br>3. स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील मुद्दा क्रमांक 33 व 34 निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द व प्रसिध्दीसाठी वेब साईटचा वापर केल्याबाबत पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.<br>4. निविदेतील अट क्रमांक 8 अन्वये मक्तेदाराने 3 महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आवश्यक आहे तसेच कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.<br>5. प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता तसेच वित्तीय मंजुरी घेतल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत.<br>6. जंतुनाशकांच्या नोंदवह्या तयार केलेल्या नाहीत.<br>7. सन 2012-13 पासून नवीन निविदा प्रक्रियेसंबंधी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.<br>8. मुदतवाढीबाबत सर्वसाधारण सभा ठराव घेतल्याचे दिसून येत नाही.<br>9. मक्तेदार हा काम करण्यास समर्थ असल्याबाबत अनुभव नोंदणीकृत मक्तेदार असल्याचीबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.<br>10. ई टेंडर कार्यप्रणालीचा अवलंब केलेला नाही.<br>11. मक्तेदाराच्या देयकातून 2 टक्के टिडीएस कपात केलेला नाही.<br>12. वॉर्ड क्रमांक 26 ते 39 च्या आर्थिक लिफाफ्यामध्ये दर नोंदवितांना अंकी व अक्षरी रकमेमध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येते.<br>13. सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा 4.99 टक्के जादा दराने मंजुर केल्याचे कार्यादेशात नमुद नाही. तथापि बिले अदा करतांना मात्र अंदाजपत्रकीय रकमेच्या 4.99 टक्के जादा दराने दिल्याचे दिसून येते.<br>14. मक्तेदाराने कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन दिल्याचे तसेच त्यांचा भविष्य निर्वाह निधी संबंधित कार्यालयास वेळोवेळी भरल्याबाबतची खात्री करणे आवश्यक आहे. |

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या सफाई करणे कामाची नस्ती तपासली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 121 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सन 2012-13 मध्ये सातारा नगरपालिकेमध्ये एकुण 39 वॉर्ड असल्याचे दिसून येते व सर्व 39 वॉर्डबाबत एकच निविदा काढणे अपेक्षित असतांना निविदेचे वॉर्ड 1 ते 25 व 26 ते 39 असे निविदेचे तुकडे पाडून निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2. सदर निविदेसोबत टेंडर फी रक्कम रुपये 5000/- बयाणा रक्कम व अनामत रक्कम जमा केल्याबाबत पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाही. पावत्या उपलब्ध करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3. सदर निविदेबाबत (सन 2012-13) स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील मुद्दा क्रमांक 33 व 34 निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द व प्रसिध्दीसाठी वेब साईटचा वापर केल्याबाबत पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

4. निविदेतील अट क्रमांक 8 अन्वये मक्तेदाराने 3 महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आवश्यक आहे तसेच कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. याबाबत कागदपत्रे नस्तीसोबत जोडले आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी व विमा उतरविलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

5. प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता तसेच वित्तीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

6. निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर कामाच्या तपशिलानुसार मक्तेदाराने स्वच्छतेसाठी नगरपरिषदेकडून जंतुनाशके उपलब्ध करुन घेऊन त्याचा वापर केल्याबाबत जंतुनाशकांच्या नोंदवह्या तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7. सन 2012-13 मध्ये जा.क्र. सानप/आरोग्य/171 व जा.क्र. मानप/आरोग्य/172 दिनांक 30/8/2012अन्वये दर मंजुर असतांना सन 2018-19 पर्यंत सदर 2012-13 च्या दराने रक्कम अदा केल्याचे दिसून येते. सदर मुदतवाढ कोणत्या नियमान्वये देण्यात आली तसेच सन 2012-13 पासून नवीन निविदा प्रक्रियेसंबंधी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

8. उपरोक्त मक्तेदारास दिलेल्या मुदतवाढीबाबत सन 2018-19 मध्ये मक्तेदारास सुधारीत कार्यादेश देण्यात आलेला नाही. तसेच सर्वसाधारण सभा ठरावही घेतल्याचे दिसून येत नाही.

9. मक्तेदार हा काम करण्यास समर्थ असल्याबाबत अनुभव नोंदणीकृत मक्तेदार आवश्यक आहे. तसेच अनुज्ञप्ती आणि परवानाधारक, अनुभवी व पुरेसा कर्मचारीवर्ग असल्याबाबत पुरावा ही पात्रतेकरीता आवश्यक मानके आहे. या बाबींची मागणी केलेली तसेच लिफाफा क्रमांक 1 ची मागणीच केल्याचे दिसून येत नाही.

10. सन 2018-19 मध्ये सदर बाबींवर रक्कम रुपये 952010/ इतका खर्च झालेला आहे तरी सदर बाबींसाठी ई निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

11. शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2018/प्र.क्र.144/2018/कोषा-प्रशा-5 अन्वये वस्तु किंवा क्षेत्र अथवा दोन्हींसाठी पुरवठादाराला/मक्तेदाराला करावयाच्या प्रदानातून पुरवठादाराकडून/कंत्राटदाराकडून देय असलेल्या एकुण रकमेतून 2 टक्के टिडीएस वजावट करण्यात यावी.

12. वॉर्ड क्रमांक 26 ते 39 च्या आर्थिक लिफाफ्यामध्ये दर नोंदवितांना अंकी व अक्षरी रकमेमध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा लेखापरीक्षणास करणे आवश्यक आहे.

13. सदर लेखापरीक्षणाबाबत यशस्वी निविदाधारकाने रक्कम रुपये 47268/- या अंदाजित रकमेच्या 4.99 टक्के जादा दराने निविदा भरलेली आहे. परंतू कार्यादेश जाक्र.मानप/आरोग्य/172 दिनांक 30/8/2012 च्या कार्यादेशात अंदाजपत्रकीय रकमेच्या 4.99 टक्के जादा दराने असे नमुद नाही तरीही बिले अदा करतांना मात्र अंदाजपत्रकीय रकमेच्या 4.99 टक्के जादा दराने दिल्याचे दिसून येते.

14. मक्तेदाराने कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन दिल्याचे तसेच त्यांचा भविष्य निर्वाह निधी संबंधित कार्यालयास वेळोवेळी भरल्याबाबतची खात्री करणे आवश्यक आहे.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 952010/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

मांडार

**24 चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना स्वच्छतेसाठी हत्यारे पुरविण्याबाबत.**

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 12

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 03*

गुंतलेली रक्कम रु. 168350.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 168350.00/-

1. तीन निविदाधारकांनी फॉर्म फी रुपये 200/- प्रमाणे जमा केल्याबाबतच्या पावत्या नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत.
2. निविदाकारांपैकी तीन निविदाकारांनी आयकर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसून आले नाही.
3. निविदा फॉर्मवर पुरवठादाराची सही शिक्का व दिनांक नमुद नाही.
4. आर्थिक लिफाफा दरामध्ये अंकी व अक्षकरी लिहीतांना खाडाखोड केलेली आहे.
5. 6 स्टार अग्रोसिंग्ट्स यांची बयाणा रक्कम रुपये 1000/- भरल्याची पावती नस्तीसोबत दिसून येत नाही.
6. निविदाकारांचे आर्थिक लिफाफ्यानी अंकी व अक्षरी दर सारख्याच स्वहस्तांतराचे लिहील्याचे दिसून येत आहेत.
7. वस्तु व सेवांची गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यात लक्षांकित विभागांना/कार्यालयांना बंधनकारक करण्यात असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
8. सदर खरेदीबाबत ठरावाची प्रत दिनांक 3/8/2018 मधील विषय क्रमांक 71, ठराव क्रमांक 785 मध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येते.
9. करारनाम्यावर दिनांक नमुद नाही. दिनांकाची जागा रिकामी आहे.
10. सदर स्वच्छतेची हत्यारे स्टॉक बुक रजिस्टरला नोंदणी करुन वाटप केल्याच्या नोंदी सादर करणे आवश्यक आहे.
11. सदर निविदेनी मागणी करतांना निविदामध्ये अंदाजित वार्षिक लागणाऱ्यानगांची संख्या नमुद केली नाही.
12. तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी घेतली असल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | एकुण रक्कम |
|---|---|---|
| 1435 | 18/12/2018 | 168350 |
| एकुण | | 168350 |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 122 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. तीन निविदाधारकांनी फॉर्म फी रुपये 200/- प्रमाणे जमा केल्याबाबतच्या पावत्या नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत. त्यामुळे फॉर्म फी जमा झाल्याबाबतची खात्री करता आली नाही.

2. निविदा फॉर्म फी मधील अट क्रमांक 8 अन्वये आयकर नोंदणी आवश्यक होती परंतु तीन निविदाकारांनी आयकर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसून आले नाही.

3. निविदा फॉर्मवर पुरवठादाराची सही शिक्का व दिनांक नमुद नाही. उदा. 6 स्टार असोसिएट्स, आंबेगांव, पुणे

4. आर्थिक लिफाफा दरामध्ये अंकी व अक्षकरी लिहीतांना खाडाखोड केलेली आहे. उदा. सातारा ट्रेडर्स, सातारा

5. 6 स्टार असोसिएट्स यांची बयाणा रक्कम रुपये 1000/- भरल्याची पावती नस्तीसोबत दिसून येत नाही.

6. तिन्ही निविदाधारकांची लखोटा क्रमांक 1 व लखोटा क्रमांक 2 ची पाकिटे सारखीच असल्याचे दिसून येते. तसेच तिन्ही निविदाकारांचे आर्थिक लिफाफ्यानी अंकी व अक्षरी दर सारख्याच स्वहस्तांतराचे लिहील्याचे दिसून येत आहेत.

7. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.2015 उद्योग-4 दिनांक 24 ऑगस्ट 2017 अन्वये वस्तु व सेवांची गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यात लक्षांकित विभागांना/कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे.

8. सदर खरेदीबाबत ठरावाची प्रत दिनांक 3/8/2018 मधील विषय क्रमांक 71, ठराव क्रमांक 785 मध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येते.

9. सदरबाबत करारनामा 200/- रुपयाचा स्टँप पेपरवर केलेला आहे त्याऐवजी रुपये 500/- च्या स्टँप पेपरवर करणे आवश्यक होते. उर्वरीत रक्कम रुपये 300/- ची वसुली करुन नगरपालिका निधीत भरणा केल्याची पुर्तता दाखवावी. तसेच करारनाम्यावर दिनांक नमुद नाही. दिनांकाची जागा रिकामी आहे.

10. सदर स्वच्छतेची हत्यारे स्टॉक बुक रजिस्टरला नोंदणी करुन वाटप केल्याच्या नोंदी सादर करणे आवश्यक आहे.

11. सदर निविदेची मागणी करतांना निविदामध्ये अंदाजित वार्षिक लागणाऱ्यानगांची संख्या नमुद केली असती तर निश्चितच स्पर्धात्मक दराचा फायदा नगरपालिकेला झाला असता. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने नगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

12. तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी घेतली असल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

अधिकाम

***25 नवि (६) योजनेंतर्गत पेठ यादोगोपाळ आरक्षण क्रमांक 42 सिसन १३४अ, १३४ब येथे बगीचा विकसित करणे***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5706685.00 /-आक्षेपाधीन रक्कम रु. 5706685.00/-

1. प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविणेस व काम सुरु होणेस विलंब झाला आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
2. सद्यस्थितीत ज्या मक्तेदाराने काम केलेले आहे त्यांनी SCADA प्रणाली वापरलीच नाही सदर विसंगती बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
3. सदरचे कामाचे अंदाज पत्रक तयार करताना खुदाई चे बाबीचा दर हा MANNUAL प्रणे आवश्यक होते परंतु विभागाने यांत्रीकीचे दर घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले आहे तसेच सदर बाबीसाठी MANNUAL दर घेण्यासाठी अधीक्षक अभियंता यांची परवानगी घेतली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | नवि (६) योजनेंतर्गत पेठ यादोगोपाळ आरक्षण क्रमांक 42 सिसन १३४अ, १३४ब येथे बगीचा विकसित करणे |
| निधिचे नांव | नवि-6(अ) योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 10728648/- |
| निविदा स्विकृत | 4.97 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 10728648/- |
| मक्तेदाराचे नांव | भोलरी इन्फ्रास्ट्रक्चर |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 403 दिनांक 6/8/2016 |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे 1442 दिनांक 15/7/2016 रक्कम रुपये 30665783/- |
| काम सुरु दिनांक | दिनांक 6/10/2018 |
| काम पुर्ण दिनांक | काम अपुर्ण |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 105 पान क्रमांक 25, 27, 92 |
| मुद्रांक शुल्क | रुपये 10000/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1466-21/12/2018 रक्कम रुपये 3435897/- पहिले धावते देयक<br>1505 -13/1/2019 रक्कम रुपये 2270788/- दुसरे धावते देयक<br>एकुण 5706685/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर 31/03/2019 अखेर रक्कम रुपये 5706685/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 142 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदरचे कामास प्रशासकीय मान्यता दिनांक १२/०६/२०१६ रोजी देण्यात आलेली आहे व तांत्रिक मान्यता ही मुख्य अभियंता MJP पुणे यांनी दिनांक १५/०७/२०१६ रोजी दिलेली आहे परंतु सदर कामास सुरुवात ही

०६/१०/२०१८ रोजी करण्यात आलेली आहे.काम सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता ही दोन वर्षापूर्वी व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविणेस व काम सुरु होणेस विलंब करणे ही बाब संयुक्तिक नाही तरी सदर बाबत स्वंय स्पष्ट खुलासा सादर करणेत यावा.

2. सदरचे कामाची प्रथम निविदा प्रसिद्ध केल्यानंतर एकूण ५ निविदा कारांनी निवेदेमध्ये भाग घेतलेला होता त्यापैकी ३ निविदाकार पात्र ठरले होते.३ पात्र निविदाकारांपैकी माई सिद्धनाथ CONSTRUCTION यांचे निविदा दर हे सर्वात कमी असलेने त्यांना काम प्राप्त झाले परंतु त्यांनी काम करणेस असमर्थता दर्शविली त्यामुळे नगरपरिषद सातारा यांनी दुसरे कमी निविदा दर भरलेले श्री ओमकार भंडारे याना काम करण्यास तयार आहात किंवा कसे याबाबत विचारणा केली .ओमकार भंडारे यांनी काम करण्यास मुखत्यारीला तयारी दर्शविली व तसा करारनामा करून दिला . करारें नामा करून दिल्यानंतर त्याना नगर परिषद सातारा ने कार्यादेश दिला परंतु ओमकार भंडारे यांनी काम करण्यास असमर्थ असलेबाबत लेखी पत्र दिले त्याप्रमाणे सातारा नगरपरिषदेने सदर पत्र ग्राह्य धरून पहिली निविदा प्रक्रिया बंद केली सादर प्रक्रियेत उपरोक्त दोन्ही निवीदाकारांचे बयाना रक्कम जप्त केलेली नाही व नियमाप्रमाणे कार्यवाही केलीली नाही.सदर काम करणेसाठी सातार नगर परिषदेने निविदेसाठी सेकंड CAAL केला त्यामध्ये तीन निविदा कारांनी सहभाग घेतला त्यातील दोन निविदाकार श्री नवनाथ वालेकर व ओमकार भंडारे यांचेकडे स्काडा प्रणाली नसलेने त्यांची निविदा बाद केली त्यामुळे एकच निविदाकार पात्र राहिल्याने निविदा रद्द केली व परत काम करून घेण्यासाठी THIRD CALL करण्यात आला सादर निविदेमध्ये एकाच निवीदाकाराने भाग घेतला व त्यांनाच पात्र ठरवण्यात आले.परंतु सदरचे कामाचे देयकाची तपासणी केली असता विभागाने SCADA प्रणाली मक्तेदाराने वापरली नसलेने मक्तेदाराचे देयकातून 117 रुपये वजा करून देयक अदा केलेले आहे म्हणजेच मक्तेदाराने स्काडा प्रणाली वापरलेली नाही.सेकंड CALL वेळी SCADA प्रणाली कागदपत्रे नसल्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली होती व सद्यस्थितीत ज्या मक्तेदाराने काम केलेले आहे त्यांनी SCADA प्रणाली वापरलीच नाही सदर विसंगती बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3. सदरचे कामामध्ये रिटेनिंग WALL बांधण्यात आलेली आहे . सदरचे कामाचे अंदाज पत्रक तयार करताना खुदाई चे बाबीचा दर हा MANNUAL घेणे आवश्यक होते परंतु विभागाने यांत्रीकीचे दर घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले आहे तसेच सदर बाबीसाठी MANNUAL दर घेण्यासाठी अधीक्षक अभियंता यांची परवानगी घेतली नाही उपरोक्त बाबत खुलासा करावा.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात .4 ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

## 26 अमृत योजने अंतर्गत सन २०१७-२०१८ चे मंजूर प्रस्तावानुसार बागबगीचा विकसित करणे.

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 05

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 10414496.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10414496.00/-

1. काम पुर्ण होण्यास विलंब झाला असून त्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
२. देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.
३.. वाढीव बाबींचे बाबतीत कार्यवाही अंदाजपत्रक तयार करून त्यास सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | अमृत योजने अंतर्गत सन २०१७-२०१८ चे मंजूर प्रस्तावानुसार बागबगीचा विकसित करणे. |
| निधिचे नांव | अमृत योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 20000943/- |
| निविदा स्विकृत | दिनांक 22/12/2017 (5 टक्के कमी दराने) |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 19000000/- |
| मक्तेदाराचे नांव | निसर्ग लँडस्केप |
| प्रशासकीय मान्यता | 136 दिनांक 22/11/2017 |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र.13/2017 दिनांक 8/9/2017 रक्कम रुपये 2000094286/- |
| काम सुरु दिनांक | दिनांक 17/2/2018 |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 92 पान क्रमांक 95, 101 पान क्रमांक 1 ते 9 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | पहिले धावते देयक रक्कम रुपये 3313362/-<br>दुसरे अंतिम देयक रक्कम रुपये 7101134/-<br>एकुण 10414496/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर 31/03/2019 अखेर रक्कम रुपये 10414496/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 143 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदरचे कामास कार्यारंभ हा दिनांक १७/१२/२१०८ रोजी करणेत आलेला आहे.सदर काम करणेची मुदत ही ६ महिन्यांची होती परंतु सदरचे काम हे ३१/०३/२०१९ पर्यंत अपूर्ण असलेचे दिसून येते सदर बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२.. खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन

खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. सदर बाबत अनुपालन सादर करण्यात यावे.

३.. सदरचे कामामध्ये खालील प्रमाणे वाढीव बाबी कार्यान्वीत केलेल्या आहेत परंतु सदर वाढीव बाबींचे बाबतीत कार्यवाही अंदाजपत्रक तयार करुन त्यास सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

I PROVIDING AND FIXING PVC PIPE OF ISI STANDARD

II PROVIDING AND FIXING UPVC PIPE OF ISI STANDARD

4. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त बाबत साधार खुलासा सादर करावा.

आक्षेप

## *27 घनकचरा संकलन, कचरा वाहतूक, साफसफाई कामामधील अनियमितता*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 22705755.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 22705755.00/-

1. मुदतवाढीबाबत आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
2. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिच्छेद क्रमांक 18 प्रमाणे कामाची विभागणी करुन कामे करण्यास प्रतिबंध केला असल्याने सदर बाबत नियमबाह्यता झाली आहे.
3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.
4. नगरपरिषद हददीमध्ये असणा-या मिळकतींची संख्या योग्य असलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.
5. घंटागाडी बंद असलेल्या दिवशी तसेच घंटागाडीवर बिगारी नसलेल्या दिवशी मक्तेदारांनी अथवा नगरपरिषदेने कोणतीही पर्यायी व्यवस्था केलेचे दिसून आले नाही.
6. वाहनांच्या फेऱ्यांबाबतचा डेपो Manager याचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.
7. घनकचरा व विल्हेवाट अधिनियम 2009 अनुसार घनकचरा व्यवस्थापनासाठीच्या उपाययोजनांचा अवलंब केलेला नाही.
8. मुळ टेंडर ,मंजूर ठराव ,करारनाम्यावर गाडी क्र. नमूद नाहीत.. तसेच गाडयांची वाहन क्षमता आरटीओ कडून प्रमाणीत होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

9.करारपत्रामध्ये नमुद अटी नुसार वाहनांवर GPS सुविधा असणे, जमा झालेल्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचरा संकलन नोंदवही ठेवणे याबाबतचा अहवाल प्राप्त झालेचे दिसून येत नाही.
10. कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात , करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-2019 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये आरोग्य विभागाकडील घनकचरा व्यवस्थापन करणेड.नस्तीची तपासणी केली असता खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे
1)ओला सुका कचरा गोळा करणे व प्रक्रिया करणे-
उपरोक्त बाबीवर खालील प्रमाणकान्वये खर्च करणेत आला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|---|
| 64 | 20/04/2018 | 2340363 | साशा हाऊसकिपींग ॲण्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. ठाणे प्रभाग क्र.1 ते 10 प्रति मिळकत दर रुपये 63/- व प्रभाग क्र.11 ते 20 प्रति मिळकत दर रुपये 65/- प्रमाणे |
| 194 | 23/05/2018 | 2258848 | |
| 295 | 18/06/2018 | 2304412 | |
| 640 | 25/07/2018 | 2268439 | |
| 770 | 23/08/2018 | 2257858 | |
| 885 | 21/09/2018 | 2280998 | |
| 1100 | 20/10/2018 | 2257395 | |
| 1265 | 02/11/2018 | 1069857 | |
| 1341 | 05/12/2018 | 1046224 | |
| 1467 | 24/12/2018 | 2340363 | |
| 1679 | 06/02/2018 | 2280998 | |
| एकुण | | 22705755 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.
1.उपरोक्त प्रमाणकान्वये साशा हाऊसकिपींग ॲण्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. ठाणे यांना रक्कम अदा करणेत आली आहे. ठराव क्रमांक 42 दिनांक 10/04/2017 अन्वये साशा हाऊसकिपींग ॲण्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. ठाणे यांची निविदा मंजुर करणेत आली होती त्यांना कार्यादेश दिनांक 23/11/2017 अन्वये दिनांक 01/12/2017 ते 30/11/2018 अखेर काम करणेबाबत आदेश देणेत आला होता.तसेच त्यांना मुदतवाढ देऊन रक्कम अदा करणेत आली आहे. मुदतवाढीबाबत आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत परंतु महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना मुदतवाढ देणेत आलेली आहे. वास्तविक स्थायी आदेश क्रमांक 36 चे अनुक्रमांक 07,08 , व 09 नुसार प्रथम तांत्रिक मंजुरी , प्रशासकीय मंजुरी त्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्वीची निविदा कालावधी संपणेपूर्वी किमान 3 महिने आधीच करून घेणे आवश्यक होते. तरी उक्त आदेश देताना त्याबाबत प्रशासकीय मंजुरी सक्षम प्राधिकरणाची घेतलेचे दिसून येत नाही.
2. निविदा प्रसिध्द करताना निविदेची संपूर्ण कार्यवाही पारदर्शक ठेवनेसाठी स्थायी आदेश क्रमांक 36 अनुक्रमांक 21 नुसार तसेच कडील शा.नि.क्र.भाखरा.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.01 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार निविदा समिती गठीत करुन समितीने निविदा प्रारूप तयार करणेपासून निविदेची अंतिम वाटाघाटी करणेपर्यंतची संपूर्ण कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु न.प. सातारा द्वारे अशी निविदा समिती गठीत करण्यात आलेली नाही.तसेच घंटागाडीने कचरा गोळा करणे ही एकच खर्चाची बाब असल्याने एकत्रित एकच निविदा मागविणे आवश्यक होते .तथापि तसे न करता नगरपरिषदेने कामाचे भाग पाडून प्रत्येक वॉर्डसाठी स्वतंत्र निविदा मागवण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिच्छेद क्रमांक 18 प्रमाणे कामाची विभागणी करून कामे करण्यास प्रतिबंध केला असल्याने सदर बाबत नियमबाह्यता झाली आहे.

3.निविदा मागविताना , कामाची अंदाजपत्रकीय रक्कम काय आधारे ठरविण्यात आली , याबाबत कोणतेही अंदाजपत्रक नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 121 अन्वये निविदा मागविताना अंदाजित रक्कम निश्चित करण्यात आलेली नाही.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

4.ओला सुका कचरा गोळा करणे व प्रक्रिया करणे या बाबीसाठी निविदा मागविताना सन 2017-18 अखेर प्रभाग क्रमांक 1 ते 10 प्रभागातील एकुण मिळकती 19153 व प्रभाग क्रमांक 11 ते 20 प्रभागातील एकुण मिळकती 17807 असे एकुण 36960 मिळकतींची संख्या कचरा संकलनासाठी निश्चीत केलेली आहे. तथापी नगरपरिषद हददीमध्ये असणा-या मिळकतींची संख्या योग्य असलेबाबत लेखापरीक्षणास खात्री पटवावी.

5.निविदेमध्ये करारनाम्यातील अट क्रमांक 56 नुसार खालीलप्रमाणे दंडात्मक तरतुद केलेली आहे

| अ. क्र. | अट | दंड तरतुद |
|---|---|---|
| 1 | बिगारी नसणे | 300 प्रतिदिन |
| 2 | घंटा नसणे | 100 प्रतिदिन |
| 3 | कचरा झाकुण न नेणे | 200 प्रतिदिन |
| 4 | कच-यामधून प्लास्टिक वेगळे न करता एकत्रित घेवून जाणे | 200 प्रतिदिन |
| 5 | घंटागाडीचे वेळापत्रक नागरीकांना प्रसिद्ध न करणे | 200 प्रतिदिन |
| 6 | घंटागाडी चालक व कर्मचारी यांचा युनिफॉर्म गमबुट मास्क नसेल तर | 200 प्रतिदिन |

वरील अटींचे पालन होत असल्याबाबत आरोग्य विभागाचे पाहणी अहवाल दप्तरी उपलब्ध नाहीत. त्यामुळे दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापी बिगारी नसणे व गाडी उपलब्धृ नसणे याशिवाय कोणताही दंड वसूली नाही. त्यामुळे कोणत्या गाडया याकामासाठी वापरल्या याबाबत खात्री करता आली नाही. तसेच दंड आकारणी योग्य असलेबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेने खात्री होत नाही.तसेच घंटागाडी बंद असलेल्या दिवशी तसेच घंटागाडीवर बिगारी नसलेल्या दिवशी मक्तेदारांनी अथवा नगरपरिषदेने कोणतीही पर्यायी व्यवस्था केलेचे दिसून आले नाही.

तसेच वरील करारनाम्यातील अट क्रमांक 56 अटीनुसार उपरोक्त देयकातुन खालीलप्रमाणे तथापी बिगारी नसणे व गाडी उपलब्धृ नसणे याबाबीसाठी खालीलप्रमाणे रक्कम प्रमाणकातुन कपात करणेत आलेली आहे

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | बिगारी नसणे यासाठी दंड रु | गाडी उपलब्धृ नसणे यासाठी दंड रु | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 64 | 20/04/2018 | 2340363 | 6300 | 24300 | 30600 |
| 194 | 23/05/2018 | 2258848 | 7900 | 111300 | 119200 |
| 295 | 18/06/2018 | 2304412 | 6600 | 83160 | 89760 |
| 640 | 25/07/2018 | 2268439 | 13300 | 65220 | 78520 |
| 770 | 23/08/2018 | 2257858 | 10700 | 64040 | 74740 |
| 1341 | 05/12/2018 | 1046224 | 2100 | 164916 | 167016 |
| 1467 | 24/12/2018 | 2340363 | 1063 | 7700 | 8763 |
| 1679 | 6/2/2018 | 2280998 | 6600 | 722 | 7322 |
| | | एकुण | 70863 | 593078 | 664841 |

उपरोक्त प्रमाणे कपात करणेत आलेली दंडाची रक्कम रुपये 664841/- नगरपालिका फंडाकडे वर्ग करणेत आली आहे.वास्तविकपणे सदर रक्कम हि 14 वित्त आयोग निधीतुन खर्च करणेत आलेने कपातीची रक्कम 14 वित्त आयोग निधी मध्येच वर्ग करणे आवश्यक होते तरी सदर रक्कम 14 वा वित्त आयोग खाती जमा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

6.कचरा संकलनानंतर त्याची वाहतुक घंटागाडीमधून कचरा डेपो पर्यंत कोणत्या वाहनांद्वारे करणेत आला याबाबत

कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.2.2.4( a),(b) नुसार परिपूर्ण अहवाल नसेच त्या वाहनांनी कोणत्या ठिकाणाहून कचरा संकलित केला व तो कचरा कोठे खाली केला याबाबत कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा परिपूर्ण अहवाल व कचरा डेपोवर प्राप्त झालेनंतर किती वाहनांमधून कचरा आला, एका वाहनाच्या किती फेऱ्या झाल्या, त्यावरील वाहनचालकाचे नाव, कोणत्या मार्गावरील वाहन होते, त्या वाहनामधून किती टन कचरा डेपोवर खाली करणेत आला ई. बाबतचा डेपो Manager यांचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

7. घनकचरा व विल्हेवाट अधिनियम 2009 अनुसार घनकचरा व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

अ) कचरा गोळा कचरा कुंडीतच करणे, घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, घंटागाडीने कचरा गोळा करणे

ब) कचरा साठवलेल्या कचरा कुंडीभोवती बेवारस प्राण्यांना येण्यास प्रतिबंध करणे.

क) नागरिकांना स्वच्छतेचे वेळापत्रक वृत्तपत्रातून तपशिलवार वॉर्ड/प्रभाग व बीट निहाय प्रसिद्ध करणे

सदर उपाययोजना करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

8. मुळ टेंडर ,मंजूर ठराव ,करारनाम्यावर गाडी क्र. नमूद नाहीत. तसेच गाड्यांची वाहन क्षमता आरटीओ कडून प्रमाणीत होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

9.करारपत्रामध्ये नमुद अटी नुसार कचरा संकलन व वाहतूक कामाचे कचरा वाहतुकीचे मोजमाप , वाहनांवर GPS सुविधा असणे, जमा झालेल्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे , कचरा संकलन नोंदवही ठेवणे व प्रभागनिहाय सदस्यांचे काम समाधानकारक झाल्याबाबत पत्र घेणे या बाबी देयकापुर्वी सादर करणे पुरवठादारास बंधनकारक करणेत आले होते. तथापी तसा अहवाल प्राप्त झालेचे दिसून येत नाही.

10.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात , कामगार विमा इत्यादीचे पालन झाले नाही.

उपरोक्त पुर्ततेअभावी रक्कम रुपये 22705755/- तात्पुरती अमान्य ठेवण्यात येत आहे.

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

आक्षेपन

## 28 संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न झालेबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मातंस/नस्ती04/224/39 दिनांक 05 मे 2007 अन्वये कार्यवाही केलेली नाही. |

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39 दिनांक 20 जुलै 2002 मधील अ.क्र. 3 व त्यामधील टिप क्रमांक 2 नुसार संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास अथवा त्यापासुन सुट मिळाल्यास वेतनवाढी रोखण्याचे आदेश आहेत. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एरा.आर.व्ही-2017/प्र.क्र.462/कार्या-12 दिनांक 03 जुलै 2018 नुसार वेळोवेळी प्रसिध्द केलेले शासन आदेश विचारात घेऊन दिनांक 24 मे 2018 च्या अधिसुचनेद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. यास्तव यापुढे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत (सुधारणा) नियम 2018 मधील तरतुदी विचारात घेण्याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 67 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-4/224/39 दिनांक 5/5/2007 नुसार संगणक अर्हता उत्तीर्ण करणेबाबत अंतिम मुदतवाढ ही दिनांक 31/12/2007 अखेर दिली असतांना खालील नमुद केलेले कर्मचारी विहीत मुदतीत संगणक अर्हता उत्तीर्ण झाले नसतांनाही शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास दिनांक/सुट दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | श्री. सुहास मा. पवार | लिपीक | |
| 2 | श्री. मोहन सु. प्रभुणे | क्रिडाधिकारी | डिसेंबर 2012 |
| 3 | श्री. सदाशिव ग. जवळे | | जानेवारी 2013 |
| 4 | श्री. विवेक ह. जाधव | सहाय्यक लेखापाल | जानेवारी 2013 |
| 5 | श्री. संजय कु. कोळी | लिपीक | फेब्रुवारी 2012 |
| 6 | श्री. अरविंद स. दामले | सहाय्यक कर निरीक्षक | |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | श्री. महादेव म. साखरे | वरीष्ठ आरोग्य निरीक्षक | सप्टेंबर 2014 |
| 8 | श्री. प्रविण एकनाथ यादव | आरोग्य निरीक्षक | नोव्हेंबर 2014 |
| 9 | श्री. राजेंद्र विनायक धायगुडे | आरोग्य निरीक्षक | जुन 2011 |
| 10 | श्री. दत्तात्रय जा. रणदिवे | आरोग्य निरीक्षक | जुन 2012 |
| 11 | श्री. अविनाश अशोक वाडेकर | आरोग्य निरीक्षक | मे 2013 |

उपरोक्तप्रमाणे कर्मचारी नसेच उर्वरीत सर्व कर्मचारी जे मुदतीत संगणक अर्हता पास किंवा विलंबाने सुट मिळाली याची पडताळणी करुन वरील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

शिक्षण मंडळ

### *29 संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न झालेबाबत. (शिक्षण मंडळ)*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मातंस/नस्ती04/224/39 दिनांक 05 मे 2007 अन्वये कार्यवाही केलेली नाही. |

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39 दिनांक 20 जुलै 2002 मधील अ.क्र. 3 व त्यामधील टिप क्रमांक 2 नुसार संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण न आल्यास अथवा त्यापासुन सुट मिळाल्यास वेतनवाढी रोखण्याचे आदेश आहेत. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही-2017/प्र.क्र.462/कार्या-12 दिनांक 03 जुलै 2018 नुसार वेळोवेळी प्रसिध्द केलेले शासन आदेश विचारात घेऊन दिनांक 24 मे 2018 च्या अधिसुचनेद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. वास्तव यापुढे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत (सुधारणा) नियम 2018 मधील तरतुदी विचारात घेण्याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 68 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-4/224/39 दिनांक 5/5/2007 नुसार संगणक अर्हता उत्तीर्ण करणेबाबत अंतिम मुदतवाढ ही दिनांक 31/12/2007 अखेर दिली असतांना खालील नमूद केलेले कर्मचारी विहीत मुदतीत संगणक अर्हता उत्तीर्ण झाले नसतांनाही शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास दिनांक/सुट दिनांक |
|---|---|---|
| 1 | सुनिल बापू तुपे | माहे जानेवारी 2014 |
| 2 | सुमैय्या उस्मान महापुळे | माहे फेब्रुवारी 2015 |
| 3 | अशोक दगडू सिरसे | माहे ऑक्टोबर 2012 |
| 4 | निरावाई कोंडीबा कदम | माहे मे 2014 |
| 5 | अस्मिता बबनराव सावंत | माहे ऑगस्ट 2014 |

उपरोक्तप्रमाणे कर्मचारी तसेच उर्वरीत सर्व कर्मचारी जे मुदतीत संगणक अर्हता पास किंवा विलंबाने सुट मिळाली यांची पडताळणी करुन वरील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आस्थापना

*30 जादा वेतन अदा झालेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेपुर-1210/प्र.क्र.124/सेवा-9 दिनांक 1 सप्टेंबर 2015 नुसार वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत न केल्याने जादा अदा झालेले वेतन वसुल होणे आवश्यक आहे.

1. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेपुर-1210/प्र.क्र.124/सेवा-9 दिनांक 1 सप्टेंबर 2015 अन्वये सुधारीत वेतन संरचनेत वार्षिक वेतनवाढ मंजुर करतांना कर्मचाऱ्यांचे वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढे जात असेल तर अशा प्रकरणी वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमित करावे व उच्च वेतन बँड मंजुर करण्यात आला तरी कर्मचारी जे ग्रेड वेतन घेत आहेत तेच आहरीत करेल असे असतांना खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्याचे वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत न केलेने त्यांना जादा वेतन अदा झाले आहे. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 69 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. कर्मचाऱ्याचे नांव – श्री. अशोक संभाजी चव्हाण, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2013 | 7340 + 1600 | 7340 + 1600 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 1/7/2014 | 7440 + 1600 | 7610 + 1600 | 170 | 1/7/2014 ते 30/6/2015 |
| एकुण | | | | 170 | |

2. कर्मचाऱ्याचे नांव – श्री. राहुल उत्तम वायदंडे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2013 | 7340 + 1600 | 7340 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2014 | 7440 + 1600 | 7610 + 1600 | 170 | 1/7/2014 ते 30/6/2015 |
| एकुण | | | | 170 | |

3. श्री. जितेंद्र बाळकृष्ण बाबर, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7410 + 1600 | 7410 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

4. श्री. प्रमोद भानुदास बडेकर, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

5. श्री. नितिन बा. चौधरी, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

6. श्री. विजय तुकाराम जाधव, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

7. श्री. राजेश विलास भिसे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

8. श्री. मिलींद अर्जुन पवार, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

9. श्री. आवेज बडेसो शेख, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

10. इन्तहाज जब्बार सय्यद, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

11. श्री. सातिष मा. जाधव, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

12. श्री. सचिन अरुण आवळे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

13. श्री. अमोल अशोक वाघमारे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2015 | 7400 + 1600 | 7400 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2016 | 7440 + 1600 | 7670 + 1600 | 230 | 1/7/2016 ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 30/6/2017 |
| एकुण | | | | 230 | |

14. श्री. शशिकांत शंकर कांबळे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2016 | 7240 + 1600 | 7240 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2017 | 7440 + 1600 | 7510 + 1600 | 70 | 1/7/2017 ते 30/6/2017 |
| 3 | 1/7/2018 | 7720 + 1600 | 7790 + 1600 | 70 | 1/7/2018 ते 30/6/2019 |
| एकुण | | | | 140 | |

15. श्री. नारायण रामचंद्र तुपे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2013 | 7190 + 1600 | 7190 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2014 | 7440 + 1600 | 7460 + 1600 | 20 | 1/7/2014 ते 30/6/2015 |
| एकुण | | | | 20 | |

16. श्री. बाळु शिवा कुचेकर, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2013 | 7190 + 1600 | 7190 + 1600 | - | - |
| 2 | 1/7/2014 | 7440 + 1600 | 7460 + 1600 | 20 | 1/7/2014 ते 30/6/2015 |
| एकुण | | | | 20 | |

17. श्री. दत्ता बाळू होडे, सफाई कामगार

वेतनश्रेणी – 4440 – 7440 ग्रेड वेतन 1600

| अ.क्र. | वेतनवाढीचा दिनांक | देय वेतन | दिलेले वेतन | जादा अदा मुळ वेतन | वसुल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2013 | 7350 + 1600 | 7350 + 1600 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 1/7/2014 | 7440 + 1600 | 7620 + 1600 | 180 | 1/7/2014 ते 30/6/2015 |
| एकुण | | | | 180 | |

वर नमूद केलेप्रमाणे जादा अदा केलेले हे मुळ वेतन असून त्यावर शासनाकडून वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता व घरभाडे भत्ता परिगणित करुन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे. वरील बाब ही चाचणी लेखापरीक्षणात आढळून आली असून वरीलप्रमाणे इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अनियमितता झाली असल्यास वर नमुद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

भांडार

### *31 माजी सैनिकांसाठीच्या निधी अंतर्गत केलेल्या CELL COUNTER मशिन खरेदीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 . नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1100.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1100.00/-

1. GeM) पोर्टलवरुन खरेदी करणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
2. निविदेची किंमत रुपये 500000/- पर्यंत असेल तर निविदा फी रुपये 1000/- रुपये घेणे आवश्यक असतांना रुपये 100/- फी स्वीकारण्यात आली आहे.
3. खरेदीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही.
4. सुरक्षा अनामत म्हणून दोष दायित्व कालावधी समाप्त होईपर्यंत राखून ठेवलेली नाही.
5. कमी रक्मेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
6. नस्तीसोबत CELL COUNTER मशिनचा चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात माजी सैनिकांसाठी निधीअंतर्गत ईसीएचएस पॉलिक्लिनीक सातारा या संस्थेस CELL COUNTER मशिन पुरविणेबाबत नस्तीचे लेखापरीक्षण केले असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 44 दिनांक – 12/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24 ऑगस्ट 2017 नुसार गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) वरुन खरेदी करणे बंधनकारक आहे. परंतु संदर

नगरपरिषदेने ती दरपत्रके मागवून खरेदी केलेली आहे.

2. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग।।।/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 नुसार परिशिष्ट 8 प्रमाणे निविदेची किंमत रुपये 500000/- पर्यंत असेल तर निविदा फी रुपये 1000/- रुपये घेणे आवश्यक असतांना सदर खरेदीसाठी रुपये 100/- फी स्वीकारण्यात आली आहे. तसेच तीन पुरवठादारांकडून निविदा प्राप्त झाल्या असता, फी भरल्याबाबतची पावती नस्तीमध्ये आढळून आली नाही. रक्कम रुपये 900/- वसूल करुन पुर्तता दाखवावी.

3. सदर खरेदीसाठी सातारा नगरपरिषदेने स्थायी समिती ठराव क्रमांक 906 दिनांक 11/9/2018 नुसार (प्र.क्र.2027 दिनांक 26/3/2019 प्रमाणे) रक्कम रुपये 97000/- ची मान्यता घेतली होती परंतु सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता मशिन खरेदीसाठी रुपये 370000/- इतका खर्च करणेत आला आहे.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 च्या कलम 141 नुसार सदर खरेदीसाठी पुरवठादाराकडून 10 टक्के म्हणजेच रुपये 31355/- इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून दोष दायित्व कालावधी समाप्त होईपर्यंत राखून ठेवणे आवश्यक असतांना ती रक्कम रुपये 24148/- एवढीच राखून ठेवण्यात आली आहे.

5. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असतांना स्टँप पेपर रुपये 500/- चा घेणे आवश्यक असांना रुपये 300/- रकमेचा स्टँप पेपरवर करारनामा केला आहे. उर्वरीत रक्कम रुपये 200/- वसुल करुन पुर्तता दाखवावी.

6. नस्तीसोबत CELL COUNTER मशिनचा चाचणी अहवाल उपलब्ध नसलेने पुरवठा केलेल्या मशिनची तांत्रिक योग्यता आहे कि नाही याची पडताळणी करता आली नाही.

वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

***32 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 267935.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 267935.00/-

| |
|---|
| अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा करण्यात आली आहे. |

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या निवृत्ती वेतन, सेवा उपदान व रजा रोखीकरण खर्च प्रमाणकांची व निवृत्ती वेतन नस्ती व सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्रमाणक क्रमांक 30 दिनांक 14/6/2018 रक्कम रुपये 259373/- नुसार श्री. जगन्नाथ रामु बाबर पद – बिगारी हे दिनांक 30/4/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना 300 दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकांमधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 30/1/2003 ते 8/2/2003 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 24/11/2003 तेक 8/12/2003 | 15 दिवस | अर्जित रजा |
| 3 | 13/1/2004 ते 17/1/2004 | 5 दिवस | अर्जित रजा |
| 4 | 13/7/2017 ते 22/7/2017 | 10 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 40 दिवस | |

वर नमुद केलेली 40 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 38909/- वसुल होणे आवश्यक आहे.

40 ÷ 30 X (10610 + 1600 + 16972) 29172 = 38909/-

2. प्रमाणक क्रमांक 31 दिनांक 14/6/2018 रक्कम रुपये 328860/- नुसार श्री. कैलास रामचंद्र सोळके पद – वाहन चालक हे दिनांक 30/4/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना 300 दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकांमधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 20/7/2000 ते 4/5/2000 | 15 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 15 दिवस | |

वर नमुद केलेली 15 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 16443/- वसुल होणे आवश्यक आहे.

15 ÷ 30 X (11560 + 2200 + 19126) 32886 = 16443/-

3. प्रमाणक क्रमांक 33 दिनांक 14/6/2018 रक्कम रुपये 28963/- नुसार श्री. सदाशिव रामचंद्र जांबळे पद – वाहन बिगारी हे दिनांक 31/5/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना 300 दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकांमधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 14/4/2015 ते 28/4/2015 | 15 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 15 दिवस | |

वर नमुद केलेली 15 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये **14567/-** वसुल होणे आवश्यक आहे.

15 ÷ 30 X (10590 + 1600 + 16944) 29134 = 14567/-

4. प्रमाणक क्रमांक 51 दिनांक 23/7/2018 रक्कम रुपये 81592/- नुसार श्री. शैलजा गजानन दिक्षीत पद – वाहन सफाई कामगार हे दिनांक 31/5/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकामधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 2/11/2006 ते 4/11/2006 | 3 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 2/2/2007 ते 5/2/2007 | 5 दिवस | अर्जित रजा |
| 3 | 6/1/2014 ते 10/1/2014 | 5 दिवस | अर्जित रजा |
| 4 | 18/8/2017 ते 1/9/2017 | 15 दिवस | अर्जित रजा |
| 5 | 15/2/2018 ते 1/3/2018 | 15 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 43 दिवस | |

वर नमुद केलेली 43 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 33880/- वसुल होणे आवश्यक आहे.

43 ÷ 30 X (8290 + 1600 + 13747) 23637 = 33880/-

5. प्रमाणक क्रमांक 59 दिनांक 9/8/2018 रक्कम रुपये 289631/- नुसार श्री. अरुण लक्ष्मण कांबळे पद – वाहन बिगारी हे दिनांक 30/6/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकामधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 4/10/1994 ते 13/11/1994 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 8/2/1996 ते 17/2/1996 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 3 | 30/4/1996 ते 9/5/1996 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 4 | 31/12/2007 ते 5/1/2008 | 6 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 36 दिवस | |

वर नमुद केलेली 36 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 34961/- वसुल होणे आवश्यक आहे.

36 ÷ 30 X (10590 + 1600 + 16944) 29134 = 34961/-

6. प्रमाणक क्रमांक 106 दिनांक 1/11/2018 रक्कम रुपये 286800/- नुसार श्री. बाळकृष्ण लक्ष्मण शिंदे पद – लिपीक हे दिनांक 31/8/2018 रोजी सेवा निवृत्त झालेने त्यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली

आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकांमधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 6/4/1994 ते 22/4/1994 | 1 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 13/10/2008 ते 17/10/2008 | 5 दिवस | अर्जित रजा |
| 3 | 3/1/2014 ते 12/1/2014 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 4 | 4/1/2018 ते 13/1/2018 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 5 | 16/1/2018 ते 31/1/2018 | 16 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 42 दिवस | |

वर नमुद केलेली 42 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 50190/- वसुल होणे आवश्यक आहे.

42 ÷ 30 X (12600 + 2400 + 20850) 35850 = 50190/-

7. प्रमाणक क्रमांक 91 दिनांक 22/10/2018 रक्कम रुपये 221142/- नुसार शशिकांत विलास वायदंडे पद – सफाई कामगार हे सेवेत असतांना मृत्यु झालेने त्यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवापुस्तकांमधील रजा लेख्यांची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकात नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 23/11/2008 ते 28/11/2008 | 6 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 31/1/2018 ते 30/4/2018 | 31 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 37 दिवस | |

वर नमुद केलेली 37 दिवस अर्जित रजा उपभोगल्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही रजा लेख्यांमधुन कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली असल्याने रक्कम रुपये 28298/- वसुल होणे आवश्यक आहे.

37 ÷ 30 X (8000 + 1600 + 13344) 22944 = 28298/-

8. प्रमाणक क्रमांक 60 दिनांक 20/8/2018 रक्कम रुपये 303401/- नुसार अशोक पापा लाड पद – सफाई कामगार हे दिनांक 31/5/2018 रोजी सेवानिवृत्त झालेने त्यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतू त्यांच्या सेवेमधील अनर्हतकाली सेवाकाळ एकुण 441 दिवस ज्या त्या सहामाहीमध्ये कमी न केलेने 441÷10 = 44 दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम खाली नमुद केलेप्रमाणे जादा अदा झालेने रक्कम रुपये 17252/- वसुल होणे आवश्यक आहे.

44 ÷ 30 X (11880 + 1600 + 18737) 32217 = 17252/-

9. प्रमाणक क्रमांक 147 दिनांक 4/2/2019 रक्कम रुपये 302287/- नुसार कै. राजु मारुती बडेकर पद – बिगारी हे दिनांक 16/10/2018 रोजी सेवेत असतांना मृत्यु पावल्याने त्यांच्या वारसाला रजा रोखीकरणाची रक्कम अदा केली आहे. परंतू त्यांच्या सेवेमधील अनर्हतकाली सेवाकाळ एकुण 326 दिवस ज्या त्या सहामाहीमध्ये कमी न केलेने 326÷10 = 33 दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम खाली नमुद केलेप्रमाणे जादा अदा झालेने रक्कम रुपये

33435/- वसुल होणे आवश्यक आहे.

33 ÷ 30 X (10960 + 1600 + 17835) 30395 = 33435/-

आस्थापना / निवृत्तीवेतन

*33 वेतन, सेवानिवृत्ती वेतन, सेवा उपदान व अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा केलेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 03

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेपुर-1210/प्र.क्र.124/सेवा-9 दिनांक 1 सप्टेंबर 2015 अन्वये सुधारीत वेतन संरचनेत वार्षिक वेतनवाढ मंजुर करतांना कर्मचाऱ्यांचे वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढे जात असेल तर अशा प्रकरणी वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमित करावे व उच्च वेतन बँड मंजुर करण्यात आला तरी कर्मचारी जे ग्रेड वेतन घेत आहेत तेच आहरीत करेल असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. |

सातारा नगरपरिषद सातारा सन 20/8/2019 चे लेखापरीक्षणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या निवृत्ती वेतन, सेवा उपदान, रजा रोखीकरण खर्च प्रमाणकांची व निवृत्ती वेतन नस्तीची व सेवापुस्तकांची तपासणी केली असता महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेपुर-1210/प्र.क्र.124/सेवा-9 दिनांक 1 सप्टेंबर 2015 अन्वये सुधारीत वेतन संरचनेत वार्षिक वेतनवाढ मंजुर करतांना कर्मचाऱ्यांचे वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढे जात असेल तर अशा प्रकरणी वेतन बँड मधील वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमित करावे व उच्च वेतन बँड मंजुर करण्यात आला तरी कर्मचारी जे ग्रेड वेतन घेत आहेत तेच आहरीत करेल असे असतांना खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्याचे वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत न केलेने त्यांना वेतन, निवृत्ती वेतन, सेवा उपदान व अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झालेने रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

1. कृष्णा दगडू कार्वे – पद – बिगारी,

सेवानिवृत्त दिनांक 31/5/2018

प्रमाणक क्रमांक 34 दिनांक 14/6/2018 रक्कम रुपये 285285/- रजा रोखीकरण,

प्रमाणक क्रमांक 48 दिनांक 23/7/2018 रक्कम रुपये 209514/- सेवा उपदान

**I) जादा वेतन अदा झालेबाबत.**

| अ.क्र. | वेतनवाढ दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | जादा अदा मुळ वेतन |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2007 | 7300+1600 | 7300+1600 | 00 |
| 2 | 1/7/2008 | 7570+1600 | 7440+1600 | 130 |
| 3 | 1/7/2009 | 7850+1600 | 7720+1600 | 130 |
| 4 | 1/7/2010 | 8140+1600 | 8000+1600 | 140 |
| 5 | 1/7/2011 | 8440+1600 | 8290+1600 | 150 |
| 6 | 1/7/2012 | 8750+1600 | 8590+1600 | 160 |
| 7 | 1/7/2013 | 9070+1600 | 8900+1600 | 170 |
| 8 | 1/7/2014 | 9390+1600 | 9220+1600 | 170 |
| 9 | 1/7/2015 | 9720+1600 | 9550+1600 | 170 |
| 10 | 1/7/2016 | 10060+1600 | 9890+1600 | 170 |
| 11 | 1/7/2017 | 10410+1600 | 10240+1600 | 170 |
| एकुण | | | | 1560 |

वर नमुद केलेले हे जादा अदा मुळ वेतन असून त्यावर वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता व घरभाडे भत्ता परिगणित करुन दिनांक 1/7/2018 ते दिनांक 31/5/2018 अखेरची जादा अदा झालेली वेतनाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**II) जादा अदा निवृत्तीवेतन –**

दिलेले निवृत्ती वेतन – 10410+1600 = 12010÷2 = 6005/-

देय निवृत्ती वेतन – 10240 +1600 = 11840÷2 = 5920/-

जादा अदा निवृत्ती वेतन 85/-

वर नमुद केलेले हे जादा अदा मुळ निवृत्तीवेतन असून त्यावर शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता परिगणित करुन दिनांक 1/6/2018 ते आजअखेर जादा अदा झालेले निवृत्तीवेतन वसुल होणे आवश्यक आहे.

**III) जादा अदा सेवा उपदान**

दिलेले सेवा उपदान 10410+1600 ÷4 X 65 = 195162/-

देय सेवा उपदान – 10240+1600 ÷4 X 65 = 192400/-

जादा अदा सेवा उपदान रुपये 2762/-

**IV) जादा अदा रजा रोखीकरण**

दिलेले रजा रोखीकरण - 300÷30X(10410+1600+16694) 28704 = 287040/-

देय रजा रोखीकरण - 300÷30X(10240+1600+16458) 28298 = 282980/-

जादा अदा रजा रोखीकरण रुपये 4060/-

V) दिनांक 1/7/1998 ते 30/12/1998 या सहामाही अखेर सदर कर्मचाऱ्यांच्या खाती एकुण 30 दिवस अर्जित रजा शिल्लक असतांना दिनांक 1/11/21998 ते 30/11/1998 या कालावधीत 30 दिवस + 30 दिवस सरेंडर रजा घेतल्याने रजा शिल्लक नसतांनाही घेतलेल्या एक महिन्याच्या सरेंडर रजेची रक्कम (मुळ वेतन 3170 + महागाई भत्ता 22 टक्के - 697) = रुपये 3867/- वसुल होणे आवश्यक आहे.

VI) दिनांक 1/7/2000 ते 31/12/2000 या सहामाही अखेर सदर कर्मचाऱ्यांच्या खाती एकुण 30 दिवस अर्जित रजा शिल्लक असतांना दिनांक 1/12/2000 ते 31/12/2000 या कालावधीत 30 दिवस + 30 दिवस सरेंडर रजा घेतल्याने रजा शिल्लक नसतांना।ही घेतलेल्या एक महिन्याच्या सरेंडर रजेची रक्कम (मुळ वेतन 3235 + महागाई भत्ता 38 टक्के - 1229) = रुपये 4464/- वसुल होणे आवश्यक आहे.

2. कै. जयवंता हणमंत सपकाळ पद – शिपाई

सेवेत असतांना मृत्यु दिनांक 6/7/2018

वारस – सौ. भाग्यश्री गोपाळ कांबळे – मुलगी (सज्ञान)

प्रमाणक क्रमांक 103 दिनांक 1/11/2018 रक्कम रुपये 113668/- रजा रोखीकरण

प्रमाणक क्रमांक 126 दिनांक 4/12/2018 रक्कम रुपये 342200 सेवा उपदान

**I) जादा वेतन अदा झालेबाबत.**

| अ.क्र. | वेतनवाढ दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | जादा अदा मुळ वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2009 | 7260+1600 | 7260+1600 | 00 |
| 2 | 1/7/2010 | 7530+1600 | 7440+1600 | 90 |
| 3 | 1/7/2011 | 7810+1600 | 7720+1600 | 90 |
| 4 | 1/7/2012 | 8100+1600 | 8000+1600 | 100 |
| 5 | 1/7/2013 | 8400+1600 | 8290+1600 | 110 |
| 6 | 1/7/2014 | 8700+1600 | 8590+1600 | 110 |
| 7 | 1/7/2015 | 9010+1600 | 8900+1600 | 110 |
| 8 | 1/7/2016 | 9330+1600 | 9220+1600 | 110 |
| 9 | 1/7/2017 | 9660+1600 | 9550+1600 | 110 |
| 10 | 1/7/2018 | 10000+1600 | 9890+1600 | 110 |
| एकुण | | | | 940 |

वर नमुद केलेले हे जादा अदा मुळ वेतन असून त्यावर वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता व घरभाडे भत्ता परिगणित करुन दिनांक 1/7/2010 ते दिनांक 6/7/2018 अखेरची जादा अदा झालेली वेतनाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**II) जादा अदा सेवा उपदान.**

दिलेले सेवा उपदान 10000 + 1600 ÷ 2 X 59 = 342200

देय सेवा उपदान 9890 + 1600 ÷ 2 X 59 = 338955

जादा अदा सेवा उपदान 3245/-

**III) जादा अदा रजा रोखीकरण.**

दिलेले रजा रोखीकरण - 123 ÷ 30 X (10000 + 1600 + 16124) 27724 = 113668/-

देय रजा रोखीकरण – 123 ÷ 30 X (9890 + 1600 +15971)27461 = 112590/-

जादा अदा रोखीकरण 1078/-

IV) कै. जयवंता हणमंत सपकाळ यांच्या सेवा पुस्तकातील रजा लेख्यांची तपासणी केली असता खालील कालावधीमधील नमुद केलेल्या अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवापुस्तकामध्ये नोंदी असतांनाही उपभोगलेल्या रजा, रजालेख्यांमधुन कमी केल्या नाहीत.

| अ.क्र. | रजेचा कालावधी | घेतलेली रजा | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 9/4/2004 ते 18/4/2004 | 10 दिवस | अर्जित रजा |
| 2 | 15/7/2004 ते 29/7/2004 | 15 दिवस | अर्जित रजा |
| 3 | 13/2/2004 ते 27/12/2004 | 15 दिवस | अर्जित रजा |
| 4 | 21/2/2007 ते 7/3/2007 | 15 दिवस | अर्जित रजा |
| 5 | 30/9/2009 ते 14/10/2009 | 15 दिवस | अर्जित रजा |
| एकुण | | 70 दिवस | |

वर नमुद केलेली 70 दिवस अर्जित रजा उपभोगलेबाबत सेवा पुस्तकामध्ये नोंदी असतांनाही सदरची रजा रजालेख्यांमधून कमी न केल्याने खाली नमुद केलेप्रमाणे 70 दिवस अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम रुपये 64689/- जादा अदा झाल्याने वसुल होणे आवश्यक आहे.

70 ÷ 30 X (10000 + 1600 +16124) 27724 = 64689/-

3. संजय शिवाजी निक – पद – वॉचमन सेवानिवृत्त दिनांक 31/12/2018

प्रमाणक क्रमांक 154 दिनांक 18/3/2019 रक्कम रुपये 297508/- रजा रोखीकरण

**I) जादा वेतन अदा**

| अ.क्र. | वेतनवाढ दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | जादा अदा मुळ वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | 1/7/2007 | 7300+1450 | 7300+1450 | 00 |
| 2 | 1/7/2008 | 7570+1450 | 7440+1450 | 130 |
| 3 | 1/7/2009 | 7850+1600 | 7710+1600 | 140 |
| 4 | 1/7/2010 | 8140+1600 | 7990+1600 | 150 |
| 5 | 1/7/2011 | 8440+1600 | 8280+1600 | 160 |
| 6 | 1/7/2012 | 8750+1600 | 8580+1600 | 170 |
| 7 | 1/7/2013 | 9070+1600 | 8890+1600 | 180 |
| 8 | 1/7/2014 | 9390+1600 | 9210+1600 | 180 |
| 9 | 1/7/2015 | 9720+1600 | 9540+1600 | 180 |
| 10 | 1/7/2016 | 10060+1600 | 9880+1600 | 180 |
| 11 | 1/7/2017 | 10410+1600 | 10230+1600 | 180 |
| 12 | 1/7/2018 | 10770+1600 | 10590+1600 | 180 |
| एकुण | | | | 1830 |

वर नमुद केलेले हे जादा अदा मुळ वेतन असून त्यावर वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता व घरभाडे भत्ता परिगणित करुन दिनांक 1/7/2008 ते दिनांक 31/12/2018 अखेरची जादा अदा झालेली वेतनाची रक्कम वुसल होणे आवश्यक आहे.

**II) जादा अदा निवृत्ती वेतन**

दिलेले निवृत्ती वेतन – 10770 + 1600 = 12370 ÷ 2 = 6185/-

देय निवृत्ती वेतन - 10590 + 1600 = 12190 ÷ 2 = 6095/-

जादा अदा निवृत्ती वेतन 90/-

वर नमुद केलेले हे जादा अदा मुळ निवृत्तीवेतन असून त्यावर शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी मिळणारा महागाई भत्ता परिगणित करुन दिनांक 1/1/2019 ते आजअखेर जादा अदा झालेले निवृत्तीवेतन वसुल होणे आवश्यक आहे.

**II) जादा अदा सेवा उपदान.**

दिलेले सेवा उपदान 10770 + 1600 ÷ 4 X 66 = 204105/-

देय सेवा उपदान 10590 + 1600 ÷ 4 X 66 = 201135/-

जादा अदा सेवा उपदान 2970/-

**III) जादा अदा रजा रोखीकरण.**

दिलेले रजा रोखीकरण - 300 ÷ 30 X (10770 + 1600 + 17565) 29935 = 299350/-

देय रजा रोखीकरण – 300 ÷ 30 X (10590 + 1600 +17310)29500 = 295000/-

जादा अदा रोखीकरण 4350/-

आस्थापना

***34 वेतनामधून विशेष भत्ता अदा केलेबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसुचना क्रमांक वेपुर-1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22 एप्रिल 2009 अन्वये विद्यमान वेतन श्रेणीतील वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जेथे सुधारीत वेतन बँड आणि ग्रेड वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता अनुज्ञेय करण्यात आला नाही. असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. |

सातारा नगरपरिषद, सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात नगरपरिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत

असणारे संवर्गातील कर्मचारी यांच्या वेतन देयकांची तपासणी केली असता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसुचना क्रमांक वेपुर-1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22 एप्रिल 2009 अन्वये विद्यमान वेतन श्रेणीतील वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जेथे सुधारीत वेतन बँड आणि ग्रेड वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता अनुज्ञेय करण्यात आला नाही. असे असतांना सन 2018-19 या आर्थिक वर्षामध्ये अदा केलेल्या वेतन देयकातून एकुण 466 कर्मचाऱ्यांना रक्कम रुपये 100/- प्रमाणे प्रती महिला वैद्यकीय भत्ता म्हणून रक्कम अदा केलेली आहे. विशेष भत्ता अथवा विशेष वेतन अनुज्ञेय नसतांनाही वेतनातून अदा केलेल्या वैद्यकीय भत्त्याची रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. सबब 466 कर्मचारी X रुपये 100/- प्रति महिना X 12 महिने अशी एकुण रक्कम रुपये 559200/- वसुल होणे आवश्यक आहे. सदरची बाब ही चाचणी लेखापरीक्षणात आढळून आली असून याबाबत दिनांक 1/1/2006 ते 31/3/2018 अखेर सर्व वेतन देयकांची आपले स्तरावर तपासणी करुन वरील प्रकारचा भत्ता अदा केला असल्यास दिलेल्या भत्त्याची रक्कम कर्मचारीनिहाय परिगणित करुन वसुल होणे आवश्यक आहे.

निवृत्तीवेतन

### *35 सेवा उपदान जादा अदा केलेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5915.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 5915.00/-

| निवृत्ती वेतन सेवाकाळ जादा घेतल्याने खाली नमुद केल्याप्रमाणे सेवा उपदानाची रक्कम जादा अदा झाली आहे. |
|---|

सातारा नगरपरिषद सातारा सन 2018-19 लेखापरीक्षणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेल्या सेवा उपदान खर्च प्रमाणकांची व निवृत्तीवेतन नस्ती व सेवा पुस्तकांची तपासणी केली असता निवृत्ती वेतन सेवाकाळ जादा घेतल्याने खाली नमुद केल्याप्रमाणे सेवा उपदानाची रक्कम जादा अदा झाली आहे.

कर्मचाऱ्याचे नांव – कुमार सदाशिव तारळेकर – पद – मुकादम

नगरपालिका सेवेत कायम दिनांक – 4/11/1985

सेवेत असतांना मृत्यु दिनांक – 23/11/2017

सेवेमधील अनर्हताकारी सेवाकाळ – (1012 दिवस) 2 वर्ष 9 महिने 12 दिवस

निवृत्ती वेतनार्ह सेवाकाळ – 29 वर्ष 3 महिने 7 दिवस

अंतिम वेतन – 10230 + 1600 = 11830/-

प्रमाणक क्रमांक – 5 दिनांक 16/4/2018 रक्कम रुपये 354200/- सेवा उपदान

दिलेले सेवा उपदान - 10230 + 1600 = 11830 ÷ 2 X 60 = 354900/-
देय सेवा उपदान - 10230 + 1600 = 11830 ÷ 2 X 59 = 348985/-

जादा अदा सेवा उपदान 5915/-
जादा अदा मृत्यु नि सेवा उपदानं रक्कम रुपये 5915/- वसूल होणे आवश्यक आहे.

पाणीपुरवठा

### 36 कास पंपींग स्टेशन चालविणे कामातील अनियमिततेबाबत.

00
**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 300.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 300.00/-

1. सदर काम दरपत्रके मागवून केलेबाबत कोणतेही कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.
2. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
3. बयाणा रक्कम शुल्क व निविदा शुल्क यांच्या पावत्या नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.
4. ठेकेदराने त्यांचेकडील कर्मचाऱ्यांचा EPF भरल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.
5. पंप हाऊस चालविणेसाठी पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रके नस्तीसोबत आढळून आली नाही.

सातारा नगरपरिषद सन 2018-19 चे लेखापरीक्षणात कास पंपींग स्टेशन चालविणे कामातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 46 दिनांक 15/2/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 294900/- इतकी असल्यामुळे सदर काम दरपत्रके मागवून करणे गरजेचे होते. सदर काम दरपत्रके मागवून केलेबाबत कोणतेही कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

2. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामाचा करारनामा करतांना रुपये 500/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना निविदाधारकाकडून रुपये 200/- च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. उर्वरीत रक्कम रुपये 300/- वसुल करुन पुर्तता दाखवावी.

3. निविदा शुल्क व बयाणा रक्कम शुल्क व बयाणा रक्कम शुल्क यांच्या पावत्या नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

4. ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांनी EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.
5. पंप हाऊस चालविणेसाठी पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रके नस्तीसोबत आढळून आली नाही, त्यामुळे किती कर्मचारी हजर होते व कितीचे देयकात नमुद यामध्ये ताळमेळ घेता आला नाही.

उपरोक्तबाबत पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

आस्थापना

### 37 वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांबाबत.

00
**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : लेखा नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आयकर अधिनियम 1961 चे कलम 17(2) अन्वये अदा केलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची रक्कम वार्षिक आयकर विवरणपत्र भरतांना त्यामध्ये समाविष्ट करुन आयकराची परिगणना करणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे खर्च केल्याचे आढळून आले.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 507 | 5/7/2019 | श्री. सागर चं. वायदंडे | 88984 |
| 508 | 5/7/2019 | शशिकांत विलास वायदंडे | 50333 |
| 510 | 5/7/2019 | प्रभाकर रा. वागडोळे | 100000 |
| 498 | 2/7/2019 | रंजना अशोक धडचिरे | 79026 |
| 1044 | 11/10/2018 | लियाकत उस्मान मुजावर | 60613 |
| 1045 | 11/10/2019 | सुरेश दत्तात्रय भोइटे | 100000 |
| 1614 | 28/1/2019 | चेतन शंकर देडगे | 63990 |
| 1941 | 29/9/2019 | विशाल राजेंद्र देशमाने | 24010 |
| 1915 | 15/3/2019 | दत्तात्रय लक्ष्मण पावशे | 100000 |
| एकुण | | | 666956 |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 152 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला

होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. आयकर अधिनियम 1961 चे कलम 17(2) अन्वये अदा केलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची रक्कम वार्षिक आयकर विवरणपत्र भरतांना त्यामध्ये समाविष्ट करुन आयकराची परिगणना करणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. सबब वरील अधिनियमाच्या कलम 17(2) प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आक्षेपण/

### *38 वेतन बँडमधील वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत करण्याबाबतची कार्यवाही न केलेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 मधील नियम 10 खालील परंतुकानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. |

सातारा नगरपरिषद, जिल्हा सातारा सन 2018-19 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये वेतन बँडमधील वेतन वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 119 दिनांक 06/03/2020 रोजी निर्गमित करण्यात आले होते. त्यास अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर1210/प्र.क्र.124/सेवा-9 दिनांक 1 सप्टेंबर 2015 व शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक 5 मे 2010 अन्वये कर्मचाऱ्यांचे वेतन हे वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढे जात असेल तर अशा प्रकरणी वेतनबँडमधील वेतनाच्या कमाल टप्प्यावर वेतन सिमीत करण्यात यावे. असे असतांना नगरपरिषदेतील कर्मचारी श्री. बबन आवळे, सहाय्यक माळी यांचे वेतन 7440/- च्या पुढे म्हणजेच दिनांक 1/7/2008 ते 1/7/2019 पर्यंत रुपये 7570/- ने वेतन निश्चिती केली आहे. व त्यानुसारच 7 वा वेतन आयोगाची वेतन निश्चिती केली आहे. सदरचे वेतन वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढे जात असल्याने त्यांचे वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर सिमीत करण्यात यावे तसेच वरीलप्रमाणे वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर 1 वर्ष वेतन घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांस महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 मधील नियम 10 खालील परंतुकानुसार लगतचा उच्च वेतन बँड अनुज्ञेय राहील.

उपरोक्तनुसार शासन निर्णय दिनांक 1 सप्टेंबर 2015 नुसार उपरोक्त नमूद कर्मचाऱ्यांच्या जादा अदा वेतनाची परिगणना करुन अतिप्रदानाची वसुली करण्यात यावी. तसेच त्याप्रमाणे उर्वरीत सर्व सेवापुस्तकांचा आढावा घेऊन

अनुपालन सादर करावे.

आदेश कार्य

*39 पेठ 440 सदर बझार ते 442 सदर बझार रस्ते डांबरीकरण व गटर पाईपड्रेन करणे.*

69

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4391400.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 4306243.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 85157.00/-

| |
|---|
| 1. दलित वस्ती मध्ये राहणारया लोकांची संख्या 25% पेक्षा जास्त असलेबाबत समाजकल्याण अधिकारी यांचे पत्र अथवा प्रमाणपत्र नस्ती सोबत आढळून आलेले नाही. |
| 2. डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत जोडलेली नाही. |
| 3. रॉयल्टी कपात केलेली नाही. |
| 4.विमा रक्कम कमी कपात केली आहे. |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 4391460/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत अर्धसमासपत्र क्रमांक 139 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे.

1. दलित वस्ती मध्ये राहणारया लोकांची संख्या 25% पेक्षा जास्त असलेबाबत समाजकल्याण अधिकारी यांचे पत्र अथवा प्रमाणपत्र नस्ती सोबत आढळून आलेले नाही.

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

3. खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाचो प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. सदरचे कामामध्ये 642.57 CUM गौण खनिज म्हणजेच 227 ब्रास गौण खनिज वापलेले आहे परंतु नसती सोबत 69 ब्रास च्या पावत्या जोडलेल्या तरी कमी कपात रक्कम रुपये 63200/- (158 BRASS X 141.34 = 63200) वसूल करुन शासन खाती भरण्यात यावेत.

4. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांवावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम

क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये 4391400 चे होते तरी सदरचे देयकातून 43914/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 21957 कपात केलेले आहेत तरी कमी कपात रक्कम रुपये 21957/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

5. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदाराने चालू महिन्याचे देयक अदा करताना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असताना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद साताराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 4306243/- तात्पुरती अमान्य व रक्कम रुपये 85157/- अंतिम अमान्य करणेत येत आहेत.

बांधकाम

***40 प्रभाग क्रमांक 16 पेठ शनिवार सोमवार यादोगोपाळ अंतर्गत ठिकाणी पाईप ड्रेन करणे***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3706083.00 /-

*तात्पुरती अमान्य रक्कम रु. 3687830.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 18253.00/-*

1. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
2. देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.
3. खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र नगरपरिषद प्रशासन संचालनालय व जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त बाबत खुलासा सादर करण्यात यावा.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग क्रमांक 16 पेठ शनिवार सोमवार यादोगोपाळ अंतर्गत ठिकाणी पाईप ड्रेन करणे |
| निधिचे नांव | रस्ते अनुदान 2017-18 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 4500800/- |
| निविदा स्विकृत | स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 846 दिनांक 11/9/2018 |

| | |
|---|---|
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 4456243/- |
| मक्तेदाराचे नांव | ओमकार द. भंडारे |
| प्रशासकीय मान्यता | क्रमांक साशा/नपा/विरस्ना/313/714 दिनांक 8/3/2018 |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण 656 दिनांक 24/1/2018 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 30/10/2018 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 5/9/2019 |
| कामाची मुदत | 3 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 105 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 3706083/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 3600/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | पहिले धावते देयक रक्कम रुपये 1505771/-<br>712-15/3/2019 रक्कम रुपये 2200312/- दुसरे धावते देयक<br><br>एकुण 3706083/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 3706083 इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 140 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदरचे कामामध्ये रक्कम रुपये 4000 चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना 3600 रुपयांचे मुद्रांकावर करारनामा केलेला आहे तरी रक्कम रुपये 400 वसूल करून शासन खाती भरण्यात यावेत.

2. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांबावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे प्रथम देयक हे रक्कम रुपये 1505771 व द्वितीय देयक हे रक्कम रुपये 2200312 आहे. सदरचे देयकातून अनुक्रमे 7528 व 10325 रुपये विमा कपात केलेला आहे म्हणजेच .50%विमा कपात केलेला आहे तरी रक्कम रुपये 17853/- वसूल करून शासन खाती भरण्यात यावेत.

3. सदर कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश मा जिल्हाधिकारी सातारा दिनांक 08/03/2018 मधील अटी व शर्ती नुसार प्रकल्पा अंतर्गतची कामे सुरु करण्यापूर्वीचे स्थितीचे छायाचित्र काढल्याचे नस्ती सोबत आढळून आलेले नाही. तसेच अटी व शर्ती मधील अट क्रमांक 3 नुसार विनियोग प्रमाणपत्र नगरपरिषद प्रशासन संचालनालय व जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केल्याचे दिसून येत नाही.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ..4

ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 3687830/- तात्पुरती अमान्य व रक्कम रुपये 18253/- वसुलपात्र करणेत येत आहे.

स्थावर

**41 नगरपरिषद मालकीचे मंगल कार्यालय मक्ता पध्दतीने चालविणेस दिल्याबाबत.**

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 06

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 439860.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 439860.00/-

1. नगरपरिषदेच्या मिळकती भाडयाने देणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 92 व मालमत्ता हस्तांतरण नियम 1983 प्रमाणे 9 वर्षापेक्षा जास्त मुदतवाढी देण्यापूर्वी शासनाची मंजुरी घेतलेली नाही.
2. तीन वर्षाकरीता मक्ता देऊन त्यानंतर दोनवेळा मुदतवाढ देणे योग्य असता एकाचवेळी 9 वर्षाकरीता मक्ता दिला असल्याने नियमबाहयता झाली आहे.
3. करारनामा शर्त क्रमांक 9 नुसार दर तीन वर्षांनी 15 टक्के वाढ असे स्वरुप आहे. मात्र याप्रमाणे भाडेवाढ करुन त्याप्रमाणे वसुली झाली नसलेचे आढळले आहे.
4. सदरबाबतचा खर्च नगरपरिषद अभियंत्याच्या देखरेखीखाली केला असल्याचे आढळले नाही.
5. मक्तेदाराकडून येणे बाकी रक्कम पाहता सदरचा मक्ता नगरपरिषदेस फायद्याचा ठरल्याचे दिसत नाही.
6. प्रत्येक त्रैवार्षिक 15 टक्के वाढ याप्रमाणे आकारणी करुन आलेली थकबाकीची रक्कम नसल्याने योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

नगरपरिषद ठराव क्रमांक 773 दिनांक 31/08/2009

कालावधी 9 वर्ष

मुदत दिनांक 30/8/2018 पर्यंत

भाडे दरमहा रुपये 4200/-

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 109 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. मंगल कार्यालय भाड्याने देणेबाबत 9 वर्षाकरीता मुळ कालावधी असतांना नगरपरिषदेने ठराव 1363 दिनांक 8/10/2011 अन्वये 6 वर्ष वाढीव मुदत म्हणजे एकुण 15 वर्ष करण्यात मान्यता दिली. तथापि नगरपरिषदेच्या मिळकती भाडयाने देणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 92 व मालमत्ता हस्तांतरण नियम 1983 प्रमाणे 9 वर्षापेक्षा जास्त मुदतवाढी देण्यापूर्वी शासनाची मंजुरी आवश्यक आहे. वाढीव मुदतीच्या ठरावाची अंमलबजावणी झाली किंवा कसे याबाबत तपशिल उपलब्ध झाला नाही. तथापि अद्याप कार्यालय मक्तेदाराच्या ताब्यात आहे असे आढळले आहे. नगरपरिषदेने कार्यालया ताब्यात मिळणेविषयी मानप/स्थायी/296/2018 दिनांक 4/9/2018 अन्वये नोटीस दिली आहे. मात्र यावर ठोस कार्यवाही झालेचे आढळले नाही.

2. मक्तेदारासोबतचा करारनाम्यातील तरतुदी पाहिल्या असता शर्त क्रमांक 11 नुसार मक्त्याची अंतिम मुदत दिनांक 30/8/2018 पर्यंत आहे. मुळात प्रथमत: तीन वर्षाकरीता मक्ता देऊन त्यानंतर दोनवेळा मुदतवाढ देणे योग्य असता एकाचवेळी 9 वर्षाकरीता मक्ता दिला असल्याने नियमबाहयता झाली आहे.

3. करारनामा शर्त क्रमांक 9 नुसार भाडे दरमहा रुपये 4200/- व दर तीन वर्षांनी 15 टक्के वाढ असे स्वरुप आहे. मात्र याप्रमाणे भाडेवाढ करुन त्याप्रमाणे वसुली झाली नसल्येचे आढळले आहे. अद्याप रुपये 4200/- नुसार भाडे आकारणी सुरु आहे. यामुळे 15 टक्के वाढीनुसार प्रथम तीन वर्षाकरीता रुपये 630/- प्रमाणे 22680/- त्यानंतर तीन वर्षाकरीता रुपये 725 प्रमाणे रुपये 26100/- व त्यापुढील तीन वर्षाकरीता रुपये 833/- प्रमाणे रुपये 29988/- एवढे नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे नुकसान झाले आहे.

4. करारनामा शर्त क्रमांक 12 नुसार कार्यालयाच्या देखभाल दुरुस्तीची कामे मक्तेदाराने स्वखर्चाने करावयाची आहेत. नस्तीमध्ये वेळोवेळी यापोटी खर्च केला असल्याचे मक्तेदाराच्या पत्रान्वये नोंदले आहे. तथापि सदर खर्च नगरपरिषद अभियंत्याच्या देखरेखीखाली केला असल्याचे आढळले नाही. सबब करारनाम्याप्रमाणे मक्तेदाराने वेळोवेळी दुरुस्ती केल्याने तसेच कार्यालय सुस्थितीत व योग्य निगा राखली असल्याचे प्रमाणित होत नाही.

5. नस्तीमधील नोंदी पाहता नगरपरिषद मंगल कार्यालय मक्त्याने देण्यापूर्वी नगरपरिषदेमार्फत भाडयाने देण्याची कार्यवाही सुरु होती व त्याकरीता नगरपरिषदेचे कर्मचारी इतर कार्यभार सांभाळून कार्यालयाचे व्यवस्थापन करीत होते. त्यादरम्याने प्राप्त उत्पन्नाआधारे मक्त्याची रक्कम निश्चित केली असल्याचे आढळले आहे. तथापि मक्तेदाराकडून येणे बाकी रक्कम पाहता सदरचा मक्ता नगरपरिषदेस फायद्याचा ठरल्याचे दिसत नाही. सदर कार्यालय नगरपरिषदेच्या ताब्यात मिळणेविषयी तसेच थकीत भाडे व कराच्या रकमा वसुल करणेविषयी सत्वर योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे.

6. सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमुद थकबाकी रुपये 439860/- ही प्रत्येक त्रैवार्षिक 15 टक्के वाढ याप्रमाणे आकारणी करुन आलेली थकबाकीची रक्कम नसल्याने योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. सबब करारनाम्याप्रमाणे अचुक परिगणना करुन योग्य रक्कम निश्चित करुन संबंधित मक्तेदाराकडून वसुल करणेबाबत नगरपरिषद अधिनियमातील तरतुदीद्वारे प्राप्त अधिकाराचा अवलंब करणे आवश्यक आहे.

अतिक्रमण/मंडई

***42 अतिक्रमण विभाग आणि मंडई विभाग मधील कमी जमा आणि डे बुक व जमा खतावणीत जमा नसलेबाबत.***

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019
अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष : 1 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 18250.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18250.00/-

| |
|---|
| अतिक्रमण विभाग व मंडई निवड महिन्यातील पावती पुस्तके व चलन पडताळणी केली असता सदरची रक्कम डे बुकला जमा दिसून येत नाही. |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणास अतिक्रमण विभाग व मंडई निवड महिन्यातील पावती पुस्तके व चलन पडताळणी केली असता त्यात आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 101 दिनांक 24/2/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बुक क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक | रुपये | डे बुक जमा | अतिक्रमण कमी जमा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 228 ते 233 | 22782<br>23217 | 2/7/2018 | 10464 | 10414 | 50 |
| 2 | 956 ते 961 | 95561<br>96100 | 31/3/2019 (चलन क्र. 13) | 12960 | जमा नाही | 12960 |
| 3 | 67 | 28973<br>29000 | 31/3/2019 (चलन क्र. 13) | 336 | जमा नाही | 336 |
| 4 | न.नं.13 चलन क्रमांक 31 दिनांक 31/3/2019 मंडई विभाग एकुण रुपये 4904/- डे बुक ला व जमा खतावणीला जमा नाही. | | | | | |
| एकुण | | | | 13296 | | |

उपरोक्त नमुद रक्कम रुपये 18250/- वसुल करुन नगरपालिका निधीत भरणा केल्याची पुर्तता लेखापरीक्षणास

दाखवावी.

बांधकाम / पाणिपुरवठा

## 43 रस्ता खुदाई परवानगी व फी वसुलीबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

1. नगरपरिषदेने शासन परिपत्रकाप्रमाणे रस्ता खुदाईकरीता प्रती मीटरप्रमाणे दर आकारणी केली नाही.
2. रस्ता खुदाईकरीता प्राप्त अर्जावर कार्यवाही करणेबाबत कालमर्यादा आखलेली आढळली नाही.
3. रस्ता खुदाईपोटी भरणा रकमेची पडताळणी करणेकरीता सामान्य पावतीची प्रत अथवा पावती क्रमांक व दिनांक यांची खात्री करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केली जात नाही.
4. वीज जोडणेसाठी रस्ता खुदाई परवानगी देतांना महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लि. यांची मंजुरी असल्याबाबत खात्री केली नाही.
5. विनापरवाना रस्ता खुदाई प्रकरणांच्या नोंदी ठेवल्या नसल्याची तसेच अशा स्वरुपाच्या प्रकरणांवर कारवाई केल्याचे आढळले नाही.

नगरपरिषदेने सन 2018-19 मध्ये नागरीकांना, नळजोडणी, ड्रेनेज, विद्युत जोडणी इत्यादी कामांकरीता रस्ते खुदाई करीता दिलेल्या परवानगीबाबत व त्यापोटी आकारलेल्या फीबाबत आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 111 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक ओएफसी/2012/प्र.क्र.209/रस्ते-7 दिनांक 7/4/2014 अन्वये शासनाने रस्ता क्रॉसिंगसाठी डांबरी रस्ता खुदाईकरीता प्रती चौरस मीटर दर रुपये 5500/- निश्चित केले आहेत. तथापि नगरपरिषदेने खालीलप्रमाणे कमी आकारणी केली आहे. सदर आकारणी अंदाजपत्रक तयार करुन त्याप्रमाणे केली आहे. वास्तविक नगरपरिषदेने त्यांच्या रस्ता डांबरीकरणाकरीता अंदाजपत्रकापेक्षा जादा दराच्या निविदा मंजुर केल्या आहेत. सबब फक्त रस्ता क्रॉसिंगकरीता अंदाजपत्रकीय दराने रक्कम निश्चित केलेने व शासन परिपत्रकाप्रमाणे प्रती मीटर रकमेची आकारणी केल्याने नगरपरिषद निधीचे नुकसान झाले आहे. तसेच रस्ता खुदाई नंतर डांबरीकरणाची कार्यवाही केव्हा केली याचा तपशिल नोंदल्याचे आढळले नाही.

| अ.क्र. | अर्जदार | मंजुरी क्रमांक व दिनांक | कामाचे परिमाण | आकारणे योग्य रक्कम | आकारलेली रक्कम | भरणा रक्कम | कमी भरणा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | चौनी | | | | रक्कम |
| 1 | अस्लम तांबोळी | सानप/सांबा दि. 18/10/2018 | 1.05 | 5775 | 3154 | 00 | 5775 |
| 2 | क्वालिटी डेव्हलपर्स | सानप/सांबा दि. 22/11/2018 | 0.405 | -7227 | 1100 | 1100 | 1127 |
| 3 | अभिजीत दिवेकर | सानप/सांबा दि. 18/9/2018 | 1.40 | 7700 | 4100 | 4100 | 3600 |
| 4 | पायोनियर कन्स्ट्रक्शन | सानप/सांबा दि. 23/8/2018 | 21.60 | 118800 | 18100 | 18100 | 100700 |
| 5 | संजिवनी इंटेन्सिव्ह केअर | सानप/सांबा दि. 8/1/2019 | 0.60 | 3300 | 1820 | 1820 | 1480 |
| 6 | भारगे-साळुंखे असोसिएट्स | सानप/सांबा दि. 28/8/2018 | 0.90 | 4950 | 3020 | 3020 | 1930 |
| एकुण | | | | | | | 114612 |

2. रस्ता खुदाईकरीता प्राप्त अर्जावर कार्यवाही करणेबाबत कालमर्यादा आखलेली आढळली नाही. तथापि काही बाबत वाजवीपेक्षा अधिक कालावधीनंतर परवानगी दिल्याचे आढळले आहे.

| अ.क्र. | अर्जदार | अर्ज दिनांक | परवानगी दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | मंगेश विठ्ठल वाडेकर | 28/12/2018 | सानप/बांध/20 दिनांक 9/4/2019 |
| 2 | संजिवनी इंटेन्सिव्ह केअर | 22/11/2018 | सानप/बांध/1085 दिनांक 8/1/2019 |
| 3 | पायोनियर कन्स्ट्रक्शन | 26/3/2018 | सानप/बांध/425 दिनांक 23/8/2018 |

- विलंबाने परवानगी देण्याबाबत कोणताही तपशिल नोंदलेला नाही. सबब याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे. उपरोक्त अ.क्र. 3 पायोनियर कन्स्ट्रक्शन यांनी माहे मार्च 2018 मध्ये परवानगी मागितल असता ऑगस्ट 2018 मध्ये मंजुरी दिली आहे. सबब पावसाळ्यात रस्ता खुदाईचे काम करण्यास परवानगी देतांना नागरीकांच्या गैरसोयीचा विचार केल्याचे तसेच पावसाळी हवामानात डांबरीकरणास प्रतिबंध असतांना त्या बाबींचा विचार केला नाही.

3. रस्ता खुदाईपोटी भरणा रकमेची पडताळणी करणेकरीता सामान्य पावतीची प्रत अथवा पावती क्रमांक व दिनांक यांची खात्री करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केली जात नाही. उदा. उपरोक्त अ.क्र. 1 मधील अस्लम तांबोळी यांना रुपये 3154/- आकारणी केली मात्र भरणा केला असलेबाबत नोंद केलेली नाही.

4. वीज जोडणीसाठी रस्ता खुदाई परवानगी देतांना महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लि. यांची मंजुरी असल्याबाबत खात्री केली जात असल्याचे आढळले नाही. सबब त्याच कामाकरीता रस्ता खुदाई केली असल्याचे निदर्शनास येत नाही.

5. नस्ती पाहता विनापरवाना रस्ता खुदाई प्रकरणांच्या नोंदी ठेवल्या असल्याची तसेच अशा स्वरुपाच्या प्रकरणांवर दंडात्मक कारवाई केल्याचे आढळले नाही. अशी प्रकरणांबाबत काय कारवाई केली याची साधार पुर्तता आवश्यक आहे.

नगरपरिषद सातारा, 2018-2019

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 10197083/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 131 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामाचे नस्तीचे लेखापरीक्षण केले असता नसती सोबत सदरचे कामासाठी वापरण्यात आलेल्या खडी बाबतची roylty ची चलने नस्ती सोबत आढळून आलेली आहेत .परंतु सदर कामामध्ये बाब क्रमांक 10 filling plinth and floors with contractors soil/murum 1323.92 cum बाहेरून आणून वापरलेला आहे व त्यासाठी वाहतुकीसह 887.08 प्रती cum साठी दर दिलेला आहे परंतु सदर गौण खनिजा पोटीची roylty वसूल केलेली नाही तरी रक्कम 187123/- (1323.92x141.34=187123) संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणेत यावेत.

2 सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन 2014-2015 चे दरसुचीनुसार बनविण्यात आलेले आहे. सन 2014-2015 चे दरसुचीतील सर्वसाधारण टिपणी मधील 6.11 नुसार 100 घनमीटरचे वर खुदाई असलेस यांत्रिकि दर घेणे आवश्यक होते. 100 cum चे वर mannual दर घेणे आवश्यक असलेस मा अधीक्षक अभियंता यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक होते परंतू नगरपरिषद सातारा चे बांधकाम विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता mannual दर घेऊन अंदाजपत्रक तयार केलेने अनियमितता झालेली आहे.

3 सदरचे कामास प्रशासकीय मान्यता मा जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश का-2 /142 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय सातारा दिनांक १९-०३-२०१५ अन्वये देणेत आलेली आहे सदरचे काम सन २०१७-२०१८ अखेर पूर्ण करणे आवश्यक होते परंतु नगरपरिषद सातारा ने सन २०१८-२०१९ पर्यंत काम पूर्ण केलेले नाही तसेच सदर कामासाठीच्या अखर्चित निधी वापर करणेस शासनाने मान्यता प्रदान केलेबाबतचे कोणतेही अभिलेखे नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.याबाबत स्वंय स्पष्ट खुलासा लेखा परीक्षणास सादर करावा.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात .4 ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 187124/- वसुलपात्र व रक्कम रुपये 10009959/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

## *44 आर्किटेक्ट नेमणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

**गुंतलेली रक्कम** रु. 394247.00 /- **आक्षेपाधीन रक्कम** रु. 386362.00/-

**वसूलपात्र रक्कम** रु. 7885.00/-

| मक्तेदाराच्या देयकातून जीएसटी टीडीएस कपात केलेला नाही. |
|---|

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात आर्किटेक्ट नेमणे या विषयाच्या नस्तीची पडताळणी केली असता त्यामध्ये आढळलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 54 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. मे स्पेस डिझायनर यांना नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 92 दिनांक 27/5/2015 नुसार व नगरपालिकेचे कार्यदेश जा.क्र./सानप/सांबां/72 दिनांक 29/4/2017 नुसार कामाचे अंदाजपत्रक, नकाशे व इलेव्हेशन स्टेटमेंट तयार करुन नगरपालिका नगरअभियंता यांचेकडे सादर करणेसाठी नेमणुक केली आहे.

नगरपालिकेने स्पेस डिझायनर यांना खाली नमुद केलेल्या प्रमाणकान्वये रक्कम अदा केली असून सदर रकमेतून जीएसटी, टीडीएस वसुल केलेला नाही.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | जीएसटी/टीडीएस रक्कम |
|---|---|---|---|
| 731 | 19/10/2018 | 49537 | 991 |
| 732 | 19/10/2019 | 38618 | 772 |
| 730 | 19/10/2019 | 91282 | 1826 |
| 729 | 19/10/2019 | 112360 | 2247 |
| 823 | 24/10/2018 | 66010 | 1320 |
| 808 | 24/10/2018 | 36440 | 729 |
| एकुण | | 394247 | 7885 |

वरीलप्रमाणे सर्व संबंधित संस्थेच्या कामाबाबत मुदतवाढ दिल्याचे नस्तीसोत दिसून येत नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपाची पुर्ततेस्तव रक्कम रुपये 386362/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 7885/- वसुलपात्र करणेत येत आहे.

(Ref No : 40, Bnsn No : 54)

## 45 कोटेश्वर मंदिर येथे पूल व अर्कशाळा येथील पुलाचे रुंदीकरण करणे

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : नवि-6 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 10197083.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10009959.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 187124.00/-

1 देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.

2 100 घनमीटरपेक्षा जादा कामास यांत्रीकी दर घेणे आवश्यक असतांना मानवी दराने खुदाई केली आहे.

3 सदर कामासाठीच्या अखर्चित निधी वापर करणेस शासनाने मान्यता प्रदान केलेबाबतचे कोणतेही अभिलेखे नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | कोटेश्वर मंदिर येथे पूल व अर्कशाळा येथील पुलाचे रुंदीकरण करणे |
| निधिचे नांव | नवि-6 योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 12057493/- |
| निविदा स्विकृत | 5 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रुपये 12057493 |
| मक्तेदाराचे नांव | श्री. गणेश कन्स्ट्रक्शन |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण,सभा ठराव क्रमांक 86 दिनांक 16/8/2014 |
| तांत्रिक मान्यता | मा. जिल्हाधिकारी सातारा जा.क्र. जिबायो/2014-15/नवि-6/का-2/142 दिनांक 19/3/2015 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 21/4/2018 |
| काम पुर्ण दिनांक | काम प्रगतीपथावर |
| कामाची मुदत | 12 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 99 व 87 पान क्रमांक 10 ते 12 व 67 ते 69 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 10197083/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 12000/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1263-1/11/2018 रक्कम रुपये 7650487/- पहिले धावते देयक<br>1489-28/12/2018 रक्कम रुपये 2546596/- दुसरे धावते देयक<br>एकुण 10197083/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 10197083/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चाबरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 131 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामाचे नस्तीचे लेखापरीक्षण केले असता नसती सोबत सदरचे कामासाठी वापरण्यात आलेल्या खडी बाबतची roylty ची चलने नस्ती सोबत आढळून आलेली आहेत .परंतु सदर कामामध्ये बाब क्रमांक 10 filling plinth and floors with contractors soil/murum 1323.92 cum बाहेरून आणून वापरलेला आहे व त्यासाठी वाहतुकीसह 887.08 प्रती cum साठी दर दिलेला आहे परंतु सदर गौण खनिजा पोटीची roylty वसूल केलेली नाही तरी रक्कम 187123/- (1323.92x141.34=187123) संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरनेत यावेत.

2 सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन 2014-2015 चे दरसुचीनुसार बनविण्यात आलेले आहे. सन 2014-2015 चे दरसुचीतील सर्वसाधारण टिपणी मधील 6.11 नुसार 100 घनमीटरचे वर खुदाई असलेस यांत्रिकी दर घेणे आवश्यक होते. 100 cum चे वर mannual दर घेणे आवश्यक असलेस मा अधीक्षक अभियंता यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक होते परंतू नगरपरिषद सातारा चे बांधकाम विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता mannual दर घेऊन अंदाजपत्रक तयार केलेने अनियमितता झालेली आहे.

3 सदरचे कामास प्रशासकीय मान्यता मा जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश का-2 /142 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय सातारा दिनांक १९-०३-२०१५ अन्वये देणेत आलेली आहे सदरचे काम सन २०१७-२०१८ अखेर पूर्ण करणे आवश्यक होते परंतु नगरपरिषद सातारा ने सन २०१८-२०१९ पर्यंत काम पूर्ण केलेले नाही तसेच सदर कामासाठीच्या अखर्चित निधी वापर करणेस शासनाने मान्यता प्रदान केलेबाबतचे कोणतेही अभिलेखे नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.याबाबत स्वंय स्पष्ट खुलासा लेखा परीक्षणास सादर करावा.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात .4 ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 187124/- वसुलपात्र व रक्कम रुपये 10009959/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

(Ref No.: 57, Hmm No.: 131)

बांधकाम

46 पेठ शुक्रवार लोखंडे कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे

80
लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :नपा निधी नगर परिषद स्व. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2086912.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1938889.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 148023.00/-

१ देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.
२ डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर केली नाही.
3 देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.
४ कामात वापरलेल्या माहित्याचे टेस्ट रिपोर्ट नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | पेठ शुक्रवार लोखंडे कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे |
| निधिचे नांव | नगरपरिषद निधी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 2161718/- |
| निविदा स्विकृत | 11.86 टक्के कमी दराने |
| निविदेची रक्कम | रुपये 2161718/- |
| मक्तेदाराचे नांव | ए. एस. कन्स्ट्रक्शन |
| प्रशासकीय मान्यता | विशेष सभा ठराव क्रमांक 17 दिनांक 3/7/2014 |
| तांत्रिक मान्यता | मा. कार्यकारी अभियंता, जा.क्र./चिशा/तांमं/1960 दिनांक 1/8/2014 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 4/8/2017 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 20/10/2017 |
| कामाची मुदत | 90 दिवस |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 87 |
| कामावरील खर्च | रुपये 2086912 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 413-30/6/2018 रक्कम रुपये 2080912/- पहिले अंतिम देयक |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये २०८६९१२/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 132 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१ शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांवावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम

क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये २०८६९२२ चे होते तरी सदरचे देयकातून२०८६९ /- वसूल करणे आवश्यक होते . रक्कम रुपये २०८६९/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

3 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात **वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा** करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामामध्ये ८९१.६३ घन मीटर गौण खनिज वापरनेत आलेले आहे . नस्ती सोबत स्वामित्व धन शुल्क भरले बाबत चे गेट पास जोडनेत आलेले आहेत .परंतु सदरचे गेट पास हे पूनम construction चे नावे आहे व मक्तेदार A S CONSTUCTION आहेत सदर बाब विसंगत आहे तसेच सदरचे काम हे दिनांक २०/१०/२०१७ रोजी पूर्ण झालेले आहे व नस्ती सोबत जोडलेले गेट पास हे काम पूर्ण झाल्यानंतरचे आहेत त्यामुळे सदरचे गेट पास लेखा परीक्षणात मान्य करता येणार नाही तरी गौण खनिज स्वामित्व धन शुल्क रक्कम रुपये १२७१५४/- (८९१.६३ X १४१.३४ = १२७१५४) वसूल करून शासन खाती भरनेत यावी.

४ सदरचे कामामध्ये वापरनेत आलेल्या मुरुमाचे टेस्ट रिपोर्ट नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

5. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्तनेस्तव रक्कम रुपये 148023/- वसुलपात्र व रक्कम रुपये 1938889/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

व्यक्तिकाम

***47 सोनगाव कचरा डेपो येथे संरक्षक भिंत, केबिन वे ब्रिज कार्यालयीन इमारत स्टोअर्स रुम बांधणे.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :14 वा वित्त शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2846354.00 /-

नगरपरिषद सातारा, 2018-2019

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2845854.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 500.00/-

| |
|---|
| 1 काम सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता ही एक वर्षापूर्वी व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविनेस व काम सुरु होनेस विलंब झाला आहे.<br>2. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.<br>3 मक्तेदारास WITHOUGHT SCADA दर देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही . |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | सोनगाव कचरा डेपो येथे संरक्षक भिंत, केबिन व ब्रिज कार्यालयीन इमारत स्टोअर्स रूम बांधणे. |
| निधिचे नांव | घनकचरा व्यवस्थापन/14 वा वित्त आयोग |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 2997805/- |
| निविदा स्विकृत | अंदाजपत्रकीय दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 2997805/- |
| मक्तेदाराचे नांव | श्री. विनय धर्मू चव्हाण |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 56 दिनांक 10/4/2017 |
| तांत्रिक मान्यता | मा. कार्यकारी मु.अ. पुणे /तांशा/846 दिनांक 25/5/2016 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 1/6/2018 |
| काम पुर्ण दिनांक | दिनां 20/12/2018 |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 99 पान क्रमांक 13 ते 17 व 31 ते 35<br>73 पान क्रमांक 172 ते 174 |
| कामावरील खर्च | रुपये 2846354/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 2000/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | दिनांक 2/2/2019 रक्कम रुपये 1496403/- पहिले धावते देयक<br>दिनांक 4/2/2019 रक्कम रुपये 1349951/- दुसरे अंतिम देयक<br>____________<br>रक्कम रुपये 2846354/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 2846354/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 133 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1 सदरचे कामास प्रशासकीय मान्यता दिनांक १०/०४/२०१७ रोजी देण्यात आलेली आहे व तांत्रिक मान्यता ही मुख्य अभियंता MJP पुणे यांनी दिनांक २५/०५/२०१६ रोजी दिलेली आहे परंतु सदर कामास सुरुवात ही ०१/०६/२०१८ रोजी करण्यात आलेली आहे.काम सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता ही एक वर्षापूर्वी व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविनेस व काम सुरु होनेस विलंब करणे ही

बाब संयुक्तिक नाही तरी सदर बाबत त्वरीत स्पष्ट खुलासा सादर करणेत यावा.

2 . मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम २९९७८०५/- रुपये असून सदरची निविदा अंदाजपत्रकीय दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच २९९७८०५/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 2500 रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 2000 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 500/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3 सदरचे कामामध्ये बाब क्रमांक 5 P/C IN SITU CC M-10 OF TRAP METAL FOUNDATION BED 149.98 CUM ITEM N0 6 P/C IN SITU CC M-20 FOR RCC BEAMS AND LINTELS 21.60 CUM ITEM NO 7 P/C IN SITU ( CC M-20 ) 22.945 CUM असे एकुण १९४.५२५ CUM करणेत आलेले आहे परंतु सदर काम करणेसाठी WITH SCADA दर घेणेत आलेले आहेत परंतु सदरचे कामाचे नस्ती सोबत SCADA प्रणाली वापरले बाबतचे कोणतेही ONLINE REPORT नस्तीसोबत जोडलेले नाहीत त्यामुळे मक्तेदारास WITHOUGHT SCADA दर देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही . ONLINE REPORT लेखापरीक्षनास सादर करावेत अन्यथा स्काडाचे दर दिलेने जादा अदा झालेली रक्कम वसूल करणेत यावी.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात .4 ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 500/- अंतिम असमान्य व रक्कम रुपये 2845854/- तात्पुरती असमान्य करणेत येत आहे.

बांधकाम

***48 बुधवार नाका कब्रस्थान येथे विविध विकास कामे करणे***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : खासदार निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : ९ब*

गुंतलेली रक्कम रु. 2589250.00/-

नगरपरिषद सातारा, 2018-2019

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2482344.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 106906.00/-

| |
|---|
| 1 काम सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता ही एक वर्षापूर्वी व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविनेस व काम सुरु होनेस विलंब झाला आहे.<br>2 डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत जोडली नाही.<br>3 देयकातुन रॉयल्टी कपात केलेली नाही.<br>4 कामात वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेतलेले नाहीत.<br>5 कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | बुधवार नाका कब्रस्थान येथे विविध विकास कामे करणे |
| निधिचे नांव | खासदार निधी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 2666336/- |
| निविदा स्विकृत | 4.98 जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपे 2463798/- |
| मक्तेदाराचे नांव | ए. एस. कन्स्ट्रक्शन |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 187 दिनांक 7/11/2015 |
| तांत्रिक मान्यता | मा. कार्यकारी अभियंता मजिप्रा, सातारा/211 दिनांक 2/2/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 12/1/2018 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 25/2/2018 |
| कामाची मुदत | 90 दिवस |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 87 पान क्रमांक 28 ते 30 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 2589250/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 1600/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 406-26/6/2018 रक्कम रुपये 2589250/- पहिले अंतिम देयक |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 2589250/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 134 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1 सदरचे कामास प्रशासकीय मान्यता दिनांक ०७/११/२०१५ रोजी देण्यात आलेली आहे व तांत्रिक मान्यता ही कार्यकारी अभियंता MJP पुणे यांनी दिनांक ०२/०२/२०१७ रोजी दिलेली आहे परंतु सदर कामास सुरुवात ही १२/०१/२०१८ रोजी करण्यात आलेली आहे.काम सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता ही एक वर्षापूर्वी व तांत्रिक मान्यता ही दोन वर्षा पूर्वी देण्यात येवूनही प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया राबविनेस व काम सुरु होनेस विलंब करणे ही बाब संयुक्तिक नाही तरी सदर बाबत स्वंय स्पष्ट खुलासा सादर करणेत यावा.

2 महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर

करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

3 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34-प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामाचे मक्तेदार हे A S CONSTRUCTION हे आहेत परंतु कामाचे नस्ती सोबत ROYLTY चे गेट पास हे POONAM CONSTRUCTION चे नावे आहेत सदर बाब विसंगत आहे.तसेच सदरचे काम हे २५/०२/२०१८ रोजी पूर्ण झालेले आहे परंतु ROYLTY चे गेट पास हे काम पूर्ण झालेनंतरचे असलेने ते लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.सबब सदरचे कामात वापरलेले गौण खनिजाची स्वामित्वधन रक्कम रुपये 106406/- (७५२.८४ X १४१.३४ = १०६४०६) वसूल करून शासन खाती भरनेत यावेत.

4 सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचे टेस्ट रिपोर्ट हे काम पुर्ण झाल्यानंतरचे घेणेत आलेले आहेत याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5 मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम 2463798 रुपये असून सदरची निविदा 4.98% जादा दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच 2586495/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 2100 रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 1600 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 500/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

6. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 106906/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 2582344/- तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

बांधकाम

**49 सोनगाव कंपोस्ट डेपो SANITERY LANDFIELD साठी बांधकाम करणे.**

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : 14 वा वित्त शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3714950.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 3597601.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 117349.00/-

1 शासन निर्णय दिनांक 10/11/2017 मध्ये विहित केलेल्या बँकामध्ये स्वतंत्र खाते उघडून कामकाज करणे आवश्यक असताना तसे केलेले दिसून येत नाही.

2 फेब्रुवारी २०१८ पर्यंत शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या घन कचऱ्यापैकी किमान 90% घनकचरा निर्मितीच्या जागीच विलगीकरण करून संकलीत करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3 उपकरणे / मशीन /यंत्रे इत्यादींची खरेदी GEM पोर्टल वरूनच करणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4 प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता पाहून देयके प्रमाणित केल्यानंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत देयक संबंधीत कंत्राटदारास अदा केली जातील असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम अदा केलेली आहे.

5 FXCAVATION FOR FOUNDATION IS EARTH SOIL OF ALL TYPES ही बाब अंदाज पत्रकात नमूद नसताना कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

6 बाब क्रमांक १ EMBANKMENT WRITE APPROVED MATERIAL 3911.63 CUM करणेत आलेले आहे परंतु त्यातून श्रींकिज वजा केलेले नाही.

७ जागेची कागदपत्रे नस्तीसोबत पहावयास मिळाला नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | सोनगाव कंपोस्ट डेपो SANITERY LANDFIELD साठी बांधकाम करणे. |
| निधिचे नांव | घनकचरा व्यवस्थापन/14 वा वित्त आयोग |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 10754143/- |
| निविदा स्विकृत | 4.99 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 10754143/- |
| मक्तेदाराचे नांव | मे. शिवकृपा कन्स्ट्रक्शन, पंढरपूर |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 156 दिनांक 10/4/2017 |
| तांत्रिक मान्यता | मा. कार्यकारी अभियंता जा.क्र. निशा/तांमं/2/846/ दिनांक 25/5/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 10/10/2018 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 7/10/2019 |
| कामाची मुदत | 12 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 66 पान क्रमांक 81 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 11783687/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 2094-30/3/2019 रक्कम रुपये 3710950/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 3714950/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 135 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यावर उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

देण्यात येत आहेत.

1 महाराष्ट्र शासन नगरविकास शासन निर्णय क्रमांक स्वमअ – २०१७/प्रक्र/१०३/नवि-३४ दिनांक १० नोव्हेंबर २०१७ मधील अनुक्रमांक ३.२ नुसार विहित केलेल्या बँकामध्ये स्वतंत्र खाते उघडून कामकाज करणे आवश्यक असताना तसे केलेचे दिसून येत नाही.

2 महाराष्ट्र शासन नगरविकास शासन निर्णय क्रमांक स्वमअ – २०१७/प्रक्र/१०३/नवि-३४ दिनांक १० नोव्हेंबर २०१७ मधील अनुक्रमांक ४.३ नुसार सातारा न.प ने फेब्रुवारी २०१८ पर्यंत शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या घन कचऱ्यापैकी किमान 90% घनकचरा निर्मितीच्या जागीच विलगीकरण करून संकलीत करणे बंधनकारक राहील असे नमूद असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3 महाराष्ट्र शासन नगरविकास शासन निर्णय क्रमांक स्वमअ – २०१७/प्रक्र/१०३/नवि-३४ दिनांक १० नोव्हेंबर २०१७ मधील अनुक्रमांक ४.७ नुसार घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या सविस्तर अहवालात नमूद उपकरणे / मशीन /यंत्रे इत्यादीची खरेदी GEM पोर्टल वरूनच करणे बंधनकारक राहील या शिवाय इतर पद्धतीचा अवलंब करून खरेदी केल्यास ती आर्थिक अनियमितता समजून शासना मार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे नमूद असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4 महाराष्ट्र शासन नगरविकास शासन निर्णय क्रमांक स्वमअ–२०१७/प्रक्र/१०३/नवि-३४ दिनांक १० नोव्हेंबर २०१७ मधील अनुक्रमांक ४.१० नुसार प्रकल्पाची देयके प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता पाहून देयके प्रमाणित केल्यानंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत देयक संबंधीत कंत्राटदारास अदा केली जातील याची जबाबदारी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील असे नमूद आहे त्याप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम अदा केलेली आहे.

5 EXCAVATION FOR FOUNDATION IS EARTH SOIL OF ALL TYPES ही बाब अंदाज पत्रकात नमूद नसताना कार्यान्वीत करणेत आलेली आहे सदर बाबीस कार्यवाही अंदाज पत्रक तयार करून सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक होते.

6 सदर कामाचे मोजमाप पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता बाब क्रमांक १ EMBANKMENT WRITE APPROVED MATERIAL 3911.63 CUM करणेत आलेले आहे परंतु त्यातून 10% SHRINKAGE वजा न केलेणे जादा अदाई झालेली आहे.(३९११.६३- १०%=३९१.१६X दर ३०० = ११७३४९/-)

७. सदरचे काम हे नगरपालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या जागेत केले असलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाहीत.

8. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्त रक्कम रुपये 117349/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 3597601/- तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

बांधकाम

**50 पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते कनिष्क मंगल कार्यालय अखेर रस्ता डांबरीकरण करणे ओव्हाळ हॉस्पिटल पिछाडी ते कुपर पूल अखेर गटर व पाईपलाईन करणे.**

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : दलितवस्ती शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2655635.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2589243.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 66392.00/-

1. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
2 डांबर खरेदीच्या पावत्या नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत.
3 देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.
4 देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.
5 अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या 50% पेक्षा जास्त असलेबाबत विशेष समाजकल्याण अधिकारी सातारा यांचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते कनिष्क मंगल कार्यालय अखेर रस्ता डांबरीकरण करणे ओव्हाळ हॉस्पिटल पिछाडी ते कुपर पूल अखेर गटर व पाईपलाईन करणे.' |
| निधिचे नांव | दलितवस्ती सुधार योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 3911923/- |
| निविदा स्विकृत | 4.50 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 3911923/- + 4.50 टक्के = 4087960/- |
| मक्तेदाराचे नांव | ओमकार राजु शिंदे |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती ठराव क्रमांक 874 दिनांक 11/9/2018 |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र. माप्रवि/प्रकल्प-1357 दिनांक 6/12/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 24/10/2018 |
| काम पुर्ण दिनांक | लेखापरीक्षण कालबधीत अपुर्ण |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 55 पान क्रमांक 269, 270 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 2655635/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 3100/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1549(2)-9/1/2019 रक्कम रुपये 2655635/- पहिले धावते देयक |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणांत सदर कामावर रक्कम रुपये 2655635/-

इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 136 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसूचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकरारकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम 3911923 रुपये असून सदरची निविदा 4.50% जादा दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच 4087960/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 3600 रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 3100 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 500/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुराव्यांना लेखापरीक्षणास दाखवावी.

2 महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

3 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घनमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामामध्ये बाब क्रमांक 2 PROVIDING AND CASTING 75MM THICK MPM WBM SURFACE 972.0 SQM केलेले आहे तसेच बाब क्रमांक 3 PROVIDING AND CASTING 75MM THICK MPM ON BT SURFACE 4936.75 SQM असे एकूण 5908.75 SQM MPM केलेले आहे त्यासाठी 5908.75X0.063=372.25CUM HAND BROKEN खडी वापरलेली आहे परंतु देयकाचे प्रदान करताना ROYLTY ची रक्कम कपात केलेली नाही तरी रक्कम रुपये 372.25CUM X 141.34 = 52614 वसूल करुन शासन खाती भरणेत यावेत.

4 शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिग/2300/सहविमा/सांबावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये 2655635 चे होते तरी सदरचे देयकातून 26556/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 13278 कपात केलेले आहेत तरी कमी कपात रक्कम रुपये 13278/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

5 मा जिल्हाधिकारी सातारा यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 31.03.2018 मधील अ.क्र 4 नुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या 50% पेक्षा जास्त असलेबाबत विशेष समाजकल्याण अधिकारी सातारा यांचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

6. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 66392/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 2589243/- तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

कोषाधिकारी

***51 सि.स.नं 492/493 पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते प्लॉट नं 36 ते ADV गोवेकर ते सावकार ते प्लॉट नं 2 अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण गटर पाईप लाईन करणे.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : दलितवस्ती शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2268577.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2213648.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 54929.00/-

1 अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या 50% पेक्षा जास्त असलेबाबत विशेष समाजकल्याण अधिकारी सातारा यांचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

2 देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही

4 देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.

5 डांबर खरेदी चलनाची मुळ प्रत देयकासोबत जोडली नाही.

6 कामावरती वापरण्यात येणारे डांबर मुरूम खडी यांचे तपासणी अहवाल घेतलेले नाहीत.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | सि.स.नं 492/493 पेठ सदर बझार सिमबॉयसिस हॉस्पिटल ते प्लॉट नं 36 ते ADV गोवेकर ते सावकार ते प्लॉट नं 2 अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण गटर पाईप लाईन करणे. |
| निधिचे नांव | दलितवस्ती सुधार योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 2545408/- |
| निविदा स्विकृत | 4.50 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 2545408/- |
| मक्तेदाराचे नांव | ओमकार राजु शिंदे |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी, सातारा यांचे क्रमांक साशा/नपा (सातारा दलितवस्ती) 347 दिनांक 31/3/2018 |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | जा.क्र.मा.प्रवि/प्रकल्प/1360 दिनांक 6/12/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 24/10/2018 |
| काम पुर्ण दिनांक | काम अपुर्ण |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 55 पान क्रमांक 271, 273 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 2268577/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 1700/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1549-9/1/2019 रक्कम रुपये 2268577/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये **2268577/-** इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत अर्धसमासपत्र क्रमांक 137 दिनांक 06/03/2020 अन्वये कळविले होते त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे.

1 मा जिल्हाधिकारी सातारा यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 31.03.2018 मधील अ.क्र 4 नुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या 50% पेक्षा जास्त असलेबाबत विशेष समाजकल्याण अधिकारी सातारा यांचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

2 खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामामध्ये बाब PROVIDING AND CASTING 75MM THICK MPM WBM SURFACE 2672.70 SQM केलेले आहे त्यासाठी 2672.70X0.063=168.38 CUM HAND BROKEN खडी वापरलेली आहे परंतु देयकाचे प्रदान करताना ROYLTY ची रक्कम कपात केलेली नाही तसेच सदरचे कामामध्ये हार्ड मुरुम 140 CUM SUPPLY केलेला आहे त्याचीही रॉयलटी वसूल केलेली नाही तरी रक्कम रुपये (168.38+140=308.38 X 141.34= 43586 ) वसूल करून शासन खाती भरणेत यावेत.

3 शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकारा/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र. जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांबावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये 2268577 चे होते तरी सदरचे देयकातुन 22686/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 11343 कपात केलेले आहेत तरी कमी कपात रक्कम रुपये 11343/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

5 महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

6 कामावरती वापरण्यात येणारे डांबर मुरुम खडी यांचे तपासणी अहवाल घेणे आवश्यक आहे परंतु सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या मुरुम व डांबराचे तपासणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत.

7. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करताना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असताना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 54929/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 2213648/- तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

बांधकाम

***52 प्रभाग क्रमांक 2 अंतर्गत ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 956274.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 939314.00/- **अंतिम अमान्य रक्कम रु. 16960.00/-**

1. कमी रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
2. शासन निर्णय दिनांक 24 ऑगस्ट 2016 मधील अ.क्र 8 नुसार खर्चित / अखर्चित निधीचा तपशील / उपयोगिता प्रमाणपत्र मा महालेखापाल मुंबई याना सादर केलेले नाहीत.
3. अखर्चित निधी संबंधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा केल्याचे दिसून येत नाही.
4. देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.
5. डांबर खरेदी चलनाची मुळ प्रत देयकासोबत जोडलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग क्रमांक 2 अंतर्गत ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे |
| निधिचे नांव | विशेष रस्ता अनुदान. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 2508860/- |
| निविदा स्विकृत | 4.50 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 2464838/- |
| मक्तेदाराचे नांव | ए. एस. कन्स्ट्रक्शन |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 168 दिनांक 11/1/2018 |
| तांत्रिक मान्यता | मा. जिल्हाधिकारी क्रमांक /साशा/नपा/विरस्ता/714 दिनांक 8/3/2018 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 6/9/2018 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 4/12/2018 |

| | |
|---|---|
| कामाची मुदत | 3 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 55 पान क्रमांक 282 ते 284 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 2864893/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 1700/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1707-13/2/2019 रक्कम रुपये 956274/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 95624 इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 138 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम 2464838/- रुपये असून सदरची निविदा4.50% जादा दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच 2575756/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 2100/- रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 1700 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

2. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2016 / प्र क्र 21(67)/नवि -16 दिनांक 24 ऑगस्ट 2016 मधील अक्र 8 नुसार खर्चित / अखर्चित निधीचा तपशील / उपयोगिता प्रमाणपत्र मा महालेखापाल मुंबई याना सादर केलेले नाहीत.

3. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 16 नुसार दिनांक 31.03.2018 नंतर अखर्चित निधी संबंधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा केल्याचे दिसून येत नाही.

4. खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामामध्ये SUPPLY HARD MURUM 105 CUM बाब करण्यात आलेली आहे तसेच WBM GRADE I , WBM GRADE II एकुण 422.58 CUM केलेले आहे त्यासाठी 422.58 X 0.11 = 46.48 CUM मुरूम वापरलेला आहे तसेच सदरचे कामामध्ये 75 MM MPM 4061.76 SQM करण्यात आलेले आहे त्यासठी 255.89 CUM इतकी HAND BROKEN खडी वापरण्यात आलेली आहे म्हणजेच एकुण 407.37 CUM गौण खनिज वापरलेले आहे त्यासठी 407.37X141.34=57578 स्वामित्व धन शुल्क आकारने आवश्यक होते परंतु सदरचे कामाचे दुसऱ्या देयकातून 18618 वसूल करण्यात आलेले आहेत व रक्कम रुपये 22400 चे गेट पास जोडण्यात आलेले आहेत तरी उर्वरीत रक्कम रुपये 16560 वसूल करून शासन खाती भरण्यात यावेत.

5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

6. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने

केल्याचे दिसून आले नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीना नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 939314/- तात्पुरती अमान्य व रक्कम रुपये 16960/- अंतिम अमान्य करणेत येत आहेत.

### *53 केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत हरित क्षेत्र विकसित करणे (सन 2016-2017 चे प्रस्तावानुसार)*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 07

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 12329257.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12202257.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 127000.00/-

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र –अमृत-२०१६ /प्रक्र १०८७/न वि -३३ दिनांक ०७/०६/२०१७ मधील अट क्रमांक ४.१९ नुसार कामाचे नियोजन केलेले नाही.
२. हरित क्षेत्र विकासास अमृत वन असे नाव दिल्याचे दिसून येत नाही.
३. सदरचे काम हे नगर परिषदेचे मालकीचे जागेवर केले बाबतचे अभिलेखे नस्ती नाहीत.
४. देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.
5. वाढीव बाबींसाठी कार्यवाही अंदाजपत्रक तयार करून त्यास सुधारीत तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत हरित क्षेत्र विकसित करणे (सन 2016-2017 चे प्रस्तावानुसार) |
| निधिचे नांव | अमृत योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 1465266/- |
| निविदा स्विकृत | 5 टक्के कमी दराने |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 13923454/- |
| मक्तेदाराचे नांव | निसर्ग लँडस्केप सर्विसेस, पुणे |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 88 दिनांक 7/6/2017, महाराष्ट्र शासन |

| | |
|---|---|
| | नगरविकास विभाग दिनांक 7/6/2017 जाहिरात दैनिक पुढारी दिनांक 16/6/2017 |
| तांत्रिक मान्यता | 6369 दिनांक 1/6/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 28/11/2017 |
| काम पुर्ण दिनांक | काम अपूर्ण |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | पान क्रमांक 50 ते 51 |
| मुद्रांक शुल्क | रुपये 13800/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये 12329257/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 12329257/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 141 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र –अमृत-२०१६ /प्रक्र १०८७/न वि -३३ दिनांक ०७/०६/२०१७ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे सदर शासन निर्णयातील अट क्रमांक ४.१९ नुसार कामाचे नियोजन करणे आवश्यक असताना ते केलेले नाही.

२. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र –अमृत-२०१६ /प्रक्र146/न वि -३३ दिनांक २२/०३/२०१७ नुसार मुद्दा क्रमांक १८ नुसार सदर हरित क्षेत्र विकासास अमृत वन असे नाव दिल्याचे दिसून येत नाही.

३. सदरचे काम हे नगर परिषदेचे मालकीचे जागेवर केले बाबतचे अभिलेखे नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.

४. खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. सदरचे कामामध्ये SEA SAND २१२.१३ घमी DRY RUBBLE STONE 354.60 CUM, FILLING PLINTH FLOORS SOIL SAND OR MURUM 331.81 CUM करण्यात आलेले आहे परंतु सदर बाबीची रॉयल्टी वसूल केलेली नाही तरी रक्कम रुपये १२७०००/-(८९८.५४*१४१.३४=१२७०००) वसूल करून शासन खाती भरण्यात यावेत.

5. सदर कामात वाढीव बाबींसाठी कार्यवाही अंदाजपत्रक तयार करून त्यास सुधारीत तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

6. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातुन किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 12202257/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 127000/- वसुलपात्र करणेत येत आहे.

नगरपरिषद सातारा. 2018-2019

बांधकाम

*54 पेठ सोमवार सिसन २२२/१ येथे दुसरा मजला बांधणे*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1146169.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1140038.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6131.00/-

1. मक्तेदाराचे देयकातून कमी विमा रक्कम वसुल केली आहे.
2. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
3. सदरचे दर पृथक्करण करताना स्काडा प्रणाली वापरलेली नसलेने स्काडा प्रणालीविरहीत दर मक्तेदारास देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
4. कामाचे दर पृथक्करण करताना डोंगरी प्रवण क्षेत्र दर हा मूळ दरावर देणे आवश्यक असताना दर पृथक्करणात मात्र मूळ दरामध्ये वाहनावळ मिळवून येणाऱ्या रक्कमेवर १०% डोंगरी प्रवण क्षेत्र दर दिलेला आहे.
5. कामात वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेण्यात आले नाहीत.
6. 10 लेखापेक्षा जादा किंमतीच्या कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक असतांना असे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही

| | |
|---|---|
| कामाचे नांव | पेठ सोमवार सिसन २२२/१ येथे दुसरा मजला बांधणे |
| निधिचे नांव | नगरपालिका निधी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 1167743/- |
| निविदा स्विकृत | 1.90 टक्के कमी दराने रक्कम रुपये 1085835/- |
| मक्तेदाराचे नांव | सुजित व्यंकटराव भोसले |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 285 दिनांक 10/3/2016 |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण 2173/2016 दिनांक 2/9/2016 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 29/8/2017 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 25/2/2018 |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 94 पान क्रमांक 46 ते 50 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 1135338/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 200/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | पहिले धावते देयक रक्कम रुपये 1019168/- पहिले अंतिम देयक |

| | |
|---|---|
| | 462-2/7/2018 रक्कम रुपये 127001/- दुसरे अंतिम देयक |
| | एकुण 1146169/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 1146169/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चाविरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 145 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांबाविं/संकिर्ण/क दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक पहिले देयकातून ५०९६ व दुसरे देयकातून ६३५ कमी कपात केलेली आहे तरी रक्कम रुपये ५७३१ वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम ११६७७४३/- रुपये असून सदरची निविदा१.९० % कमी दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच १०८५८३५/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा ६००/- रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा २०० रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3. सदरचे काम हे सन २०१५-२०१६ चे दर सूची नुसार करण्यात आलेले आहे सदर कामामध्ये RCC M-20 कॉनक्रीट काम केलेले आहे सदरचे दर पृथक्करण करताना स्काडा प्रणाली वापरलेली नसलेने स्काडा प्रणालीविरहीत दर मक्तेदारास देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4. सदरचे कामातील बाबींचे दर पृथक्करण करताना डोंगरी प्रवण क्षेत्र दर हा मूळ दराबर देणे आवश्यक असताना दर पृथक्करणात मात्र मूळ दारामध्ये वाहनावळ मिळवून येणाऱ्या रक्कमेवर १०% डोंगरी प्रवण क्षेत्र दर दिलेला आहे सदर बाबत खुलासा होणे आवश्यक आहे समर्पक खुलासा न सादर केलेस जादा अदा झालेल्या रक्कमेची परिगणना करून परिच्छेद मुल अहवालात समाविष्ठ करण्यात येईल.

5. सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.

6. महाराष्ट्रशासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/2008/1338/प्र.क्र.171/नवि20 दिनांक 2/3/2008 तसेच महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.335/नवि-33 दिनांक 28 मार्च 2018 अन्वये 10 लाखापेक्षा जादा किंमतीच्या कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक असतांना असे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही.

7. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 1140038/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 6131/- वसुलपात्र करणेत येत आहेत.

बांधकाम

## 55 १८२२ रविवार पेठ येथे शॉपिंग सेंटर ईमारत बांधणे

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 08

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1688436.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1668029.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 20401.00/-

1. देयकातून कमी दराने विमा रक्कम कपात केली आहे.
2. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.
3. दर पृथक्करण करताना स्काडा प्रणाली वापरलेली नसलेने स्काडा प्रणालीविरहीत दर मक्तेदारास देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
4. कामात वापरलेल्या साहित्याने चाचणी अहवाल घेतलेले नाही.
5. 10 लेखापेक्षा जादा किंमतीच्या कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक असताना असे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही
6. देयकातून रॉयल्टी कपात केलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | १८२२ रविवार पेठ येथे शॉपिंग सेंटर ईमारत बांधणे |
| निधिचे नांव | नगरपालिका फंड |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 2760576/- |
| निविदा स्विकृत | दिनांक 10/9/2016 |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 2760576/- |
| मक्तेदाराचे नांव | दिपक संभाजी शिंदे |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 347 दिनांक 30/4/2016 |
| तांत्रिक मान्यता | 1167 दिनांक 3/8/2016 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 12/2/2017 |
| काम पुर्ण दिनांक | दिनांक 11/12/2018 |
| कामाची मुदत | 1 वर्ष |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 95 पान क्रमांक 33 ते 40 |

| | |
|---|---|
| मुद्रांक शुल्क | रुपये 1900/- |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1189-2/11/2018 रक्कम रुपये 1688436/- पहिले व अंतिम देयक |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 1688436/- इतका खर्च करणेत आलेला आहे.सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धशासपत्र क्रमांक 146 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांवावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये 1688436 चे होते तरी सदरचे देयकातून 16884/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 8442 कपात केलेले आहेत तरी कमी कपात रक्कम रुपये 8442/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम 2760576/- रुपये असून सदरची निविदा 6.80% जादा दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच 2948295/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 2400/- रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 1900 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 500/- वसुल करून शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3. सदरचे काम हे सन २०१५-२०१६ चे दर सूची नुसार करण्यात आलेले आहे सदर कामामध्ये RCC M-20 कॉंक्रीट काम केलेले आहे सदरचे दर पृथक्करण करताना स्काडा प्रणाली वापरलेली नसलेने स्काडा प्रणालीविरहीत दर मक्तेदारास देणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4. सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल नस्ती सोबत आढळून आलेले नाहीत.

5. महाराष्ट्रशासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/2008/1338/प्र.क्र.171/नवी20 दिनांक 2/3/2008 तसेच महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.335/नवि-33 दिनांक 28 मार्च 2018 अन्वये 10 लेखापेक्षा जादा किंमतीच्या कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक असतांना असे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही

6. खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. सदरचे कामामध्ये 162.12 CUM गौण खनिज वापलेले आहे रॉयल्टी ची रक्कम 141.34 रुपये दराने कपात करणे आवश्यक असताना 70.68 दराने कपात केलेली आहे तरी कमी रक्कम रुपये ११४५९ वसूल करून शासन खाती भरण्यात यावेत.

7. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित

केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात यईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 1668029/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 20401/- वसुलपात्र करणेत येत आहे.

***56 76 मल्हार पेठ डॉक्टर यादव घर ते श्री पन्हाळे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : 00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 985602.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 976775.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8827.00/-

१. नस्ती सोबत काम पूर्ण झालेबाबतचा दाखला नस्ती सोबत आढळून आलेला नाही

२. 100 घनमीटरपेक्षा जादा खुदाईसाठी यांत्रिकी दर घेणे आवश्यक असतांना मानवी दराने खुदाई केली आहे.

3. डांबर खरेदी चलनाची मुळ प्रत नस्तीसोबत जोडलेली नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | 76 मल्हार पेठ डॉक्टर यादव घर ते श्री पन्हाळे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे |
| निधिचे नांव | नगरपरिषद रस्ता निधी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 1093828/- |
| निविदा स्विकृत | दिनांक 21/9/2016 |
| निविदेची रक्कम | रक्कम रुपये 1093828 |
| मक्तेदाराचे नांव | राजेंद्र कन्स्ट्रक्शन |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 369 दिनांक 17/5/2016 |
| तांत्रिक मान्यता | एम.जी.पी. दिनांक 2/9/2017 |
| काम सुरु दिनांक | दिनांक 21/5/2017 |
| काम पुर्ण दिनांक | काम अपुर्ण |
| कामाची मुदत | 60 दिवस पावसाचे दिवस सोडून |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 95 पान क्रमांक 55 |
| कामावरील खर्च | रक्कम रुपये 988264/- |
| मुद्रांक शुल्क | रक्कम रुपये 400/- |

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 716-11/8/2018 रक्कम रुपये 850713/- पहिले व धावते देयक<br>दुसरे धावते देयक रक्कम रुपये 34889/-<br>एकुण 985602/- |
|---|---|

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 985602 इतका खर्च करणेत आलेला आहे. सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 147 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. सदरचे कामास सुरुवात २१/०५/२०१७ रोजी झालेली आहे सदर कामाची मुदत ही पावसाळ्याचे दिवस सोडून 60 दिवस आहे कामाचे नस्ती सोबत काम पूर्ण झालेबाबतचा दाखला नस्ती सोबत आढळून आलेला नाही त्यामुळे काम विहित कालावधीत पूर्ण झाले किंवा नाही याची खात्री करता आलेली नाही.

२. सदरचे कामामध्ये बाब क्रमांक 1 अन्वये १४५.९० CUM खुदाई केलेली आहे सदर खुदाई MANNUAL दर घेऊन केलेली आहे परंतु सन १५-१६ चे दर सूचीतील सर्वसाधारण सूचनेनुसार १०० CUM चे वर खुदाई असलेस यांत्रिकी दर घेणे आवश्यक होते तरी रक्कम रुपये ८८२७ वसूल करण्यात यावेत .MANNUAL दर 125 + HILLY AREA 10%= 137.50 घेणे आवश्यक दर 70 + 10% hilly area दर = 77 दरातील फरक 60.50.
जादा अदाई 60.50 जादा दर कx 145.90 = ८८२७ वसूलपात्र.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात .4 ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांचीEPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औ .5द्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील.परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 976775/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 8827/- वसुलपात्र करणेत येत आहे.

बांधकाम

*57 सिसन ५१९ पेठ सदर बझार आयुर्वेदिक गार्डन येथे म्यूजिकल कारंजे बसविणे*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3001963.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2986453.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 15510.00/-

| |
|---|
| 1 देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.<br>2 मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार करारनाम्यासाठी कमी रकमेचे मुद्रांक शुल्क घेतले आहे. |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मिसन '५१९ पेठ सदर बझार आयुर्वेदिक गार्डन येथे म्युझिकल कारंजे बसविणे |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 3398645/- |
| निविदा स्विकृत | 4.99 टक्के जादा दराने |
| निविदेची रक्कम | रुपये 2938340/- |
| मक्तेदाराचे नांव | ओंकार दत्तात्रय भंडारे |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 148 दिनांक 2/11/2017 |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जा.क्र./चिशा/तांमं/237/2017 मजिप्रा जलव्यवस्थापन, सातारा |
| काम सुरु दिनांक | दिनांक 23/4/2018 |
| काम पुर्ण दिनांक | काम पुर्णत्वाचा दाखला नाही |
| कामाची मुदत | 12 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रमांक | 90 पान क्रमांक 74 |
| कामावरील खर्च | 3001963/- |
| मुद्रांक शुल्क | रुपये 2100/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2018-2019 चे लेखा परीक्षणात सदर कामावर रक्कम रुपये 3001963/- इतका खर्च करणेत आलेला आहे सदर खर्चावरील त्रुटी बाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 149 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1 शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांबावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते. तरी सदरचे कामाचे देयक हे रक्कम रुपये 3001963 चे होते तरी सदरचे देयकातून 30020/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 15010 कपात केलेले आहेत तरी कमी कपात रक्कम रुपये 15010/- वसूल करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2 मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत 10 लक्ष वरील प्रत्येक 1 लक्ष रुपयांसाठी 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम 2938340/- रुपये असून सदरची निविदा4.99% जादा

दराने स्वीकृत केलेली आहे म्हणजेच 3084963/- रुपयांना स्वीकृत केलेली आहे.सदर कामाचा करारनामा 2600/- रुपयांचे मुद्रांकावर करणे आवश्यक होता परंतु सदरचा करार नामा 2100 रुपयांचे मुद्रांकावर करणेत आलेला आहे. सबब रक्कम रुपये 500/- वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3. कामाचे आदेशातील अटी व शर्ती नुसार ठेकेदारास चालू महिन्याचे देयक अदा करतांना मागील महिन्यात ठेकेदाराने त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची EPF भरणे आवश्यक असतांना तशा प्रकारची पडताळणी नगरपरिषदेने केल्याचे दिसून आले नाही.

4. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 15510/- वसुलपात्र व रक्कम रुपये 2986453/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

### *58 स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीतून सार्वजनिक शौचालय विद्युतीकरणासाठी केलेल्या खर्चाबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 05

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 320039.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 295109.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 24930.00/-

1. उपरोक्त सन 2018-19 मधील कामास प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता ही सन 2017-18 करीता दिल्याचे निदर्शनास आले आहे.
2. कामाचे द्वितीय व अंतिम देयक हे सन 2017-18 मधील कामाचा भाग असल्याबाबत कोणताही तपशिल नमुद नाही.
3. उपरोक्त कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविलेली नाही. नगरपरिषदेने स्वनिधीतून करावयाच्या कामाकरीता सन 2016-17 मध्ये मंजुर निविदाकाराला काम दिले आहे.
4. जुन्या साहित्याची काय विल्हेवाट लावली यावबत साधार पुर्तता आवश्यक आहे.
5. अंदाजपत्रकात नमुद दरापेक्षा जादा दराने प्रदान केले आहे.

प्रशासकीय मान्यता – ठराव क्रमांक 145 दिनांक 2/11/2017 (सन 2017-18 करीता)

तांत्रिक मान्यता – मजिप्रा/चिशा/तांमं/222/2017 दिनांक 23/1/2018 (सन 2017-18 करीता)

निविदा मंजुर – ठराव क्रमांक 428 दिनांक 6/8/2018

नगरपरिषद सातारा, 2018-2019

काम मंजुर – ठराव क्रमांक 113 दिनांक 24/8/2017

कार्यादेश क्रमांक – सानप/विद्युत/128 दिनांक 11/1/2018

मोजमाप पुस्तक पान क्रमांक – 9 ते 10 रक्कम रुपये 285749 + 12 टक्के जीएसटी = 320039

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 642 | 25/7/2018 | 320039 | श्री. वरद विनायक डले. डेकोरेटर्स, सातारा द्वितीय व अंतिम देयक |
| एकुण | | 320039 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 110 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त सन 2018-19 मधील कामास प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता ही सन 2017-18 करीता दिल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच उपरोक्त नमुद कार्यादेश हे सन 2017-18 मध्ये मंजुर कामाकरीता झाले असून नस्तीमधील नोंदीनुसार दिनांक 15/1/2018 रोजी काम 100 टक्के पुर्ण झाले आहे तसेच त्याचे प्रदान प्रमाणक क्रमांक 14 दिनांक 12/2/2018 रक्कम रुपये 2007688/- अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान विर्दीमध्ये नोंदलेले आहे. मात्र उपरोक्त प्रमाणक क्रमांक 642 सोबतच्या देयकावर त्याचा संदर्भ नोंदलेला नाही. सबब सन 2017-18 मधील मंजुर कामाच्या प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता आधारे उपरोक्त खर्च नियमबाहय नोंदला आहे.

2. तांत्रिक मान्यता अट क्रमांक अ नुसार तांत्रिक मान्यता कालावधी 1 वर्षापर्यंत मर्यादित राहील असे नमुद आहे. उपरोक्त द्वितीय व अंतिम देयक हे सन 2017-18 मधील कामाचा भाग असल्याबाबत कोणताही तपशिल नमुद नाही. देयक व मोजमाप पुस्तकातील नोंदी पाहता हे काम सकृतदर्शनी नवीन असल्याचे दिसते. सदरच्या अंतिम देयकावर प्रथम व धावत्या देयकासह कामाचे एकुण झालेले परिमाण त्यापैकी प्रथम देयकाद्वारे केलेले प्रदान व उर्वरीत प्रदान असा तपशिल नोंदविलेला नाही. सबब हे काम नवीन नसून त्याच कामाचा भाग असल्याचे प्रमाणित होत नाही.

3. उपरोक्त कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविलेली नाही. नगरपरिषदेने स्वनिधीतून करावयाच्या कामाकरीता सन 2016-17 मध्ये मंजुर निविदाकाराला काम दिले आहे. सदरचे काम शासन निधीचे असून स्वतंत्र काम असल्याने त्याची स्वतंत्र ई निविदा प्रक्रिया करणे आवश्यक होते. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/2018/प्र.क्र.539/नवि-20/दिनांक 8 जुन 2018 मध्ये दिलेल्या निविदा प्रक्रिया राबवितांना घ्यावयाच्या दक्षताबाबतच्या सुचना क्रमांक 7 अन्वये वाढीव कामे समाविष्ट करावयाची झाल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय व तांत्रिक पुर्व मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबवावी याचे उल्लंघन झाले आहे. तसेच सुचना क्रमांक 6 अन्वये जुन्या निविदेमध्ये नवीन कामे समाविष्ट करुन कार्यादेश देऊ नयेत. अशी बाब आढळून आल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी असे निर्देश आहेत. सबब नियमबाहयरित्या उपरोक्त काम केल्याने यथायोग्य कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4. उपरोक्त कामात वापरलेल्या साहित्याचे एकक हे मोजमापानुसार नसून नग स्वरुपात आहे. सदर शौचालये जुनी आहेत. सबब नवीन साहित्य बसविणेपूर्वी जुने साहित्य नगरपालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेचे आढळले नाही. जुन्या साहित्याची काय विल्हेवाट लावली याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

5. खालील बाबींकरीता अंदाजपत्रकात नमुद दरापेक्षा जादा दराने प्रदान केले आहे.

| बाब क्रमांक | बाब | परिमाण संख्या | अंदाजपत्रकीय दर रुपये | मोजमाप पुस्कानुसार देयकातील दर | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supplying erecting and marking SPMCB 6A to 32A B series etc--- | 121 | 151 | 81 | 3630 |
| 2 | Supplying erecting mains with ISI mark wp 2x4 gm 1100v grade aluminums pvc insulated wires etc. | 1850 | 62 | 64 | 7400 |
| 3 | Supplying erecting mains with 2x1.5 sqmm FR coper pvc insulated wires etc. | 2250 | 34 | 38 | 9000 |
| एकुण | | | | | 20030 |

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दरसुचीनुसार दिलेल्या दरानुसार प्रदान करणे आवश्यक असतांना नियमबाह्यरित्या जादा दरानुसार केलेले प्रदान अंतिम असमान्य करणेत येत आहे.

खालील बाबींची अंदाजपत्रकात तरतुद नसून त्यास तांत्रिक मान्यतादेखील नाही. तथापि मोजमाप पुस्तकात मापे नोंदवून देयकात यापोटी प्रदान केले आहे. सबब सदर दोन्ही बाबींकरीता सक्षम प्राधिकाऱ्याच्या म्हणजे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मान्यतेशिवाय केलेला जादा बाबीवरील एकुणखर्च रक्कम रुपये 24930/- अंतिम असमान्य करणेत येत आहे.

| बाब क्रमांक | बाब | परिमाण संख्या | अंदाजपत्रकीय दर रुपये | मोजमाप पुस्कानुनार देयकातील दर | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Supplying and erecting G/s Lamp | - | 100 | 17 | 1700 |
| 6 | Ceiling rose/button holder | - | 100 | 32 | 3200 |
| एकुण | | | | | 4900 |

विद्युत

***59 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत***

.00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 13**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2658853.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2632263.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 26590.00/-

1. स्थायी निर्देश क्र. 36 मधील उपपरिच्छेद क्र. 23 पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पूर्वी देता येईल. तथापि नगरपालिकेने यांना स्थायी समिती सभा, ठराव क्र. 94, दि. 20-06-2017 ने मुदत वाढ देण्यात आली आहे.

2.महाराष्ट्र शासन उद्योग , उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक भांखंस2004/प्र.क्र.256/08/उद्योग/4 दिनांक 10/10/2004 नुसार सर्वसाधारण कोणत्याही करारास मुदतवाढ देणेत येऊ नये तशी कार्यवाही न करता नियमबाह्य सन 2016-17 चे मंजूर निविदाधारकास कामाचा आदेश देऊन रक्कम अदा केली आहे.

3. कंत्राटदारांचे नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविधेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नसले बाबत प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही

4.नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

5.स्थायी निदेश क्रमांक 36 अन्वये प्राप्त साहित्याच्या पर्यवेक्षणासाठी एक समिती नेमलेली नाही.

6.मक्तेदाराच्या देयकातून आयकर कपात केलेला नाही.

7.कामात वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत.

8. मा. विद्युत निरीक्षक उद्योग व कामगार विभाग यांचेकडून करून घेवून त्यांनी दिलेला निरीक्षण अहवालाची प्रत लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

10.महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 चे नियम 139 नुसार नमुना क्रमांक 62 मध्ये काम पुर्णत्व प्रमाणपत्र नसल्याने काम कधी पुर्ण झाले याचा बोध होत नाही.

11. पोल बसविणे व शिफटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुसतीका तपासणी केली असता अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च झालेला आहे.

12. न.पा.इमारतींचे विद्युतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणेबाबत प्रत्येक महिन्यांत , कोणकोणत्या प्रभागात कोणती कामे/दुरुस्ती केली याबाबत नगरपरिषदेने नोंदी ठेऊन आढावा घेतलेला नाही.

13.मक्तेदाराच्या देयकातून कामगार उपकर रक्कम कपात केलेली नाही.

नगरपरिषद सातारा चे सन 2018-19 चे लेखापरीक्षणामध्ये विदयुत विभागाकडील नगरपरिषद हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे ,पोल बसविणे शिफटींग करणे ,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील ठेक्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| अनु.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| | नगरपरिषद हददीमध्ये पोल बसविणे व शिफटींग करणे | अंदाजपत्रकीय रक्कम रक्कम रु. 7500000/-<br>तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016 टेंडर नोटीस प्रसिध्दी- सानप/विद्युत-3, दिनांक 29-02-2016 (फेर निविदा)<br>निविदाकार – दोन<br>टेंडर मंजूर केलेला ठराव व दिनांक - ठराव क्र. 302, दि. 30-04-2016<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक - क्र. सानप/इले/88/2016, दि. |

| | | |
|---|---|---|
| | | 10-10-2016<br>कालावधी – 1 वर्ष |
| | हायमास्ट दिवे व विदयुत व्यवस्था करणे<br>प्रभाग क्रमांक 1,9,12,20 साठी | तांत्रिक मान्यता – नाही<br>प्रशासकीय मंजुरी – 1.ठराव क्र. 2562 दिनांक 08/07/2016<br>2.ठराव क्र. 387 दिनांक 10/04/2017<br>निविदाकार - दोन<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक – 1.सानप/इले/111/2016, दि. 06-12-2017<br>2.सानप/इले/81/2017, दि. 06-12-2017<br>कालावधी – 1 महिना |
| | न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरुस्ती करणे | तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016 टेंडर नोटीस प्रसिध्दी- दिनांक 19-03-2016<br>निविदाकार – तीन<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक – 145,145अ,145ब दिनांक 22/02/2018<br>कालावधी – 1वर्ष |

उपरोक्त बाबींकरीता खर्च करण्यात आलेल्या निवड महिन्यातील प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे निवड महिन्यात खर्च करण्यात आला आहे.

| प्र. क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 224 | 29/05/2018 | 505727 | श्री.वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>पोल बसविणे व हायमास्ट दिवे बसवणे |
| 456 | 02/07/2018 | 1133212 | श्री.वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>पोवई नाका,झेड पी ग्राऊंड येथे एल ई डी स्कीन,लाईट,साऊंड,जनरेटर ,हॅलोजन पुरविणे |
| 602 | 21/07/2018 | 1019914 | श्री.वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>क्रिडा स्पर्धा व स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्तीसाठी विदयुत साहित्य पुरवणे |
| | एकुण | 2658853 | |

उपरोक्त खर्चा बाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कडील स्थायी निदेश क्र. 36 मधील उपपरिच्छेद

क्र. 23 व महाराष्ट्र शासन उद्योग , उर्जा व कामगार विभाग , शासन निर्णय क्रमांक: भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01 डिसेंबर , 2016 सुधारित नियमपुस्तिका मधील अनु. क्र. 3.3.2 नुसार पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश , सुरवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पूर्वी देता येईल. तथापि नगरपालिकेने श्री. वरद विनायक इलेक्ट्रिक डेकोरेटर्स , सातारा यांना स्थायी समिती सभा , ठराव क्र. 94, दि. 20-06-2017 ने मुदत वाढ देण्यात आली आहे. नगरपंचायतीने स्थायी निर्देश क्र. 36 व दिनांक 01 डिसेंबर, 2016 चे शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली नाही.

2.महाराष्ट्र शासन उद्योग , उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक भांखस2004/प्र.क्र.256/08/उद्योग/4 दिनांक 10/10/2004 नुसार सर्वसाधारण कोणत्याही करारास मुदतवाढ देणेत येऊ नये तसेच अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावली नुसार संबंधित विभागांशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही करावी असे असताना नगरपरिषदेने तशी कार्यवाही न करता नियमबाह्य सन 2016-17 चे मंजूर निविदाधारकाम कामाचा आदेश देऊन रक्कम अदा केली आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 16(1)(झ) व कलम 44(1)(ग) मधील तरतुदीनुसार कंत्राटदारांचे नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नसले बाबत प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही

4.नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

5.स्थायी निर्देश क्रमांक 36 क्र.नपस/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/9 दि.29-12-2005 मधील परिशिष्ट क मधील बाब क्रमांक 6 अन्वये प्राप्त साहित्याच्या पर्यवेक्षणासाठी एक समिती नेमणे आवश्यक असताना नगरपालिकेने उपरोक्त दिवाबत्ती व इतर साहित्य स्विकारताना अशा प्रकारची समिती स्थापन केलेली नाही.

6.आयकर नियम 194 (सी.) अन्वये 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना , नगरपालिकेने मक्तेदाराचे देयकातून 1 % प्रमाणे आयकराची रक्कम कपात केली आहे. उर्वरित आयकराची रक्कम 1 % प्रमाणे परिगणना करून संबंधितांनाकडून वसुल करुन शासनास भरणा आवश्यक आहे.

7.कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 ( EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

8.नगरपरिषद हद्दीमध्ये पोल बसविणे व शिफटींग करणे बाबत करारनाम्यातील अट क्र. 14 नुसार सदर कामामध्ये वापरलेल्या साहित्याच्या आवश्यक नमुन्यांचा चाचणी अहवाल विदयुत निरीक्षक सातारा यांचेकडुन तपासुन घेणे आवश्यक आहे. तथापी असा साहित्या चाचणी अहवाल घेणेत आलेला नाही. तसेच अट क्रमांक 9 नुसार कामासाठी वापरणेत आलेले साहित्य महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाकडुन तपासुन घेणे बंधनकारक असताना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

9.काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाची पाहणी करून मा. विद्युत निरीक्षक उद्योग व कामगार विभाग यांचेकडून करून घेवून त्यांनी दिलेला निरीक्षण अहवालाची प्रत कंपनीचे उपविभागिय कार्यालय , शाखा कार्यालय यांचेकडून सदरची लाईन चालू करून घेणेची आहे. याबाबत खात्री करण्यात यावी.

10.महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 चे नियम 139 नुसार नमुना क्रमांक 62 मध्ये काम पुर्णत्व प्रमाणपत्र नसल्याने काम कधी पुर्ण झाले याचा बोध होत नाही.

11.प्र. क्र. 224 दिनांक 29-05-2018 रक्कम रु.505727/- मधील उपप्रमाणकांची तपासणी केली असता पोल बसविणे व शिफटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुसतीका तपासणी केली असता सदर कामाची मोजमाप पुस्तिकेत खालील बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रुपये 24150/- जादा खर्च झालेला आहे.

| अ. क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार नग | मोजमाप पुस्तीकेनुसार नग | जादा नग | दर | जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | RSJ pole 120*70 8m | 3 | 5 | 2 | 6000 | 12000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | long | | | | | |
| 2 | RSJ pole 120*70 8m long | 1 | 2 | 1 | 6000 | 6000 |
| 3 | Earthing set | 1 | 2 | 1 | 200 | 200 |
| 4 | LT stay set | 1 | 2 | 1 | 1200 | 1200 |
| 5 | Providing Earthing with glavansied cast iron plat earth | 0 | 1 | 1 | 4750 | 4750 |
| | एकूण- | | | | | 24150 |

12.न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरुस्ती करणेबाबत मक्तेदाराने करारनाम्यांत नमूद केल्याप्रमाणे स्ट्रीट लाईट देखभालीकरीता प्रत्येक महिन्यांत , कोणकोणत्या प्रभागात कोणती कामे/दुरुस्ती केली याबाबत नगरपरिषदेने नोंदी ठेऊन आढावा घेतलेला नाही.

13.महाराष्ट्र शासन , उद्योग, उर्जा व कामगार विभाग , शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र. 108/कामगार-7अदि.17 जून 2010 अन्वये कामावरील खर्चाच्या 1% रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करणे आवश्यक असताना, वसुल केलेली नाही. सबब उपरोक्त प्रमाणकान्वये झालेला खर्च रक्कम रुपये 2658853 X 1% = 26590/- वसुलपात्र ठरते.

उपरोक्त पुर्ततेअभावी रक्कम रुपये 26590/- वसुलपात्र व रक्कम रुपये 2632263/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

भांडार

***60 सन 2017-18 तसेच सन 2018-19 मध्ये शहरातील महिला व मुलींना मबाक समितीतर्फे एमएससीआयटी व मोबाईल ॲपचे प्रशिक्षण देणेबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्वः निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 48800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 41200.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7600.00/-

| |
|---|
| 1. सदर योजना विलंबाने राबविल्याने लाभार्थ्यांना सन 2017-18 या आर्थिक वर्षात लाभ मिळाला नाही. |

2. मक्तेदाराच्या देयकातून जीएसटी कपात केलेला नाही.
3. सदर प्रशिक्षण संस्थेस लाभार्थी, विद्यार्थी संख्येनुसार संगणक संख्या, बैठक व्यवस्था याबाबत मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे सन 2017-18 व 2018-19 करीता मंजुरी असलेचे आढळले नाही.
4. लाभार्थ्यांचे प्रस्तावात उणिवा आढळल्या.
5. सातारा शहरातील रहिवासी नसतांना काही लाभार्थ्यांना योजनेचे लाभ देण्यात आले आहेत.
6. योजनेसाठी निकष ठरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे लाभार्थ्यांना दिलेला लाभ वसुल करणे आवश्यक राहील.
7. योजनेच्या निकषात संगणक अर्हता परीक्षा उपस्थित रहाणे ही अट आढळली नाही.
8. सन 2018-19 मध्ये मंजुर योजना एक वर्षापेक्षा अधिक काळ विलंबाने राबविली आहे.

सातारा नगरपरिषदेचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात सन 2017-18 तसेच सन 2018-19 मध्ये शहरातील महिला व मुलींना मबाक समितीतर्फे एमएससीआयटी व मोबाईल ॲपचे प्रशिक्षण देणेबाबतची नस्ती तपासली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 112 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदर योजना सन 2017-18 मध्ये मबाक समितीमार्फत राबविणेचे प्रयोजन होते त्यानुसार सदर समिती ठराव क्रमांक 37 दिनांक 3/10/2017 अन्वये रुपये 1 लक्षपर्यंत खर्चास मंजुरी दिली आहे. मात्र वरीलप्रमाणे विलंबाने योजना राबविल्याने लाभार्थ्यांना सन 2017-18 या आर्थिक वर्षात लाभ मिळाला नाही. खर्चाकरीता तरतुद असतांना विलंब झाल्याबाबत खुलासा आवश्यक आहे.

2. तीन प्राप्त निविदाकारांपैकी शशि कॉम्प्युटर्स, सातारा यांची कमी दराची म्हणजे रुपये 3800/- प्रति लाभार्थी या दराची निविदा मंजुर केली. निविदाकाराच्या अर्जानुसार एमएससीआयटी कोर्सला जीएसटी लागु होत नाही. तथापि सदर योजना एमएससीआयटी सोबत मोबाईल ॲपचे प्रशिक्षण देणे अशी असल्याने मोबाईल ॲप ही व्यवसायिक बाब असल्याने त्याकरीता जीएसटी आकारणी होऊ शकली असती मात्र निविदाकाराच्या अर्जानुसार नगरपरिषदेने जीएसटीची आकारणी केली नाही. याबाबत निविदाकाराने जोडलेल्या सल्लागारांच्या खुलाशाच्या शेवटी सदरची माहिती आकलनावर आधारीत असून कायदेशिर बाबींसाठी ग्राह्य नाही. अशा आशयाचा मजकुर समाविष्ट आहे. नगरपरिषदेने याबाबत छाननी करणे आवश्यक होते. उपरोक्त दोन्ही प्रकारच्या प्रशिक्षण योजनाप्रकरणी नगरपरिषदेने वस्तु व सेवा कर कार्यालय सातारा यांचे अभिप्राय मागविणे आवश्यक होते.

3. सदर प्रशिक्षण संस्थेस लाभार्थी, विद्यार्थी संख्येनुसार संगणक संख्या, बैठक व्यवस्था याबाबत मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे सन 2017-18 व 2018-19 मध्ये प्रशिक्षण वर्ग चालविण्याकरीता मंजुरी असलेचे आढळले नाही. सबब लाभार्थी संख्येएवढी दोन महिन्यात प्रशिक्षण देण्याइतकी सदर संस्थेची क्षमता असलेचे प्रमाणित होत नाही.

4. लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासले असता खालील उणिवा आढळल्या.

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नांव | आढळलेल्या उणिवा |
|---|---|---|
| 1 | पोळ काजल शहाजी | रेशनकार्ड, आधारकार्ड, उत्पन्न दाखला या तिनही कागदपत्रांवर पत्ता मु.पो. चिकलठाणा, ता. करमाळा असा आहे. |
| 2 | सौ. अश्विनी संदीप कांबळे | उत्पन्नाचा दाखला नाही. |

| | | |
|---|---|---|
| 3 | सौ. रेवती राहुल शेटे | शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र नाही. |
| 4 | शाहीन मुसा मुजावर | शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 5 | श्रुपता सिकंदर शेख | शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 6 | रिजवाना आरीफ खान | शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 7 | राखी सतीश सुरासणे | शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 8 | नम्रता नितीन राऊत | कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| 9 | सौ. वैशाली जितेंद्र झनकर | उत्पन्न दाखला, शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नाही. |
| 10 | सौ. उज्वला चंद्रहास झांजुर्णे | उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 11 | दिप्ती सिध्देश्वर कुंभार | उत्पन्नाचा दाखला नाही तसेच सातारा येथील रहिवाशी असल्याचा पुरावा नाही. |
| 12 | ज्योती चंद्रहास झांजुर्णे | उत्पन्नाचा दाखला नाही. |
| 13 | लता विश्वनाथ किरनकर | उत्पन्न दाखला व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र नाही. |
| 14 | वैशाली नंदकुमार चोरगे | उत्पन्न दाखला नाही. |
| 15 | सायली अनिल शिंदे | संगणक शास्त्र व अभियांत्रिकी शाखेची विद्यार्थिनी असलेबाबत नोंद आहे. |

5. सदर योजना सातारा शहरातील महिला व मुलींना संगणकाचे ज्ञान व माहिती व्हावी या उद्देशाने राबविली आहे. मात्र उपरोक्त अ.क्र. 1 पोळ काजल शहाजी या लाभार्थ्यांचा सातारा शहराचे नागरीक व रहिवासी नसलेने व अ.क्र.15 सायली अनिल शिंदे, संगणक शास्त्र शाखेची दुसऱ्या वर्षाची विद्यार्थीनी असलेने संगणकाचे शिक्षण रितसर घेत असल्याने दोन्ही लाभार्थ्यांचे रुपये 7600/- वसुलपात्र आहेत.

6. अन्य लाभार्थ्यांबाबत योजनेसाठी निकष ठरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे लाभार्थ्यांना दिलेला लाभ वसुल करणे आवश्यक राहील.

7. उपरोक्त उणिवा पाहता योजना सर्वंकष राबविली नसलेचे दिसते. एकाच कुटुंबातील दोन लाभार्थी असून त्यांची कागदपत्रे अपुर्ण आहेत. योजनेच्या निकषात संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होणे ही अट आढळली नाही. हा निकष अनिवार्य नसला तरी परीक्षेस उपस्थिती अनिवार्य करणे आवश्यक होते. परीक्षा 7 जुलै 2018 व ऑगस्ट 2018 रोजी पार पडल्याने उपस्थितीपत्रक घेणे शक्य होते जेणेकरुन संगणकाचे नियमित प्रशिक्षण घेऊन प्राथमिक ज्ञान प्राप्त केल्याची पुष्टी होऊन उद्देश बऱ्याच अंशी सफल झाला असता

8. सदर योजनेसाठी नगरविकास विभाग क्रमांक संकिर्ण/2005/प्र.क्र.156/5/नवि-20 दिनांक 30/12/2006 शासन निर्णयानुसार तसेच योजना जाहिर प्रसिध्दीच्या अटी शर्तीनुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणे आवश्यक आहे. याबाबत मक्तेदार प्रशिक्षण संस्थेच्या फी नोंदीसह लाभार्थ्यांनी हिस्सा भरला असलेबाबत पुर्तता दाखवावी. तसेच शासन निर्णयाप्रमाणे नगरपरिषदेने 10 टक्के लाभार्थी हिश्याबाबत व त्या अनुषंगाने दर मंजुरीबाबत निविदेत तसेच करारनाम्यात अटी, शर्ती नमुद करणे आवश्यक होते. मात्र अशी कार्यवाही केली नाही.

9. सन 2018-19 या वर्षाकरीता नरपरिषद हद्दतील एमएससीआयटी चे महिला व मुलींना प्रशिक्षण देणेबाबत निविदा प्रक्रिया होऊन अक्षय कॉम्प्युटर सर्व्हिसेस यांची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक 1130 दिनांक 18/12/2018 अन्वये मंजुर केली मात्र अनामत भरणेबाबत व करारनामा करणेबाबत जा.क्र.सानप/भांडार/265/ दिनांक 1/3/2019 अन्वये सुचित केले, त्यानंतर कार्यादेश क्रमांक सानप/भांडार/265 दिनांक 2/3/2019 अन्वये 78 लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे सुचित केले. निविदा मंजुर दिनांक 18/12/2018 रोजी असतांना पुढील प्रक्रिया

उशिरा राबविलेने संगणक प्रशिक्षणाचा कालावधी 2 महिने असलेने सन 2018-19 मध्ये लाभार्थींना लाभ मिळाला नाही. तरतुद असतांना योजना राबविणेची प्रक्रिया विलंबाने केल्याबाबत खुलासा आवश्यक आहे. याचप्रकारे ब्युटी पार्लर कामाचे प्रशिक्षण देणेकरीता ठराव क्रमांक 939 दिनांक 11/9/2018 अन्वये गुरुकुल शिक्षण संस्था यांची निविदा मंजुर केली मात्र 16 लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणेसाठी कार्यादेश क्रमांक सानप/भांडार/75 दिनांक 31/12/2019 रोजी दिला आहे म्हणजे एक वर्षापेक्षा अधिक काळ विलंबाने योजना राबविली आहे. उपरोक्त दिनांक 30/12/2006 च्या शासन निर्णयानुसार वर्षाअखेरीस योजना न राबविता वर्षाच्या सुरुवातीस राबविणे आवश्यक आहे.मात्र याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 41200/- आक्षेपाधिन व रक्कम रुपये 7600/- वसुलपात्र करणेत येत आहे.

पाणीपुरवठा

## 61 वेलणकर बोळ ते पालकर घर (पॅट्रीट बोळ कॉर्नर) अखेर पाईपलाईन घालणे.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 117652.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 114361.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3291.00/-

1. निविदा फीच्या पावत्या नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत.
2. सदर कामावर प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्च केला आहे.
3. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा कमी परिमाणाची पाईप वापरली आहे.
4. कामात वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेतलेले नाहीत.
5. मक्तेदाराकडून बयाणा रक्कम वसुल केलेली नाही.
6. कामाच्या माहितीचा नामफलक लावलेला नाही.
7. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केला आहे.

सातारा नगरपरिषद, साताराचे लेखापरीक्षण दिनांक 20/1/2020 पासून चालू असून पाणी पुरवठा विभागाकडील वेलणकर बोळ ते पालकर घर (पॅट्रीट बोळ कॉर्नर) अखेर पाईपलाईन टाकणे कामाची तपासणी केली असता त्यातील उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 50 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाची दरपत्रके मागवून घेतली होती त्यानुसार सदर कामासाठी तीन दरपत्रके आली होती. त्या तिनही निविदाधारकांकडून निविदा फी भरुन घेणे आवश्यक असतांना तशा पावत्या नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

2. उपरोक्त कामास रक्कम रुपये 114661/- ची प्रशासकीय मान्यता स्थायी समितीने दिलेली असतानाही प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा रक्कम रुपये 117652/- इतका खर्च सदर कामावर अनियमितपणे करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेपेक्षा रक्कम रुपये 2991/- इतका जादा खर्च झालेला आहे.

3. मे. स्थायी समिती ठराव क्रमांक 239 दिनांक 3/8/2017 नुसार सदर कामासाठी 100 मीमी व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी मान्यता दिलेली असतांना प्रत्यक्ष कामाचे अंदाजपत्रक 90मीमी व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी करुन त्याप्रमाणे काम करणेत आलेले आहे.

4. महाराष्ट्र नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 37 अन्वये कामात वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. सदर कामात पुरवठा केलेले व वापरलेली 90मीमी/8किग्रॅ 138 RMT पाईपचे टेस्ट रिपोर्ट नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

5. मंजुर निविदा धारक सुजित व्यंकट भोसले यांचे नोंदणी प्रमाणपत्र सु.बे.अ. किंवा मजुर सहकारी संस्था या प्रकारातील नसतांनाही त्यांना बयाणा रकमेतून सुट देणेत आलेली आहे.

6. महाराष्ट्र नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 37 अन्वये तसेच करारनामा अट क्रमांक 10 नुसार काम पुर्ण होण्यापूर्वी कामाच्या माहितीचा फलक कामाच्या ठिकाणी लावणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

7. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकरारकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. प्रस्तुतचे कामाचा करारनामा करतांना निविदाधारकाकडून रुपये 500/- च्या मुद्रांकावर करारनामा करुन घेणे आवश्यक असतांना रुपये 200/- च्या मुद्रांकावर करारनामा करुन घेतलेला आहे. उर्वरीत रक्कम रुपये 300/- वसुल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

आरोग्य

***62 आरोग्य विभागाकडील जेसीबी 2DX- 49 HP खरेदीतील अनियमिततेबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1552759.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1521704.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 31055.00/-

1. नपप्रंस स्थायी निर्देश क्रमांक 32 मधील बाब क्रमांक 34 नुसार ज्या वाहनाचा नियमित वापर होत नसतो अशी वाहने खरेदी करण्यात मान्यता देण्यात येणार नाही असे नमुद असतांना नगरपरिषद साताराकडील आरोग्य विभागाने जेसीबी खरेदी केला आहे.

| |
|---|
| 2. वाहन खरेदी, इंधन व वाहन देखभाल दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात तरतुद दिसून आली नाही. |
| 3. वाहन खरेदीसाठी मागणीचा कोणताही प्रस्ताव नसतांनाही वाहनाची खरेदी करण्यात आली आहे. |
| 4. सातारा नगरपरिषदेने आस्थापना खर्चाची टक्केवारी परिगणित न करता वाहन खरेदी केले आहे. |
| 5. सुरक्षा अनामत वसुल करण्यात आली नाही. |
| 6. पुरवठयाच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे निरीक्षण करणे आवश्यक असतांना अशा प्रकारचे कोणतेही अहवाल नस्तीसोबत नाहीत. |
| 7. देयकातून आयकर कपात केलेला नाही. |
| 8. प्रशासकीय मान्यता आदेशात आवश्यकता व विनीयोगाबाबत भाष्य केल्याचे दिसून येत नाही. |
| 9. जेसीबी ऑपरेटरसाठी होणाऱ्या खर्चाची तरतुद केलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. |

सातारा नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील जेसीबी 2DX- 49 HP खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 52 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्रमांक 32 दिनांक 10 मे 2005 नुसार नगरपरिषदेकडील वाहने खरेदी व वापरासंबंधिच्या धोरणाबाबतचे एकत्रित आदेश दिले गेले आहेत. या आदेशातील बाब क्रमांक 34 नुसार ज्या वाहनाचा नियमित वापर होत नसतो अशी वाहने (उदा. जेसीबी, स्वयंचलित रोड रोलर इत्यादी) खरेदी करण्यात मान्यता देण्यात येणार नाही असे नमुद असतांना नगरपरिषद साताराकडील आरोग्य विभागाने जेसीबी खरेदी केला आहे.

2. वाहन खरेदीपूर्वीर वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात वाहन खरेदीची तरतुद तसेच इंधन व वाहन देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद आवश्यक असतांना अशा प्रकारची तरतुद अर्थसंकल्पात दिसून आली नाही.

3. सदर वाहन खरेदी करण्यापूर्वी वाहन खरेदी करण्याची आवश्यकता आणि वाहन खरेदीसाठी मागणीचा कोणताही प्रस्ताव नसतांनाही वाहनाची खरेदी करण्यात आली आहे.

4. नगरपरिषदेने आस्थापना खर्चाच्या मर्यादेत अनुसरुन वाहन खरेदी करणे आवश्यक असतांना सातारा नगरपरिषदेने आस्थापना खर्चाची टक्केवारी परिगणित न करता कार्यवाही केलेचे दिसून येत आहे.

5. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 1 डिसेंबर 2016 च्या बाब क्रमांक 46 नुसार यशस्वी निविदाधारकाला खरेदी प्राधिकाऱ्याकडे आदेशाच्या मुल्याच्या (रक्कम रुपये 1552759/-) कमीत कमी 3 टक्के इतकी अनामत रक्कम जमा करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कोणतीही रक्कम नगरपरिषदेने जमा करुन न घेता खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

6. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 1 डिसेंबर 2016 च्या बाब क्रमांक 4.7 नुसार 47अ पुरवठयाच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे त्वरीत निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे व या निरीक्षणात आढळलेल्या उणिवा/दोष ताबडतोब पुरवठयाच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही 15 दिवसांच्या आंत करणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने अशा प्रकारची तपासणी केल्याबाबतची कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

7. उपरोक्त खरेदीच्या देयकातून शासन निर्णयाप्रमाणे दोन टक्के आयकर देयकातून वसुल करणे आवश्यक असतांना देयक रक्कम रुपये 1552752/- मधून 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 31055/- वसुल करुन शासन निधीत भरणा केलेची पुर्तता दाखवावी.

8. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 नुसार प्रशासकीय आदेशात खरेदीची आवश्यक व खरेदी केलेल्या वस्तुंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे असे प्रमाणित करण्यात यावे असे नमुद असतांना सदर प्रशासकीय मान्यता आदेशात आवश्यकता व विनीयोगाबाबत भाष्य केल्याचे दिसून येत नाही.

9. सदर वाहन खरेदी केल्यानंतर तपासणी जेसीबी ऑपरेटरसाठी होणाऱ्या खर्चाची तरतुद केलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

आक्षेप

***63 स्वच्छमहाराष्ट्र अभियान निधीमधून स्वच्छ सर्वेक्षण 2018 अंतर्गत राजवाडा, गुरुवार परज-1 व 2 व सदरबझार या भागामध्ये ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे सफाई करणे.***

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 07

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 199200.00 /-

1. सदरची योजनेचा खर्च स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीतून केला आहे मात्र सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविली नाही.
2. करारनामा अट क्रमांक 4 नुसार सदरचे काम पीडब्ल्युडी डीएसआर स्पसिफिकेशनप्रमाणे करण्याचे नमुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
3. राजवाडा, परज-2, परज-2, सदरबाझार – 2 या चारही भागांची भौगोलिक संरचना भिन्न आहे. तेथील रस्ते, गल्ली, बोळ, मोकळया जागा यांचे आकारमान विभीन्न आहे.
4. क्रमवार मागणी देयके नसल्याने सदरचा खर्च नोंदविल्याप्रमाणेच योग्य झाला असल्याचे प्रमाणित होत नाही.
5. मक्तेदाराच्या मागणी देयकांवर वाहन क्रमांक व तपशिल नोंदलेला नाही.
6. नगरपालिकेने कचरा डेपोवर असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत सदरचे वाहन तेथे पोचल्याबाबत वेळ, दिनांक व कचरा, गाळ टाकलेबाबत तपशिलवार नोंदी ठेवणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीमधून स्वच्छ सर्वेक्षण 2018 अंतर्गत राजवाडा, गुरुवार परज-1 व 2 व सदरबझार या भागामध्ये ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे सफाई करणे या कामाची नस्ती तपासणी असता त्यावर खालीलप्रमाणे खर्च केल्याचे दिसून आले.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 512 | 5/7/2018 | 199200 | मक्तेदार सुजित व्ही. भोसले दगड, माती, गाळ ट्रॅक्टर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ट्रॉलीद्वारे उचलणे दर रुपये 415/- प्रति तास |
| एकुण | | 199200 | |

1. उपरोक्त खर्च स्वच्छ महाराष्ट्र अभियान निधीतून केला आहे मात्र सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविली नाही. सन 2017-18 व त्यापूर्वी मंजुर असलेल्या उपरोक्त मक्तेदारास त्यावेळी मंजुर असलेल्या रुपये 415/- दराने उपरोक्त कामापोटी खर्च नोंदला आहे. सदरचा मक्तेदार हा नगरपरिषद निधीतून करावयाच्या कामाकरीता सन 2017-18 पूर्वी करारबध्द झाला आहे. त्याच्याकडून वरील प्रमाणे शासन निधीतील कामे करुन घेणेऐवजी नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रमांक 36 नगप्रसं/निविदा मागविणे/प्र.क्र.51/05/09 दिनांक 29/12/2015 व सुधारणा दिनांक 6 जुन 2006 अन्वये तसेच नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 93 नुसार निविदा मागवून संविदा करणे आवश्यक होते स्थायी निर्देशातील परिच्छेद क्रमांक 48 नुसार फक्त दर कराराच्या बाबींस मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने निविदा न मागविता संविदा करता येते. सदर बाब त्या प्रकारामधील नसल्याने उपरोक्त मक्तेदारास विना निविदा काम दिल्याने नियमबाह्यता झाली आहे.

2. करारनामा अट क्रमांक 4 नुसार सदरचे काम पीडब्ल्युडी डीएसआर स्पेसिफिकेशनप्रमाणे करण्याचे नमुद आहे. मात्र वरीलप्रमाणे ट्रॅक्टर ट्रॉली यांकरीता प्रतितास रुपये 415/- या दराने आकारले आहेत. वास्तविक कचरा गोळा करण्याची ठिकाणे निश्चित असतांना तेथून कचरा डेपोपर्यंतच्या अंतरानुसार दरसुचीप्रमाणे प्रती घनमीटर कचरा, गाळ तत्सम बाबी गोळा करुन टाकणे याचे अंदाजपत्रक तयार करुन त्याप्रमाणे येणाऱ्या परिमाणानुसार व दरानुसार प्रदान करणे आवश्यक होते. करारनाम्यात डीएसआर प्रमाणे काम करण्याची शर्त आहे मात्र करारनाम्यानुसार काम न करण्योच प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

3. देयकांत विविध ठिकाणाकरीता खालीलप्रमाणे काम केलेचे दर्शवून त्यापोटी दर आकारले आहेत.

| अ.क्र. | भाग | तास | दर | एकुण रक्कम रुपये | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राजवाडा | 120 | 415 | 49800 | दिनांक 13/4/2018 ते 12/5/2018 30 दिवस |
| 2 | परज-2 | 120 | 415 | 49800 | |
| 3 | परज-2 | 120 | 415 | 49800 | |
| 4 | सदरबाझार -2 | 120 | 415 | 49800 | |
| एकुण | | | | 199200 | |

उपरोक्त चारही भागांची भौगोलिक संरचना भिन्न आहे. तेथील रस्ते, गल्ली, बोळ, मोकळया जागा यांचे आकारमान विभीन्न आहे. असे असता चारही भागात एकसमान 120 तास काम झालेचे दर्शविले आहे. याबाबत नगरपरिषदने मोजमाप अथवा कालमापन याकरीता नोंदवही विहीत करुन त्यातील नोंदीद्वारे खात्री केल्यानंतर देयक मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक होते. मात्र सदरची नस्ती पाहता मक्तेदाराने सर्वच मागणी देयकावर वाहन चालू, बंद याप्रमाणे नमुद केलेल्या सकाळी 4 व दुपारी 4 तासांप्रमाणे देयक अदा केले आहे. मागणी देयकांवर कामाचे ठिकाण व फक्त कचरा गाळ उचलला एवढाच तपशिल नोंदला आहे. त्याचे परिमाण घनमीटर/ब्रास यास्वरुपात नोंदले नाही.

4. मक्तेदाराने सादर केलेली देयके पाहता त्यांचे मागणी देयक क्रमांक 27 दिनांक 1/5/2018, 38 दिनांक 12/5/2018 यानुसार मागणी देयक क्रमांक 39 व त्यापुढील मागणी देयके माहे मे 2018 अथवा त्यानंतरचे असणे क्रमप्राप्त असता मागणी देयक क्रमांक 39 ते 53 यांचा दिनांक 13/4/2018 ते 27/4/2018 असा आहे. सबब क्रमवार मागणी देयके नसल्याने सदरचा खर्च नोंदविल्याप्रमाणेच योग्य झाला असल्याचे प्रमाणित होत नाही.

5. करारनाम अटी व शर्ती नुसार शहराच्या वेगवेगळया भागांकरीता एकुण 2 ट्रॅक्टर व ट्रॉली वाहन पुरविणेबाबत

नमुद केले आहे. मात्र मक्तेदाराच्या मागणी देयकांवर वाहन क्रमांक व तपशिल नोंदलेला नाही. सबब देयकांवर नमुद केल्याप्रमाणे दररोज दोन वाहनांद्वारे 8 तास काम केल्याचे प्रमाणित होत नाही.

6. करारनामा शर्तीनुसार गोळा केलेला कचरा, गाळ इत्यादी नगरपरिषदेच्या सोनगांव येथील कचरा डेपोवर टाकणेचा आहे. मात्र नगरपालिकेने कचरा डेपोवर असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत सदरचे वाहन तेथे पोचल्याबाबत वेळ, दिनांक व कचरा, गाळ टाकलेबाबत तपशिलवार नोंदी ठेवणे आवश्यक होते. मात्र याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे मक्तेदाराने सादर केलेल्या मागणी देयकावर केवळ टिपणीद्वारे केलेले प्रदान योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

7. नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापनाकरीता स्वनिधी तसेच अन्य निधीतून नियमित खर्च करीत आहे. सदरचा कचरा, गाळ इत्यादी नगरपरिषदेच्या विकास कामांमधील उर्वरीत साहित्यापैकी असलेले वगळता अन्य खाजगी मिळकतदारांनी त्यांच्या मिळकतीमधील सफाई, दुरस्ती इत्यादी बाबीमधून निघालेले विटा, दगड, माती इत्यादी स्वरुपाचे असल्यास अशा मिळकतदारावर दंडात्मक कारवाई करणे गरजेचे आहे. मात्र नगरपालिकेने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 199200/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

भांडार

## 64 तुरटी ब्लिचींग पावडर खरेदीबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

***लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी***

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1302750.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1285000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17750.00/-

1. शासन निर्णय भांखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये 3.3.2 पुन:प्रत्यायी आदेश सहा महिन्याच्या कालावधीच्यापुर्वी देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2. शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र. 3.1.2.1 चे नुसार वस्तू खरेदी पूर्व किंमतीचा अंदाज निश्चित केलेले नाहीत.

3. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे परिशिष्ठ 8 प्र.क्र.6.8 चे नुसार निविदा फॉर्म फी वसुल केलेली नाही.

4.नगरपरिषदेने आर्थिक वर्षात रक्कम रुपये 1302750/- खरेदी केलेल्या तुरटी व ब्लिचींग पावडरच्या परिमाणचे वजन काटा पावत्या नाहीत.

5.स्थायी निदेश क्रमांक 27 नपप्रसं/1005/विकास कामे/43/5 दिनांक 3/1/2006 नुसार साहित्याचे शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

6.पुरवठादारास रक्कम प्राप्त झाली असल्याबाबत मुद्रांक तिकीट लावून पोहोच घेतलेली नाही.

नगरपरिषद सातारा येथील सन 2018-19 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीता असतांना तुरटी व ब्लिचींगची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अनियमितता दिसून येतात.

निविदा जाहिरात - दिनांक 27/3/2015

पुरवठादार – गुरुदत्त एंटरप्रायजेस पळशी

पुरवठा आदेश – 1. 16 दिनांक 13/4/2018, 2. 79 दिनांक 16/7/2017,

साहित्याचे मंजुर दर – सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 59 दिनांक 27/5/2015

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 1111 | 12/10/2018 | 436500 | गुरुदत्त एंटरप्रायजेस,पळशी<br>तुरटी 10 टन – रुपये 27.30/- प्रति किलो<br>ब्लिचींग 10.5 टन – रुपये 10.90/- प्रति किलो |
| 2 | 1196 | 02/11/2018 | 288750 | तुरटी 5 टन – रुपये 18.75/- प्रति किलो<br>ब्लिचींग 5 टन – रुपये 39/- प्रति किलो |
| 3 | 1188 | 13/03/2019 | 187500 | तुरटी 10 टन – रुपये 18.75/- प्रति किलो |
| 4 | 2014 | 26/03/2019 | 390000 | ब्लिचींग 10 टन – रुपये 39/- प्रति किलो |
| एकुण | | | 1302750 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.नगरपरिषद सातारा सन 2018-19 मध्ये तुरटी व ब्लिचींग पावडर सन 2015-16 च्या दराप्रमाणेच पुरवठा करणेस.मे. गुरुदत्त एंटरप्रायजेस यांना ठराव क्रमांक 77 दिनांक 10/4/2017 ने पुरवठा करणेस मंजुरी आदेश देण्यात आला आहे,याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय निविदा मागविणे दिनांक 29/12/2005 अन्वये स्थायी निर्देश क्रमांक 36 अन्वये परिशिष्ट अ.क्र. 23 नुसार फेर आदेश मुळ कार्यदिशातील कालावधीनंतर सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त नाही अशा कालावधीकरीता फेर आदेश देऊ शकते तसेच शासन निर्णय भांखस/2014/प्र.क्र.82/भागIII/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये 3.3.2 पुन:प्रत्यायी आदेश सुरुवातीचा आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्यापुर्वी आवश्यक राहील. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. न.प. सातारा पाणी पुरवठा विभाग अंतर्गत तुरटी खरेदी बाबत व ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत अनुक्रमे न.प. सर्व. सा. सभा ठराव क्र. 1021 व 1022 दि.21/06/2018 नुसार मंजुरी प्रदान करणेत आली असून दि.23/07/2018 रोजी ई- निविदा प्रसिद्ध करून तुरटी खरेदीबाबत 4 निविदाकारांपैकी व ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत 4 निविदाकारांपैकी श्री गुरुदत्त एंटरप्रायजेस पळशी सातारा यांचे न्यूनतम दर तुरटी प्रति किलो रुपये 18.75 व ब्लीचिंग पावडर दर प्रति किलो रुपये 39/- इतके निश्चित करणेत आले आहेत. तथापी उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र. 3.1.2.1 चे नुसार वस्तू खरेदी पूर्व किंमतीचा अंदाज निश्चित करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

3.नगर परिषद सातारा द्वारे सन 2018-2019 मध्ये ई – निविदा प्रक्रियेने मक्ता देणेत आला असून महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग- III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे परिशिष्ठ 8 प्र.क्र.6.8 चे नुसार निविदाकारांकडून घ्यावयाची फॉर्म फी नमूद असून त्यानुरूप कमी प्राप्त निविदा शुल्क खालीलप्रमाणे

| कामाचे नाव व खरेदी रक्कम | सहभागी निविदाकार | जमा करावयाची फॉर्म फी/बयाणा रक्कम | कमी जमा करणेत आलेली फॉर्म फी/बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| तुरटी खरेदीबाबत | 4 | 4000 | 2000 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 20000 | 2000 |
| ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत | 4 | 4000<br>20000 | 2000<br>2000 |

उपरोक्त तक्त्यामधील कमी प्राप्त झालेली निविदा फॉर्म फी रक्कम रुपये 4000/- व बयाणा रक्कम रुपये 4000/-असे एकुण रुपये 8000/-वसूल करून न.प. निधीमध्ये जमा करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

4.नगरपरिषदेने आर्थिक वर्षात रक्कम रुपये 1302750/- खरेदी केलेल्या तुरटी व ब्लिचींग पावडरच्या परिमाणाचे वजन काटा पावत्या नाहीत. त्यामुळे प्राप्त मालाचे वजनाअभावी कमी/जादा परिमाणाबाबत भाष्य करता येत नाही.

5.स्थायी निदेश क्रमांक 27 नपप्रसं/1005/विकास कामे/43/5 दिनांक 3/1/2006 नुसार साहित्याचे शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही. त्यामुळे प्राप्त मालाचा गुणात्मक दर्जा योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

6. पुरवठादारास रक्कम प्राप्त झाली असल्याबाबत मुद्रांक तिकीट लावून पोहोच घेतलेली नाही.

7. जकातवाडी पाणी शुध्दीकरण केंद्राकडील ब्लिचिंग पावडर साठा नोंदवहीची तपासणी केली असता दिनांक 18/07/2018 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सातारा विभाग पाणी शुध्दीकरण बिभागास 250 किलो ब्लिचिंग पावडर उसनवार दिल्याचे दिसुन येते परंतु याबाबत त्यांचे मागणीपत्र व पोहोच घेतल्याचे दिसून येत नाही तसेच लेखापरीक्षण कालावधीअखेर सदर ब्लिचिंग पावडर संबधित विभागाकडुन प्राप्त आलेली नाही तरी 250 किलो प्रति किलो 39/- प्रमाणे रक्कम रुपये 9750/- संबंधितांकडुन वसुल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

उपरोक्त पुर्ततेअभावी रक्कम रुपये 17750/-वसुलपात्र व रक्कम रुपये 1285000/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

आरोग्य

***65 प्रभागनिहाय रस्ते गटारे,मंडई ,गाळ काढणे साफसफाई इ.विविध कामांसाठी सेवापुरवणेबाबत अनियमितता***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3773052.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3749727.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 23325.00/-

1. शा.नि.क्र.भाखरा.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार निविदा समिती गठीत करणे आवश्यक आहे. परंतु न.प. सातारा द्वारे अशी निविदा समिती गठीत करण्यात आलेली नाही.
2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना मुदतवाढ देणेत आलेली आहे..
3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.
4.मक्तेदार यांचेकडून दर महिन्याला करारनामा करुन घेतला आहे. परंतू याबाबत निविदा फ़ी भरलेली दिसून आली नाही.
5.कर्मचाऱ्यांचा विमा उतरविलेला नाही.
6.प्रत्यक्ष केलेल्या कामापेक्षा जादा दिवसांचे देयक अदा केले आहे.
7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार ठेवावयाचा नमुना क्रमांक 46 ,घनकचरा व्यवस्थापन प्रणाली

2000 चे प्रकरण क्रमांक 23.3.1.4( I)(a) नुसार साफसफाईबाबत नियुक्त कंत्राटी/कायम कर्मचाऱ्यांचे दैनिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
8. सदरचा खर्च विकासाकामांसाठी अथवा कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोगात आणने आवश्यक आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद सातारा येथील सन 2018-19 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना साफसफाईबाबतची नस्ती तपासली असता आढळून आलेल्या उणिवांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

नगरपालिकेने रस्ते, नाली, गटारे सफाई या बाबींवर आर्थिक वर्षात रक्कम रुपये 3773052/- एवढा खर्च झालेला आहे.यासाठी सन 2017-18 मध्ये निविदा मंजुर करणेत आली याबाबत तपशिल खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| जाहिर निविदा | 3/25 दिनांक 12/5/2017 दैनिक सांजवात |
| निविदा मंजुरी | 19 मे 2017 |
| मक्तेदार | श्री. किरण प्रकाश निपाणे ,गुरुवार परज 1 व 2, ठराव क्र.447 दिनांक11/04/2017 |
| मक्तेदार | श्री. रमेश फडतरे , सदरबझार व राजवाडा भाग, ठराव क्र.445 दिनांक11/04/2017 |
| कार्यादेश | दिनांक 20/05/2017 |
| ठेका कालावधी | 26 दिवस |
| दर | रुपये 311/- प्रति कर्मचारी प्रति दिवस |
| एकुण खर्च | 3773052/- |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.
1.निविदा प्रसिध्द करताना निविदेची संपूर्ण कार्यवाही पारदर्शक ठेवनेसाठी स्थायी आदेश क्रमांक 36 अनुक्रमांक 21 नुसार तसेच कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग- III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार निविदा समिती गठीत करुन समितीने निविदा प्रारूप तयार करणेपासून निविदेची अंतिम वाटाघाटी करणेपर्यंतची संपूर्ण कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु न.प. सातारा द्वारे अशी निविदा समिती गठीत करण्यात आलेली नाही.तसेच घंटागाडीने कचरा गोळा करणे ही एकच खर्चाची बाब असल्याने एकत्रित एकच निविदा मागविणे आवश्यक होते .तथापि तसे न करता नगरपरिषदेने कामाचे भाग पाडून प्रत्येक वॉर्डसाठी स्वतंत्र निविदा मागवण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिच्छेद क्रमांक 18 प्रमाणे कामाची विभागणी करुन कामे करण्यास प्रतिबंध केला असल्याने सदर बाबत नियमबाह्यता झाली आहे.

2.उपरोक्त मक्तेदार यांना कार्यादेश अनुक्रमे 445 व 447 दिनांक 11/04/2017 अन्वये 26 दिवस काम करणेबाबत आदेश देणेत आला होता.तसेच त्यांना मुदतवाढ देऊन रक्कम अदा करणेत आली आहे. मुदतवाढीबाबत आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत परंतु महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना मुदतवाढ देणेत आलेली आहे. वास्तविक स्थायी आदेश क्रमांक 36 चे अनुक्रमांक 07,08 , व 09 नुसार प्रथम तांत्रिक मंजुरी , प्रशासकीय मंजुरी त्यानंतर निविदा प्रक्रिया पुर्वीची निविदा कालावधी संपणेपूर्वी किमान 3 महिने आधीच करून घेणे आवश्यक होते. तरी उक्त आदेश देताना त्याबाबत प्रशासकीय मंजुरी सक्षम प्राधिका-याची घेतलेचे दिसून येत नाही.
3.निविदा मागवितांना , कामाची अंदाजपत्रकीय रक्कम काय आधारे ठरविण्यात आली , याबाबत कोणतेही अंदाजपत्रक नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 121 अन्वये

निविदा मागविताना अंदाजित रक्कम निश्चित करण्यात आलेली नाही.तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

4.ठेकेदार यांचेकडून दर महिन्याला करारनामा करुन घेतला आहे. परंतु याबाबत निविदा फी भरलेली दिसून आली नाही. तरी संबंधितांकडून निविदा फी वसुल करुन नगरपालिका निधीत जमा करणे आवश्यक आहे.

5.शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35 दिनांक 8/5/2002 व शासकीय विमा निधी यांचे पत्र दिनांक 8/9/2010 अन्वये कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु विमा उतरविलेला नाही.

6.प्र.क्र.835 दिनांक 04/09/2018 रक्कम रुपये 675492/- अन्वये रककम ठक्केदार रमेश फडतरे यांना अदा करणेत आली आहे.सदर प्रमाणकातील उपप्रमाणकांची तपासणी केली असता पावसाळयापुर्वी ओढा सफाई कामाचे देयक दिनांक 13/06/2018 ते 27/06/2018 अखेर 15 सफाई कामगार याप्रमाणे 15 दिवस काम केलेले आहे परंतु प्रत्यक्षात देयक अदा करताना मंजुर दर 311/- प्रमाणे 15 मजुर X 20 दिवस प्रमाणे रककम रुपये = 93300/- अदा केली आहे त्यामुळे मंजुर दर 311/- प्रमाणे 15 मजुर X 5 दिवस प्रमाणे

रक्कम रुपये 23325/- जादा गेल्याचे दिसून येते. सदर रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

7.उपरोक्त बाबी मध्ये रस्ते, गटारे साफसफाईच्या कामावर प्रत्यक्ष कोणते कर्मचारी कोण कोणते काम करीत होते या बाबत त्यांचे हजेरीपुस्तक, संस्थेच्या पर्यवेक्षीय कर्मचाऱ्याची त्यावर नोंद ,मुकादम/ स्वच्छता निरीक्षक यांचे क्षेत्रीय कामाचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील दैनंदिन अहवाल नमुना क्रमांक 43 व 44 ,स्वच्छता निरीक्षकाद्वारे खासगी मेहतरकामाबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार ठेवावयाचा नमुना क्रमांक 46,घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.3.1.4( I)(a) नुसार साफसफाईबाबत नियुक्त कंत्राटी/कायम कर्मचाऱ्यांचे दैनिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

8. कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 ( EPFO) कायदयानुसार ठक्केदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

9.नगर परिषद सातारा येथे आस्थापनेवर एकुण 255 सफाई कर्मचारी कार्यरत आहेत उपरोक्त ठेकयातील काही प्रभागातील कामे जर नगरपरिषदेकडील सफाई कर्मचा-यानी पुर्ण केली असती उपरोक्त ठेका हा काही प्रभागांसाठीच दिला असता तर नगरपालिकेची खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होवून सदरचा खर्च विकासकामांसाठी अथवा कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोगात आणने आवश्यक होते.

उपरोक्त पुर्तते अभावी रक्कम रुपये 23325/- वसुल पात्र व रककम रुपये 3749727/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेप

***66 प्रभागनिहाय रस्ते गटारे,मंडई ,गाळ काढणे साफसफाई इ.विविध कामांसाठी सेवापुरवणेबाबत अनियमितता***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1913616.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1888616.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25000.00/-

| |
|---|
| 1. शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार निविदा समिती गठीत करण्यात आलेली नाही.<br>2.निविदा मागविताना , कामाची अंदाजपत्रकीय रक्कम काय आधारे ठरविण्यात आली , याबाबत कोणतेही अंदाजपत्रक नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाही.<br>3. निविदा धारकांकडून निविदा शुल्क वसुल केलेले नाही.<br>4.कर्मचाऱ्यांचा विमा उतरविलेला नाही.<br>5. मक्तेदारांचा मासिक व दैनिक अहवाल जोडलेला नाही.<br>6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार ठेवावयाचा नमुना क्रमांक 46 ,घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.3.1.4( I)(a) नुसार साफसफाईबाबत नियुक्त कंत्राटी/कायम कर्मचाऱ्यांचे दैनिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. |

नगरपरिषद सातारा येथील सन 2018-19 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना साफसफाईबाबतची नस्ती तपासली असता आढळून आलेल्या उणिवांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

नगरपालिकेने रस्ते , नाली, गटारे सफाई या बाबींवर आर्थिक वर्षात रक्कम रुपये 1913616/- एवढा खर्च झालेला आहे.यासाठी सन 2018-19 मध्ये निविदा मंजुर करणेत आली याबाबत तपशिल खालील प्रमाणे

| प्रभाग निहाय कामे | निविदा प्रसिध्दी - दिनांक 11/6/2018 दैनिक सकाळ |
|---|---|
| प्रभाग 1 ते 20 राजवाडा भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे. | श्री. सचिन लेबर सप्लायर्स सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 147 दिनांक 21/09/2018<br>कालावधी – 1 वर्ष<br>दरपत्रक – 11652/- प्रति कर्मचारी प्रति महिना<br>कर्मचारी संख्या- 20<br>निविदाकार सहभाग - 2 |
| गुरुवार परज 1 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | श्री. राजदीप ॲग्रो सर्विसेस सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 148 दिनांक 21/09/2018<br>कालावधी – 1 वर्ष<br>दरपत्रक – 12220/- प्रति कर्मचारी प्रति महिना<br>कर्मचारी संख्या- 15<br>निविदाकार सहभाग - 2 |
| गुरुवार परज 2 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर सेवा संस्था सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 149 दिनांक 21/09/2018<br>कालावधी – 1 वर्ष<br>दरपत्रक – 9650/- प्रति कर्मचारी प्रति महिना<br>कर्मचारी संख्या- 15 |

| | |
|---|---|
| | निविदाकार सहभाग - 3 |
| सदरबझार भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर सेवा संस्था सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 150 दिनांक 21/09/2018<br>कालावधी – 1 वर्ष<br>दरपत्रक – 9960/- प्रति कर्मचारी प्रति महिना<br>कर्मचारी संख्या- 20<br>निविदाकार सहभाग – 3 |
| एकुण खर्च | रक्कम रुपये 1913616/- |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. निविदा प्रसिध्द करताना निविदेची संपूर्ण कार्यवाही पारदर्शक ठेवनेसाठी स्थायी आदेश क्रमांक 36 अनुक्रमांक 21 नुसार तसेच कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग- III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार निविदा समिती गठीत करुन समितीने निविदा प्रारूप तयार करणेपासून निविदेची अंतिम वाटाघाटी करणेपर्यंतची संपूर्ण कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु न.प. सातारा द्वारे अशी निविदा समिती गठीत करण्यात आलेली नाही.तसेच रस्ते , नाली, गटारे सफाई करणे ही एकच खर्चाची बाब असल्याने एकत्रित एकच निविदा मागविणे आवश्यक हो.तथापि तसे न करता नगरपरिषदेने कामाचे भाग पाडून प्रत्येक वॉर्डसाठी स्वतंत्र निविदा मागवण्यात आली आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिच्छेद क्रमांक 18 प्रमाणे कामाची विभागणी करुन कामे करण्यास प्रतिबंध केला असल्याने बाबत नियमबाहयता झाली आहे.

2.निविदा मागविताना , कामाची अंदाजपत्रकीय रक्कम काय आधारे ठरविण्यात आली , याबाबत कोणतेही अंदाजपत्रक नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 121 अन्वये निविदा मागविताना अंदाजित रक्कम निश्चित करण्यात आलेली नाही.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

3.नगर परिषद सातारा द्वारे सन 2018-2019 मध्ये ई – निविदा प्रक्रियेने मक्ता देणेत आला असून महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग- III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे परिशिष्ठ 8 प्र.क्र.6.8 चे नुसार निविदाकारांकडून घ्यावयाची फॉर्म फी नमूद असून त्यानुरूप कमी प्राप्त निविदा शुल्क खालीलप्रमाणे

| कामाचे नाव व खरेदी रक्कम | सहभागी निविदाकार | जमा करावयाची फॉर्म फी | कमी जमा करणेत आलेली फॉर्म फी |
|---|---|---|---|
| प्रभाग 1 ते 20 राजवाडा भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे. | 2 | 6000 | 5000 |
| गुरुवार परज 1 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | 2 | 6000 | 5000 |
| गुरुवार परज 2 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | 3 | 9000 | 7500 |
| सदरबझार भागातील रस्ते व भाजी | 3 | 9000 | 7500 |

| | | |
|---|---|---|
| मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | | |
| एकुण | 30000 | 25000 |

उपरोक्त तक्त्यामधील कमी प्राप्त झालेली निविदा फॉर्म फी रक्कम रुपये 25000/- वसूल करून न.प. निधीमध्ये जमा करून पूर्तता अहवाल सादर करावा.
4.शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35 दिनांक 8/5/2002 व शासकीय विमा निधी यांचे पत्र दिनांक 8/9/2010 अन्वये कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतू विमा उतरविलेला नाही.
5. मक्तेदारांचा मासिक व दैनिक अहवाल जोडलेला नाही. कामगारांची यादी जोडलेली नाही. करारनामा अट क्रमांक 30 अन्वये तक्रार रजिस्टर ठेवणेले आहे परंतु ते अदयावत नाही.
6.उपरोक्त बाबी मध्ये रस्ते, गटारे साफसफाईच्या कामावर प्रत्यक्ष कोणते कर्मचारी कोणकोणते काम करीत होते या बाबत त्यांचे हजेरीपुस्तक, संस्थेच्या पर्यवेक्षीय कर्मचाऱ्याची त्यावर नोंद ,मुकादम/ स्वच्छता निरीक्षक यांचे क्षेत्रीय कामाचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील दैनंदिन अहवाल नमुना क्रमांक 43 व 44 ,स्वच्छता निरीक्षकाद्वारे खासगी मेहतरकामाबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार ठेवावयाचा नमुना क्रमांक 46,घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.3.1.4( I)(a) नुसार साफसफाईबाबत नियुक्त कंत्राटी/कायम कर्मचाऱ्यांचे दैनिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
7. कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 ( EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.
8.नगर परिषद सातारा येथे आस्थापनेवर एकुण 255 सफाई कर्मचारी कार्यरत आहेत उपरोक्त ठेक्यातील काही प्रभागातील कामे जर नगरपरिषदेकडील सफाई कर्मचा-यानी पुर्ण केली असती उपरोक्त ठेका हा काही प्रभागांसाठीच दिला असता तर नगरपालिकेची खर्चात मोठया प्रमाणावर बचत होवून सदरचा खर्च विकासाकामांसाठी अथवा कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोगात आणने आवश्यक होते.
उपरोक्त पुर्तते अभावी रक्कम रुपये 25000/- वसूल पात्र व रककम रुपये 1888616/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

भांडार

## *67 भांडार विभागाकडील स्टेशनरी साठा नोंदवहीमधील रकमेच्या तफावतीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| भांडार विभागाकडील सन 2017-18 ची अखेरची शिल्लक व सन 2018-19 ची सुरुवातीची शिल्लक यामध्ये तफावत आढळून आली. |

सातारा नगरपरिषदेचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात भांडार विभागाकडील लेखे तपासले असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 98 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) भांडार विभागाकडील सन 2017-18 ची साठा नोंदवही (स्टेशनरी) ची अखेर शिल्लक सन 2018-19 मध्ये सुरुवातीची शिल्लक घेतांना खालीलप्रमाणे कमी वस्तुंची नोंद घेतली आहे.

| अ.क्र. | वस्तुंचे नांव | 2017-18 चे पान नंबर | वस्तुंची संख्या | सन 2018-19 चे नोंदवहीतील शिल्लक | तफावत | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | डबल साईड कार्बन | 6 | 134 | - | 134 | 150 | 20100 |
| 2 | कतीण फाईल | 35 | 44 | - | 44 | 16 | 704 |
| 3 | 7 लिव्हर कुलुपे | 88 | 55 | 23 | 32 | 552 | 17664 |
| 4 | 30 मीटरचे टेप | 101 | 11 | - | 11 | 480 | 5280 |
| 5 | घडयाळाचे सेल | 103 | 24 | - | 24 | 13 | 312 |
| 6 | A4 साईज रिम पेपर | 142 | 326 | - | 326 | 250 | 81500 |
| 7 | F5 लिगल साईज पेपर | 146 | 72 | - | 72 | 250 | 18000 |
| 8 | प्लास्टीक फाईल | 196 | 30 | - | 30 | 15 | 450 |
| 9 | नोट बुक डायरी | 199 | 6 | - | 6 | 950 | 570 |
| 10 | प्लग पॅकेट | 201 | 5 | - | 5 | 52 | 260 |
| 11 | ग्लुस्टीक | 202 | 14 | - | 14 | 28 | 280 |
| एकुण | | | | | | | 14512( |

ब) सन 2018-19 चे साठा रजिस्टरमधील बेरीज चुकलेने आलेली तफावत खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वस्तुंचे नांव | पान नंबर | सु.शि. | जमा | खर्च | अ.शि. | प्रत्यक्ष शिल्लक | तफावत | दर रुपये | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 कल्चर बुक | 12 | 4 | 230 | 121 | 133 | 73 | 60 | 65 | 3900 |
| 2 | 7 लिव्हर कुलुपे (60 कुलुपे जमेस धरली नाहीत) | 78 | - | - | - | - | - | 60 | 552 | 33120 |
| 3 | A4 साईज रिम पेपर | 119 | - | 960 | 767 | 253 | 75 | 178 | 250 | 44500 |
| 4 | F5 साईज रिम पेपर | 131 | - | 240 | 158 | 82 | - | 82 | 250 | 20500 |
| एकुण | | | | | | | | | | 10202( |

वरीलप्रमाणे (अ) 145120/- + (ब) 102020 = 247120/- रुपये त्वरीत वसुल करुन लेखापरीक्षणास पुर्तता दाखवावी.

अतिक्रमण

## 68 अतिक्रमण काढणेकामी केलेल्या खर्चाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

***अनियमितता कलम : 9ब***

गुंतलेली रक्कम रु. 168696.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 168696.00/-

| |
|---|
| 1. अतिक्रमण काढण्यावरील खर्च रक्कम रुपये 168696/- संबंधितांकडून वसुल होणे आवश्यक आहे.<br>2.प्रमाणक क्रमांक 164 दिनांक 16/05/2018 नुसार रक्कम रुपये 40800/- जेसीबी भाडे अतुल नारायण जाधव यांना अदा केलेले आहे परंतु देयकासोबत उपप्रमाणक जोडलेले नाही. |

नगरपरिषद सातारा लेखापरीक्षण सन 2018-19 करीता अतिक्रमण काढणेकामी रक्कम रुपये 168696/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.
1.महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 मधील 183 चे कलम 6 नुसार जो कोणी एक तर पोट कलम (1) अन्वये आवश्यक असलेली नोटीस दिल्यावाचून किंवा नगरपालिकेने पोट कलम (3) च्या खंड (अ) अन्वये दिलेल्या आदेशानुसार असेल त्या व्यतिरिक्त किंवा अधिनियमाच्या किंवा त्याखाली त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही उपविधींच्या तरतुदीविरुध्द कोणत्याही रितीने अशा कोणत्याही रस्त्याचे रेखांकन करील किंवा तो तयार करील त्यास अपराधसिध्दीनंतर , 19फ (दहा हजार रुपयांपर्यंत) असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि नगरपालिकेस, अशा रितीने रेखांकित केलेल्या किंवा तयार केलेल्या रस्त्यात फेरफार करण्याची आणि अशा रस्त्यावर बांधलेल्या, कोणत्याही इमारतीत फेरफार करण्याची किंवा ती काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल आणि त्यासाठी झालेला सर्व खर्च अपराधी व्यक्तीला नगरपालिकेस द्यावा लागेल आणि तो मालमत्तेवरील कराच्या रुपाने देय असलेली रक्कम ज्या रितीने वसुल करता येते त्याच रितीने वसुल योग्य असेल. अशी तरतुद असल्याने अतिक्रमण काढण्यावरील खर्च रक्कम रुपये 168696/- संबंधितांकडून वसुल होणे आवश्यक आहे.
2.प्रमाणक क्रमांक 164 दिनांक 16/05/2018 नुसार रक्कम रुपये 40800/- जेसीबी भाडे अतुल नारायण जाधव यांना अदा केलेले आहे परंतु देयकासोबत उपप्रमाणक जोडलेले नाही.त्यामुळे खर्च योग्य प्रकारे केल्याचे खात्री होत नाही.

## 69 अनधिकृत बांधकामांबाबत

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| अनधिकृत बांधकाम व विगर परवाना बांधकामे नोंदवहीमध्ये वर्ष 2018-19 मध्ये 28 अनधिकृत बांधकामे असल्याच्या नोंदी आढळून आल्या आहेत. |

सातारा नगरपरिषदेने सन 2018-19 अखेर बांधकाम विभागाकडील सादर केलेल्या अनधिकृत बांधकाम व विगर परवाना बांधकामे नोंदवही पडताळता वर्ष 2018-19 मध्ये 28 अनधिकृत बांधकामे असल्याच्या नोंदी आहेत. याबाबत त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम189(अ)नुसार अवैध बांधकामाबाबतीत त्यांच्या विरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत अशा इमारतींवर महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ/2018- प्र.क्र.73/नवी 14 दिनांक 27 सप्टेंबर 2018 नुसार शास्ती कर आकारण्याची योग्य ती कार्यवाही करावी परंतू सातारा नगरपरिषदेने वर्ष 2018-19 मधील एकुण 28 आणि त्यापुर्वीच्या अशा एकुण 546 अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

निरंक

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

आक्षेप 77

*70 राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना निमशासकीय आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागु करणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 04

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1. कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे ऑगस्ट 2017 देय सप्टेंबर 2017 च्या वेतनातून कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
2. अपघात विमा योजनेची वर्गणी संबंधित कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांनी वसुल केलेबाबत कागदपत्रे पहावयास मिळाली नाहीत.
3. कर्मचाऱ्यांच्या रकमांच्या लेख्यांचे जतन करणेबाबत कार्यालय प्रमुखांनी काय कार्यवाही केली याबाबत समजुन येत नाही.

सर्वशासकीय कर्मचाऱ्यांकरीता शासन निर्णय दिनांक 4 फेब्रुवारी 2016 अन्वये सुरु केलेली व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2017/प्र.क्र.19 विमा प्रशासन दिनांक 18 फेब्रुवारी 2017 अन्वये ती पुढे सुरु करण्यात आलेली राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती शासकीय महामंडळे, मंडळे सार्वजनिक उपक्रम पारंपारीक विद्यापिठे यांच्या अधिकारी/कर्मचारी वगळून यांना यावर्षी दिनांक 1 ऑगस्ट 2017 पासून ही योजना लागु करण्यात येत आहे व पुढील वर्ष 1 एप्रिलपासून आमलात आणली जाईल तसेच शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2017/प्र.क्र.69/विमा प्रशासन दिनांक 11 ऑगस्ट 2017 अन्वये –

1. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे ऑगस्ट 2017 देय सप्टेंबर 2017 च्या वेतनातून कपात करणे आवश्यक आहे. तद्नंतर दरवर्षी माहे फेब्रुवारी देय मार्चच्या वेतनातून वसुल करणे आवश्यक आहे.
2. सदर समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी वसुल करण्याची जबाबदारी सदस्य कार्यरत असलेल्या संबंधित कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.
3. वेतन प्रणाली व्यतिरिक्त ग्राम प्रणाली रोख धनादेश/धनाकर्ष अन्वये स्विकारण्यात येणाऱ्या या योजनेखालील रकमा जोडपत्र-1 मधील अनुसूचिसहीत संबंधितांनी विमा संचालक विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांना परस्पर पाठपुराव्यात अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या रकमांच्या लेख्यांचे जतन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय

प्रमुखांची राहील.

4. सदर अपघात विमा योजनेखाली देय राशीभूत विमा रक्कम आकारण्यात येणाऱ्या वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणे वसुल करावी.

| अ.क्र. | गट | राशीभूत विमा रक्कम (Capital Sum Insure) | वर्गणीचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वार्षिक वर्गणी | वस्तु व सेवाकर 18 टक्के | एकुण |
| 1 | गट अ ते ड | 10 लाख | रुपये 300 | रुपये 54 | रुपये 354 |

संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी योजनेची वार्षिक वर्गणी केंद्र शासनाने विहीत केलेल्या वस्तु व सेवा करासह (GST) भरणे बंधनकारक आहे. उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास कर्मचाऱ्यांना त्याचा आर्थिक लाभ होऊ शकतो.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे पुर्तता करुन लेखापरीक्षणास दाखवावी.

भांडार

### *71 चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रेनीसुट पुरविणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 05

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

**गुंतलेली रक्कम** रु. 555128.00 /- **आक्षेपाधीन रक्कम** रु. 555128.00/-

1. सदर खरेदी ही GeM पोर्टलवरुन केलेली नाही.
2. सुक्ष्म व लघु उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंचा यादीनुसार उपलब्ध आहे किंवा नाही याची शहानिशा केल्याचे आढळून येत नाही.
3. निविदा जाहिरातीमध्ये एकुण किती रेनीसुट खरेदी करावयाचे आहेत, त्यांच्या गुणवत्तेचे निकष काय असावेत याचा उल्लेख नाही.
4. नगरपरिषदेने बिलाच्या रकमेतून सुरक्षा अनामत कपात केलेली नाही.
5. एकुण किती साडया/गणवेश वाटप झाले साठा शिल्लक आहे याची नोंद साठा नोंदवहीत आढळून येत नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी रेनीसुट खरेदीच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 58 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

प्रमाणक क्रमांक 736 दिनांक 20/8/2018 नुसार 266 पुरुष कर्मचाऱ्यांसाठी रुपये 1400/- दराने एकुण रक्कम रुपये 372400 + 12 टक्के जीएसटी = 417088/- व एकुण 85 महिला कर्मचाऱ्यांसाठी रुपये 1450 दराने 123250 + 12 टक्के जीएसटी = 138040/- अशी एकुण रक्कम रुपये 555128/- ची खरेदी केली आहे.

1. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24/8/2017 अनुसार सदर खरेदी ही GeM पोर्टलवरुन करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2. नगरपरिषदेने सदर खरेदी करण्यापूर्वी उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4 दिनांक 1/12/2016 परिच्छेद क्रमांक 5.14 नुसार सुक्ष्म व लघु उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंचा यादीनुसार उपलब्ध आहे किंवा नाही याची शहानिशा केल्याचे आढळून येत नाही.

3. निविदा जाहिरातीमध्ये एकुण किती पुरुष व महिलांसाठी रेनीसुट खरेदी करावयाचे आहेत, तसेच त्यांच्या गुणवत्तेचे निकष दरपत्रकात जी तसेच दर जीएसटी समाविष्ठ असावेत की निव्वळ दर द्यावेत असा उल्लेख नाही. त्यामुळे निविदा मागणाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊन स्पर्धात्मक दराचा लाभ उचित भेटेलच याची खात्री करता येत नाही. निविदा धारकांनी दरपत्रकात जीएसटी किंवा इतर कराचा उल्लेख केला नसतांना निविदा स्विकृतीनंतर पुरवठादारास 12 टक्के जीएसटी वाढवून दिल्याचे दिसते. त्यामुळे इतर निविदाकाराचे दर हे जीएसटी समाविष्ट होते किंवा कसे याची खात्री होत नाही.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहित नियम 141 नुसार एकुण रकमेच्या 10 टक्के रक्कम ही सुरक्षा अनामत म्हणून राखुन ठेवण्याच निर्देश असतांना नगरपरिषदेने बिलाच्या रकमेतून ठेवण्याचे निर्देश असतांना नगरपरिषदेने बिलाच्या रकमेतून सुरक्षा अनामत कपात केलेली नाही. त्यामुळे वस्तुच्या गुणवत्तेबाबत नंतर प्रश्न उद्भवल्यास त्याची भरपाई शक्य होणार नाही.

5. सदर वस्तुंचया साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही अद्यावत असल्याचे दिसून येत नाही. एकुण 153 पुरुष व 71 महिला कर्मचाऱ्यांनी सहया केल्याचे दिसते. पण एकुण किती वाटप झाले व किती साठा शिल्लक आहे याची नोंद साठा नोंदवहीत आढळून येत नाही. तसेच साठा नोंदवही प्राधिकृत अधिकाऱ्याने मासिक तपासणी करुन व शिल्लक साठयाची खात्री करुन साक्षीकृत करण्याची नगरपरिषद लेखासंहिता नियम 62 नुसार तरतुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त बाबींची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये 555128/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

लेखा

***72 आयकर कपाती शासन खात्यात वेळेत भरणा न केलेबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९इ*

गुंतलेली रक्कम रु. 6938849.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6938849.00/-

| |
|---|
| आयकर अधिनियम 1961 मधील कलम 201 उपकलम 1A नुसार आयकर शासन खात्यात वेळेत भरणा न केल्यामुळे विलंब फी वसुल होणे आवश्यक आहे. |

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान आयकर कपाती शासन खात्यात वेळेत भरणा न केलेबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 107 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| बँकेचे नांव | कालावधी | चेक नंबर | रक्कम रुपये | रक्कम भरल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| UCO BANK | डिसेंबर 2018/मार्च 2019 | 990891 | 2554104 | 30/4/2019 |
| UCO BANK | जुन 2018/नोव्हेंबर 2018 | 990881 | 4144984 | 24/12/2018 |
| UCO BANK | मे 2018 | 990874 | 239761 | 29/6/2018 |
| एकुण | | | 6938849 | |

वरील रक्कम आयकर अधिनियम 1961 मधील कलम 201 उपकलम 1A नुसार आयकर शासन खात्यात वेळेत भरणा न केल्यामुळे विलंब फी वसुल करुन शासन खात्यात भरुन पुर्तता दाखवावी. अन्यथा सदर परिच्छेद मुळ लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्यात येईल.

आक्षेपन।

## *73 वाहन चालकाच्या सेवा पुस्तकातील उणिवांबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| वाहन चालकाच्या सेवापुस्तकात उणिवा आढळून आल्या आहेत. |

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात वाहन चालकांची सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता त्यात आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 123 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या शर्ती) नियम 1981 नियम 38 (1) नुसार कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन जीवनामध्ये घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींच्या नोंदी यथोचीतरीत्या पडताळून कार्यालय प्रमुखाने साक्षांकित करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक हिंभाप/1083/1448वीस दि.01 डिसेंबर 1884 व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मभाप/1087/14/सीआर-2/87/20 दि.30 डिसेंबर 1987 नुसार हिंदी/मराठी भाषा उत्तीर्ण/सूट च्या नोंदी सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक स्थाप्रप 1414/(प्र.क्र.73/14)13-अ दि. 11 सप्टेंबर 2014 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्रांच्या नोंदी सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 43 अन्वये रजा लेखा अद्यावत ठेवण्यात आला पाहिजे.

6) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 45 अन्वये सेवापुस्तकांची वार्षिक पडताळणी करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 38(1) अन्वये सेवापुस्तकांत वार्षिक वेतन वाढीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

तथापि पुढीलप्रमाणे नमूद कर्मचारी यांच्या बाबतीत अर्जित रजांच्या नोंदी नसणे, वैद्यकीय रजांच्या नोंदी नसणे, अर्जित रजा जादा नोंद करणे, रजा प्रवास सवलतीची रजा लेख्यांमध्ये नोंद नसणे याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या शर्ती) नियम 1981 नियम 41 नुसार कार्यवाही केली नसणे, सेवा पडताळणी नोंदी न करणे, रजा लेखा अपूर्ण असणे, संगणक अर्हता नोंदी नसणे अशा प्रकारच्या अनियमितता दिसून आल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | तपशिल |
|---|---|---|
| 1 | श्री. सुरेश भिसे, वाहन चालक | 1. सेवापुस्तकाच्या पान क्रमांक 1 जात, धर्म व जात वैधता प्रमाणपत्रानुसार नोंदविलेले नाही. |
| | | 2. जन्मतारीख एसएससी बोर्ड सर्टिफिकेटवरुन साक्षांकित केलेली नाही |
| | | 3. 5 वर्षांनी कार्यालय प्रमुखाने सेवापुस्तक साक्षांकित केलेले नाही. |
| | | 4. वेतन श्रेणी पटानुसार सेवा पडताळणी करणे आवश्यक असतांना ती केलेली नाही. |
| | | 5. सेवा पुस्तकासोबत आरोग्य बिगारी म्हणून दिनांक 1/7/1995 ची नियुक्ती नोंद तसेच आदेश नाहीत. |
| | | 6. दिनांक 15/10/2001 चे आदेशान्वये सदर बिगारी यांना वाहन चालक म्हणून पदोन्नती देण्यात आली अशाप्रकारे पदोन्नती देता येते काय व सदर वाहन चालक पदोन्नतीची अर्हता पुर्ण केल्याबाबतची कागदपत्रे सेवापुस्तकासोबत नाहीत. |
| | | 7. वाहन चालक पदावर अश्वासित प्रगती योजनेचा |

| | | |
|---|---|---|
| | | लाभ दिल्यानंतर दिनांक 1/7/2014 ला रुपये 2100/- ग्रेड पे देण्यात आला आहे व त्यानंतर 2 महिन्यांनंतर दिनांक 1/9/2014 ला रुपये 2200/- ग्रेड पे देण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. |

लेखा/-

*74 14 व्या वित्त आयोगाचा अनुदानातून केलेल्या मुदत ठेवींबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : ७६*

1. गुंतवणुक करतांना शासन अनुदानाचे सहामाही विनीयोग प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असतांना त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सदर अनुदान गुंतवून ठेवले आहे.
2. अनुदानाची रक्कम ही स्वतंत्र राष्ट्रीयकृत किंवा नमुद बँकेत स्वतंत्र खात्यामध्ये ठेवणे बंधनकारक असतांना इतर नगरपरिषद निधीमध्ये सदर निधी वळवला आहे.
3. शासन निर्णयामध्ये नमुद सदर मुलभूत व कार्यात्मक अनुदानातून साध्य करावयाची उद्दीष्टे व हाती घ्यावयाचे कामांवर सदर निधीचा मोठा हिस्सा विकास कामांवर खर्च न करता गुंतून पडला आहे.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात गुंतवणुक नोंदवहीचे लेखापरीक्षणात 14 व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून खालीलप्रमाणे मुदत ठेवी केलेल्या आढळून आल्या.

| अ.क्र. | बँकेचे नांव | मुदत ठेव क्रमांक | ठेव ठेवल्याचा दिनांक | ठेव पावती मोडल्याचा दिनांक | मुद्दल | प्राप्त व्याज |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | IDBI Bank | 84421614 | 29/3/2018 | 29/6/2018 | 5674576 | 95711 |
| 2 | AXIS Bank | 2251152 | 3/1/2018 | ---CD | 5507351 | मोडली ना |
| 3 | IDBI Bank | 84921227 | 27/3/2018 | 26/6/2018 | 5693150 | 88712 |
| 4 | HDFC Bank | 7775910 | 21/6/2016 | - | 11061306 | - |
| 5 | Inian Bank | 161902 | 3/11/2017 | - | 5000000 | - |
| 6 | Baroda Bank | 0105173 | 27/10/2017 | - | 5000000 | - |
| 7 | Baroda Bank | 0105174 | 27/10/2017 | - | 5000000 | - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Baroda Bank | 0098587 | 30/10/2017 | - | 5000000 | - |
| 9 | Baroda Bank | 0098588 | 30/10/2017 | - | 5000000 | - |
| 10 | IDBI Bank | 83349333 | 26/10/2017 | 26/10/2018 | 100000 | 6323 |
| 11 | IDBI Bank | 83349334 | 24/10/2017 | 24/10/2018 | 9900000 | 685356 |
| 12 | Union Bank | 069558 | 1/11/2017 | 27/10/2018 | 9500000 | 617930 |
| 13 | Union Bank | 069561 | 2/11/2017 | 28/10/2018 | 9500000 | 616184 |
| 14 | Union Bank | 069562 | 3/11/2017 | - | 1000000 | - |
| 15 | ICICI Bank | 13790050 | 4/5/2018 | 28/6/2018 | 40244110 | 454754 |
| 16 | ICICI Bank | 13790051 | 4/5/2018 | 28/6/2018 | 50305136 | 443444 |
| एकुण | | | | | 173485629 | 3009014 |

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 99 दिनांक 26/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टिएफसी-8015/प्र.क्र.106/नवि-4 दिनांक 3/8/2015 अन्वये 14 व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होत असून अनुदानाच्या पुढील हप्त्यांची मागणी केंद्र शासनाकडे करण्यासाठी किमान 70 टक्के खर्चाचे विनीयोग प्रमाणपत्र दरवर्षी दिनांक 15 मे व दिनांक 15 सप्टेंबर पर्यंत नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर निधीची गुंतवणुक करता येते किंवा कसे याबाबत खुलासा करावा. असे असतांना नगरपरिषदेने वर नमुद केल्याप्रमाणे वित्तीय वर्षात 14 व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून रक्कम रुपये 173485629/- एवढया रकमेची गुंतवणुक मुदत ठेवींमध्ये केल्याचे दिसते. पैकी वरील अ.क्र. 4,5,6,7,8,9 व 14 ची एकुण रक्कम रुपये 37061306/- ही ऑक्टोबर/नोव्हेंबर 2017 पासून व अ.क्र. 2 ची रक्कम रुपये 5507351/- ही जानेवारी 2018 पासून लेखापरीक्षण वर्ष अखेर पर्यंत तसेच पुढेही गुंतवून ठेवल्याचे दिसते. तसेच अ.क्र. 10,11,12 व 13 ची एकुण रक्कम रुपये 19595000/- ही एक वर्ष कालावधीसाठी गुंतविल्याचे दिसते. सदर शासन अनुदानाचे सहामाही विनीयोग प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असतांना त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सदर अनुदान गुंतवून ठेवणे नियमबाहय आहे.

2. तसेच अ.क्र. 1 मधील ठेवीची मुदत दिनांक 29/6/2018 रोजी पुर्ण झाल्यानंतर सदर रक्कम व्याजासह एकुण रक्कम रुपये 5770287/- हे नगरपरिषद सर्वसाधारण निधीत वर्ग केले आहेत. तसेच अ.क्र. 12 व 13 मध्ये नमुद मुदत ठेवींची एकुण व्याजासहीत रक्कम रुपये 10117930 + 10116184 = 20234114/- ही युनियन बँक खाते क्रमांक 579302010005204 मध्ये जमा करुन दिनांक 28/3/2019 रोजी नगरपरिषद कर खाते ॲक्सीस बँक खाते क्रमांक 914020006437486 मध्ये वर्ग केल्याचे दिसून येते. उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे सदर अनुदानाची रक्कम ही स्वतंत्र राष्ट्रीयकृत किंवा नमुद बँकेत स्वतंत्र खात्यामध्ये ठेवणे बंधनकारक असतांना इतर नगरपरिषद निधीमध्ये सदर निधी वळवणे नियमबाहय आहे.

3. उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद सदर मुलभूत व कार्यात्मक अनुदानातून साध्य करावयाची उद्दीष्टे व हाती घ्यावयाचे कामांवर सदर निधीचा मोठा हिस्सा विकास कामांवर खर्च न करता गुंतून पडल्यामुळे विपरीत परिणाम होतो किंवा कसे या बाबींचा खुलासा करुन अनुपालन सादर करावे.

लेखा

*75 सर्वसाधारण रोकडवही नमुना क्रमांक 11 मधील नमुद बँकांच्या ताळमेळाबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| सर्वसाधारण रोकडवही नमुना नंबर 11 मधील नमुद बँकांचे अभिलेखे लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. |
|---|

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात सर्वसाधारण रोकडवही नमुना क्रमांक 11 मधील नमुद बँकांच्या ताळमेळाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 30 दिनांक 27/01/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सर्वसाधारण रोकडवही नमुना नंबर 11 मधील नमुद बँकांचे ताळमेळ होणेसाठी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने ताळमेळ घेता आला नाही. अभिलेखे प्राप्त करुन अनुपालन सादर करावे.

लेखा

*76 अनामत नोंदवहीतील अनियमिततांबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 09

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| 1. नमुना नंबर 24 मध्ये अनामत नोंदवही ठेवण्यात आली नाही. |
| 2. नोंदवहीतील नोंदी व नोंदवही सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात आलेली नाही. |
| 3. 3 वर्षावरील ठेवी व्यपगत केलेल्या नाहीत. |
| 4. प्रलंबित असणाऱ्या अनामत रकमा सन 2018-19 च्या नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या नाहीत. |

नगरपरिषद सातारा, 2018-2019

नगरपरिषद सातारा सन 2018-19 च्या लेखापरीक्षणात अनामत नोंदवहीची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 37 दिनांक 31/01/220 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 62, 295, 453 नुसार नमुना नंबर 24 मध्ये अनामत नोंदवही ठेवण्यात आल्याचे दिसून आले नाही.

2. नोंदवहीतील नोंदी व नोंदवही सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात आलेली नाही.

3. लेखासंहिता 2011 मधील नियम 299 अन्वये, 3 वर्षावरील ठेवी व्यपगत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

4. प्रलंबित असणाऱ्या अनामत रकमा सन 2018-19 च्या नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या नाही. उदाहरणादाखल खालीलप्रमाणे –

माहे एप्रिल 2015

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | इसमाचे नांव | ठेवीचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 6 | दिप गिफ्ट्स | टेंडर बयाणा | 900 |
| 2 | 27 | संदीप तग्डे | नळ कनेक्शन अनामत | 1000 |
| 3 | 30 | मनोज शेंडे | टेंडर बयाणा | 850 |
| 4 | 31 | राजकमल मंडप डेकोरेटर्स | टेंडर बयाणा | 850 |
| 5 | 32 | भोसले डेकोरेटर्स | टेंडर बयाणा | 850 |
| 6 | 36 | सागर गुरुन | नळ कनेक्शन | 1000 |
| 7 | 39 | नरेंद्र रोकडे | नळ कनेक्शन | 1000 |
| 8 | 42 | श्रीकांत मोहिते | नळ कनेक्शन | 1000 |
| 9 | 45 | महादेव सावंत | नळ कनेक्शन | 1000 |
| 10 | 88 | दिलावर घोष | नळ कनेक्शन | 500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | 98 | सुधाकर देशमुख | शाहू कला अनामत | 10000 |
| एकुण | | | | 18950 |

5. उपरोक्त प्रमाणकान्वये परत केलेल्या रकमा पुन्हा सन 2018-19 मध्ये सुरुवातीची शिल्लक म्हणून दाखविण्यात आलेली आहे.

2017-18

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | इसमाचे नांव | रक्कम रुपये | परतावा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 836 | आकाश श्रीकांत गिरी गोसावी | 10000 | 19/6/2017 |
| 2 | 2487 | स्मार्ट एज्युकेशन | 10000 | 10/1/2018 |
| 3 | 2688 | नितीन कैंगार | 2000 | 8/2/2018 |
| 4 | 2689 | नितीन कैंगार | 2000 | 8/2/2018 |
| 5 | 2853 | सुधांशु किरकिरे | 10000 | 18/8/2017 |
| 6 | 1332 | किरण निपाने | 1000 | 6/9/2017 |
| 7 | 1333 | रुपेश मरकाळे | 1000 | 6/9/2017 |
| 8 | 1336 | रुपेश मरकाळे | 1000 | 6/9/2017 |
| 9 | 1337 | रमेश फडतरे | 1000 | 6/9/2017 |
| 10 | 1339 | रुपेश सरकाळे | 1000 | 6/9/2017 |
| 11 | 1340 | रमेश फडतरे | 1000 | 6/9/2017 |
| 12 | 1341 | किरण निपाने | 1000 | 6/9/2017 |
| 13 | 3142 | रुपेश फडतरे | 1000 | 6/9/2017 |
| एकुण | | | 42000 | |

वरील रकमा दुबार दिल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6. अखेरच्या शिलकेला नसलेल्या परंतु सुरुवातीच्या शिलकेला घेतलेल्या रकमा-

| अ.क्र. | पावती क्रमांक | रक्कम रुपये | नांव | ठेवीचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 7504 | 7290 | विद्या मोरे | सुरक्षा अनामत |
| 2 | 7506 | 5000 | विद्या मोरे | बांधकाम साहित्य |
| 3 | 7507 | 500 | विद्या मोरे | वृक्ष अनामत |
| 4 | 7512 | 2377 | राजकुमार राजपाल | सुरक्षा अनामत |
| 5 | 7513 | 5000 | राजकुमार राजपाल | बांधकाम साहित्य |
| 6 | 7514 | 500 | राजकुमार राजपाल | वृक्ष अनामत |
| एकुण | | 20667 | | |

7. सन 2017-18 मधील रकमा सन 2018-19 मध्ये चुकीच्या घेतल्या आहेत.

| अ.क्र. | नांव | सन 2017-18 मधील रकमा | 2018-19 मधील रक्कम | 2018-19 मधील रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सुजीत व्यंकटराव भोसले | 1069 | 11567 | 4942 |
| 2 | कृष्णा सावंत | 1378 | 1000 | 4000 |
| एकुण | | | 12567 | 8942 |

8. तीन वर्षापुर्वीच्या सन 2015-16 मधील खालील रकमा सन 2018-19 मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | रक्कम रुपये | देण्याची दिनांक | नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | 884 | 3485 | 6/6/2018 | एडीडी एजन्सी (टेंटर ववाणा) |
| 2 | 3414 | 2800 | 3/4/2019 | पद्मावती मजुर सहकारी संस्था |
| 3 | 2752 | 16000 | 4/12/2018 | गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 4 | 2883 | 42787 | 14/9/2018 | श्री. गणेश कन्स्ट्रक्शन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | 8887 | 41151 | 2/11/2016 | राजेंद्र कन्स्ट्रक्शन |
| 6 | 8899 | 18478 | 8/10/2018 | हेमंत दरेकर |
| 7 | 9237 | 900 | 4/6/2019 | दुर्वांकुर मजुर सहकारि संस्था |

उपरोक्त अनामत रकमांबाबत स्थायी समितीचा ठराव नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. तसेच परतावा केलेल्या रकमांच्या समोर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी केलेली नाही.

9. सन 2017-18 व 2018-19 मधील अनामत रकमांचा गोषवारा तपासले असता त्यांचा ताळमेळ दिसून येत नाही.

उपरोक्त अनियमिततांबाबत पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

*77 लेखापरीक्षणास प्रमाणके उपलब्ध न केलेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 81

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 120700654.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 120700654.00/-

सन 2018-19 चे लेखापरीक्षणात, लेखापरीक्षणासाठी प्रमाणके उपलब्ध केली नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान मे, जुलै 2018 व मार्च 2019 या निवड महिन्यातील प्रमाणकांमध्ये आढळलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 32 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्र.क्र. | कोणास दिले | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 639 | ICICI BANK | 100000000 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 651 | प्रवास भत्ता व दैनिक भत्ता | 1790 |
| 3 | 646 | ICICI BANK | 20698864 |
| एकुण | | | 120700654 |

उपरोक्त नमुद प्रमाणके लेखापरीक्षणादरम्यान रेखांकन करतांना प्रमाणकांच्या वस्तीमध्ये आढळून आलेली नाहीत.

उपरोक्त उपलब्ध न झालेली प्रमाणके लेखापरीक्षणास त्वरीत सादर करण्यात यावीत.

उपरख्यापन।

### *78 अपंग वाहन भत्ता फरक बिल अदा करणेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

**गुंतलेली रक्कम** रु. 9833.00 /- **आक्षेपाधीन रक्कम** रु. 9833.00/-

1. सन 2018-19 चे लेखापरीक्षणात अपंग वाहन भत्ता देयकांत तफावत आढळून आली.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान मे व जुलै 2018 या महिन्यांचे रेखांकन करतांना आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासापत्र क्रमांक 33 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला असता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | तपशिल | प्रमाणकातील रक्कम | रोखवहीतील रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|
| 107-4/5/2018 | अपंग वाहन भत्ता फरक बिल | 92800 | 102683 | 9833 |

1. कर्मचा-यांच्या अपंगत्वाचे दाखले देयकासोबत जोडलेले नाहीत.

2. रक्कम मंजुरीबाबत सक्षम प्राधिका-याचे मंजुरी आदेश पहावयास मिळाले नाहीत.

3. रक्कम अदा केलेबाबतचे फरक विवरणपत्र देयकासोबत पहावयास मिळाले नाहीत.

वरील उणिवांची पुर्तता सादर करावी.

लेखा

***79 रोकडवही व प्रमाणके ताळमेळाबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

माहे मे, जुलै 2018 व मार्च महिन्याचे रेखांकनात रोकडवही व प्रमाणकांचा ताळमेळा घेतल्याचे आढळून आले नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान मे, जुलै 2018 व मार्च महिन्याचे रेखांकन करतांना रोकडवही व प्रमाणके ताळमेळाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 35 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | कोणास दिले | प्रमाणकातील रक्कम | रोखवहीतील रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 125-14/5/2018 | श्री. एस. एस. कन्स्ट्रक्शन | 187822 | 1000000 |
| 2 | 576-16/7/2018 | सुरेंद्र निवृत्ती माहुलकर | 16140 | 9850 |
| 3 | 623-21/7/2018 | धनलक्ष्मी महिला बचतगट | 1800 | 10000 |
| 4 | 425-2/7/2018 | कृष्णाई नागरी पतसंस्था | 13100 | पहावयास मिळाली नाही. |

वरीलप्रमाणे प्रमाणके व रोकडवही यांचा ताळमेळ जुळत नाही. ताळमेळ घेऊन पुर्तता दाखवावी.

भांडार

### 80 पावती पुस्तक साठा नोंदवही नमुना नंबर 116 बाबत.

00
लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019
अनियमितता संख्या : 04

*लेखा शीर्ष : 00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1. शिल्लक पुस्तके आणि सुरुवातीची शिल्लक पुस्तके यांचा ताळमेळ घेतलेला नाही.
2. सन 201819 मध्ये प्रत्यक्ष पावती पुस्तके किती खरेदी केली आणि किती जमेला घेतली याबाबत नोंदवहीत नोंदी आढळून आल्या नाहीत.
3. वेगवेगळया विभागांना पुस्तके देऊन किती शिल्लक राहिली याबाबत नोंदी घेतलेल्या नाहीत.
4. नमुना नंबर 116 पावती पुस्तक साठा नोंदवही विहीत नमुन्यात असून ती पुर्णपणे भरलेली नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात भांडार विभागाकडील पावती पुस्तक साठा नोंदवही नमुना नंबर 116 चे लेखापरीक्षण केले असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सन 2016-17 मधील नोंदवहीमध्ये सन 2017-18 च्या पुस्तके दिलेबाबत नोंदी दिसून आल्या परंतू सन 2017-18 अखेरीस किती पुस्तके शिल्लक राहिली याच्या नोंदी नसल्याने सन 2018-19 ला सुरुवातीची शिल्लक पुस्तके नोंद घेतली नाहीत. त्यामुळे अखेर शिल्लक पुस्तके आणि सुरुवातीची शिल्लक पुस्तके याबाबत तपासणी करता आली नाही.

2. सन 201819 मध्ये प्रत्यक्ष पावती पुस्तके किती खरेदी केली आणि किती जमेला घेतली याबाबत नोंदवही पडताळता लेखापरीक्षणास समजून येत नाही.

3. सन 2018-19 मध्ये वेगवेगळया विभागांना पावती पुस्तक दिल्याची नोंद आहे. परंतू पुस्तके देऊन किती शिल्लक राहिली याबाबत नोंदी घेतलेल्या नाहीत.

4. नमुना नंबर 116 पावती पुस्तक साठा नोंदवही विहीत नमुन्यात असून ती पुर्णपणे भरलेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षणास जमा पुस्तके, अदा पुस्तके, शिल्लक पुस्तके याबाबत समजून येत नाही.

उपरोक्तबाबत लवकरात लवकर पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

भांडार

## 81 शिल्लक कोरी पावती पुस्तके साठयाबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष 00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

सन 2019-20 मध्ये खरेदी पुस्तके किती, जमा पुस्तके किती, अदा पुस्तके किती आणि शिल्लक पुस्तके किती याबाबत नमुना नंबर 116 नोंदवही विहीत नमुन्यात असून ती पुर्णपणे भरलेली नसल्याने लेखापरीक्षणास समजून येत नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 लेखापरीक्षणास पावती पुस्तके साठा नोंदवही 116 चे लेखापीरक्षण केले असता पावती पुस्तके कोरी साठा पडताळला असता त्याबाबत आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 41 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने त्यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पावती पुस्तकांच नांव | कोरी शिल्लक पावती पुस्तके |
|---|---|---|
| 1 | सामान्य पावती पुस्तके नमुना नंबर 2 | 182 |
| 2 | वृक्ष विभाग (शाहु उद्यान) | 490 (रुपये 1/-, 2/-, 4/- ची पावती पुस्तके वापरात नाहीत) |
| 3 | मंडई विभाग (कट्टा वापर दर्शनी फी) - दर्शनी मुल्य रुपये 12/- | 682 |
| 4 | मंडई विभाग दर्शनी मुल्य – रुपये 8/- | निरंक |
| 5 | प्रसुती गृहविभाग – दर्शनी मुल्य रुपये 5/- | 20 |

| | | |
|---|---|---|
| 6 | थिएटर पुस्तके | 8 |
| 7 | अतिक्रमण विभाग – दर्शनी मुल्य रुपये 24/- | 332 |
| 8 | अतिक्रमण विभाग – जाहिरात कर बिल पुस्तक | 11 |

वरीलप्रमाणे कोरी शिल्लक पावती पुस्तके प्रत्यक्षात आढळून आली परंतू नोंदवहीमध्ये सन 2019-20 सुरुवातीची शिल्लक पावती पुस्तके नमुद नाहीत. तसेच सन 2019-20 मध्ये खरेदी पुस्तके किती, जमा पुस्तके किती, अदा पुस्तके किती आणि शिल्लक पुस्तके किती याबाबत नमुना नंबर 116 नोंदवही विहीत नमुन्यात असून ती पुर्णपणे भरलेली नसल्याने लेखापरीक्षणास समजून येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष असलेली शिल्लक कोरी पावती पुस्तके बरोबर असलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री झालेली नाही.

उपरोक्त बाबत लवकरात लवकर पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

आंडर

***82 वर्धापन दिनानिमित्त कर्मचारी/पदाधिकारी कौटुंबिक स्नेह भोजन पुरविणे***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 231000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 231000.00/-

1. खर्च नोंदविल्यानंतर ठराव घेतला आहे.
2. निविदा फॉर्ममध्ये नमुद केल्याप्रमाणे सुरक्षा अनामत किती भरली आहे हे समजून येत नाही.
3. पुरवठादाराचा करारनामा निविदा नस्तीसोबत प्राप्त झालेला नाही.

नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान वर्धापन दिनानिमित्त कर्मचारी/पदाधिकारी यांना कौटुंबिक स्नेहभोजन पुरविण्याच्या खर्चाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 53 दिनांक 17/02/2020 अन्वये

खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. प्रमाणक क्रमांक 1180 दिनांक 2/11/2018 रक्कम रुपये 231000/- दिनांक 1/8/2018 रोजीच्या वर्धापन दिनानिमित्त स्नेहभोजनावर खर्च केला आहे. याबाबत ठराव क्रमांक 940 दिनांक 11/9/2018 खर्चास व कामास स्थायी समितीची मंजुरी घेतली आहे. दिनांक 1/8/2018 पुर्वी का घेतली नाही याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2. निविदा फॉर्ममध्ये नमुद केल्याप्रमाणे सुरक्षा अनामत किती भरली आहे हे समजुन येत नाही.

3. पुरवठादाराचा करारनामा निविदा नस्तीसोबत प्राप्त झालेला नाही.

उपरोक्तबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

स्थावर

***83 स्थावर जिंदगी विभाग येथे मागणी केलेल्या अभिलेख्यांबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

नगरपालिकेच्या मालमत्ता भाडे पट्टयाने देण्यासाठी लागणारी आवश्यक पुर्तता नगरपरिषदेने केलेली दिसून येत नाही.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात स्थावर जिंदगी विभाग येथे अभिलेखे मागविण्यात आले होते. त्यामध्ये आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 55 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद साताराकडे एकुण किती मालमत्ता आहेत व त्या किती प्रकारच्या आहेत हे उपलब्ध लेख्यांवरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे अभिलेखे उपलब्ध करुन एकुण मालमत्तांचा ताळमेळ घेणेत येऊन लेखापरीक्षणास दाखवावे.

2. नगरपरिषदेने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांवरुन नगरपरिषद मालकीच्या मालमत्ता कोणकोणत्या ठिकाणी आहेत. याबाबत समजून येत नाही. तरी त्याबाबत उचित कार्यवाही करणेत यावी.

3. नगरपरिषदेच्या मालकीच्या मालमत्तां भाडयाने देतांना करारनामा करुन घेणे आवश्यक आहे. तथापि उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांवरुन सदर मालमत्ता भाडयाने देतांना त्यांचे करारनामे कधी झाले व किती वर्षासाठी करारनामे केले याचा बोध होत नाही.

4. तसेच मालमत्ता भाडेपट्टयाने देतांना किती रक्कम ठरली व त्यापैकी किती रक्कम नगरपरिषदेस जमा झाली याबाबत बोध होत नाही.

5. मालमत्ता भाडेपट्टयाने देतांना करारनामा कोणासोबत झाला व कोणत्या ठरावानुसार करारनामा केला याबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाही. सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन पुर्तता सादर करावी.

5. करारनाम्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर कोणत्या जागांसाठी करारनामे पुन्हा करावयाचे आहेत याबाबत स्पष्टता दिसून येत नाही.

उपरोक्त बाबत पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

स्थावर

***84 स्थावर जिंदगी विषयी आढळून आलेल्या त्रुटींबाबत.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : 00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1. इमारत/जागा वापर नोंदवहीमध्ये सुरुवातीची शिल्लक व अखेरची शिल्लक यामध्ये तफावत आढळून येते.

2. नगरपरिषद मालमत्तेची नोंदवही, नमुना क्रमांक 15 – जमिनीची नोंदवही, नमुना क्रमां 16 स्थावर मालमत्ता नोंदवही या नोंदवहया ठेवणे आवश्यक असतांना त्या ठेवल्याचे दिसून येत नाही.

नगरपरिषद सातारा येथे सन 2018-19 च्या लेखापरीक्षणात स्थावर जिंदगी विषयी त्रुटी आढळून आलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 81 दिनांक 18/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सन 2017-18 मधील इमारत/जागा वापर फी वधिनली असता अखेरची शिल्लक रक्कम रुपये 20507892/- अशी आढळून आली व सन 2018-19 ची आरंभीची शिल्लक रुपये 20508774/- अशी आढळून आली. त्यामध्ये रुपये 882/- एवढी तफावत असल्याचे दिसून येते.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार प्रकरण 5 मधील बाब क्रमांक 62 प्रमाणे नमुना क्रमांक 10 भाडयाने देण्यात आलेल्या नगरपरिषद मालमत्तेची नोंदवही, नमुना क्रमांक 15 – जमिनीची नोंदवही, नमुना क्रमां 16 स्थावर मालमत्ता नोंदवही या नोंदवह्या ठेवणे आवश्यक असतांना त्या ठेवल्याचे दिसून येत नाही. त्यावरुन मासिक जमा किती झाली हे स्पष्ट होत नाही. त्यावरुन मासिक जमा किती झाली हे स्पष्ट होत नाही. वरील आक्षेपाची पुर्तता करावी अन्यथा वरील आक्षेपाचा परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्यात येईल.

स्वाक्ष. का.म.का.स्थ

***85 दावे खटले नोंदवहीबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

**गुंतलेली रक्कम** रु. 188500.00 /- **आक्षेपाधीन रक्कम** रु. 188500.00/-

1. नगरपरिषद साताराचे मागील प्रलंबित 34 दावे तसेच **नवीन** 53 दावे असे एकुण 87 दाव्यांपैकी 36 दावे निकाली निघाले असून 51 दावे प्रलंबित आहेत.
2. प्रलंबित दाव्यांची संख्या पाहता नगरपरिषदेने त्यांच्या निपटाऱ्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
3. दावे, खटले नोंदवहीची लेखाप्रमुखाने मासिक पडताळणी केलेली नाही.
4. र न्यायालयीन प्रकरणांकडे प्राधान्याने व गांभिर्याने लक्ष देऊन नगरपरिषदेची बाजु वेळीच समर्थपणे मांडण्याचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात दावे, खटले नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता

त्यातील उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 59 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. एकुण मागील 34 दावे प्रलंबित आहेत. तसेच सन 2018-19 या वर्षात नवीन दाखल दावे 53 असे एकुण 87 दाव्यांपैकी फक्त 36 दावे निकाली निघाले असून 51 दावे प्रलंबित आहेत.

2. कोर्ट खर्चाकरीता नगरपरिषदेने अंदाजपत्रकात रुपये 500000/- ची तरतुद केली आहे. त्यापैकी रक्कम रुपये 188530/- खर्च केल्याचे दिसते. तरी प्रलंबित दाव्यांची संख्या पाहता नगरपरिषदेने त्यांच्या निपटाऱ्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम 63 अनुसार दावे, खटले नोंदवहीची लेखाप्रमुखाने मासिक पडताळणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

4. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा स्थायी निर्देश क्रमांक सीओडी-120/प्र.क्र.135/2000/2 दिनांक 31 ऑगस्ट 2000 अनुसार न्यायालयीन प्रकरणांकडे प्राधान्याने व गांभिर्याने लक्ष देऊन नगरपरिषदेची बाजु वेळीच समर्थपणे मांडण्याचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 188530/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

अतिक्रमण

### *86 अतिक्रमण विभागाकडील पावती पुस्तक साठा नोंदवहीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1. सन 2017-18 दिनांक 31/3/2018 रोजी साठा नोंदवही पान क्रमांक 92 वर शिल्लक रकान्यामध्ये शिल्लक पुस्तक आणि पावती याबाबत नोंद आढळून आली नाही.

2. अतिक्रमण विभागास पावती पुस्तके दिल्याची भांडार पावती पुस्तके साठा नोंदवहीत नोंद आहे. परंतू अतिक्रमण विभागाकडील पावती पुस्तकात पावती पुस्तक प्राप्त झालेबाबत नोंद नाही.

3. अतिक्रमाण विभाग पावती पुस्तक साठा नोंदवहीत पावती पुस्तके प्राप्त झालेबाबत नोंद नाही.

सातारा नगरपरिषद सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात अतिक्रमण विभागाकडील सन 2017-18 पावती पुस्तक साठा नोंदवहीवरुन अखेर शिल्लक पावती पुस्तक सन 2018-19 ला पावती पुस्तके साठा नोंदवही

सुरुवातीची शिल्लक पावती पुस्तके तसेच सन 2018-19 मध्ये भांडार विभागाकडून दिलेली पावती पुस्तके पडताळणी अतिक्रमण विभागाकडील पावती पुस्तके साठा नोंदवहीला केली असता आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासापत्र क्रमांक 102 दिनांक 24/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सन 2017-18 दिनांक 31/3/2018 रोजी साठा नोंदवही पान क्रमांक 92 वर शिल्लक रकान्यामध्ये शिल्लक पुस्तके आणि पावती याबाबत नोंद आढळून आली नाही. सन 2018-19 ला सुरुवातीची शिल्लक पावती पुस्तके दोन आणि पावत्या 55 अशी नोंद आहे परंतू सन 2017-18 अखेर शिल्लक पावती पुस्तके आणि पावत्या नोंद नसल्याने खात्री करता आली नाही.

2. सन 2018-19 मध्ये भांडार विभागाने खालील नमुद तारखांना पावती पुस्तके दिलेली आहेत (मुल्य प्रति पावती रुपये 12/-)

दिनांक 21/5/2018 रोजी 10 पुस्तके बुक क्रमांक 230 ते 240 पर्यंत

दिनांक 21/8/2018 रोजी 10 पुस्तके बुक क्रमांक 241 ते 250 पर्यंत

दिनांक 1/10/2018 रोजी 50 पुस्तके बुक क क्रमांक 251 ते 300 पर्यंत

एकुण 70 पुस्तके

वरील नमुद तारखांना अतिक्रमण विभागास पावती पुस्तके दिल्याची भांडार पावती पुस्तके साठा नोंदवहीत नोंद आहे. परंतू अतिक्रमण विभागाकडील पावती पुस्तकात पावती पुस्तक प्राप्त झालेबाबत नोंद नाही.

3. दिनांक 28/1/2019 रोजी बुक क्रमांक 803 ते 900 – 100 पुस्तके

दिनांक 7/3/2019 रोजी बुक क्रमांक 901 ते 1000 – 100 पुस्ते

वरील दिनांकांना अतिक्रमण विभागास पावती पुस्तके दिल्याची भांडार विभागातील पावती पुस्तक साठा नोंद आहे. परंतू अतिक्रमाण विभाग पावती पुस्तक साठा नोंदवहीत पावती पुस्तके प्राप्त झालेबाबत नोंद नाही. त्यामुळे पावती पुस्तके प्राप्त, खर्च, शिल्लक याबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्तबाबत योग्य ती पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

### *87 मोबाईल ठराव नोंदवही न ठेवलेबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| मोबाईल ठराव नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. |

सातारा नगरपरिषद, साताराचे लेखापरीक्षण सन 2018-19 करीता आस्थापना विभागाकडील मोबाईल ठराव नोंदवहीबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 36 दिनांक 30/01/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपालिका सातारा सन 2018-19 चे लेखापरीक्षणात माहे मे, जुलै 2018 व मार्च 2019 या निवड महिन्यातील वेतन देयकांची तपासणी केली असता मोबाईल बिलाच्या रकमा कपाती केलेल्या आढळून आल्या. त्याअनुषंगाने मोबाईल ठराव नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. त्याअभावी किती कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला ते दिसून आले नाही. तरी परिपुर्ण नोंदी घेऊन नोंदवही अद्यावत करुन साधार खुलासा करावा.

लेखा

### *88 आयकर रक्कम कपातीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| नमुना नंबर 11 ला व मार्च 2019 च्या विवरणपत्राच्या रकमेत तफावत दिसून आली. |

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षण करीत असतांना माहे फेब्रुवारी 2019 पेड इन मार्च 2019 चे वेतनातून केलेल्या आयकर कपातींचे विवरणपत्र पाहता नमुना नंबर 11 ला व मार्च 2019 च्या विवरणपत्राच्या रकमेत तफावत दिसून आली. याबाबत योग्य तो खुलासा करुन पुर्तता दाखवावी.

| | रोकडवहीला कपात |
|---|---|
| माहे 2019 च्या वेतनाच्या विवरणपत्रानुसार 001276 | 124264 |
| भारतीय स्टेट बँक भरणा रक्कम रुपये 128868/- | 39028 |
| एकुण | 163292 |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे 128868 – 163292 = 34424/- इतक्या रकमेची तफावत दिसून येते.

अग्निशमन

**89 अग्निशमन विभागाकडील साहित्य खरेदीबाबत.**

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1019800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1019800.00/-

अग्निशमन विभागाकडील खरेदीमध्ये शासन निर्णय नगरविकास विभाग दिनांक 31/8/2019 मधील मुद्दा क्रमांक 6 नुसार खरेदीपूर्वी दरकराराची पडताळणी केलेली नाही.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 181 | 17/10/2018 | 1019800 |
| | 15/11/2018 | |

उपरोक्त नमुद प्रमाणकान्वये केलेल्या खर्चातील अनियमिततांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 45 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. अग्निसुरक्षा अभियानासंदर्भातील शासन निर्णय नगरविकास विभाग, दिनांक 31/8/2009 मधील मुद्दा क्रमांक 6 नुसार उपकरणे खरेदी संदर्भात संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त तांत्रिक समितीच्या मदतीने शासन स्तरावरुन दरकरार निश्चित करुन देणेत येईल, त्यानुसारच खरेदी करावयाची असून दरकराराची पडताळणी न करता खरेदी करण्यात आली आहे.

2. साहित्याची नोंदवही पाहता ती अपुर्ण असल्याची दिसली.

3. नगरपालिका शाळांसाठी 11 छोटी यंत्रे/उपकरणे घेतलेली असून यापूर्वी शासन स्तरावरुन शाळांना अशी यंत्रे पुरविली आहेत याबाबतची पडताळणी केलेली नाही, त्यामुळे अनावश्यक खरेदीची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सांधार पुर्तता लेखापरीक्षणास करावी.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 1019800/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

वाहतुक

## 90 अग्निशमन विभागाकडील वाहनाचा पाणी वाटपासाठी केलेल्या वापराबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| वाहन क्रमांक 8004 चा वावर केवळ शहरात पाणी पुरवठानाठी केला जात असून पाणी पुरवठयासाठी नागरीकांची मागणी न घेतला नियमितपणे वाहनाचा पाणी वाटपासाठी वापर केल्याने अनावश्यक व खाजगी करणांसाठी वाहनाचा वापर केल्याची शक्यता दिसून येते. |

अग्निशमन विभागाकडील वाहनांचे लॉगबुक पाहता वाहन क्रमांक 8004 चा वावर केवळ शहरात पाणी पुरवठासाठी केला जात असून पाणी पुरवठयासाठी नागरीकांची मागणी न घेतला नियमितपणे वाहनाचा पाणी वाटपासाठी वापर केल्याने अनावश्यक व खाजगी करणांसाठी वाहनाचा वापर केल्याची शक्यता दिसून येते. याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 153 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद अग्निशमन विभागाकडे लेखापरीक्षण कालावधीत खालीलप्रमाणे तीन गाडया असल्याचे दिसून आले. एम.एच.11 ए.बी. 8200 या वाहनाचा अग्निशमन विभागामार्फत आग विझविण्यासाठी वापर केला जात असून गाडी क्रमांक 8004 चा वापर केवळ पाणी वाटपासाठी केला जात असल्याचे लॉगबुकवरील नोंदींवरुन दिसून येते.

2. वाहन क्रमांक 8004 चा वापर केवळ शरात पाणी पुरवठयासाठी होत असतांना तसेच शहरात कायम स्वरुपी कोणतीही टंचाई सदृश्य परिस्थिती नसतांना सदर वाहनाद्वारे रोजी 5 ते 6 खेपा पाणी पुरवठा करणे संयुक्तिक वाटत नाही. पाणी पुरवठा करणेसंबंधी लोकांची मागणी तसेच तो केल्यानंतर संबंधीत वॉर्डातील नागरीकांची सही घेतली जात नाही. त्यामुळे अनावश्यकपणे व खाजगी कारणासाठी वाहनाचा वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थायी आदेश क्रमांक 31 नुसार प्रती खेप रुपये 1000/- प्रमाणे रकमा जमा करण्यात आलेल्या नाहीत.

3. वाहन क्रमांक एम.एच.11 ए.बी. 822 हे वाहन आग विझविण्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी पाठविल्यानंतर लॉगबुकवर संबंधित व्यक्तींच्या स्वाक्षरीसह नाव तसेच रक्कम ज्या पावती क्रमांक नमुद करणे व मासिक गोषवाऱ्यांवर अग्निशमन अधिकारी यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. ती केलेली दिसून आली नाही. त्यामुळे पेट्रोल, डिझेलवर या गाडयांचे बाबतीत नाहक खर्च झालेला दिसून येतो. याबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

लेखा

### 91 तसलमात नोंदवही व तसलमात रकमांबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| अग्रिम समायोजनांबावत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून आली नाही. लेखासंहिता नियम 239 अन्वये कोणतीही कार्यवाही केलेली नाही. |

नगरपालिका साताराकडील तसलमात नोंदवही पडताळणी केली असता त्यात आढळलेल्या उणिवांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 154 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाने अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. तसलमात नोंदवहीतील गोषवाऱ्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे नगरपालिकेकडे सन 1951 ते सन 2017-18 अखेर रक्कम रुपये 4147834.37 इतकी रक्कम समायोजनाअभावी प्रलंबित असल्याचे दिसते. तसलमात रकमांचे/अग्रधन रकमांबावत नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 235 ते 248 प्रमाणे योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक असून नियम 243 नुसार प्रलंबित रकमा समायोजन करणेबाबत योग्य ती कार्यवाही करुन लेखापरीक्षणास पुर्तता होणे आवश्यक आहे.

### 92 वाहन क्रमांक एम.एच.11 8004 मध्ये वापरलेल्या इंधनाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 201049.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 201049.00/-

| |
|---|
| वाहनाचे इंधनावर जादा प्रमाणात खर्च घेऊन आग विझविण्यासाठीचा योग्य हेतू सफल झाला नसल्याचे दिसून येते. |

सन 2018-19 चे लेखापरीक्षणात सातारा नगरपरिषदेकडील अग्निशमन वाहनांचे हिस्ट्रीशिट तपासले असता वाहन क्रमांक एम.एच.11 8004 या वाहनावर (मिनी फायर फायटर) मोठ्या प्रमाणात पेट्रोल टाकून इतर अन्य कारणांसाठी (उदा. पोवई नाका येथे पाणी खेप, सदर बाजार, एलबीएस कॉलेजसमोर पाणी खेप, इत्यादी ठिकाणी) अनावश्यक पाणी खेपा यासाठी वाहनाचा अनधिकृतरित्या वापर केल्याचे दिसून येते.

सन 2018-19 मध्ये या वाहनाचे इंधनावर जादा प्रमाणात खर्च घेऊन आग विझविण्यासाठीचा योग्य हेतू सफल झाला नसल्याचे दिसून येते. तरी इंधनावर झालेला सर्व खर्च योग्य/सकारण झाल्याची खात्री पटवावी. तोपर्यंत झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

एकुण खर्च - रक्कम रुपये 94236/-

लेखापरिक्षण कालावधीतील मे 2018 अखेर – रक्कम रुपये 201049/-

**निवड महिन्यातील ऑगस्ट 2018 अखेर – रक्कम रुपये 654324/-**

वाहतुक

## *93 वाहन निर्लेखनाबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष : वाहन निर्लेखन नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

सन 2018-19 मध्ये सातारा नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठरावान्वये वाहने निर्लेखन करुन संबंधित व्यक्तींच्या ताब्यात दिली आहेत तथापि सदरची वाहने त्या त्या व्यक्तींच्या नावे झाली असलेबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणादरम्यान वाहन निर्लेखनाच्या नस्तीची पडताळणी केली असता उणिवांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 82 दिनांक 20/2/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सन 2018-19 मध्ये वाहन क्रमांक एम.एच.11 जी 7011 व एम.एच.11 जी 7002 यांचे वाहतुक विभागाकडून सातारा नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 351 दिनांक 23/1/2019 नुसार लिलावाद्वारे वाहनांचे निर्लेखन करण्यात आले आहे. त्यानुसार एम.एच.11 जी 7011 हे श्री. चंद्रशेखर शंकर वामणे दिनांक 27/2/2019 रोजी व एम.एच.11 जी 7002 हे शाहीर सत्तार शेख यांना दिनांक 27/2/2019 रोजी ताब्यात दिल्याचे दिसून येते.

परंतू सदरची वाहने संबंधित व्यक्तींच्याच नावे झालेबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदरची वाहने संबंधिताच्याच नावे झालेबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

उपरोक्तबाबत पुर्तता करुन लेखापरीक्षणास दाखवावी.

आरोग्य

**94 आरोग्य विभागाकडील 70 HP BACK HOE OADER खरेदीतील अनियमिततेबाबत.**

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 10

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 2142856.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2142856.00/-

1. नपप्रंस स्थायी निर्देश क्रमांक 32 नुसार नगरपरिषदेकडील वाहने खरेदी व वापरासंबंधिच्या धोरणाबाबतचे एकत्रित आदेशानुसार ज्या वाहनाचा नियमित वापर होत नसतो अशी वाहने खरेदी करता येणार नाहीत. असे असतांना नगरपरिषदेने उपरोक्त नमुद वाहन खरेदी केले आहे.
2. अर्थसंकल्पात वाहन खरेदीची तरतुद तसेच इंधन व वाहन देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद केलेली नाही.
3. आस्थापना खर्च परिगणित न करताच नगरपरिषदेने वाहन खरेदी केल्याचे दिसून येते.
4. खरेदी केलेल्या वस्तुंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे स्पष्टीकरण असणे आवश्यक असतांना तशा प्रकारचा प्रकारची प्रशासकीय मान्यता आदेश नस्तीसोबत आढळून आला नाही.
5. वाहनाची आवश्यकता व वाहनाच्या मागणीचा कोणताही प्रस्ताव नस्तीसोबत आढळून आला नाही.
6. अर्थसंकल्पात वाहन खरेदी व इंधने, देखभाल व दुरुस्तीसाठी तरतुद केलेली नाही.
7. सुरक्षा अनामत जमा करुन घेतलेली नाही.
8. देयकातून आयकर कपात केलेला नाही.
9. पुरवठ्याच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे त्वरीत निरीक्षण करणे आवश्यक असतांना अशाप्रकारचे अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाही.
10. सदर वाहन खरेदी केल्यानंतर त्यासाठी लागणाऱ्या ऑपरेटरसाठी होणाऱ्या खर्चाची तरतुद केल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

सातारा नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षण 20 जानेवारी 2020 पासून चालू झाले असून आरोग्य विभागाने उपरोक्त वाहन रुपये 2142856/- इतक्या रकमेला GeM पोर्टलवरुन खरेदी केले आहे. त्यातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 51 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्रमांक 32 दिनांक 10 मे 2015 नुसार नगरपरिषदेकडील वाहने खरेदी व वापरासंबंधिच्या धोरणाबाबतचे एकत्रित आदेश दिले गेले आहेत. या आदेशातील बाब क्रमांक 34 नुसार ज्या वाहनाचा नियमित वापर होत नसतो अशी वाहने खरेदी करता येणार नाहीत. असे असतांना नगरपरिषद साताराकडील आरोग्य विभागाने उपरोक्त वाहन खरेदी केले आहे.

2. उपरोक्त स्थायी निर्देश क्रमांक 32 नुसार वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात वाहन खरेदीची तरतुद तसेच इंधन व वाहन देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद आवश्यक राहील असे निर्देश असतांना अशी तरतुद अर्थसंकल्पात आढळून आली नाही.

3. नगरपरिषदेने आस्थापना खर्चाच्या मर्यादेत राहू वाहन खरेदी करणे आवश्यक असतांना आस्थापना खर्च परिगणित न करताच नगरपरिषदेने वाहन खरेदी केल्याचे दिसून येते.

4. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक 01 डिसेंबर 2016 बाब क्रमांक 47अ नुसार प्रशासकीय आदेशाती खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तुंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे असे नमुद असावे व त्याची आवश्यकता काय आहे याचे स्पष्टीकरण असणे आवश्यक असतांना तशा प्रकारचा प्रकारची प्रशासकीय मान्यता आदेश नस्तीसोबत आढळून आला नाही.

5. वाहन खरेदी करण्यापूर्वी वाहनाची आवश्यकता व वाहनाच्या मागणीचा कोणताही प्रस्ताव नस्तीसोबत आढळून आला नाही.

6. उपरोक्त वाहन खरेदी करण्यापूर्वी सदर वर्षाच्या वित्तीय अर्थसंकल्पात वाहन खरेदी व इंधने, देखभाल व दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात तरतुद असणे आवश्यक असतांना अशी कोणतीही तरतुद अर्थसंकल्पात आढळून आली नाही.

7. यशस्वी निविदाधारकाने खरेदी प्राधिकाऱ्याकडे खरेदी मुल्याच्या (रक्कम रुपये 21428569/-) 3 टक्के इतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही.

8. उपरोक्त खरेदीच्या देयकातून शासन नियमाप्रमाणे 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

9. पुरवठयाच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाने त्वरीत निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे व त्यातील उणिवा व दोष 15 दिवसांच्या आंत पुरवठादाराच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक असतांना असे कोणतेही निरीक्षण केल्याचा अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

10. सदर वाहन खरेदी केल्यानंतर त्यासाठी लागणाऱ्या ऑपरेटर साठी होणाऱ्या खर्चाची तरतुद कोठून केली जाणार आहे याबाबतची कोणतीही तरतुद केल्याची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाहीत.

आरोग्य

95 आरोग्य विभागाकडील EICHER PRO 1080 TIPPER TRUCK खरेदीतील अनियमिततेबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 05

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 95*

1. सदर वाहन खरेदीपूर्वी मागणीचा कोणताही प्रस्ताव नस्तीसोबत आढळून आला नाही.
2. सदर वाहन खरेदीसाठी अंदाजपत्रकात कोणतीही तरतुद आढळून आली नाही.
3. पुरवठादाराच्या देयकातून सुरक्षा अनामत कपात केलली नाही.
4. पुरवठा केलेल्या मालाचे निरीक्षण अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाहीत.
5. पुरवठादाराचे देयकातून आयकर रक्कम कपात केलेली नाही.

सातारा नगरपरिषदेने सन 2018-19 चे लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील EICHER PRO 1080 TIPPER TRUCK खरेदीची नस्ती तपासली असता त्यामध्ये आढळलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 53 दिनांक 17/02/2020 अन्वये खुलासा मागविला असता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

पुरवठादाराचे नांव – JAIKA MOTORS PVT LTD., NAGPUR

1. सदर वाहन खरेदीपूर्वी मागणीचा कोणताही प्रस्ताव नस्तीसोबत आढळून आला नाही. त्यामुळे सदर वाहनाची काय आवश्यकता होती याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणास करता आली नाही.

2. सदर वाहन खरेदीसाठी अंदाजपत्रकात कोणतीही तरतुद आढळून आली नाही. स्थायी निर्देश क्रमांक 32 नुसार वाहन खरेदी करण्यापूर्वी त्याची तरतुद अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे.

3. यशस्वी निविदाधारकाने निविदा मुल्याच्या (रक्कम रुपये 2608756/-) चे 3 टक्के इतकी अनामत रक्कम नगरपरिषदेकडे जमा करणे आवश्यक असतांना अशी अनामत रक्कम नगरपरिषदेने जमा करुन घेतलेचे नस्तीवरुन दिसून आले नाही.

4. पुरवठ्याच्या ठिकाणी माल पोहोचताच त्याचे त्वरीत निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे व त्यातील उणिवा व दोष 15 दिवसांत पुरवठादाराच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक असतांना अशा प्रकारचा कोणताही अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

5. उपरोक्त खरेदीच्या देयकातून शासन निर्णयाप्रमाणे दोन टक्के आयकर देयकातून वसुल करणे आवश्यक असतांना सदर खरेदीचे देयकामधून 2 टक्के प्रमाणे रक्कम वसुल करुन शासन निधीत भरणा केलेची पुर्तता दाखवावी.

आरोग्य

## 96 स्वच्छ सर्वेक्षणासाठी आरोग्य विभागाने केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 113105.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 113105.00/-

| |
|---|
| 1. फॅब्रिकेशन बोर्ड बसविणे कामास कार्योत्तर मंजुरी घेतलेली नाही, तसेच काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीसोबत जोडलेला नाही. |
| 2. निविदा फी व बयाणा रक्कम जमा करुन घेतलेली नाही. |
| 3. मोजमाप पुस्तकाची मुळ कॉपी नस्तीसोबत जोडणे आवश्यक असतांना कार्बन कॉपी नस्तीसोबत जोडलेली आहे. |

नगरपरिषद, साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात स्वच्छ सर्वेक्षणासाठी आरोग्य विभागाने केलेल्या कामांची नस्ती तपासली असता त्यात आढळलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 87 दिनांक 24/2/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सातारा शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण 2018 साठी सेंद्रीय खत निर्मितीचे फॅब्रीकेशन बोर्ड बनविण्यासाठीचे रक्कम रुपये 13400/- चे बिल यश कन्स्ट्रक्शन यांना अदा केले आहे. सदर कामासाठी कार्योत्तर मंजुरी देणेत आली आहे. बोर्ड बसविण्याच्या कामात मंजुरीपूर्वी काम करण्याची काय आवश्यकता होती याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच सोबत काम पुर्णत्वाचा दाखला जोडलेला नाही.

2. प्रभाग क्रमांक 7 पेठ गुरुवार शेटे चौक ते बिप मार्केट पुल ते पांडुरंग शिंदे घर ओढा स्वच्छ करणे हे काम, काम वाटप समितीतून दत्तमाला मजुर सहकारी संस्था यांच्या नावे मंजुर केलेली आहेत. कामाची रक्कम रुपये 99705/- इतकी आहे. सदर कामासाठी नगरपरिषदेकडे निविदा फी रुपये 200/- व बयाणा रक्कम रुपये 1000/- इतकी नगरपरिषदेकडे जमा करुन घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारच्या पावत्या नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

3. प्रभाग क्रमांक 7 पेठ गुरुवार बाटा शु मार्ट ते आवळे घर ओढा स्वच्छ करणे या कामाच्या नस्तीसोबत मोजमाप पुस्तकाची कार्बन कॉपी जोडली आहे. तसेच काम पुर्णत्वाचा दाखला सोबत जोडलेला नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 113105/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

स्थावर

## 97 नगरपरिषद शॉपींग सेंटर व अन्य गाळे मुदतबाहय भाडेपट्टयाबाबत.

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

अनियमितता संख्या : 05

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 95*

| |
|---|
| 1. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 92(3) नुसार मुदत होऊन गेलेले गाळे ताब्यात घेऊन फेर लिलाव करणेची प्रक्रिया राबविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.<br>2. नस्तीमधीलची विवरणपत्रे पाहता खालील गाळे संबंधित गाळे धारकांच्या ताब्यात दिलेचा ठराव क्रमांक, दिनांक व कालावधी नोंदविलेला नाही. |

नगरपरिषद साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात नगरपरिषद शॉपींग सेंटर व अन्य गाळे मुदतबाह्य भाडेपट्टयाबाबत तपासणी केली असता आढळलेल्या उणिवांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 116 दिनांक 06/03/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्याचे उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. नगरपरिषद मुख्य कार्यालयामध्ये असलेल्या शॉपींग सेंटरमध्ये 29 गाळे आहेत. याबाबतची नस्ती पाहता सदरचे गाळे ठराव क्रमां व दिनांक यानुसार खालीलप्रमाणे भाडेपट्टयाने दिले आहेत.

| अ.क्र. | गाळा क्रमांक | नगरपालिका ठराव क्रमांक | दिनांक | भाडेपट्टयाची अंतिम मुदत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 2 | 436 | 27/7/2008 | 28/7/2017 |
| 2 | 3 ते 4 | 542 | 25/11/2008 | 24/11/2017 |
| 3 | 5 ते 20 | 436 | 29/7/2008 | 28/7/2017 |
| 4 | 21 | 483 | 29/9/2008 | 28/9/2017 |
| 5 | 22 ते 24 | 436 | 29/2/2008 | 28/7/2017 |
| 6 | 25 | 542 | 25/11/2008 | 24/11/2017 |
| 7 | 26 | 436 | 29/7/2008 | 28/7/2017 |
| 8 | 27 | 542 | 25/11/2008 | 24/11/2017 |
| 9 | 28 ते 29 | 436 | 29/7/2008 | 28/7/2017 |

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 92(3) नुसार नगरपरिषदेस जास्तीत जास्त 3 वर्षासाठी आपली स्थावर मालमत्ता भाडयाने देता येईल. त्यानंतर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी नगरपरिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने जास्तीत जास्त 9 वर्षासाठी भाडेपट्टयाने देता येईल असे असतांना वरीलप्रमाणे मुदत होऊन गेल्याने गाळे ताब्यात घेऊन फेर लिलाव करणेची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केलेबाबत नस्ती पाहता पत्र क्रमांक नोटीस क्रमांक सानप/स्था.विका/स्थाजिवि/408/1 ते 408/29 दिनांक 21/12/2019 अन्वये म्हणजे दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीनंतर संबंधित गाळे धारकांना कळविले आहे.

2. याचप्रमाणे शनिवारपेठ सि.स.नं. 368 गुरुवार परज शॉपींग सेंटर एकुण 24 गाळे ठराव क्रमांक 437 व 438 दिनांक 29/7/2008 अन्वये भाडेपट्टयाने दिले आहेत. त्याची मुदत दिनांक 28/7/2017 रोजी संपली आहे.

याचप्रमाणे सदाशिव पेठ, मच्छी मार्केट 24 गाळयांपैकी गाळा क्रमांक 6,7,21 व 24 वगळता अन्य 20 गाळयांची मुदत दिनांक 22/1/2017 दिनांक 22/1/2018 व दिनांक 6/8/2018 रोजी संपलेली आहे.

3. सदरबझार लोकॉस्ट शॉपिंग सेंटर येथे 82 गाळे असून त्यापैकी गाळा क्रमां 14,20,41,48,81 वगळता अन्य 77 गाळयांची मुदत संपलेली आहे. सोबतचे प्रपत्र पाहता सदरचे गाळे ठराव क्रमांक 1417 दिनांक 6/9/2001 अन्वये भाडेपट्टयाने दिले आहेत. दिनांक 5/9/2010 रोजी मुदत संपली आहे. म्हणजे मुळ मुदतीपेक्षा दुप्पट कालावधी होऊनदेखील गाळे संबंधित गाळेधारकांच्या ताब्यात आहेत.

4. रविवारपेठ सिटी सर्वे नंबर 182 येथील 7 गाळयांपैकी गाळा क्रमांक 7 याची मुदत दिनांक 19/7/1999 रोजी संपलेली आहे, गाळा क्रमांक 1,3,5,6 यांची मुदत दिनांक 12/1/2012 रोजी तर गाळा क्रमांक 2,4 याची मुदत दिनांक 24/4/2010 व दिनांक 2/10/2010 रोजी संपली आहे.

पेठ सदाशिव सि.स.नं. 102,103 येथील सर्व 32 गाळयांची मुदत दिनांक 28/3/2019 रोजी संपली आहे. भवानीपेठ सि.स.नं. 35 अबक येथील 32 गाळयांपैकी गाळा क्रमांक 1,2,4 (पहिला मजला), 3,4,5,8,11 (दुसरा मजला) वगळता अन्य गाळयांची मुदत दिनांक 6/8/2018 रोजी संपली आहे. सि.स.नं. 271,272 श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुल 24 गाळयांची मुदत दिनांक 6/8/2018 व दिनांक 30/11/2018 रोजी संपली आहे. तसेच श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले व्यापारी संकुल 41 गाळयांपैकी गाळा क्रमांक 1,2,20,22,24,26,28,30,37,41 यांची मुदत दिनांक 25/9/2017 रोजी संपली आहे. तर गाळा क्रमांक 17,21 यांची मुदत दिनांक 2/10/2010 व गाळा क्रमांक 17,19 (पहिला मजला) याची मुदत दिनांक 12/10/2010 रोजी संपली आहे.

उपरोक्त सर्वच गाळा धारकांना दिनांक 21/12/2019 व दिनांक 11/2/2020 रोजी मुदत संपल्याच्या नोटीसा दिल्या आहेत. मात्र त्यापूर्वी काय कारवाई केली याचा तपशिल उपलब्ध झाला नाही. सबब सदर गाळे नव्याने भाडयाने देण्याची कार्यवाही वेळेवर झाली नसल्याने नगरपरिषद उत्पन्न वाढीवर परिणाम झाला आहे.

5. नस्तीसोबतची विवरणपत्रे पाहता खालील गाळे संबंधित गाळे धारकांच्या ताब्यात दिलेचा ठराव क्रमांक, दिनांक व कालावधी नोंदविलेला नाही.

| अ.क्र. | पेठ/ठिकाण | संकुलाचे नांव | गाळे धारकाच्या ताब्यात दिलेची नं नसलेला गाळा क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | सदाशिव पेठ | श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे व्यापारी संकुल | गाळा क्रमांक 5,9,11,13,14,15 (त मजला)<br>गाळा क्रमांक 4,8,13,18 (पहि मजला) |
| 2 | भवानी पेठ सि.स.नं. 271,272 | श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुल | 15 (पहिला मजला) |
| 3 | भवानी पेठ सि.स.नं.35 अबक | श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुल | 1,2,6,7,9,10 (दुसरा मजला) |
| 4 | सदाशिव पेठ | मच्छी मार्केट | 10,15,17,20,22 (तळ मजला) |
| 5 | सदरबझार | लो कॉस्ट शॉपींग सेंटर | गाळे क्रम 10,13,21,23,29,30,31,37,40, 43,44,49,50,56,58,61 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 72,74,75,79,80,82 (तळ मजला) |
| 6 | मल्हारपेठ | सि.स.न. 75 शॉपींग सेंटर | गाळे क्रमांक 4,8,9,13 |

उपरोक्त गाळा वाणिज्यीक कारणास्तव हस्तांतरीत केलेबाबतचा (भाडे पट्टयान दिलेबाबतचा) ठराव क्रमांक, दिनांक व अंतिम मुदत या नोंदी नसल्याने गाळे केव्हापासून संबंधितांच्या ताब्यात आहेत हे समजू शकले नाही. सदर बाब गंभीर असून नगरपरिषदेच्या उत्पन्नविषयक बाबींसंदर्भात अनास्था निदर्शक आहे.

नगरपालिका उत्पन्न वाढीच्या दृष्टीने उपरोक्त 1 ते 5 मधील उणिवांची पुर्तता तातडीने करणे गरजेचे आहे.

नगरपरिषद स्वतःची मालमत्ता विकसित करण्यासाठी लागणारे भांडवल हे स्वनिधी, शासन निधी तसेच आवश्यकतेनुसार कर्ज रुपाने निधी उभारुन निर्माण करत असते. त्याद्वारे निर्माण मालमत्तेद्वारे नगरपरिषद व नियमित उत्पन्न मिळणे अपेक्षित असते. अशा उत्पन्नातून भांडवली गुंतवणूक गोळा होऊन त्यानंतर प्राप्त होणारे उत्पन्न नगरपालिका हद्दीत करावयाच्या विकास कामांकरीता उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी नियमानुसार वेळेवर भाडेवाढ करणे तसेच नियमानुसार मालमत्तांच्या वाणिज्यीक कारणास्तव हस्तांतरणाची योग्यवेळी पुर्नप्रक्रिया होणे गरजेचे आहे.

उपरोक्त शॉपींग सेंटर व अन्य गाळे ही नगरपरिषदेची स्वमालकीची मालमत्ता ताब्यात घेण्याचे अधिकार नगरपरिषदेस आहेत. यासाठी नगरपरिषद (स्थावर मालमत्तांचे हस्तांतरण अधिनियम) 1983 कलम 16(अ)(ब)(क) मधील तरतुदींनुसार करार नगरपालिकेवर बंधनकारक रहात नाही. यानुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 92(3) तसेच नगरपालिका प्रशासन संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्रमांक 24 दिनांक 28/10/2004 व क्रमांक 39 दिनांक 10/8/2000 मधील सुचना यांचा अवलंब करणे गरजेचे आहे.

वसुली

***98 करांची मागणी नोंदवही तसेच करांची पावती पुस्तके विहीत नमुन्यात न ठेवलेबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1. जमा रक्कम भरणा चलन नमुना नंबर 56 ठेवलेले नाही.
2. नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 327 प्रमाणे नमुना नंबर 27, 35 मागणी नोंदवही ठेवलेली नाही.
3. नगरपरिषद प्रशासन स्थायी निर्देश क्रमांक 17 नुसार व परिपत्रक क्रमांक नपप्रस/1022/प्र.क्र.112/2002/16 दिनांक 3 जुन 2002 मधील अट क्रमांक 3 मध्ये नमुद केलेप्रमाणे नगरपरिषदेच्या मत्तीच्या/ऐच्छीक करांची/शुल्काची वसुली 100 टक्के करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
3. मालमत्ता करात सुसुत्रता/आणण्यासाठी भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणालीनुसार मालमत्ता कर आकारणी करणेबाबत सुचित केले असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. कर व्याज आकारणी पध्दतीमध्ये मानवी हस्तक्षेपास वाव नसलेबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.
6. न्यायालयीन प्रकरणांमुळे गुंतलेल्या कराच्या रकमांच्या वसुलीबाबत योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

सातारा नगरपरिषद, साताराचे सन 2018-19 चे लेखापरीक्षणात कर वसुली विभागाकडील अभिलेखे अर्धसमासपत्र क्रमांक 29 दिनांक 27/01/2020 रोजी मागणी केले होते त्यास कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62, 37, 327, 332, 345 नुसार नमुना नसेच नियम 75, 476 प्रमाणे नमुना नंबर 540 मध्ये पावती पुस्तके ठेऊन तीन प्रतीमधील पुर्वीचा क्रमांक घालून देण्यात आलेल्या पावतीने उपलब्ध घेण्यात येऊन स्वाक्षरी दिनांकास संबंधितास दिला पाहिजे. जमा रक्कम भरणा चलन नमुना नंबर 56 ठेवणे आवश्यक आहे.

2. नगरपालिका सातारा यांनी सन 2018-19 मध्ये वसुली विभागाकडील प्रतिदिनी सर्व पेठांमधील वसुली केलेल्या कराच्या संगणकीय पावत्या आणि त्यांचे भरणा चलन आहे याप्रमाणे निवड महिने ये – कर डे बुक जमा खतावणीचे लेखापरीक्षण केले असता नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 327 प्रमाणे नमुना नंबर 27, 35 मागणी नोंदवही न ठेवल्याने मिळकतधारकनिहाय सन 2017-18 अखेर शिल्लक थकबाकी रक्कम सन 2018-19 ला सुरुवातीची शिल्लक रक्कम आणि वसुल केलेल्या रकमेच्या नोंदी मिळकतधारकनिहाय लेखापरीक्षण करता आले नाही.

3. सन 2018-19 अखेर कराच्या थकबाकीपोटी रकमा खालीलप्रमाणे दिसून येत आहेत.

| अ.क्र. | कराचे नांव | थकबाकी रक्कम |
|---|---|---|
| 1 | एकत्रित कर | 779256 |
| 2 | शासन शिक्षण कर | 222738 |
| 3 | विशेष पाणी कर | 1228969 |
| 4 | विशेष शिक्षण कर | 41791 |
| 5 | रोजगार हमी कर | 24695 |
| 6 | वृक्ष कर | 31779 |
| 7 | मागणी नोटीस फी कर | 536 |
| 8 | वॉरंट नोटीस फी कर | 700 |
| 9 | विशेष स्वच्छता कर | 289440 |
| 10 | थकीत रकमेवरील व्याज कर | 1718198 |
| 11 | इमारत/जागा वापर फी | 10535 |
| 12 | अग्निशमन कर | 4614 |
| एकुण | | 4353251 |

सन 2018-19 अखेर कराच्या थकबाकीपोटी एकुण रक्कम रुपये 4353251/- इतकी दिसून येते. नगरपरिषद प्रशासन स्थायी निर्देश क्रमांक 17 नुसार व परिपत्रक क्रमांक नपप्रस/1022/प्र.क्र.112/2002/16 दिनांक 3 जुन 2002 मधील अट क्रमांक 3 मध्ये नमुद केलेप्रमाणे नगरपरिषदेच्या सक्तीच्या/ऐच्छीक करांची/शुल्कांची तसेच नगरपरिषदेने मंजुर केलेल्या उपविधीनुसार नगरपरिषदांनी वसुलात आणावयाच्या रकमेची सर्व प्रकारची वसुली

100 टक्के करावी असे नमुद आहे. त्यामुळे याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 105(अ) अन्वये नगरपरिषद क्षेत्रातील जमिनीचे सर्वेक्षण करुन कर आकारणी करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही कलेबाबत साधार पुर्तता दाखवावी.

4. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक 2008/466/प्र.क्र.167/2008/नवि-32 दिनांक 5 जुन 2010 नुसार मालमत्ता करात सुसुत्रता/आणण्यासाठी भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणालीनुसार मालमत्ता कर आकारणी करणेबाबत सुचित केले आहे. याबाबत नगरपरिषदेने कोणती कार्यवाही केली याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

5. महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150(अ) प्रमाणे दिलेल्या बिलामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासुन सदर दुसऱ्या सहामाहीची कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी भरावयाची आणि कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे कराची रक्कम विहीत मुदतीत भरली नाही तर रक्कम भरावयाच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यास 2 टक्केप्रमाणे शास्तीची आकारणी करुन वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे. मात्र याबाबत सत्यता ठेवणे आवश्यक आहे. व्याज आकारणी पध्दतीमध्ये मानवी हस्तक्षेपास वाव नसलेबाबत पुर्तता दाखवावी.

6. न्यायालयीन प्रकरणांमुळे गुंतलेल्या कराच्या रकमांकरीता योग्य ती कार्यवाही करुन वसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपरोक्तबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

वसुली

*99 थकबाकीबाबत सन 2018-19*

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 4342716.00 /- **आक्षेपाधीन रक्कम** रु. 4342716.00/-

| |
|---|
| नगरपरिषदेची एकुण थकबाकी 4342716/- एवढी असून मागणी रकमेतून संग्रह रक्कम वजा जाता थकबाकी रक्कम जुळत नाही. |

नगरपरिषद सातारा सन 2018-19 लेखापरीक्षणास कर वसुली विभागाकडील मागणी संग्रह थकबाकी विवरणपत्रक पाहता थकबाकीबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 85 दिनांक 24/02/2020 अन्वये

खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कराचे नांव | थकबाकी रक्कम |
|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर | 779256 |
| 2 | शासन शिक्षण कर | 222738 |
| 3 | विशेष पाणी कर | 1228969 |
| 4 | रोजगार हमी कर | 24695 |
| 5 | विशेष शिक्षण कर | 41791 |
| 6 | वृक्ष कर | 31779 |
| 7 | मागणी नोटीस फी | 536 |
| 8 | वॉरंट नोटीस फी | 700 |
| 9 | थकीत रकमेवरील शास्ती | 00 |
| 10 | विशेष स्वच्छता कर | 1718198 |
| 11 | अग्निशमन कर | 289440 |
| 12 | इमारत/जागा वापर फी | 4614 |
| एकुण | | 4342716 |

सन 2018-19 अखेर वरीलप्रमाणे थकबाकी दिसून येते. परंतू मागणी रकमेतून संग्रह रक्कम वजा जाता थकबाकी रक्कम जुळत नाही.

उपरोक्तबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी

वसुली

## *100 कर वाढ व घट नोंदवहीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 02

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| 1. नोंदवही न ठेवल्याने कररचना सदोष असलेचे नाकारता येत नाही. |
| 2. बांधकाम इमारतीवर कर आकारणीसाठी विलंब होवून नगर पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. |

नगरपरिषद सातारा चे सन 2018-19 चे लेखापरीक्षणामध्ये करविभागाकडील कर घट वाढ नोंदवहीबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्रमांक 39 नुसार नमुना क्रमांक 63 मधील तरतुदीनुसार वाढ/ घट नोंदवही ठेवलेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कमल 123 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही कारणाने मागणीमध्ये झालेला प्रत्येक बदल विहीत केलेला नमूना क्रमांक 63 मध्ये ठेवणे आवश्यक असून इमारत /मिळकतीमध्ये झालेली वाढ किंवा घट दर्शवणे व तशा नोंदी घेणे आवश्यक असताना कर विभागाने तशी नोंदवही ठेवलेली नाही.त्यामुळे सन 2018-19 मध्ये वाढ व घट किती झाली हे समजून येत नाही व त्यामुळे कर निर्धारणा प्रकरणांची योग्य कर निर्धारणा झाल्याची तपासणी लेखापरीक्षणाला करता आली नाही. नोंदवही न ठेवल्याने कररचना सदोष असलेचे नाकारता येत नाही.

2.सन 2015 ते 2018 अखेर ज्या मिळकत धारकांना भोगवटा प्रमाणपत्र मंजूर केले आहे व भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले आहे. ज्या वर्षी बांधकाम पुर्ण झाले आहे त्यावेळी तात्काळ याबाबत शहर विकास विभागाने कळविणे आवश्यक होते तथापि त्याप्रमाणे कळवलेले नाही. उशीरा कळविल्याने सदर बांधकाम इमारतीवर कर आकारणीसाठी विलंब होवून नगर पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

वसुली

## *101 संकलित कराच्या थकबाकीबाबत.*

00

**लेखापरीक्षण वर्ष** : 2018-2019

**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| संकलित कराच्या थकबाकीमध्ये सुरुवातीची शिल्लक व अखेरची शिल्लक यामध्ये तफावत आढळून येत आहे. |

नगरपरिषद सातारा सन 2018-19 लेखापरीक्षणात कर वसुली विभागाकडील सन 2017-18 अखेर थकबाकी आणि सन 2018-19 सुरुवातीची शिल्लक यांची विवरणपत्रके पाहता आढळलेल्या तफावतीबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासापत्र क्रमांक 84 दिनांक 24/02/2020 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | करांचे नांव | सन 2017-18 अखेर शिल्लक रुपये | सन 2018-19 सुरुवातीची शिल्लक रुपये | तफावत रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर | 71957917 | 69375285 | (-)2582632 |
| 2 | शासन शिक्षण कर | 23501802 | 22588161 | (-)913641 |
| 3 | विशेष पाणी कर | 28263636 | 33459126 | (+)5195490 |
| 4 | रोजगार हमी कर | 3435463 | 3282220 | (-)153243 |
| 5 | विशेष शिक्षण कर | 4100762 | 3953888 | (-)146974 |
| 6 | वृक्ष कर | 3248007 | 3119234 | (-)128773 |
| 7 | मागणी नोटीस फी | 13373 | 13216 | (-)157 |
| 8 | वॉरंट नोटीस फी | 98877 | 97177 | (-)1700 |
| 9 | डिसऑनर धनादेशावरील कर | 11100 | 13050 | (+)1950 |
| 10 | आऊट स्टेशन चेक कर | 00 | 00 | 00 |
| 11 | थकीत रकमेवरील शास्ती | 100492020 | 128972036 | (+)28480016 |
| 12 | विशेष स्वच्छता कर | 4327202 | 3665853 | (-)661349 |
| 13 | अग्निशमन कर | 617855 | 470854 | (-)147001 |
| 14 | सामान्य पाणी पट्टी | 00 | 00 | 00 |
| 15 | इमारत/जागा वापर फी | 19261216 | 18942618 | (-)318598 |
| एकुण | | | | (-)28623488 |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सन 2017-18 अखेर शिल्लक रक्कम सन 2018-19 ला सुरुवातीला शिल्लक रक्कम कमी/जादा नोंदी दिसून येतात तरी याबाबत लेखापरीक्षणास पुर्तता दाखवावी.

पाणीपुरवठा

***102 पाणी तपासणी फी रकमेबाबत.***

06

**लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 130000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 130000.00/-

| |
|---|
| सार्वजनिक आरोग्य विभाग , महाराष्ट्र शासन निर्णय शासन शुध्दीपत्रक क्रमांक राप्रआ-2011/प्र.क्र.217/11/आरोग्य/3अ दिनांक 16/4/2013 मध्ये मध्ये नमुद केलेल्या पाण्याच्या 1 ते 69 बाबींपैकी कोणत्या बाबींची (पाण्यातील) तपासणी केली याचा तपशिल बिलात नमूद नाही. |

लेखापरीक्षण कालावधी सन 2018-19 मध्ये नगरपालिका सातारा यांनी पाणी तपासणी फी करीता एकुण रुपये 130000/- इतका खर्च केलेला आहे याबर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.
प्रमाणक क्रमांक 1711 दिनांक 15/2/2019 रक्कम रुपये 130000/-

उपरोक्त प्रमाणकांचे अवलोकन केले असता कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी , जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा , सातारा यांच्या मागणी बिल क्रमांक 008960 दिनांक 25/1/2019 अन्वये त्यांना रुपये 130000/- इतके प्रदान केलेले आहे. याबाबत कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी सातारा यांनी वर्षात विविध प्रभागातील दरमहा 40 नमुने तपासणी केली आहे. परंतु नगरपरिषद हद्दीतील सर्व भागांतील पाणी तपासणी होत असल्याबाबत साधार पुर्तता दाखवावी.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग , महाराष्ट्र शासन निर्णय शासन शुध्दीपत्रक क्रमांक राप्रआ-2011/प्र.क्र.217/11/आरोग्य/3अ दिनांक 16/4/2013 मध्ये प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी दर निश्चित केले आहेत. त्यानुसार परिशिष्ट ब मध्ये पाण्याच्या 1 ते 69 बाबींकरीता वेगवेगळे दर निश्चित केले आहेत. सदर 1 ते 69 बाबींपैकी कोणत्या बाबींची (पाण्यातील) तपासणी केली याचाही तपशिल बिलात नमूद नाही , त्यामुळे प्रयोगशाळेमार्फत नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली याचा लेखापरीक्षणास बोध होत नाही.

उपरोक्तबाबत साधार पुर्तता दाखवावी.

विद्युत

### 103 पथदिवे देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2018-2019

अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9इ

गुंतलेली रक्कम रु. 19993905.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19993905.00/-

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिशिष्ठ क मधील बाब क्रमांक 5 नुसार कराराचा कालावधी ठरविताना सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराला स्वत:ची साधनसामुग्री गुंतवणुक करणे आवश्यक असल्यास असे करार दिर्घ मुदतीचे म्हणजेच 3 ते 7 वर्ष या कालावधीकरीता करणे आवश्यक असतांना 10 वर्षासाठी सेवा पुरविण्याचा करार केल्याने नियमबाह्यता झाली आहे.

2.मक्तेदारास नियमबाह्यपणे कामास मुदतवाढ देण्यात आली आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 124 अन्वये सदर कामासाठी तांत्रीक मान्यता घेण्यात आलेली नाही.

4. दिव्यांचा पूर्नवापर न केलेने नगरपरिषद निधीचे आर्थीक नुकसान झाले आहे.

5. कोणत्या दिव्यांची दुरुस्ती केली व कोणते नवीन कार्यान्वीत केले याचा कोणताही मेळ लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

6.निविदेतील अटी शर्तीप्रमाणे ठेकेदाराने नागरिकांच्या तक्रारी स्विकारणेसाठी नगरपरिषदेत उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

7.सदरचे खरेदी साहित्याचे विनियोग व शिल्लक साहित्याबाबत नमुना नंबर 21 साठा नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे साहित्याचा ताळमेळ घेता आला नाही.

8.स्थायी निदेश क्रमांक 36 नुसार साहित्याच्या पर्यवेक्षणासाठी एक समिती नेमणे आवश्यक असताना अशा प्रकारची समिती स्थापन केलेली नाही.

9..नगरपरिषद सातारा विद्युत विभागाने पोल नोंदवही ठेवलेली नाही व विद्युत साहित्याची / दुरुस्ती बाबत कोणत्या प्रभागातून किती मागणी आहे याबाबत प्रभागनिहाय मागणी दिसून येत नाही.

10.नगरपरिषद सातारा यांनी विद्युत साहित्य दुरुस्ती बाबत इतिहास नोंदवही ( History sheet) अद्ययावत ठेवनेत आलेली नाही.

11.मक्तेदाराच्या देयकातून आयकर कपात केलेला नाही.

12.महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 चे नियम 139 नुसार नमुना क्रमांक 62 मध्ये काम पुर्णत्व प्रमाणपत्र नसल्याने काम कधी पूर्ण झाले याचा बोध होत नाही.

नगरपरिषद सातारा ने सन 2015-16 मध्ये ई निविदा प्रक्रीयेचा अवलंब करुन एल.ई.डी. दिवे खरेदीबाबतची प्रक्रीया राबविली होती. याबाबत दि. 02/04/15 रोजी दैनिक सकाळ मध्ये जाहिरात देऊन त्यानुसार ई निविदेव्दारे प्रज्वल भारत स्ट्रीट लाईट सोल्यूशन प्रा. लि. सांगली या पुरवठादारास याबाबतचा ठेका मंजूर करण्यात आलेला होता. सन 2016-17 मध्ये करारातील अटी व शर्तीनुसार खालील तपशिलानुसार एकूण देयकाच्या 30 टक्के रक्कम अदा करण्यात आलेली आहे तसेच उर्वरित रक्कम 42 हप्त्यांमध्ये खालील प्रमाणकान्वये अदा करणेत आलेली आहे .

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 232 | 29/05/2018 | 3963502 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |

| | | | |
|---|---|---|---|
| 258 | 11/06/2018 | 3963502 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |
| 728 | 16/08/2018 | 3194742 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |
| 1102 | 22/10/2018 | 2684118 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |
| 1471 | 28/12/2018 | 3790102 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |
| 2138 | 30/03/2019 | 2397939 | प्रज्वल भारत एस एस प्रा लि. |
| | | 19993905 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.उपरोक्त प्रमाणकान्वये रक्कम मक्तेदार प्रज्वल भारत एस एस प्रा लि. सांगली यांना एल ई डी दिवे पुरवविणेकामी अदा केलेचे दिसुन येते सदर मक्तेदार यांना ठेका 6 महिने कालावधीमध्ये जुने दिवे काढुन नवीन दिवे बसवणे व 10 वर्षे देखभाल व दुरुस्ती करणे यासाठी पुरवठा आदेश देणेत आल्याचे दिसुन येते परंतु नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिशिष्ट क मधील बाब क्रमांक 5 नुसार करारांचा कालावधी ठरविताना सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराला स्वत:ची साधनसामुग्री गुंतवणुक करणे आवश्यक असल्यास असे करार दिर्घ मुदतीचे म्हणजेच 3 ते 7 वर्ष या कालावधीकरीता असु शकतात मात्र उपरोक्त मक्तेदार यांना 10 वर्षासाठी सेवा पुरविण्याचा करार केल्याने नियमबाह्यता झाली आहे.

2.महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक भांखंस2004/प्र.क्र.256/08/उद्योग/4 दिनांक 10/10/2004 नुसार सर्वसाधारण कोणत्याही करारास मुदतवाढ देणेत येऊ नये तसेच अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावली नुसार संबंधित विभागांशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही करावी असे असतांना नगरपरिषदेने तशी कार्यवाही केलेली नाही.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 124 अन्वये सदर कामासाठी तांत्रीक मान्यता घेण्यात आलेली नाही.

4.जंगम मालमत्ता नोंदवही पान नं. 65 नुसार 2907 जुने दिवे काढलेबाबत नोंद आहे तथापि चालू स्थितीतील दिवे काढुन त्याठिकाणी नवीन एलईडी दिवे बसविण्यात आले. त्याचवेळी काढण्यात आलेल्या दिव्यांच्या वापराबाबत योग्य नियोजन करणे आवश्यक असताना तशी कोणतीही कार्यवाही न करता केवळ सदर दिवे भांडार विभागाकडे जमा करण्यात आले व भांडार विभागाकडेही ते तसेच विनावापर पडून असलेचे दिसून आले. कालांतराने सदर दिवे बाद होणार असून केवळ योग्य नियोजनाअभावी व काढण्यात आलेल्या दिव्यांचा पूर्नवापर न केलेने नगरपरिषद निधीचे आर्थीक नुकसान झाले आहे.

5.एलईडी दिवे कोणत्या प्रभागात किती बसविण्यात आले याबाबतच्या कोणत्याही नोंदी विद्युत विभागाने न ठेवल्याने जुन्या पध्दतीनुसार दिवे बसविण्याचा खर्च व नवीन दिव्यांचा खर्च असे दोन्ही खर्च नगरपरिषदेमार्फत सुरु असून प्रभागनिहाय नोंदीअभावी कोणत्या दिव्यांची दुरुस्ती केली व कोणते नवीन कार्यान्वीत केले याचा कोणताही मेळ लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

6.निविदेतील अटी शर्तीप्रमाणे ठेकेदाराने नागरिकांच्या तक्रारी स्विकारणेसाठी नगरपरिषदेत उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तथापि ठेकेदार नगरपरिषदेत उपस्थिती असलेबाबत व नागरिकांच्या तक्रारी नोंदवही उपलब्ध न झालेने ठेकेदार नगरपरिषदेत हजर राहिलेबाबत नोंदवही उपलब्ध न झालेने तक्रारींचे निवारण झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

7.सदरचे खरेदी साहित्याचे विनियोग व शिल्लक साहित्याबाबत नमुना नंबर 21 साठा नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे साहित्याचा ताळमेळ घेता आला नाही.

8.स्थायी निदेश क्रमांक 36 क्र.नपस/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/9 दि.29-12-2005 मधील परिशिष्ट क मधील बाब क्रमांक 6 अन्वये प्राप्त साहित्याच्या पर्यवेक्षणासाठी एक समिती नेमणे आवश्यक असताना नगरपालिकेने उपरोक्त दिवाबत्ती व इतर साहित्य स्विकारताना अशा प्रकारची समिती स्थापन केलेली नाही.

9.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 144 नुसार विद्युत पोलांची नोंद नगरपरिषदेच्या प्राधिकृत अधिका-याच्या आद्याक्षरी निशी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील

नियम 147(1) नुसार नमुना नंबर 119 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात पुस्तक ठेवून त्यात नगरपरिषदेने बसविलेल्या विद्युत दिव्यांची संख्या दर्शविणे आवश्यक आहे. नगरपरिषद सातारा विद्युत विभागाने पोल नोंदवही ठेवलेली नाही व विद्युत साहित्याची / दुरुस्ती बाबत कोणत्या प्रभागातून किती मागणी आहे याबाबत प्रभागनिहाय मागणी दिसून येत नाही.

10.नगरपरिषद सातारा यांनी विद्युत साहित्य दुरुस्ती बाबत इतिहास नोंदवही ( History sheet) अद्ययावत ठेवनेत आलेली नाही. त्यामुळे पूर्वी खरेदी केलेले साहित्य Warranty/ Guaranty मध्ये आहे किंवा नाही ? व त्याप्रमाणे साहित्य बदल ( Replace) किंवा नवीन खरेदी करावयाचे आहे? याबाबत खात्री करता येत नाही.

11.आयकर नियम 194 (सी.) अन्वये 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना , नगरपालिकेने मक्तेदाराचे देयकातून 1 % प्रमाणे आयकराची रक्कम कपात केली आहे. उर्वरित आयकराची रक्कम 1 % प्रमाणे परिगणना करून संबंधितांनाकडून वसुल करुन शासनास भरणा आवश्यक आहे.

12.महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 चे नियम 139 नुसार नमुना क्रमांक 62 मध्ये काम पुर्णत्व प्रमाणपत्र नसल्याने काम कधी पुर्ण झाले याचा बोध होत नाही.

उपरोक्त पुर्ततेअभावी रक्कम रुपये 19993905/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अंकुर नगरपरिषद साताराने उपलब्ध केलेल्या कागदपत्राच्या आधारे तपासणी केली असता ते बरोबर असल्याचे लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपास अधीन राहून प्रमाणित करण्यात येते.

तसेच उक्त कारणासाठी अनुदाने मंजूर करण्यात आली होती त्याच कारणासाठी त्याचा विनियोग करण्यात आला आहे असे लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपास अधीन राहून प्रमाणित करण्यात येत आहे.

अहवालाचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 10 (1) नुसार अहवाल मिळाले पासून चार महिन्याच्या आत अहवालातील आक्षेपाची पुर्तता करुन नगरपरिषद साताराच्या ठरावाने मान्यता घेऊन ठरावाच्या प्रतीसह या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच सदरचा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याची पोहोच अहवाल मिळालेल्या दिनांकासह देण्यात यावी.

(दि. रा. सुर्यवंशी)
सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे

जा.क्र.स्था 2/अ/न. प. सातारा/लेप/सातारा/2018-19/ ४२० दिनांक १५/९/२०२०.

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

1. मा. सचिव नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32
2. मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
3. मा. विभागीय आयुक्त, तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन पुणे विभाग पुणे
4. मा. संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य नवी मुंबई
5. मा. सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण, नवी मुंबई
6. मा. जिल्हाधिकारी, सातारा
7. वरिष्ठ लेखा परीक्षा अधिकारी (बाह्य लेखापरिक्षण) विभाग क्र.4, मुंबई

प्रत :

1. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा
2. अभिलेख स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, पुणे विभाग

(दि. रा. सुर्यवंशी)
सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे

## लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|

विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10 | 3421400.00 | ---- | ---- | ---- | 3421400.00 |
| 2 | 13 | 803187.00 | ---- | ---- | ---- | 803187.00 |
| 3 | 15 | 3001963.00 | ---- | ---- | ---- | 3001963.00 |
| 4 | 16 | ---- | ---- | 181244.00 | ---- | 181244.00 |
| 5 | 17 | 601380.00 | ---- | ---- | ---- | 601380.00 |
| 6 | 18 | ---- | ---- | 1184000.00 | 87000.00 | 1271000.00 |
| 7 | 19 | 298000.00 | ---- | ---- | ---- | 298000.00 |
| 8 | 20 | 64600.00 | ---- | ---- | ---- | 64600.00 |
| 9 | 21 | 341622.00 | ---- | ---- | ---- | 341622.00 |
| 10 | 23 | 952010.00 | ---- | ---- | ---- | 952010.00 |
| 11 | 24 | 168350.00 | ---- | ---- | ---- | 168350.00 |
| 12 | 25 | 5706685.00 | ---- | ---- | ---- | 5706685.00 |
| 13 | 26 | 10414496.00 | ---- | ---- | ---- | 10414496.00 |
| 14 | 27 | 22705755.00 | ---- | ---- | ---- | 22705755.00 |
| 15 | 31 | ---- | 1100.00 | ---- | ---- | 1100.00 |
| 16 | 32 | ---- | ---- | ---- | 267935.00 | 267935.00 |
| 17 | 35 | ---- | ---- | ---- | 5915.00 | 5915.00 |
| 18 | 36 | ---- | 300.00 | ---- | ---- | 300.00 |
| 19 | 39 | ---- | ---- | 4306243.00 | 85157.00 | 4391400.00 |
| 20 | 40 | ---- | ---- | 3687830.00 | 18253.00 | 3706083.00 |
| 21 | 41 | ---- | 439860.00 | ---- | ---- | 439860.00 |
| 22 | 42 | ---- | 18250.00 | ---- | ---- | 18250.00 |
| 23 | 44 | 386362.00 | 7885.00 | ---- | ---- | 394247.00 |
| 24 | 45 | 10009959.00 | 187124.00 | ---- | ---- | 10197083.00 |
| 25 | 46 | 1938889.00 | 148023.00 | ---- | ---- | 2086912.00 |
| 26 | 47 | ---- | ---- | 2845854.00 | 500.00 | 2846354.00 |
| 27 | 48 | ---- | ---- | 2482344.00 | 106906.00 | 2589250.00 |
| 28 | 49 | ---- | ---- | 3597601.00 | 117349.00 | 3714950.00 |
| 29 | 50 | ---- | ---- | 2589243.00 | 66392.00 | 2655635.00 |
| 30 | 51 | ---- | ---- | 2213648.00 | 54929.00 | 2268577.00 |
| 31 | 52 | ---- | ---- | 939314.00 | 16960.00 | 956274.00 |
| 32 | 53 | 12202257.00 | 127000.00 | ---- | ---- | 12329257.00 |
| 33 | 54 | 1140038.00 | 6131.00 | ---- | ---- | 1146169.00 |
| 34 | 55 | 1668029.00 | 20401.00 | ---- | ---- | 1688436.00 |
| 35 | 56 | 976775.00 | 8827.00 | ---- | ---- | 985602.00 |
| 36 | 57 | 2986453.00 | 15510.00 | ---- | ---- | 3001963.00 |
| 37 | 58 | ---- | ---- | 295109.00 | 24930.00 | 320039.00 |
| 38 | 59 | 2632263.00 | 26590.00 | ---- | ---- | 2658853.00 |
| 39 | 60 | 41200.00 | 7600.00 | ---- | ---- | 48800.00 |
| 40 | 61 | 114361.00 | 3291.00 | ---- | ---- | 117652.00 |
| 41 | 62 | 1521704.00 | 31055.00 | ---- | ---- | 1552759.00 |
| 42 | 63 | ---- | ---- | ---- | ---- | 199200.00 |
| 43 | 64 | 1285000.00 | 17750.00 | ---- | ---- | 1302750.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 44 | 65 | 3749727.00 | 23325.00 | ---- | ---- | 3773052.00 |
| 45 | 66 | 1888616.00 | 25000.00 | ---- | ---- | 1913616.00 |
| 46 | 68 | ---- | 168696.00 | ---- | ---- | 168696.00 |
| 47 | 71 | 555128.00 | ---- | ---- | ---- | 555128.00 |
| 48 | 72 | 6938849.00 | ---- | ---- | ---- | 6938849.00 |
| 49 | 77 | 120700654.00 | ---- | ---- | ---- | 120700654.00 |
| 50 | 78 | 9833.00 | ---- | ---- | ---- | 9833.00 |
| 51 | 82 | 231000.00 | ---- | ---- | ---- | 231000.00 |
| 52 | 85 | 188500.00 | ---- | ---- | ---- | 188500.00 |
| 53 | 89 | 1019800.00 | ---- | ---- | ---- | 1019800.00 |
| 54 | 92 | 201049.00 | ---- | ---- | ---- | 201049.00 |
| 55 | 94 | 2142856.00 | ---- | ---- | ---- | 2142856.00 |
| 56 | 96 | 113105.00 | ---- | ---- | ---- | 113105.00 |
| 57 | 99 | 4342716.00 | ---- | ---- | ---- | 4342716.00 |
| 58 | 102 | 130000.00 | ---- | ---- | ---- | 130000.00 |
| 59 | 103 | 19993905.00 | ---- | ---- | ---- | 19993905.00 |
| **एकूण रक्कम** | | **247588476** | **1283718** | **24322430** | **852226** | **274246056** |

नमुना २८

(नियम ६० पहा)

# सातारा नगर परिषदेच्या

सन २०१८-२०१९ या वर्षाचा

## वार्षिक लेख्यांचा सारांश

सातारा नगर परिषद सातारा

नमुना
(नियम

सातारा नगर परिषदेच्या सन २०१८-१९

| जमा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
| कार्य संकेतांक | | | | | |
| भाग —१ | | | | | |
| महसुली प्राप्त रकमा | | | | | |
| क | कर महसूल | | | | |
| | मालमत्ता करावरील एकत्रित कर | 91111190000 | १२००००००० | ८२२३९,२६२ | (-) |
| | वसुली आगाऊ रक्कम | 91111190001 | ६००,००० | ८८२८३० | (-) |
| | | | | | |
| | | | | | |
| | इतर | | | | |
| | जाहिरात कर | 92011200000 | ९,५०००० | २३८७८२ | (+) |
| | विशेष शिक्षण कर | 94711400000 | ५०,००,००० | ४२३३५५२ | (-) |
| | वृक्ष उपकर | 94811900000 | ५०००००० | ३११२०४४ | (-) |
| | करमणूक कर (शो टॅक्स) | 91711310000 | ४०००० | ३२१८५ | (-) |
| | अग्निशमन कर | ९१६११४००००० | २०००००० | १४४२,९५८ | (-) |
| | विशेष शिक्षणकर | ९१५११४००००० | १००००००० | १०८५४,००० | (+) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

६० पहा)

या वर्षाच्या वार्षिक लेख्यांचा सारांश

| खर्च | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| खर्च रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
| कार्य संकेतांक | | | | | |
| भाग दोन | | | | | |
| महसुली खर्च | | | | | |
| क | आस्थापना खर्च | | | | |
| १ | वेतन | 03221100000 | | | |
| | सर्व | | | | |
| | मूळ वेतन | 03221110000 | ४५४००००० | ४६३२४८३६ | (+) |
| | महागाई भत्ता | 03221120000 | ४४४००००० | ४३८९९०४८ | (−) |
| | ग्रेड पे | 03221100000 | १४५००००० | १४३४८३९९ | (−) |
| | घरभाडे भत्ता | 03221140000 | ५२००००० | ५१६०५९२ | (−) |
| | इतर | | | | |
| | | | | | |
| २ | मजुरी | | | | |
| ३ | भत्ते | | | | |
| | अनाक्लिन भत्ता | 03221390000 | ४०००० | ३९९२५ | (−) |
| | धुलाई भत्ता | 03221310000 | २४०००० | २१४९४५ | (−) |
| | अतिकालिक भत्ता | 03221320000 | १०००० | ८८२० | (−) |
| | वहातुक भत्ता | 03221390000 | २५००००० | २४४८६३२ | (−) |
| | | | | | |
| ४ | लाभ | | | | |
| | सर्व | | | | |
| | वैद्यकीय प्रतिपूर्ती | 03221410000 | १५००००० | ११८०६६२ | (−) |
| | कालबद्ध फरक/६ वा वेतन आयोग फरक | 03221490000 | १०००००००० | ५५३५६०३ | (−) |

सातारा नगर परिषद सातारा

## जमा

| जमा रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (क) | | ११२८५०००० | १०२५३८६६३७ | |
| ख | अभिहस्तांकित महसूल आणि भरपाई | | | | |
| | शासनाने वसूल केलेल्या करांचा आणि शुल्कांचा हिस्सा | | | | |
| | सर्व | | | | |
| | मालमत्ता हस्तांतरण / मुद्रांक शुल्क अनुदान | 04312110000 | २५०००००० | १३८२३८०५ | (-) |
| | करमणूक करअनुदान | 04312120000 | ५०००००० | - | - |
| | कर महसूल अनुदान/जमिन महसूल | 04312130000 | २००००० | - | - |
| | मोटार वाहन कर अनुदान | 0431214000 | - | | |
| | खनिज कर (लहान) | 04312150000 | - | | |
| | खनिज कर (मोठे) | 04312160000 | - | | |
| | पाणी उपकर | 04312170000 | - | | |
| | इतर (कोर्ट अनुदान) | 04312190000 | २०००० | २२५०० | (+) |
| | कर आणि शुल्क यांच्या बदल्यात भरपाई | | | | |
| | सर्व | | | | |
| | जकात कराच्या बदल्यात भरपाई (सहाय्यक अनुदान) | 04312210000 | २८५०००००० | २०९८८७५०५ | (-) |
| | इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | कर्मचाऱ्यांचा विमा | | - - | १०,६००/ | (+) |
| | कर्मचारी साहित्य (रेनकोट, छत्री) | | - | | |
| | कर्मचाऱ्यांना गणवेश | 03221450000 | ६००००० | ११,३२,३६२/ | (+) |
| | एच आर डी कार्यक्रम | | | | |
| | ~~शिक्षण आणि वाढी~~ [illegible] | 03221470000 | ५५३७५०० | ५५,३७,५००/ | - |
| | इतर | | | | |
| ५ | अंशदान | | | | |
| | वेतन राखीव निधी | 04329400000 | १५००००० | - | - |
| | अग्नि सुरक्षा निधी | | ५००००० | - | - |
| | प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्याचे निवृत्तीवेतन | 03221520000 | १०००००० | १६६,६६६/ | (-) |
| | रजा वेतन अंशदान | 03221520000 | ५००००० | ३००,३५२/ | (-) |
| | भविष्य निर्वाह निधी | | २०००००० | - | |
| | घसारा निधी | | ५००००० | - | |
| ६ | मोबदला | | | | |
| | सर्व | | | | |
| | पदाधिकारी नसलेले | | | | |
| | सल्लागार | | | | |
| | संगणक ऑपरेटर, कनिष्ठ अभियंता प्रशिक्षणार्थी, वाहन चालक इत्यादी मानधन | 03221690000 | ७०००००० | ५३६७,६५८/ | (+) |
| | [illegible] | | ३५००००० | २५,५६०१६/ | (-) |
| ७ | निवृत्ती वेतन आणि अंतिम लाभ | | | | |
| | सर्व | | | | |
| | नियमित निवृत्ती वेतन | 03921710000 | ६२५००००० | ६३०२६५८९/ | (+) |

सातारा नगर परिषद सातारा

## जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ख) | | ३३५९२०००० | २८५०२०००९७ | |
| ग | महसुली अनुदाने, अंशदान आणि अर्थसहाय्य | | | | |
| | महसुली अनुदाने | | | | |
| | सर्व | | | | |
| | महागाई भत्ता | 04313110000 | | | |
| | कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते | 04313120000 | | | |
| | इतर | | | | |
| | खर्चाची प्रतिपूर्ती | | | | |
| | आर्थिक व सामाजिक जातनिहाय सर्वेक्षण अनुदान | 04313210001 | - | | |
| | जनगणना अनुदान | 04313210000 | - | | |
| | पशुगणना मानधन | 04313290001 | - | | |
| | आर्थिक गणना मानधन | 04313290002 | - | | |
| | शिक्षण उपकर } | 04313310000 | } ५००००० | - | - |
| | रोहयो उपकर } [illegible] | 04313320000 | | | |
| | हुतात्मा स्मारक देखभाल दुरुस्ती अनुदान | 04313290005 | ७५०००० | ७२५०००/ | (-) |
| | इतर उपकर | 04313390000 | - | | |
| | इतर | 04313290000 | - | | |
| | [illegible] केंद्र | 04331300000 | ५००००० | - | - |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | कुटुंब निवृत्तीवेतन | 03921720000 | | - | |
| | निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण | 03921730000 | | - | |
| | उपदान | 03921740000 | | - | |
| | निवृत्ति वेतनावरील प्रवास भत्ता | | | - | |
| | निवृत्ति वेतनावरील इतर अंतिम लाभ | | | - | |
| ८ | [illegible] | | ३000000 | - | |
| | [illegible] | | 2000000 | - | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (क) | | | २४,७३,८९,८०२ | |
| ख | प्रशासकीय खर्च | | | | |
| १ | कार्यालयीन खर्च | | | | |
| | [illegible] | - | १00,000 | ७४,३००/ | (-) |
| | पाणी आकार | 3122211000 | | - | |
| | वीज आकार | | | - | |
| | स्ट्रीट लाईट | 24122120000 | १२,000,000 | १०,६१,८,७७०/ | (-) |
| | इतर वीज आकार | 03922120000 | २,६५,00,000 | १५०,३६,२११/ | (-) |
| | अल्पोपहारावरील खर्च / चहापान | 03922130000 | २४0000 | २,१३,७०५/ | (-) |
| | मुद्रण व लेखनसामग्री (छपाई) | 03922140000 | ४00000 | ६७५,७६२/ | (-) |
| | कार्यालयीन उपभोग्य वस्तूंची खरेदी स्टेशनरी, फर्निचर | | ७४0000 | ५,१५,८२५/ | (+) |



सातारा

## जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ग) | | १७५०,००० | ७२५८००७ | |
| घ | नगरपरिषद मालमत्तांपासून भाड्याचे उत्पन्न | | | | |
| | जमिनीपासून भाडे | | | | |
| | सर्व | | | | |
| | खुल्या जागा भाडे | 45714110000 | ५०,००,००० | ३८५८८८३ | (-) |
| | इमारती भाडे | 45114200000 | ८०००००० | ८००१७७१ | (+) |
| | मंगल कार्यालय भाडे | 51214290000 | - | | |
| | कर्मचारी वसाहत | 45714210000 | - | | |
| | निवासी जागा (कर्मचारी वसाहती व्यतिरिक्त) | 45714220000 | - | | |
| | कार्यालयाची जागा | | | | |
| | दुकाने | 45714240000 | - | | |
| | इतर | | | | |
| | इतर स्थिर मत्तांपासून भाडे | | | | |
| | संयंत्र आणि यंत्रसामग्री यांपासून भाडे | | - | | |
| | वाहनांपासून भाडे | 81114600000<br>85014600000 | ५००,००० | ८०,००० | (-) |
| | इतर मत्तापासून भाडे | | - | - | |
| | [illegible] | - | - | ४०५७८३ | (-) |
| | | | | | |
| | | | | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | मुद्रांक खर्च (वारनिशी) | 03122240000 | 24000 | 20,309 | (–) |
| | अध्यक्ष मानधन | 0221690000 | 50000 | 42000 | (–) |
| | मालमत्तेचा विमा / वाहन विमा | 83022160000 | 240000 | 414037 | (+) |
| | बिगर सिंचन पाणीपट्टी | 31425100000 | 2800000 | 2220238 | (–) |
| २ | भाडे, दर व कर | | | | |
| | [illegible] | | 15000 | 15000 | – |
| | दूरध्वनी | 03922210000 | 800000 | ८३७८११ | (+) |
| | भ्रमणध्वनी | 03922220000 | | | |
| | फॅक्स आणि तार | | | | |
| | टपाल व कुरियर आकार | 03922240000 | | | |
| | प्रदूषण नियंत्रण मंडळाला उपकर | 31922250000 | | | |
| | खाजगी पाणी टँकर भाडे | 32122290000 | 500000 | ३७०७४४ | (–) |
| ३ | दळणवळण खर्च | | | | |
| | सर्व | | | | |
| | दूरध्वनी व फॅक्स | | | | |
| | भ्रमणध्वनी | | | | |
| | टपाल व कुरियर आकार | | | | |
| ४ | पुस्तके आणि नियतकालिके | | | | |
| | सर्व | | | | |
| | वर्तमानपत्रे | 03922410000 | ७0000 | ३२४५७ | (–) |
| | नियतकालिके आणि मास पत्रिका | | | | |
| | इतर | | | | |
| ५ | प्रवास व वाहन भत्ता | | | | |
| | सर्व | | | | |
| | प्रवास भत्ता | 03922510000 | 30000 | ४१४४७ | (+) |

८

# जमा

| जमा रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (घ) | | १०५००,००० | ८३,२८,३६७ | |
| ड | फी वापरकर्ता आकार आणि द्रव्यदंड | | | | |
| | नगरपालिका मालमत्तांचा तात्पुरता वापर करण्याकरिता आकार | | | | |
| | नाट्यगृह भाडे | 53114290000 | ८००००० | १०,२८,३०७/ | (+) |
| | तात्पुरते बांधकाम उभारणे | | - | | |
| | बांधकाम साहित्याचा साठा करणे | | - | | |
| | अतिक्रमण फी | | - | | |
| | रस्ता कमी करण्याची फी | | - | | |
| | वाहन आकार | | - | | |
| | पार्किंग आकार | | - | | |
| | सुविधांचा वापर करण्याकरिता आकार पोहणे फी | 54415220000 | - | | |
| | अग्निशमन भाडे | 81114600000 | ३०००० | २३,५००/ | (-) |
| | सेप्टीक टँक भाडे | 35014600000 | ३००,००० | ३२०,०००/ | (+) |
| | कोंडवाडा फी | 94111400000 | - | - | - |
| | उद्यान फी | 55115220000 | ७५००० | - | - |
| | दवाखाना फी | 61115210000 | ५९०० | ७६८०/ | (+) |
| | हातगाडा परवाना फी | 44515170000 | २५००,००० | २३,८९,००१/ | (-) |

सातारा
सातारा

## खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | वाहन भत्ता | 03922520000 | ४००००० | ४१४८२२ | (+) |
| ६ | पेट्रोल, तेल व वंगण | 83022600000 | ४०००००० | २११२१८३ | (-) |
| ७ | फी | | - | | |
| | मोजणी फी | | २००००० | २०६००० | (+) |
| | टॅक्स कन्सलटंट फी | 04322790000 | १५०००० | ६२४०० | (-) |
| | कायदेविषयक फी | 07622720000 | ८००००० | ५१०६१० | (-) |
| | अभियांत्रिकी सेवा/आर्किटेक्चर फी | 04322790000 | १,५०,००,००० | १,२७,२२,१२६ | (-) |
| | सॉफ्टवेअर देखभाल फी | | | - | - |
| | पर्यावरण अहवाल फी | 34322740000 | २००००० | - | - |
| | तांत्रिक मंजूरी फी | 12222730000 | २५००००० | २८०४६५४ | (+) |
| | पाणी तपासणी फी | 31222790000 | ३५०००० | १३३४५० | (-) |
| ८ | जाहिरात व प्रसिद्धी | | - | | |
| | सर्व | | - | | |
| | सर्वसाधारण जाहिराती | 07322810000 | २००००० | ४२८८५६ | (+) |
| | योजनेची प्रसिद्धी | 07322820000 | १५००००० | १६३२८४२ | (+) |
| | विशेष प्रसंगावरील जाहिरात | | १०००० | - | - |
| | इतर | | - | | |
| ९ | इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सातारा नगर परिषद सातारा

# जमा

| जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| मंडई फी | 44214190000 | ८००००० | ४४४०३२ | (-) |
| मंडप फी | 45714110000 | ५००००० | ६२४२ | (-) |
| पाणी कर | 94511400000 | ४००००००० | २८६३३५६० | (-) |
| बांधकाम पाणी कर | 94511400000 | | | |
| किरकोळ पाणी विक्री | 32115170000 | २५००० | ३१६३० | (+) |
| अन्नभेसळ परवाना फी | 41415430000 | | | |
| प्रकाशने | | | | |
| मोजमाप साधन (मीटर) | | | | |
| शौचालय दाखला फी | 41115290000 | ५००० | ७९९० | (+) |
| नोंदणी, अनुज्ञप्ती आणि ना-हरकत प्रमाणपत्र फी | | | | |
| सर्व | | | | |
| परवाना फी | | | | |
| पुनर्विधिग्राह्यीकरण फी | | | | |
| अनुज्ञप्ती फी – हॉटेल | 41115430000 | २५००० | १८५०० | (-) |
| दुकाने व्यवसाय दाखला फी | 41415430000 | २००००० | २४३६०८ | (+) |
| नळ जोडणी फी | 32515440000 | ३००००० | ३११४५० | (+) |
| रस्ता खुदाई नुकसान भरपाई | 04315450000 | ४५,००,००० | ४४२४४६६ | (-) |
| माहिती अधिकाराखालील फी | 03315720000 | ४०००० | ४४२३४ | (+) |
| विवाह नोंदणी फी | 03515470000 | ७५००० | १०४३३० | (+) |
| इमारत छाननी फी | 12115599000 | १५०००० | १५४३३१ | (+) |
| बांधकाम परवानगी आकार | | | ५६१२० | |
| सर्व [illegible] फी | | - | ३६४०० | (+) |
| इमारत परवाना फी | 12115510000 | - | | |
| वसुली आकार | | - | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | एकूण (ख) | | | ५,२८,३१,२०६ | |
| ग | **व्याज व वित्त आकार** | | | | |
| | १. भारत सरकारकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याज | 04323100000 | – | | |
| | २. महाराष्ट्र शासनाकडून घेतलेले कर्ज व व्याज | 04323200000 | ४५,००,००० | | |
| | ३. नवि ६ योजना | | | – | |
| | ४. पाणी पुरवठा योजना | | | १०,३१,६५२ | (–) |
| | ५. कर्जावरील हमी शुल्क | 04322790000 | – | | |
| | ६. बँक आकार | | | | |
| | ७. इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ग) | | | १०,३१,६५२ | |
| घ | **सत्तांची दुरुस्ती व परिरक्षण** | | | | |
| | कोंडवाडा इमारत | | | | |
| | नाट्यगृह इमारत | 53124200000 | १५,००,००० | ५०४९३४ | (–) |
| | मंडई इमारत | 44224200000 | ३,००,००० | ५५४६९ | (–) |
| | ऑफीस इमारत | 45224200000 | ५६,००,००० | ५८१०७८ | (–) |
| | शाळा इमारत | 21924200000 | ४०,००,००० | ११,८४,३४३ | (–) |
| | कर्मचारी निवासस्थाने | 45424200000 | २,००,००० | १६६०४६१ | (+) |
| | समाज मंदिरे | 45424200000 | १५,००,००० | २,६८,३२५ | (–) |
| | शॉपिंग सेंटर दुरुस्ती | 45124200000 | २,००,००० | – | – |
| | हुतात्मा स्मारक | 45424200000 | २५,००,००० | १०३९११४ | (–) |

# जमा

| जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| पाडून टाकण्याचा आकार | | - | २४०००/ | (+) |
| पर्यवेक्षण आकार | | | | |
| विकास कर | 12115550000 | १,५०००,००० | १३३८५,०६३/ | (-) |
| प्रिमीयम | 12115590000 | १,२०००,००० | १३१,८८,४६२/ | (+) |
| गुंठेवारी | | - | | |
| निपटारा आकार | | - | | |
| इतर | | - | | |
| **हस्तांतरण आकार** | | - | | |
| सर्व | | - | | |
| फेरफार फी | | - | | |
| हस्तांतरण फी / नाव नोंद फी | 91915620000 | ३०००० | ३७८५०/ | (+) |
| जन्म मृत्यू नोंद फी | 03515790000 | २४०० | २७८५/ | (+) |
| इतर | | | | |
| दस्तऐवज आकार | | | | |
| सर्व | | - | | |
| प्रमाणपत्रे | | | | |
| नक्कल फी | 03515470000 | १३,००,००० | १३६७८७९/ | (+) |
| आराखड्याच्या प्रती | | - | | |
| इतर | | | | |
| **द्रव्यदंड आणि शास्ती** | | - | | |
| सर्व | | | | |
| नोटीस फी | 91915810000 | १०००० | १५८३/ | (-) |
| वारंट फी | 91915820000 | - | ६,४३५/ | (+) |
| विलंब प्रदान | | - | ३०/ | (+) |
| मागणी आकार | | - | | |

सातारा

## खर्च

| खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| पुतळे मेंटेनन्स | 55924200000 | ४०,००० | - | - |
| कास बंगला | 454242200000 | | | |
| पोहणे तलाव | 45424390000 | | | |
| गोडोली दवाखाना | 82124200000 | १,००,००० | - | - |
| सिग्नल देखभाल दुरुस्ती | 24224900000 | | | |
| शिवाजी सभागृह | | | | |
| हॉकर्स झोन तयार करणे | | | | |
| पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती | | | | |
| कास | 31924390000 | २०,००,००० | ९,१४,२३१ | (-) |
| शहापूर | 3192440000 | ८०,००,००० | ४४,०९,७८६ | (-) |
| वितरण नलिका देखभाल | 319249000 | १,००,००,००० | १,०९,४४,१५८ | (+) |
| पाण्याच्या टाक्या हौद बोअर दुरुस्ती देखभाल | 3192440000 | १०,००,००० | ६,४७,३६३ | (-) |
| पूल | 2112431000 | - | - | |
| गटारे व नाले | 23124320000 | २,००,००० | १,५६,००५ | (-) |
| मार्ग व पदपथ (रस्ते) | 21424330000 | ४४,००,००० | ४२,१७,२८६ | (-) |
| प्रसाधनगृहे, सार्व. शौचालय व मुताऱ्या | 35324340000 | ३४,००,००० | २३,६५,१९७ | (-) |
| उद्याने | 551243900000 | ४३,००,००० | ५८,३९,६७५ | (-) |
| तलाव देखभाल दुरुस्ती | 32924390000 | १५,००,००० | ११,५१,९०४ | (-) |
| संयंत्र आणि यंत्रसामग्री | | - | - | |
| वीज संच मांडणी (स्ट्रिट लाईट देखभाल व दुरुस्ती) | 24124500000 | ६८,००,००० | ६०,९४,९०४ | (-) |
| वाहने | 83024600000 | १०,००,००० | ५,६३,७७३ | (-) |
| कार्यालयीन सामग्री, संगणक | 07224700000<br>03124700000 | ५,४०,००० | ३,४२,४१५ | (-) |
| सॉफ्टवेअर देखभाल, दुरुस्ती | 07224700000 | | | |
| इतर बांधकामे | 07924900000 | - | ८१,३२५ | (+) |
| [illegible] | | - | ३००० | (+) |

| | |
|---|---|
| | ज |
| | नियमा |
| | अनाधि बांधका |
| | ठेकेदार यांचेकड् शास्ती |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | एकूण (ब |
| च | विक्री व |
| | नमुने आ यांची विक्र |
| | सर्व |
| | निविदा न |
| | आराखडे |
| | नगरपालि |
| | इतर |
| | भांडारे आ विक्री |

# जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | इतर ६०८० १०७१ | - | 20000 | १५६७०[illegible] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | एकूण (च) | | ३५०000 | ५५८०४५-[illegible] |
| छ | व्याजापासून उत्पन्न | | | |
| | बँक ठेवींवरील व्याज | 04317100000 | 10000000 | १३८६६८८[illegible] |
| | थकित घरपट्टीवरील व्याज / विलंब आकार | 91115830000 | 30000000 | १६२५१२०[illegible] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | एकूण (छ) | | 40000000 | ३०२३८२८[illegible] |
| ज | समपहृत ठेवी / ना-परतावा ठेवी इत्यादी | | | |
| | समपहृत ठेवी | | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | २. रस्ते नाले गटारे सफाई | 34327900000 | ८००००० | ७१८२,६३५ | (-) |
| | ३. साथीचे रोग | 63925790000 | १००००० | - | |
| | ४. शौचालय टाक्या उपसणे | 35324340000 | ३००००० | - | |
| | ५. इतर कार्यक्रमांवरील खर्च | | | | |
| | निवडणूक खर्च | 05025790000 | १००००० | ३७३७२ | (-) |
| | डॉ. आंबेडकर जयंती साजरी करणे | 03125790000 | ५५०००० | ५४२७०० | (-) |
| | वृक्षारोपण | | ५००००० | ४७८६१३ | (-) |
| | गणेश विसर्जन | | ५५००००० | ३८४३१९८ | (-) |
| | पशुगणना मानधन | 05025790000 | - | - | |
| | आर्थिक गणना | 05025790000 | - | - | |
| | घरपट्टी परतावे | 91029500000 | ३५००००० | ४७१४६०६ | (+) |
| | इतर परतावे | 04329500000 | 2200000 | ५८६६४५२ | (+) |
| | जनगणना खर्च | 05025790000 | | | |
| | आर्थिक सामाजिक सर्वेक्षण | 05025750000 | | | |
| | वृक्षगणना | | | | |
| | विद्युत साहित्य खरेदी | - | 20000 | १५७०८४ | (+) |
| | [illegible] | | - | ३४४०१२ | (+) |
| | पगार पुरस्कार देयो | | 200000 | ६०००० | (-) |
| | [illegible] | | - | १५८८३२८ | (+) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ज) | | | ४५८५९१९१ | |
| च | दिलेली महसुली अनुदाने, अशंदाने आणि अर्थसहाय्ये | | | | |
| | १. अनुदाने | | | | |
| | १. अंशदाने<br>शिक्षण मंडळ | 82227200000 | २९०००००० | १९०४०६५८ | (-) |

सातारा नगर परिषद सातारा

# जमा

| जमा रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | ना–परतावा ठेवी | | | | |
| | व्यपगत ठेवी | | | | |
| | इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकूण (ज)** | | | | |
| **झ** | **इतर उत्पन्न** | | | | |
| | मत्तांच्या विक्रीवरील नफा | | | | |
| | कर्मचाऱ्यांकडून वसुली / ऑडीट वसुली व इतर | 043192000000 | १०००,००० | ६८४६८८६ | (-) |
| | **संकीर्ण** | | | | |
| | किरकोळ जमा / जादा गेलेला वसूल | 04319900000 | ४०००,००० | ८१०२०४३ | (+) |
| | घरपट्टी सूट | | | | |
| | लाभार्थी हिस्सा (IHSDP ) | | २३३५००० | ४५०००० | (-) |
| | साक्षी भत्ता | 04319900000 | | | |
| | निर्लेखित केलेली अधिक्य तरतूद | 04331830000 | | | |
| | वृक्ष संवर्धन निधीकडून वर्ग रक्कम | 04331610000 | | | |

# खर्च

| खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| अग्निशमन केंद्र | 81127200000 | | | |
| लोकल सेल्फ गव्हर्मेंट | 03127200000 | | | |
| २. अर्थसहाय्य | 08027490000 | | | |
| ३. जनतेकरिता कल्याण कार्यक्रम | | | | |
| शिक्षक दिन साजरा करणे | 08027490000 | | | |
| कृषी जागर साहित्य संमेलन | 08027490000 | | | |
| अंत्यसंस्कार मंडळांना अर्थ सहाय्य | 58027300000 | ५,००,००० | ५,४६,०८५ | (+) |
| विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | 08027410000 | | | |
| [illegible] कल्याणकारी योजना | 08027490000 | ३६,००,००० | ३४,२९,५०० | (-) |
| मराठी भाषा पंधरवडा साजरा करणे | 08027490000 | ५०००० | — | — |
| माजी सैनिकांसाठी निधी | 08027490000 | २०,००,००० | १४,००,५०० | (-) |
| क्रीडा कार्यक्रम | 08027420000 | २०,००,००० | १८,५०,५३९ | (-) |
| स्काऊट आणि गाईड कार्यक्रम / वाचनालय | 08027430000 | ३०००० | — | — |
| जयंती साजरी करणे (शिवजयंती व प्रतापसिंह महाराज) | 08027490000 | ६,००,००० | ६,५३,५३० | (+) |
| न. पा. वर्धापन दिन साजरा करणे | 08027490000 | ५,००,००० | ३,४४,६३० | (-) |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकूण (च) | | | २,५८,१०,५३६ | |

सातारा नगर परिषद सातारा

## जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | वेतन राखीव निधीकडून वर्ग रक्कम | 04331510000 | - | - | - |
| | [illegible] | | ५०००००० | - | - |
| | [illegible] | | ७००००० | - | - |
| | [illegible] | | ५००००० | - | - |
| | [illegible] | | - | १९७८०/ | (+) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (झ) | | ८२९५००० | १०६९९७८८/ | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण - अ व ब [illegible] | | | ५०६७७३७९/ | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| छ | तरतुदी आणि निर्लेखित करणे | | | | |
| | १. कर महसुलाच्या शंकास्पद प्राप्य रकमांकरिता तरतुदी | | | | |
| | सर्व | | | | |
| | अभिहस्तांकित महसूल | | | | |
| | फी आणि वापरकर्ताआकार | | | | |
| | इतर | | | | |
| | २. स्थिर मत्ता निर्लेखित करणे | | - | ७५६७१३/ | (+) |
| | ३. जंगम मालमत्ता निर्लेखित करणे | | | | |
| | ४. संकीर्ण उत्पन्न निर्लेखित करणे | | | | |
| | ५. संकीर्ण खर्च | | | | |
| | ६. इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (छ) | | | ७५६७१३/ | |
| ज | राखीव निधी आणि संकीर्ण खर्च | | | | |
| | १. शहर विकास संकिर्ण | 11129990000 | 200,000 | ६३१६७०/ | (+) |
| | २. ऑफीस किरकोळ | 03129990000 | ६00,000 | ६७५,६५७/ | (+) |
| | ३. राखीव निधीचे हस्तांतरण (राखीव निधी) | | | | |

सातारा
सातारा

## जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सातारा

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | ४. इतर | 03129990000 | | - | |
| | खर्च | | | | |
| | गौरव आणि स्वागत समारंभ (दिन उत्सव सण सत्कार) | 08029910000 | 2000000 | १६७८३७३ | (-) |
| | पुतळ्याचे अनावरण | 0802992000 | .. | | |
| | पोलीस संरक्षणाचा खर्च | | | | |
| | नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी हानी | 81429940000 | 500000 | - | |
| | मोकाट जनावरांचा बंदोवस्त | 66925720000 | 500000 | - | |
| | अतिक्रमण काढणे | 13025400000 | 500000 | १६८९९६ | (-) |
| | २५% [illegible] | | 3000000 | - | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ज) | | | ३४५४९६६ | |

एकूण = [illegible] - ४३,४३,४९,८७७/-

## जमा

| जमा रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| कार्य संकेतांक :- | | | | | |
| भाग तीन | | | | | |
| भांडवली जमा | | | | | |
| क | विशिष्ट प्रयोजनाकरिता अनुदाने, अंशदाने | | | | |
| | भारत सरकार आय. एच. एस. डी. पी. | 04332190000 | — | — | — |
| | यु. आय. डी. एस. एस. एम. टी. | 04332140000 | — | — | — |
| | वित्त आयोगाकडून अनुदान (१३ वा वित्त) | 04332110000 | — | | |
| | १४ वा वित्त | 04332110000 | ७६५००,००० | ८२६७४,७२१०/ | (+) |
| | सुवर्णजयंती | 04332130000 | — | — | — |
| | महाराष्ट्र शासन कास धरण उंची वाढविणे | 04332190000 | १८०००,०००० | — | — |
| | स्वच्छता अभियान | | | | |
| | दलित वस्ती पा. पु. | | | | |
| | सुजल निर्मल व नळ जोडणी | | | | |
| | युडी-६ | 04332230000 | २४४१,००० | — | — |
| | नगरोत्थान अनुदान | 04332290000 | १८८७,००० | १८८९,०००/ | — |
| | अग्निशमन केंद्र बांधणे | 04332300000 | | | |
| | नागरी आरोग्य केंद्र | 04332300000 | | ५००,०००/ | (+) |
| | क्रीडा व युवक | 04332300000 | | | |
| | वैशिष्ट्यपूर्ण अनुदान | 04332290000 | ४२५००००० | २२५७२७६०/ | (-) |
| | अमृत योजना | | १५,००००,००० | १८०८५८५७८/ | (+) |
| | नगरोत्थान (राज्यस्तर) | | | | |

# खर्च

| खर्च रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| **कार्य संकेतांक :-** | | | | | |
| भाग चार | | | | | |
| **भांडवली खर्च** | | | | | |
| क | स्थिर व जंगम मत्ता | | | | |
| | शाहू कला मंदीर सुधारणा | 53141200000 | — | — | |
| | **संगणक प्रणाली विकसित करणे** | **07241700000** | — | — | |
| | श्रमसाफल्य योजना | | — | — | |
| | सार्वजनिक शौचालय व मुतान्या | 35341360000 | ५००००० | — | — |
| | जलदाय योजना | 31041340000 | १५००००० | ४८९२९४ | (−) |
| | जलनिस्सारण (गटारे) | 33241350000 | २००००००० | ११६८२६८२ | (−) |
| | मागासवर्गीय दुर्बल घटक योजना | 04331720000 | ३६००००० | ८०३९८४ | (−) |
| | महिला बाल कल्याण कार्यक्रम | 04331710000 | ३६००००० | ३७९६२२ | (−) |
| | ~~दलित वस्ती~~ [illegible] | 04332220000 | ४००००००० | १७९२३००४ | (−) |
| | विकास निधीतील कामे | 11143390000 | — | — | |
| | रस्ते बांधणे | 21443330000 | ४२४००००० | ३२७२७८०२ | (−) |
| | एकात्मिक शहर विकास योजना (आयडीएसएमटी) | 31032190000 | — | — | — |
| | सुवर्ण जयंती | 04332130000 | — | — | |
| | अल्पसंख्यांक विकास कार्यक्रम | 04332290000 | १५००००० | ११३३८८ | (−) |
| | कास धरण उंची वाढविणे | 04332290000 | १४१०००००० | ३८८२२३६३ | (−) |
| | आरक्षीत उद्यान विकसीत करणे (गेंडामाळ हुतात्मा उद्यान) | 55141390000 | १०००००० | | |
| | विद्युत दिवे व पोल बसविणे | 24141540000 | १५०००००० | १२३८८३४८ | (−) |

सातारा
सातारा

# जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | NULM | | १०००००० | ३६५९६०० | (+) |
| | खासदार फंड | 04332240000 | २५००००० | ३७५००० | (-) |
| | आमदार फंड | 04332240000 | ५००००० | - | - |
| | रस्ते विकास अनुदान | 04332210000 | २६५०००००० | ६५००००० | (-) |
| | अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती अनुदान | 04332220000 | ४२५०००००० | ३१२०१२६५ | (-) |
| | श्रम साफल्य आवास योजना | 04332300000 | - | - | - |
| | रमाई घरकुल आवास योजना | 04332300000 | २२५००० | २२५००० | - |
| | पंतप्रधान आवास योजना | 04332300000 | २६०००००० | ६१०८००० | (-) |
| | मत्स्य विकास महामंडळ | 04332300000 | - | - | - |
| | अल्पसंख्यांक अनुदान | 04332290000 | १५००००० | - | - |
| | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 04332290000 | ६०००००० | १८६५००८ | (-) |
| | अमृत योजना (अभियान [illegible]) | | - | ६६५६१२० | (+) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (क) | | | ३४७६८६०८४ | |
| ख | सुरक्षित आणि असुरक्षित कर्जे | | | | |
| | भारत सरकारकडून मिळणारे कर्जे | | | | |

सातारा

## खर्च

| खर्च रक्कम | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| ट्रॅफिक सिग्नल | 24241550000 | — | — | — |
| स्थानिक विकास कार्यक्रम | 04332240000 | — | — | — |
| आमदार/ खासदार फंड | 04332240000 | २५००,००० | ३५५००० | (–) |
| इतर बांधकामे (पूल मोऱ्या सर्वेक्षक भिंत इ.) | 22941390000 | ३००,००,००० | १२८७८२०८ | (–) |
| भूसंपादन | 11143100000 | १००,००,००० | — | — |
| लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सुविधा [U.I.D.S.S.M.T] | 04332140000 | — | — | — |
| सुजल निर्मल अभियान वैयक्तिक शौचालय व नळ जोडणी | 04332290000 | — | — | — |
| नगरोत्थान [illegible] | 04332290000 | १८८५००० | ११५०१८ | (–) |
| तेरावा वित्त आयोग | 04332110000 | — | | |
| आय. एच. एस. डी. पी. | 04332290000 | ५०००,००० | १०८५,१५४७ | (–) |
| शिर्के शाळा येथिल मैदान विकसीत करणे | 54141100000 | — | — | — |
| न. वि. ६ पेठ भवानी भाजी फळे विक्री केंद्र बांधणे. | 44241200000 | — | — | — |
| अग्नीशमन केंद्र उभारणे | 04332290000 | २०००००० | १०१८,८०० | (–) |
| घन कचरा ([illegible]) | 33941390000 | ५५५,००,००० | ३२१,८३,५५८ | (–) |
| नविन मुताऱ्या खरेदी | 35441360000 | — | — | — |
| सयाजीराव हायस्कूल रस्ता दुभाजक | 21941390000 | — | — | — |
| जुनी मंडई (पेठ भवानी) (वैशिष्ट्यपूर्ण) विकसित करणे. | 44241200000 | — | — | — |
| भुयारी गटर योजना | 33241320000 | ८०००,०००० | २१२३२५८३ | (–) |
| न.पा.कार्यालय येथे सौर उर्जा यंत्र बसविणे | | — | — | — |
| राजवाडा ऑफिस येथे बॅडमिंटन हॉल व पोहणे तलाव बांधणे (क्रिडा व युवक कल्याण निधी) | | — | — | |
| फिश मार्केट बांधणे | 44341200000 | | — | — |

सातारा
सातारा

# जमा

| जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| सर्व | | | | |
| सुरक्षित कर्जे | | | | |
| असुरक्षित कर्जे | | | | |
| महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली कर्जे नवि – ६ योजना कर्ज | 04333200000 | ७८८0,000 | — | |
| सर्व | | | | |
| सुरक्षित कर्जे | | | | |
| असुरक्षित कर्जे | | | | |
| इत्तर वित्तीय संस्थांकडून मिळालेली कर्जे | | | | |
| सर्व | | | | |
| सुरक्षित | | | | |
| असुरक्षित | | | | |
| बंधपत्रे व प्रमाणपत्रे | | | | |
| सर्व | | | | |
| सुरक्षित | | | | |
| असुरक्षित | | | | |
| इतर | | | | |
| | | | | |

## खर्च

| खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| कुंड्या खरेदी (कॉम्प्यॉक्टर) | 34441800000 | - | - | |
| न.पा.कार्यालय आग प्रतिबंधक यंत्रणा बसविणे | | - | - | |
| १०६ पेठ भवानी हॉकर्स शॉपींग सेंटर बांधणे (नवि ६ योजना) | | - | - | |
| मटण मार्केट विकसित करणे (वैशिष्ट्यपूर्ण कामे) | 44341200000 | - | - | |
| कर्नल संतोष महाडीक स्मारक बांधणे | | - | - | |
| १८२ पेठ रविवार शॉपींग सेंटर बांधणे (न. पा. निधी) | | 3400000 | ३०३३,८७२ | (-) |
| जुना राजवाडा येथे आर्ट गॅलरी करणे. | 53941200000 | - | - | |
| सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत गोडोली उद्यान विकसित करणे | 55141390000 | 4000000 | ३०४७,६६३ | (-) |
| डोंगरी भागाचा विकास करणे. | 51941390000 | 1000000 | - | |
| शाहुकला मंदिर जनरेटर खरेदी | | - | - | |
| मंगळवार तळे येथील वाचनालया साठी फर्निचर करणे, पुस्तके खरेदी | 52141800000 | - | - | |
| मेहेर देशमुख कॉलनी (करंजे) बगीचा विकसित करणे. | | - | - | |
| समाज मंदिर बांधणे (बागड वस्ती गोडोली) | 51141200000 | - | - | |
| हनुमान सोसा. (नवि-६) पुल रुंदीकरण | 21141310000 | - | - | |
| आ. क्र. ४२ बगीचा कुंपण भिंत (नगरोत्थान) जिल्हा स्तर | | - | - | |
| स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 04332290000 | 6000000 | ४४१८४१५ | (-) |
| ११अ/१ चिमणपुरा | 53941200000 | - | - | |

# जमा

| जमा रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ख) | | | | |
| ग | प्राप्त ठेवी | | | | |
| | कंत्राटदार/पुरवठादार यांच्याकडून मिळालेली ठेव | 04336800000 | ३५०,००,००० | ५३८०७५२२ | (+) |
| | महसुली ठेव [illegible] | | – | १०३४,७१८ | (–) |
| | कर्मचारी वर्गाकडून मिळालेली ठेव | | | | |
| | जनतेकडून मिळालेली ठेव | | | | |
| | इतर ठेवी | 04336900000 | १३८५,००,००० | १८६१८१,८०२ | (+) |
| | शासनाच्या वतीने केलेली वसुली | | | | |
| | देय वसुली (वेतन कपाती) | 04335700000 | ५०००००० | – | – |
| | देय असलेल्या शासकीय रकमा | 04338100000 | २५०००००० | २८६०५२८७ | (+) |
| | तसलमात | 04347100000 | ८०००००० | ६३८२५६५ | (+) |
| | शिक्षण कर व रोजगार हमी कर | 04338100000 | २५०००००० | २८१३७७८६ | (+) |
| | इतर [illegible] | | – | ८००० | (+) |
| | | | | | |
| | | | | | |

# खर्च

| खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| मेडिटेशन हॉल (वैशिष्ट्यपूर्ण) | | 3400000 | ३१,८३,११० | (-) |
| दलित वस्ती पा. पु. | | | | |
| एल. ई. डी. दिवे बसविणे | | 23000000 | १,६६,६३,६०४ | (-) |
| शाहुकला मंदिर नविन साउंड सिस्टीम बसविणे | | - | - | |
| मा. श्री. छ. अभयसिंह राजेभोसले उद्यान विकसित करणे. | 55141390000 | - | - | |
| वैशिष्ट्यपूर्ण कामे | 21441330000 | 7340000 | - | |
| ~~डॉग व्हॅन खरेदी~~ ऑटोमॅट्रिक मशीन खरेदी | | 1400000 | १८२४७०२ | (-) |
| टॉयलेट व्हॅन | 35541600000 | | | |
| राजीव आवास योजना/पंतप्रधान | 51941200000 | 20000000 | ६७,६०,२७२ | (-) |
| नविन झेरॉक्स मशिन खरेदी | 07341700000 | - | - | - |
| शहर स्वच्छता आराखडा तयार करणे | | - | - | - |
| रमाई आवास योजना | 51941200000 | 224000 | 224000 | - |
| नवीन संगणक व प्रिंटर खरेदी | 07241700000 | 1000000 | ४,०८,६८१ | (-) |
| अग्निशमन साहित्य खरेदी | | | | |
| १४ वा वित्त आयोग | 04332110000 | 40000000 | ६,६६,३०,८६८ | (+) |
| सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे | 24941590000 | - | - | - |
| फॉगिंग मशिन खरेदी | 66341490000 | 1140000 | ११११२०० | (-) |
| फर्निचर आणि खिळण्या | | 40000 | २६६४० | (+) |
| अमृत योजना [पा.पु.योजना] - | | 22400000 | - | - |
| नगरोत्थान राज्यस्तर | | | | |
| NULM | | 1400000 | ४१,६०,७३८ | (+) |
| अमृत योजना [ड्रेनेज] | | 33000000 | २,६६,६३,००७ | (-) |
| अग्निशमन विभागासाठी वाहन खरेदी | | 1200000 | १०४४६९८ | (-) |

## जमा

| | जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ग) | | | ३०,४२,५५,५६९/- | |
| घ | तरतुदी | | | | |
| | खर्चाकरिता तरतूद | | | | |
| | सर्व | | | | |
| | वेतन | | | | |
| | दूरध्वनी | | | | |
| | वीज | | | | |
| | पाणी | | | | |
| | इतर | | | | |
| | व्याजाकरिता तरतूद | | | | |
| | इतर | | | | |
| | एकूण [illegible] जमा | | | ८५,२२,०१,६७१/- | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (घ) | | | | |
| ङ | इतर दायित्वे | | | | |
| | कर्मचाऱ्यांची दायित्वे | | | | |
| | ऋणकोंची दायित्वे | | | | |

# खर्च

| | खर्च रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | नाविन्य योजना | | २४५०००० | २,३०,३५,३७८ | (-) |
| | [illegible] | | ५५०,००० | - | |
| | उद्याने विकसित करणे | | ५०००,००० | १५,९९,७०८ | (-) |
| | [illegible] | | - | ७६,९९,५३८ | (+) |
| | | | | | |
| | एकूण भांडवली खर्च | | | ४०,३३,३९,७७२ | |
| च | कर्जे, अग्रिमे आणि ठेवी | | | | |
| | कर्मचाऱ्यांना दिलेली कर्जे आणि अग्रिमे | 04347100000 | ५०००००० | ५७,३०,५०० | (+) |
| | भविष्यनिर्वाह निधी कर्जे | | | | |
| | कंत्राटदारांना अग्रिमे | | | | |
| | बाह्य अभिकरणांच्या ठेवी | | | | |
| | ऑफिस डिपॉझीट | 04329500000 | ४०००,०००० | १,८५,२९,२५१ | (-) |
| | शिक्षणकर रोजगार हमीकर | 04329500000 | २५०००,००० | २,३०,१९,५०९ | (-) |
| | वेतनातील कपाती | 04329500000 | ५०००,००० | ३१७८९३० | (-) |
| | शासनाच्या वतीने वसूल केलेल्या करांचा भरणा | 04329500000 | २५०,००,००० | १८८५५००१ | (-) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (च) | | | ६,१०,१३,०९१ | |
| छ | रोख आणि बँक शिल्लक | | | | |
| | हातात असलेली रोख | | | | |
| | बँकेत असलेली रोख | | | | |

सातारा

## जमा

| जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|
| उपार्जित व्याज व देय रकमा | | | | |
| देय परतावे | | | | |
| महसुलाची आगाऊ वसुली | | | | |
| विक्री उत्पन्न | | | | |
| इतर | | | | |
| सर्व | | | | |
| देय अधिक्य वसुली | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकूण एकंदर जमा - | | | ११,६८,०६,१५,०३२ | |
| | | | | |
| एकूण (ड) | | | | |

# खर्च

| खर्च रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | सर्व | | | | |
| | राष्ट्रीयीकृत बँक | | | | |
| | सहकारी बँक | | | | |
| | शेड्यूल बँक | | | | |
| | इतर | | | | |
| | टपाल कार्यालय खात्यात असलेली रोख | | | | |
| | इतर [illegible] | | | ११,३६,७८,९२० | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण एकंदर खर्च | | | १०१६,८,७७,३७०२ | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (छ) | | | | |
| ज | इतर मत्ता | | | | |
| | नियत कामांचा खर्च | | | | |
| | आंतर युनिट खर्च | | | | |
| | निर्लेखित करावयाचा संकीर्ण खर्च | | | | |
| | पूर्वदत्त खर्च | | | | |
| | अदत्त मालमत्ता कराकरिता तरतूद | | | | |
| | इतर कर | | | | |
| | शंकास्पद ऋणको | | | | |
| | इतर | | | | |
| | | | | | |

## जमा

| जमा रकमा | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रक्कम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|

आरंभीची शिल्लक - ५११८,८६,५८३/-

एकूण जमा - ११६,०८,११,०३३/-

एकूण - १६७,२६,९७,६१६/-

एकूण खर्च - १०१,२४,२७,३६४/-

अखेरची शिल्लक - ६६०२,७०,२५२/-

लेखापाल,
सातारा नगर परिषद, सातारा.

लेखापरीक्षक
सातारा नगरपरिषद, सातारा
7/6/2019

मुख्याधिकारी
सातारा नगर परिषद, सातारा

## खर्च

| खर्च रकमा | | लेखा संकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज | रकम | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण (ज) | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

विषय क्रमांक:- ११- सन २०१८-२०१९ चे वार्षिक लेख्यास मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव नं १५ -** अहवालात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र नगरपालिका, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०३ नुसार नगरपरिषदेच्या वार्षिक लेख्यास मे. सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून सदरचे वार्षिक लेखे स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करून नगरपरिषद क्षेत्रात प्रौढ रहिवाशांस निरिक्षणासाठी ठेवणे आवश्यक आहे.

सन २०१८-२०१९ मधील वार्षिक लेख्यांची माहिती खालीलप्रमाणे

| तपशिल | रक्कम | तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ५१,५८,९९,५८३/- | एकूण खर्च | १,०१,६४,४४,३७२ |
| एकूण जमा | ११६,०८,१५,०३१ | अखेरची शिल्लक | ६६,०२,७०,२४२ |
| एकूण | १,६७,६७,१४,६१४ | एकूण | १,६७,६७,१४,६१४ |

वरील प्रमाणे सादर केलेल्या सन २०१८-२०१९ च्या वार्षिक लेख्यास (जमा व खर्च) तसेच तरतुदीपेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणेत येत आहे.

सूचक - मे. शिंदे किशोर दत्तात्रय
अनुमोदक- मे. जाधव विशाल वसंत
वरील ठराव सर्वानुमते मंजूर करणेत येत आहे.

मुख्याधिकारी यांचेकडेस
सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५ दिनांक २०/७/२०१९
प्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

(सौ. कदम माधवी संजोग)
अध्यक्षा
सातारा नगरपरिषद सातारा.

**Assistant Director**
**Local Fund Accounts Audit Satara**

(शंकर गोरे)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा

विवरणपत्र

सन 2018-2019 अनामत

| अ.नं | सन्. | एकूण | परतावा | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 1 | 15-16 | 2117122 | - | 2117122 |
| 2 | 16-17 | 3178598 | - | 3178598 |
| 3 | 17-18 | 3665713 | 130300 | 3535413 |
| 4 | 18-19 | 26362029 | 399826 | 25962203 |
| | एकुण | **35323452** | **431126** | **34793336** |

सुरक्षा अनामत

| अ.नं | सन | एकूण | परतावा | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 1 | 15-16 | 7050179 | 525310 | 6524869 |
| 2 | 16-17 | 8759163 | 2364155 | 6395008 |
| 3 | 17-18 | 8683420 | 1739022 | 6944398 |
| 4 | 18-19 | 17517447 | 280923 | 17236524 |
| | एकुण | **42010209** | **4909410** | **37100799** |

**Assistant Director**
Local Fund Accounts Audit Satara

25/2/2020
लेखापाल
सातारा नगरपरिषद सातारा

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद सातारा

विवरण पत्र क्र 4

महसूली जमा व खर्च

| अ.क्र | वर्ष | महसुली जमा | महसूली खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2016-2017 | 507972880 | 463502061 |
| 2 | 2017-2018 | 486421898 | 382938815 |
| 3 | 2018-2019 | 508573386 | 434349877 |

विवरण पत्र क्र 5

भांडवली जमा व खर्च

| अ.क्र | वर्ष | भांडवली जमा | भांडवली खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2016-2017 | 500299294 | 420341942 |
| 2 | 2017-2018 | 315776238 | 309102987 |
| 3 | 2018-2019 | 652241645 | 578001683 |

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

लेखापाल
सातारा नगरपरिषद सातारा

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद सातारा

## सन 2018-2019

### तसलमात विवरणपत्र

| अ क्र | सन | रक्कम |
|---|---|---|
| १ | १९५१-१९६० | १११९६ |
| २ | १९६१-१९७० | ५७२६१.४१ |
| ३ | १९७१-१९८० | १३०४५८.८८ |
| ४ | १९८१-१९९० | ६७०८६ |
| ५ | १९९१-२०१४ | ३३५३८२ |
| ६ | २०१५-२०१७ | २३२५१०० |
| ७ | २०१८-२०१९ | ४८३३७०५ |
| | एकुण | ७७,६०,१८९.३७/- |

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

लेखापाल
सातारा नगरपरिषद सातारा

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद सातारा

## नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.
### प्रपत्र:- मंजूर तरतुदी पेक्षा कमी/जादा खर्च.

| अ.क्र | खर्च बाब | सन २०१८-१९ मंजूर तरतूद | सन २०१८-१९ प्रत्यक्ष खर्च | कमी | जादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑफीस स्थाय पगार (वेतन बँड) | ६००००० | ४२९९६० | १७००४० | ० |
| २ | ऑफीस वेतन ( ग्रेड पे) | ११३००० | ११७६०० | ० | ४६०० |
| ३ | ऑफीस महागाई | १०६०००० | ८१०६३६ | २४९३६४ | ० |
| ४ | शिक्षक पगार (वेतन बँड) | ११८६३००० | ११५७५७०४ | २८७२९६ | ० |
| ५ | शिक्षक वेतन ( ग्रेड पे) | ३४९४००० | ३४१०८०० | ८३२०० | ० |
| ६ | शिक्षक महागाई | २२७७२००० | २२७७४८९९ | ० | २८९९ |
| ७ | शिक्षण सेवक मानधन | ६००००० | ४३२००० | १६८००० | ० |
| ८ | वाहन भत्ता शिक्षक/सेवक | ४००००० | ४११०२७ | ० | ० |
| ९ | शिपाई ( धुलाई भत्ता) | ० | ० | ० | ० |
| १० | घरभाडे भत्ता | १७००००० | १६५३३५० | ४६६५० | ० |
| ११ | शाळा भाडे दर-कर | ८००००० | ४६१४० | ७५३८५० | ० |
| १२ | सदस्य मानधन/अतिथी भत्ता | ० | ० | ० | ० |
| १३ | वरिष्ठश्रेणी /महागाई फरक | १००००० | ६६१८५० | ० | ५६१८५० |
| १४ | स्टेशनरी छपाई | ४०००० | २८२१३ | ११७८७ | ० |
| १५ | वैद्यकीय मदत | ५००००० | ४१७६६७ | ८२३३३ | ० |
| १६ | प्रवास भत्ते | १५००० | २३४४६ | ० | ८४४६ |
| १७ | पोस्टेज तारा | २००० | १००० | १००० | ० |
| १८ | शिपाई गणवेश | १००० | ० | २००० | ० |
| १९ | पेन्शन फंड ( उपदाने/धिकी इ.) | ३९६८७००० | ३५७५५४१५ | ३९३१५८५ | ० |
| २० | ऑफीस सादील (कार्यालयीन खर्च) | ३०००० | २४२९८ | ५७०२ | ० |
| २१ | रोखपाल मेहनताना | ० | ० | ० | ० |
| २२ | ऑफीस फर्निचर | २०००० | ० | २०००० | ० |
| २३ | शालेय पोषण आहार | ० | ० | ० | ० |
| २४ | सावित्रीबाई फुले द.पा.योजना | ० | ० | ० | ० |
| २५ | सहाव्वा आयोग अग्रीम/फरक | ० | ० | ० | ० |
| २६ | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | ० | ० | ० | ० |
| २७ | मुदत ठेवी | ० | ० | ० | ० |
| २८ | दिवाळी/ईद अॅडव्हान्स | ६००००० | ५३०००० | ७०००० | ० |
| ३० | नरातमात | ० | ० | ० | ० |
| ३१ | कोर्ट खर्च | २०००० | ० | २०००० | ० |
| ३२ | स्काउट गाईड | ० | ० | ० | ० |
| ३३ | टेलिफोन बिल भाडे | २५००० | २३४८ | २२६५२ | ० |
| ३४ | शिक्षण मंडळ,सभापती मानधन | ० | ० | ० | ० |
| ३५ | पदाधिकारी मानधन | ० | ० | ० | ० |
| ३६ | शिक्षण प्रशिक्षण | ५०००० | ० | ५०००० | ० |
| ३७ | उत्सव समारंभ/शिक्षक दिन | ४००००० | ० | ४००००० | ० |
| ३८ | क्रीडा स्पर्धा बक्षिसे/स्नेहसंमेलन | २००००० | ० | २००००० | ० |
| ३९ | प्ले-ग्रुप,सेमी इं. वर्ग शिक्षक मानधन | १०००००० | ० | १०००००० | ० |
| ४० | विद्यार्थी प्रशिक्षण व संगणक खरेदी व दुरुस्ती | २००००० | ० | २००००० | ० |
| ४१ | इतर किरकोळ खर्च/न.पा.वर्ग रक्कम | ० | ० | ० | ० |
| ४२ | प्रज्ञाशोध परीक्षा | २०००० | ० | २०००० | ० |
| ४३ | विज्ञान प्रदर्शन | ० | ० | ० | ० |
| ४४ | कै.श्रीम.प्रतापसिह दादा महाराज स्मृती स्पर्धा | ७५००० | ० | ७५००० | ० |
| ४५ | शिवजयंती उत्सव | ० | ० | ० | ० |
| ४६ | गुरुपोर्णिमा | ० | ० | ० | ० |
| ४७ | कै.श्रीमंत छ.अभिमयसिह महाराज शिष्यवृत्ती | ० | ० | ० | ० |
| ४८ | शिक्षक/कर्मचारी सानुग्रह अनुदान | ० | ० | ० | ० |
|  | एकूण | ८५६१४००० | ७८७५६१५७ | ७८६१४६१ | ५७७७९५ |

| नगरपलिका शिक्षण मंडळ,सातारा | | | | |
|---|---|---|---|---|
| सामान्य भविष्य निधी जमा खर्च पत्रक | | | | |
| | सन २०१८-२०१९ | | | |
| अ.क्र. | जमा बाब | रक्कम | खर्च बाब | रक्कम |
| १ | बँक व्याज | ६२८२७ | बँक कमिशन | ० |
| २ | ठेवीवरील व्याज | ० | स्टेशनरी चार्जेस | ० |
| ३ | वर्गणी /हप्ता | ५२९८७८१ | अंतिम प्रदान | ० |
| ४ | बँक गुंतवणूक | ९००००० | परतावा रक्कम | ० |
| ५ | वर्ग होउन आलेली रक्कम | २०५६३२७२ | विना परतावा रक्कम | ६२७२००० |
| ६ | बँक कमिशन | ० | बँक गुंतवणूक | ९००००० |
| ७ | वसूलपात्र रक्कम जमा | ७००० | मुदती अंती नावे | १६६७६९७९ |
| ८ | एकूण जमा | ३४९३१८८० | एकूण खर्च | ३१९४८९७९ |
| ९ | सुरुवातीची शिल्लक | ३५०९०८३८.७३ | अखेर शिल्लक | ३८०७३७३९.७३ |
| १० | एकूण एकंदर | ७००२२७१८.७३ | | ७००२२७१८.७३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बहुतपत्रकामधील एकूण शिल्लकरक्कम | | २८२०१३८० |
| २ | रोकडवहीतील शिल्लक रक्कम | ३६९७३७३९ | |
| | कै.श्री.छ.अभयसिंह राजे शिष्यवृ | ११००००० | ३८०७३७३९ |

प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा
सातारा शहर

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

| नगरपलिका शिक्षण मंडळ,सातारा | | | | |
|---|---|---|---|---|
| | तेरीज पत्रक माहे १ एप्रिल१८ ते ३१ मार्च २०१९ | | | |
| अ.क्र. | जमा | रक्कम | नावे | रक्कम |
| १ | प्राथ.शिल्लक | १७४२६८१.२८ | शिक्षक वेतन | १२५७५७०४ |
| २ | शासन अनुदान शालार्थ | ६४५८२२०० | ग्रेडवेतन | ३४१०८०० |
| ३ | शासन अनुदान पेन्शन व कार्या.कर्मचारी | ० | शिक्षक महागाई | २२७७४८११ |
| ४ | व्यवसायकर | १७७७०० | घरभाडे भत्ता | १५९८५९४ |
| ५ | न.पा.अनुदान वेतन | १८१६१३०८ | वाहन भत्ता | ३११८२७ |
| ६ | ॲडव्हान्स - ईद/दिवाळी | १००६००० | शिक्षकसेवक मानधन | ४३२००० |
| ७ | दादामहाराज/क्रिडा स्पर्धा/स्नेहसंमेलन | ० | कार्या.वेतन | ४२११६० |
| ८ | जादा वसूली | १२०० | ग्रेडवेतन | ११७६०० |
| ९ | खाऊ वाटप अनुदान | | महागाई | ८१०६३६ |
| १० | जादा पेन्शन वसूली | ४३४००३ | घरभाडे भत्ता | ५४७५६ |
| ११ | आय.डी.बी.आय बँक व्याज जमा | ५९५८० | वाहन भत्ता | १९२०० |
| १२ | आयकर रोख जमा | | चेक समायोजन/आयकर | ११११००० |
| १३ | इतर जमा | ११११०२६ | पेन्शन फंड | ३५७५५४१५ |
| १४ | शापोआ शिक्षक अनुदान | १८००० | उत्सव समारंभ व शिक्षक दिन, | |
| १५ | कैश्री.छ.अभयसिंहराजे भोसले शिष्यवृत्ती मुद्दल व व्याज जमा | १८५०० | वैद्यकीय प्रतिपूर्ती | ४१७६६७ |
| १६ | उत्सव व समारंभ शिक्षक दिन | | कार्या.खर्च | ४७४११ |
| १७ | मुख्यमंत्री सहाय्यता निधी | | विद्यार्थि कला,क्रीडा/स्नेहसंमेलन | |
| १८ | शाळा भाडे | ४६१४० | पोस्टेजतारा | ३०५५ |
| १९ | प्ले-ग्रुप सेमी इं.वर्ग शिक्षक मानधन | | वीज बील | ५१०० |
| २० | सावित्रीबाई दत्तक पालक योजना अनुदान | ५११८० | प्ले-ग्रुप सेमी इं.वर्ग शिक्षक मानधन | |
| २१ | टीडीएस जमा दि.कराड अर्बन | १०८५५ | सावित्रीबाई दत्तक पालक योजना अ | ५११८० |
| २२ | | | शाळा भाडे | ४६१४० |
| २३ | | | बँक चार्जेस | |
| २४ | | | प्रवासखर्च | २३४४६ |
| २५ | | | शापोआ शिक्षक मानधन | १८००० |
| | | | कैश्री.छ.अभयसिंहराजे भोसले | ११००००० |
| | | | विद्यार्थि कला,क्रीडा/स्नेहसंमेलन खर्च | १४४१७७३ |
| | | | वेतन,वरिष्ठश्रेणी फरक | ६६१८५० |
| | | | सण अग्रीम | ५३०००० |
| | | | एकूण खर्च | ८३९२४०१३.० |
| | | | पुढील शिल्लक | ३५९२३६०.२८ |
| | एकूण | ८७५१६३७३.२८ | एकूण | ८७५१६३७३.२८ |

| नगरपलिका शिक्षण मंडळ,सातारा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तेरीज पत्रक माहे १ एप्रिल१८ ते ३१ मार्च २०१९ | | | | |
| अ.क्र. | जमा | रक्कम | नावे | रक्कम | |
| १ | प्राथ.शिल्लक | १७४२९६८१.२८ | शिक्षक वेतन | १२५७५७०४ | १२५७५७०४ |
| २ | शासन अनुदान शालार्थ | ६४५८२१०० | ग्रेडवेतन | ३४१०८०० | ३४१०८०० |
| ३ | शासन अनुदान पेन्शन व कार्या.कर्मचारी | ० | शिक्षक महागाई | २२७७४८९१ | २२७७४८९१ |
| ४ | व्यवसायकर | १७७७०० | घरभाडे भत्ता | २५९८५१४ | २५९८५१४ |
| ५ | न.पा.अनुदान वेतन | १८१६९३०८ | वाहन भत्ता | ३११८२७ | ३११८२७ |
| ६ | ॲडव्हास - ईद/दिवाळी | १००६००० | शिक्षकसेवक मानधन | ४३२००० | ४३२००० |
| ७ | दादामहाराज/क्रिडा स्पर्धा/स्नेहसंमेलन | ० | कार्या.वेतन | ४२११६० | ४२११६० |
| ८ | जादा वसूली | १२०० | ग्रेडवेतन | ११७६०० | ११७६०० |
| ९ | खाऊ वाटप अनुदान | | महागाई | ८१०६३६ | ८१०६३६ |
| १० | जादा पेन्शन वसूली | ४३४००३ | घरभाडे भत्ता | ५४७५६ | ५४७५६ |
| ११ | आय.डी.बी.आय बँक व्याज जमा | ५९५८० | वाहन भत्ता | ११२०० | ११२०० |
| १२ | आयकर रोख जमा | | चेक समायोजन/आयकर | ११११००० | ० |
| १३ | इतर जमा | ११११०२६ | पेन्शन फंड | ३५७५५४१५ | ३५७५५४१५ |
| १४ | शापोआ शिक्षक अनुदान | १८००० | उत्सव समारंभ व शिक्षक दिन, | ० | ० |
| १५ | कै.श्री.छ.अभयसिंहराजे भोसले शिष्यवृत्ती मुद्दल व व्याज जमा | १८५०० | वैद्यकीय प्रतिपूर्ती | ४१७६६७ | ४१७६६७ |
| १६ | उत्सव व समारंभ शिक्षक दिन | | कार्या.खर्च | ४७४११ | ४७४११ |
| १७ | मुख्यमंत्री सहाय्यता निधी | | विद्यार्थि कला,क्रीडा/स्नेहसंमेलन | ० | ० |
| १८ | शाळा भाडे | ४६१४० | पोस्टेजतारा | ३०५५ | ३०५५ |
| १९ | प्ले-ग्रुप सेमी इं.वर्ग शिक्षक मानधन | | वीज बील | ५१०० | ५१०० |
| २० | सावित्रीबाई दत्तक पालक योजना अनुदान | ५९१८० | प्ले-ग्रुप सेमी इं.वर्ग शिक्षक मानधन | | ० |
| २१ | टीडीएस जमा दि.कराड अर्बन | १०८५५ | सावित्रीबाई दत्तक पालक योजना अ | ५९१८० | ० |
| २२ | | | शाळा भाडे | ४६१४० | ४६१४० |
| २३ | | | बँक चार्जेस | | ० |
| २४ | | | प्रवासखर्च | २३४४६ | २३४४६ |
| २५ | | | शापोआ शिक्षक मानधन | १८००० | ० |
| | | | कै.श्री.छ.अभयसिंहराजे भोसले | ११००००० | ० |
| | | | विद्यार्थि कला,क्रीडा/स्नेहसंमेलन रक्क | १४४१७७३ | ५००००० |
| | | | वेतन,वरिष्ठश्रेणी फरक | ६६१८५० | ६६१८५० |
| | | | सण अग्रीम | ५३०००० | ५३०००० |
| | | | एकूण खर्च | ८३९२४०१३.० | 80614060 |
| | | | पुढील शिल्लक | ३५९२३६०.२८ | |
| | एकूण | ८७५१६३७३.२८ | एकूण | ८७५१६३७३.२८ | |

नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.

सन २०१८-२०१९ जमा पत्रक

| अ.क्र | जमा बाब | रक्कम |
|---|---|---|
| १ | वेतनापोटी शासन अनुदान ८० टक्के. | ६४७५९९०० |
| २ | वेतनेत्तर शासन अनुदान. | ० |
| ३ | वेतनापोटी नगरपालिका २० टक्के. | १८१६९३०८ |
| ४ | वेतनेत्तर खर्च नगरपालिका. | ४६१४० |
| ५ | जादा रक्कम वसूली निवृत्ती वेतन व इतर. | ४३५२०३ |
| ६ | इतर किरकोळ जमा. | ११९१०२६ |
| ७ | फी उत्पन्न | ० |
| ८ | बँकेवरील व्याज जमा. | ५९५८० |
| ९ | शापोआ शिक्षक अनुदान | १८००० |
| १० | सा.फु.द.पा.योजना व्याज वाटप. | ५९१८० |
| ११ | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. | २९३५५ |
| १२ | मुदत ठेवी. | ० |
| १३ | दिवाळी + ईद ॲडव्हान्स परत जमा. | १००६००० |
| | एकूण जमा | ८५७७३६९२ |
| | सुरुवातीची शिल्लक | १७४२६८१.२८ |
| | एकूण एकंदर | ८७५१६३७३.२८ |

प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा
सातारा शहर

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.

शिक्षण उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून प्राप्त शासकीय अनुदाने

| अ.क्र | रक्कम | तपशिल | धनादेश क्रमांक | दिनांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४९४२४०० | माहे मार्च | online | १९/०४/२०१८ | १९/०४/२०१८ |
| २ | ४९१५६०० | माहे एप्रिल १८ चे | online | ०३/०५/२०१८ | ०३/०५/२०१८ |
| ३ | ४९१५६०० | माहे मे २०१८ चे | online | ०४/०६/२०१८ | ०४/०६/२०१८ |
| ४ | ४९१५६०० | माहे जून २०१८ चे | online | ११/०७/२०१८ | ११/०७/२०१८ |
| ५ | ४९८१६०० | माहे जुलै २०१८ चे | online | १३/०८/२०१८ | १३/०८/२०१८ |
| ६ | ४४८१६०० | माहे ऑगस्ट २०१८ चे | online | १३/०९/२०१८ | १३/०९/२०१८ |
| ७ | ४७३१६०० | माहे सप्टें २०१८ चे | online | ०९/१०/२०१८ | ०९/१०/२०१८ |
| ८ | ४७३१६०० | माहे ऑक्टो २०१८ चे | online | ३०/१०/२०१८ | ३०/१०/२०१८ |
| ९ | ६२९९२०० | माहे नोव्हें २०१८ चे | online | ०३/१२/२०१८ | ०३/१२/२०१८ |
| १० | ६०८५२८२ | माहे डिसें २०१८ चे | online | ०५/०१/२०१९ | ०५/०१/२०१९ |
| ११ | १८१२११८ | माहे जाने २०१९ चे | online | ०२/०२/२०१९ | ०२/०२/२०१९ |
| १२ | ११७७०००० | माहे फेब्रु.२०१९ चे | online | १२/०३/२०१९ | १२/०३/२०१९ |
| | ६४५८२२०० | एकूण | | | |
| १ | ० | शासकीय वेतनेत्तर | | | |
| २ | १८००० | शालेय पोषण आहार | online | २७/०४/२०१९ | २७/०४/२०१९ |
| | १८००० | एकूण | | | |

प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा
सातारा शहर

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.

न.पा.सातारा कडून वेतनासाठी २० टक्के प्राप्त अनुदाने

सन २०१८-२०१९

| अ.क्र | रक्कम | तपशिल | धनादेश क्रमांक | दिनांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११७४३१२ | माहे फेब्रु.२०१८ चे | ६४३ | २७/०४/२०१८ | २७/०४/२०१८ |
| १ | १२३३५२३ | माहे मार्च १८वेतनासाठी | ६४३ | २७/०४/२०१८ | २७/०४/२०१८ |
| २ | १२६७८५१ | माहे एप्रिल १८ चे | ७१६ | २३/०५/२०१८ | २३/०५/२०१८ |
| ३ | १२४८५१४ | माहे मे २०१८ चे | ७२१ | ०४/०६/२०१८ | ०४/०६/२०१८ |
| ४ | १२६७७६१ | माहे जून २०१८ चे | ९४१ | ०३/०७/२०१८ | ०३/०७/२०१८ |
| ५ | १२८५००५ | माहे जुलै २०१८ चे | ८५७ | १४/०८/२०१८ | १४/०८/२०१८ |
| ६ | १५३७१८३ | माहे ऑगस्ट २०१८ चे | ९८५ | १७/०९/२०१८ | १७/०९/२०१८ |
| ७ | १२८५००५ | माहे सप्टें २०१८ चे | १०३२ | १७/१०/२०१८ | १७/१०/२०१८ |
| ८ | २५६३९५ | माहे ऑक्टो २०१८ चे | १०५५ | ३१/१०/२०१८ | ३१/१०/२०१८ |
| ९ | १५३७१८३ | माहे ऑक्टो २०१८ चे | १०५८ | ३१/१०/२०१८ | ३१/१०/२०१८ |
| १० | १५३७१८३ | माहे नोव्हें २०१८ चे | ११८३ | ०७/१२/२०१८ | ०७/१२/२०१८ |
| ११ | १५३७१८३ | माहे डिसे २०१८ चे | १२२४ | १७/०१/२०१९ | १७/०१/२०१९ |
| १२ | १५३७१८३ | माहे जाने २०१९ चे | १२३३ | ११/०२/२०१९ | ११/०२/२०१९ |
| १३ | १३६४९४७ | माहे फेब्रु.२०१९ चे | १२६६ | १७/०३/२०१९ | १७/०३/२०१९ |
| | १८१६९३०८ | एकूण | | | |

न.पा.सातारा वेतनेत्तर

| अ.क्र | रक्कम | तपशिल | धनादेश क्रमांक | दिनांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. १. | ० | शिक्षक दिन खर्चासाठी | | | |
| २. २. | ० | कै.प्रतापसिंह दादा क्रीडा स्पर्धा व | | | |
| ३. ३. | ० | प्ले-ग्रुप व सेमी इंग्लिश वर्ग शिक्षक मानधन | | | |
| ४. ४. | ४६१४० | शाळा इमारतभाडे | २८११ | ०९/०८/२०१८ | ०९/०८/२०१८ |
| | ४६१४० | एकूण | | | |

प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा
सातारा शहर

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.

शासन अनुदान

<u>प्रपत्र</u>

| अ.क्र | सन २०१८-१९ मधील वेतनावरील प्रत्यक्ष खर्च १००% | वेतनाचा ८० टक्के प्रमाणे प्रत्यक्ष खर्च रक्कम | मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडून प्रत्यक्ष प्राप्त रक्कम | कमी | जादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८०६१४०६० | ६४४९१२४८ | ६४५८२२०० | -९०९५२ | ० |

नगरपालिका शिक्षण मंडळ,सातारा.

न.पा. अनुदान

<u>प्रपत्र</u>

| अ.क्र | सन २०१८-१९ मधील वेतनावरील प्रत्यक्ष खर्च १००% | वेतनाचा २० टक्के प्रमाणे प्रत्यक्ष खर्च रक्कम | न.पा. कार्यालयाकडून प्रत्यक्ष प्राप्त रक्कम | कमी | जादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८१५५५८३३ | १६३१११६७ | १६९९४९९६ | -६८३८२९ | |

प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ सातारा
सातारा शहर

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

# सातारा नगरपरिषद सातारा

RTAXSUM_MAR

From Date / दिनांकापासून : 01-04-2017 To Date /दिनांकापर्यंत : 31-03-2018

Date / दिनांक : 02-04-2018
Time / वेळ : 18:16:21
Page / पाने : 1/1

ाग = सर्व, पेठ = सर्व

## करांचा सारांश

| कराचे नाव | मागणी | | | संग्रह | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) |
| ालमत्ता कर | 98792749.00 | 95366652.00 | 194159401.00 | 54072044.00 | 47337820.00 | 101409864.00 | 51446464.00 | 20511452.00 | 71957917.00 |
| ालन शिक्षण कर | 44968979.00 | 26547231.00 | 71516210.00 | 22429657.00 | 17121724.00 | 39550381.00 | 16906457.00 | 6595345.00 | 23501802.00 |
| ोशेष पाणी कर | 25486697.00 | 29830846.00 | 55317542.00 | 10432644.00 | 20110972.00 | 30543616.00 | 18863739.00 | 9399897.00 | 28263636.00 |
| ाव्यगार हमी कर | 6784772.00 | 4092562.00 | 10877334.00 | 3412985.00 | 2752906.00 | 6165891.00 | 2367673.00 | 1047790.00 | 3435463.00 |
| ोशेष शिक्षण कर | 6691403.00 | 4765312.00 | 11456715.00 | 4008764.00 | 2812230.00 | 6820994.00 | 2952975.00 | 1167787.00 | 4100762.00 |
| ृक्ष कर | 6278970.00 | 3404700.00 | 9683670.00 | 2867576.00 | 2228577.00 | 5096153.00 | 2375723.00 | 872284.00 | 3248007.00 |
| ागणी नोटिस फी | 14078.00 | .00 | 14078.00 | 1755.00 | .00 | 1755.00 | 13373.00 | .00 | 13373.00 |
| ारंट नोटीस फी | 101036.00 | 9700.00 | 110736.00 | 16555.00 | 525.00 | 17080.00 | 89702.00 | 9175.00 | 98877.00 |
| ंमर्हामर धनादेशावरील र | 13050.00 | 7950.00 | 21000.00 | 6900.00 | 4950.00 | 11850.00 | 8100.00 | 3000.00 | 11100.00 |
| ारेस्टेशन फेक कर | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| ालिट रकोवरिल शास्ती | 120893811.00 | 10737365.00 | 131630976.00 | 29484721.00 | 6516425.00 | 36001146.00 | 96300210.00 | 4191810.00 | 100492020.00 |
| ालिप स्वच्छता कर | 2374.00 | 14127725.00 | 14130099.00 | 1713.00 | 9611303.00 | 9613016.00 | 15748.00 | 4311454.00 | 4327202.00 |
| ाग्निशमन कर | 2177.00 | 1918701.00 | 1920878.00 | 44.00 | 1257088.00 | 1257132.00 | 2417.00 | 615438.00 | 617855.00 |
| ानान्य पाणीपट्टी | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| ामारत / जागा वापर फी | 17418247.00 | 6977140.00 | 24395387.00 | 866895.00 | 4334343.00 | 5201238.00 | 16666652.00 | 2694564.00 | 19261216.00 |
| एकूण (₹) | 327448144.00 | 197780883.00 | 525234027.00 | 127601264.00 | 114088863.00 | 241690117.00 | 208000233.00 | 51319986.00 | 259329230.00 |

रक्कम (₹) 8516957.00 आगाऊ शिल्लक रक्कम (₹) 1657858.00

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

30/06 15/04/2020

कर निरिक्षक, (राज्यसंवर्ग)
वसुली विभाग
नगर परिषद, सातारा.

RTAXSUM_MAR

# सातारा नगरपरिषद सातारा

From Date / दिनांकापासून : 01-04-2017 To Date / दिनांकापर्यंत : 31-03-2018

Date / दिनांक : 02-04-2018
Time / वेळ : 16:16:21
Page / पाने : 1/1

श = शर्व, पेठ = वार्ड

## करांचा सारांश

| कराचे नाव | मागणी | | | वसूल | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) |
| …नगरा कर | 98792749.00 | 95366652.00 | 194159401.00 | 54072044.00 | 47337820.00 | 101409864.00 | 51440464.00 | 20511452.00 | 71957917.00 |
| …ान शिक्षण कर | 44968979.00 | 26547231.00 | 71516210.00 | 22428657.00 | 17121724.00 | 39550381.00 | 18900457.00 | 6695345.00 | 23501802.00 |
| …ोष पाणी कर | 25488697.00 | 29830845.00 | 55317542.00 | 10432644.00 | 20110972.00 | 30543616.00 | 18863730.00 | 9309097.00 | 28263338.00 |
| …गार हमी कर | 6784772.00 | 4092562.00 | 10877334.00 | 3412986.00 | 2752905.00 | 6165891.00 | 2387673.00 | 1047790.00 | 3433463.00 |
| …ोष शिक्षण कर | 6691403.00 | 4766312.00 | 11456715.00 | 4008764.00 | 2812230.00 | 6820994.00 | 2932975.00 | 1167787.00 | 4100762.00 |
| … कर | 6278970.00 | 3404700.00 | 9683670.00 | 2857576.00 | 2228577.00 | 5086153.00 | 2376723.00 | 872284.00 | 3246007.00 |
| …णी नोटिस फी | 14070.00 | .00 | 14073.00 | 1756.00 | .00 | 1756.00 | 13373.00 | .00 | 13373.00 |
| …ट नोटीस फी | 101038.00 | 9700.00 | 110738.00 | 15555.00 | 525.00 | 17080.00 | 89702.00 | 9175.00 | 98677.00 |
| …ाहीनर धनादेशावरील | 13050.00 | 7950.00 | 21000.00 | 6900.00 | 4950.00 | 11850.00 | 6100.00 | 3000.00 | 11100.00 |
| …वटलेला चेक कर | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| …ेत रामेश्वरिय भाजी | 120893611.00 | 10737365.00 | 131630976.00 | 29484721.00 | 6516425.00 | 36001146.00 | 96300210.00 | 4191810.00 | 100492020.00 |
| …ेष स्वच्छता कर | 2374.00 | 14127725.00 | 14130099.00 | 1713.00 | 9611303.00 | 9613016.00 | 16748.00 | 4311454.00 | 4327202.00 |
| …शमन कर | 2177.00 | 1916701.00 | 1920878.00 | 44.00 | 1257086.00 | 1257132.00 | 2417.00 | 615438.00 | 617855.00 |
| …मान्य पाणीपट्टी | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| …रत / बाबा वापर फी | 17418247.00 | 6977140.00 | 24395387.00 | 866895.00 | 4334343.00 | 5201238.00 | 16866852.00 | 2594564.00 | 10261216.00 |
| एकूण (₹) | 327448144.00 | 197785863.00 | 525234027.00 | 127501254.00 | 114088863.00 | 241590117.00 | 208009233.00 | 51319996.00 | 259329230.00 |

रक्कम (₹) : 8516957.00 व्याजाऊ बिल्लाचा रक्कम (₹) 1657868.00

शलुला भोंपावा

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

15/04/2020

कर निरीक्षक, (अधिक्षक)
वसुली विभाग
नगर परिषद, सातारा.

# सातारा नगरपरिषद सातारा

RTAXSUM_MAR

From Date / दिनांकापासून : 01-04-2018    To Date /दिनांकापर्यंत : 31-03-2019

Date / दिनांक : 29-11-2019
Time / वेळ : 17:15:01
Page / पाने : 1/1

ग = सर्व, पेठ = सर्व

## करांचा सारांश

| ाराचे नाव | मागणी | | | संग्रह | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) | थकीत (₹) | चालू (₹) | एकूण (₹) |
| मित्ता कर | 69379332.00 | 92906870.00 | 162286202.00 | 14156263.00 | 67723478.00 | 81879741.00 | 654248.00 | 125008.00 | 779256.00 |
| न शिक्षण कर | 22589779.00 | 25500304.00 | 48090083.00 | 5461092.00 | 18693976.00 | 24155068.00 | 189984.00 | 32749.00 | 222733.00 |
| ष पाणी कर | 33459126.00 | 32585642.00 | 65044768.00 | 7229820.00 | 20996803.00 | 28226623.00 | 1027645.00 | 201324.00 | 1228969.00 |
| ार हमी कर | 3262590.00 | 3900848.00 | 7163438.00 | 891297.00 | 2872763.00 | 3764060.00 | 21287.00 | 3408.00 | 24695.00 |
| य शिक्षण कर | 3954091.00 | 4646117.00 | 8600208.00 | 902178.00 | 3315419.00 | 4217597.00 | 35543.00 | 6248.00 | 41791.00 |
| कर | 3119427.00 | 3318060.00 | 6437487.00 | 732446.00 | 2363341.00 | 3095788.00 | 27301.00 | 4478.00 | 31779.00 |
| णी नोटिस फी | 13216.00 | .00 | 13216.00 | 558.00 | .00 | 558.00 | 635.00 | .00 | 635.00 |
| ट नोटीस फी | 97177.00 | 31050.00 | 128227.00 | 6375.00 | 3950.00 | 10325.00 | 700.00 | .00 | 700.00 |
| होनर धनादेशावरील | 13050.00 | 6600.00 | 19650.00 | 4200.00 | 4200.00 | 8400.00 | .00 | .00 | .00 |
| टस्टेशन चेक कर | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| ा स्थानेनिल शास्ती | 128974065.00 | 37345251.00 | 166319316.00 | 11733518.00 | 4235219.00 | 15968737.00 | 1711409.00 | 6789.00 | 1718198.00 |
| प स्वच्छता कर | 3666766.00 | 13962066.00 | 17628832.00 | 1218878.00 | 9421826.00 | 10640704.00 | 90063.00 | 199377.00 | 289440.00 |
| शमन कर | 470972.00 | 1842314.00 | 2313286.00 | 173427.00 | 1237040.00 | 1410467.00 | 2092.00 | 2522.00 | 4614.00 |
| न्य पाणीपट्टी | .00 | .00 | .00 | | | | .00 | .00 | .00 |
| रज / गाळा वापर फी | 13942618.00 | 13962556.00 | 27905174.00 | 1026923.00 | 5517621.00 | 6544544.00 | 1565.00 | 8970.00 | 10535.00 |
| एकूण (₹) | 287962209.00 | 225007678.00 | 512969887.00 | 43536974.00 | 136385635.00 | 179922608.00 | 3792378.00 | 590873.00 | 4383251.00 |

सूट (₹) 673573.00    मागाऊ शिल्लक रक्कम (₹) 178504.00

Assistant Director
Local Fund Accounts Audit Satara

15/01/2020

कर निरिक्षक, (...)
वसुली विभाग
नगर परिषद, सातारा.

15/01/2020